"आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य"

(इ.स.१७९१ ते १८३२)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणे)

तात्विक व सामाजिक शास्त्राच्या 'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)

पदवीकरिता सादर केलेला संशोधन प्रबंध

संशोधक

श्री. रणसिंग नवनाथ (नवनीत) बाबूराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ. महादेव भानुदास वाघमारे

मार्च २०१५

आद्य क्रांतिकारक - उमाजी नाईक



(०७/०९/१७९१ ते ०३/०२/१८३२)

प्रतिज्ञा प्रमाणपत्र

मी प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, "आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य" (इ.स.१७९१ ते १८३२) हा पीएच.डी. च्या पदवीसाठी सादर केलेला प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून संपुर्णपणे स्वतंत्र आहे व हा विषय अन्य कोणत्याही विद्यापीठाकडे किंवा कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण - श्रीगोंदा.

दिनांक- मार्च २०१५.

संशोधक

श्री. रणसिंग नवनाथ (नवनीत) बाबूराव

कायम नोंदणी क्र. ०२११०००४३३७

प्रमाणपत्र

श्री . रणसिंग नवनाथ (नवनीत) बाबुराव यांनी "आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य" (इ.स.१७९१ ते १८३२) हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विभागाच्या पीएच.डी. पदवीकरिता अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सन २०१४-२०१५मध्ये सादर केला आहे.

श्री. रणसिंग नवनाथ (नवनीत) बाबुराव यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनातून आद्यक्रांतीकारक राजे उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य" (इ.स.१७९१ ते १८३२) हा प्रबंध साकारलेला आहे. हा शोध प्रबंध स्वतंत्र्यरित्या लिहिलेला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण - जुन्नर.

दिनांक - मार्च २०१५.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. वाघमारे एम. बी.

CERTIFICATE

This is certify that the thesis entitled **"आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य"** (इ.स.१७९१ ते १८३२) submitted by Ransing Navnath (Navneet) Baburao to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the Degree of Doctor of Philosophy (Ph.D.) is a Bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis in full or part have not been submitted to any other institute or University for the award of any other Degree or diploma.

Place : Pune

Date : /03/2015

Signature

Research Guide

ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठांर्तगत तात्त्विक व सामाजिक शास्त्राच्या विद्याशाखेतील इतिहास विषयामधून पीएच.डी. या पदवीसाठी मला "आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य" (इ.स.१७९१ ते १८३२) हा शोध प्रबंध सादर करण्याची जी सुसंधी प्राप्त झाली याबद्दल मी अनेकांचा ऋणी आहे

प्रथम मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू व तात्त्विक व सामाजिक शास्त्राच्या विद्याशाखा विभागाचे प्रमुख अधिष्ठाता प्रा. विजय कारेकर सर यांचे आभार मानतो. त्यांनी मला संशोधनासाठी पात्र ठरवून संधी दिली म्हणूनच मी माझा शोधप्रबंध यशस्वीरित्या पूर्ण करू शकलो, त्यांचप्रमाणे इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ. श्रध्दा कुंभोजकर मॅडम, आणि त्यांच्या नंतर आलेल्या डॉ. पंडित मॅडम यांचे ऋण व्यक्त करण्यास माझ्या जवळ शब्द अपुरे आहेत, तरीही अपुऱ्या शब्दात का होईना मी त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतो. गेल्या तीन वर्षाच्या संशोधन काळात ज्या ज्या वेळी मला अडचण जाणवली त्यावेळी मी त्यांची भेट घेतली, त्याचप्रमाणे मार्गदर्शन मिळण्यासाठी वेळोवेळी फोन केले, त्या त्या प्रत्येक वेळी त्यांनी अगदी सहानुभूतीपुर्वक मला समजावून घेवून सहकार्य केले त्याचप्रमाणे मला संशोधन अभ्यासाचा जो लाभ घेता आला त्यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संबंधीत अधिकारी व स्टाफ यांचे देखील मोलाचे सहकार्य झाले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने प्रस्तुत संशोधनासाठी पात्र ठरवून मला दिलेल्या संधीचे सोने करण्याची जबाबदारी मी स्विकारली, परंतु त्याला मूर्त आकार देण्यासाठी अचुक मार्गदर्शनाची गरज होती ते मार्गदर्शन मला जुन्नर येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राध्यापक सन्मानीय डॉ. एम.बी. वाघमारे यांच्या रूपाने प्राप्त झाले.

त्यांनी मला अगदी सुरूवातीपासून विषयाची निवड, संशोधनासाठी आवश्यक असे मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मुळेच मी हा संशोधन प्रबंध पूर्ण करू शकलो. त्यांनी योग्य वेळी योग्य मार्गदर्शन, उपयुक्त सल्ला तसेच जमा केलेली माहिती त्वरित तपासून देवून साधक बाधक चर्चा करून आपुलकीने आणि परखडपणे सूचना देवून संकलित माहितीची संयुक्तिक मांडणी करण्यास मार्गदर्शन केले. त्या बद्ल मी त्यांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा आयुष्यभर ऋणातच राहणे मला आवडेल.

त्याचप्रमाणे पुणे येथील पुरालेखागार, महाराष्ट्र शासन येथील श्री महेश पाटील यांनी मोडी लिपीतील कागदपत्रांसंबंधी सहकार्य केले. त्याबददल त्यांचा शतशः ऋणी आहे. त्याचप्रमाणे ज्ञानदिप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय श्री. शिवाजीराव नागवडे (बापू) यांनी मला पीएच.डी. करण्यासाठी परवानगी देऊन सहकार्य केले त्यांचेही मी मनःपुर्वक आभार मानतो. तसेच मुधोजी कॉलेज फलटनचे प्राध्यापक डॉ. गावडे सर, त्याप्रमाणे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा येथील इंग्रजी विषयाचे प्रा. ज्ञानदेव गायकवाड सर यांनी मला इंग्रजी विषयाचे भाषांतर आणि खूप महत्वाचे असे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो.

त्याचप्रमाणे आमचे मित्र श्री रमेश सोनवणे सर यांनी मला संशोधन कामात वेळोवेळी सतत सहकार्य व मदत केली. लेखक शिवाजीराव एक्के सर (सासवड) दुसरे लेखक शंकर नऱ्हे (पाबळ) शिरूर, त्याचप्रमाणे श्री दत्तकृपा महाविद्यालय, घारगावचे प्राचार्य श्री डॉ शेळके सर व श्री. विक्रम कांबळे सर यांनी ही सहकार्य व मार्गदर्शन केले.

तसेच छत्रपती महाविद्यालय श्रीगोंदयाचे प्रा. डॉ. राजेंद्र शेळके, प्रा. नंदकुमार साबळे, प्रा. सुरेश रसाळ, प्रा.धेंडे सर, प्रा. डॉ बळे सर त्याचप्रमाणे एम.जे.एस. कॉलेज श्रीगोंदा येथील प्रा. डॉ राजेंद्र ठाकरे, प्रा. रमेश थोरात, त्याचप्रमाणे माझे संशोधक मित्र श्री. नानाभाऊ कुरूमकर सर, रघुराज कुरूमकर (सर),

प्रविण पिसे, प्रा. नारायण गवळी सर (ग्रंथपाल), श्री. वाखारे सर (शिरूर), प्रा. महादेव गोडसे सर (माढा), सुनिल गाडे (उरुळी कांचन) यांनी ही मला खूप सहकार्य करुन संबंधित विषयावर काम करण्यास प्रेरणा व ऊर्जा दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी राहील.

त्याचबरोबर श्रीगोंद्याचे पो. कॉन्स्टेबल श्री. अंकुश ढवळे, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. कांतीलाल ढवळे (नगर), श्री. उत्तरेश्वर मोहोळकर सर (कार्यकर्ते सत्यशोधक समाज) त्याचप्रमाणे अशोकराव (अण्णा) जाधव - अध्यक्ष आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक संघटना महाराष्ट्र राज्य, व वसंतराव चव्हाण - अध्यक्ष, नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक मंडळ महाराष्ट्र राज्य, तुषार भैय्या (खोमणे) सरपंच भिवडी यांनी त्याचप्रमाणे उमाजी नाईकांचे सातवे वंशज चंद्रकांत सुदाम खोमणे यांनी त्यांच्या खोमणे मळयातील उमाजी नाईकांच्या समाधीविषयी प्रत्यक्ष त्या ठिकाणी नेऊन माहिती दिली. या सर्वांनी प्रत्यक्ष वेळ देऊन काही माहिती पुरविली.

तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री आदरणीय श्री. बबनरावजी पाचपुते साहेब (दादा) यांनी विषयासंबंधी साहित्य गोळा करीत असताना मुंबईत राहण्याची सोय केली. त्याचबरोबर माझे आई वडील यांचे आशिर्वाद, पत्नी व मुले यांचे सहकार्य व त्यांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे साथ मिळाली त्यामुळेच खऱ्या अर्थाने शिक्षणामध्ये मी आणखीन एक धाडशी पाऊल टाकू शकलो त्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार.

आणि त्याचबरोबर सर्वात महत्त्वाचे सहकार्य लाभले ते म्हणजे महाराष्ट्र शासनाचे मुंबई अभिलेखागार, संशोधन विभागाच्या प्रमुख सौ. साळुंके मॅडम, व त्यांचे सहकारी स्टाफ, पुणे येथील पेशवे दप्तर येथील श्री. महेश पाटील सर यांनी मोडी लिपीतील कागदपत्रांसंबंधीत सहकार्य केले.

त्याचप्रमाणे पुण्याचे डेक्कन कॉलेजचे ग्रंथालय पुणे येथील गोखले इन्स्टिटयूट, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, अहमदनगर येथील वस्तु संग्रहालय, पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळ व श्रीगोंदा येथील श्री छ. शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथालय.

तसेच यशवंतराव चव्हाण विद्यालय घारगाव या माझ्या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सचिन लगड सर व सर्व सेवक वृंद यांचेही मला वेळोवेळी सहकार्य मिळाले. त्याचप्रमाणे घारगाव येथील शिवम कॉम्प्युटरचे श्री वाजे सर आणि श्रीगोंदा येथील साई डिजीटल्सचे श्री शेख सर यांनी माझ्या प्रबंधाचे टंकलेखन वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल त्यांचाही मनोमन आभारी आहे.

वरील सर्वांच्याच सहकार्याने मला हा प्रबंध पुर्णत्वास नेता आला, त्याबद्दल सर्वांचेच आभार मानने हे मी माझे कर्तव्य मानतो.

अनुक्रमणिका

प्रकरण क्रमांक	शिर्षक	पृष्ठ क्रमांक
	संशोधकाचे प्रतिज्ञा प्रमाणपत्र	I
	मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र	II
	CERTIFICATE	III
	ऋणनिर्देश	IV-VII
	प्रस्तावना	१-४
	संशोधन पध्दती : संशोधन कार्याचा आढावा	५-१६
प्रकरण पहिले	रामोशांचा वैभवशाली इतिहास: एक मागोवा	१७-५१
प्रकरण दुसरे	उमाजीचे पुर्वचरित्र	५२-७६
प्रकरण तिसरे	दुसऱ्या बाजीरावाचे अन्यायी धोरण व उमाजी नाईक आणि रामोशांची वाताहात	७७-८८
प्रकरण चौथे	उमाजी नाईकांचा कंपनी सरकारविरूद्धचा सशस्त्र लढा	८९-१६९
प्रकरण पाचवे	आद्य क्रांतिकारक - उमाजी नाईक	१७०-२१२
प्रकरण सहावे	उपसंहार	२१३-२२४
	संदर्भ सूची	२२५-२३५
	परिशिष्टांची यादी	२३६

	परिशिष्टे १. भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे येथील संपादक- कै.पा.न.पटवर्धन यांचा ऐतिहासिक संकिर्ण साहित्य खंड -५ यामधील लेखांक क्र. १५,१७ २. कॅप्टन अलेझांडर मॅकिंन्टॉश यांनी लिहिलेल्या उमाजीच्या चरित्रातील (इंग्रजीतील) जाहिरनामा ३. ब्रिटिशांच्या हस्ताक्षरांतील ११ पत्रे ४. मोडी १) वंशावळ २) मोडीतील पत्रे ३) लिप्यंतराची महत्वाची पत्रे ४) सातारा महाराज रेसिडेन्सी मराठी दप्तरातील रूमाल नंबर -४७ व ४७ (४४) यामधील प्रबंधात वापरलेली काही मोडी पत्रांचे लिप्यंतर केलेले थोडक्यात घेतलेले आशय.	२३७-२८८
	छायाचित्रे व नकाशे	२८९-२९७

प्रस्तावना :

भारतीय इतिहासाचा तटस्थपणे अभ्यास केला असता असे दिसून येते की, भारताचा राजकीय इतिहास हा परकीय अंमलांचा इतिहास आहे. भारतावर अगदी प्राचीन काळापासून आर्य, मुस्लिम, डच, पोर्तुगीज, फ्रेंच आणि ब्रिटिश अशा अनेक परकीय सत्तांनी वेगवेगळया कालखंडात आक्रमण केले. त्यामध्ये इंग्रज यशस्वी होऊन त्यांनी या देशावर सुमारे दिडशे वर्षे राज्य केले. याच परकीय इंग्रजांची भारतावरील राजवट घालवण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी संघर्ष केला. मग त्यामध्ये अजीमुल्लाखान कुवरसिंह, हुतात्मा शेरअली, बेगम हजरतमहल, वासुदेव बळवंत फडके, वीर लहुजी वस्ताद साळवे, क्रांतिवीर बिरसा भगवान मुंडा, हुतात्मा खुदीराम बोस, हुतात्मा मदनलाल धिंग्रा, हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे, क्रांतिशिरोमणी चंद्रशेखर आझाद, हुतात्मा महावीर सिंग, हुतात्मा सूर्यसेन, मॅडम भिकाईजीरूस्तुम कामा, लाला हरदयाळ, नेताजी सुभाषचंद्र बोस, वि.दा. सावरकर, डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथजी नाईकवडी, राघोजी भांगरे, अशा अनेक क्रांतिकारकांनी मातृभूमीला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी बलिदान दिले.

तसेच उपरोक्त क्रांतीकारकांनी भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या या हवनकुंडात आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांचे योगदान मोठेच आहे. परंतु उमाजी नाईकांना इंग्रजांविरूध्दच्या या सशस्त्र लढयात केवळ आपल्या प्राणांची आहुती द्यायची नव्हती. तर त्यांची सत्ता उलथून टाकून यशस्वी व्हायचे होते. त्यासाठी त्यांनी आपल्या रामोशांची सशस्त्र सेना देखील उभी केली होती आणि इंग्रजांची भंबेरी उडवून दिली होती. हे उमाजी शिवरायांसारखे राज्य स्थापन करतोय की काय? अशी जबर भिती इंग्रजांच्या मनात निर्माण झाली होती. एवढी दहशत निर्माण करणारे उमाजी नाईक त्या दृष्टीने पहिले क्रांतिकारक ठरतात.

परंतु या सर्वांच्यामध्ये कित्तुरची राणी वगळता (१७७८ ते १८२९) १७५७ इंग्रजांच्या विरूध्द सशस्त्र लढा देऊन प्राणाची आहुती देणारे उमाजी नाईक हे पहिले क्रांतिकारक होते. (इ.स.१७९१ ते १८३२) १८५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर हिंदुस्थानात परकीय तुर्क राजवटीबरोबर गोव्यातल्या पोर्तुगिजांसारखे इंग्रजही शिरले. मागोमाग फ्रेंचांनीही त्यांचे बस्तान बसवले. इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट करून इंग्रजांनी सत्तेच्या वर्चस्वात फ्रेंच, पोर्तुगीज आणि अगोदरपासून ठाण मांडून बसलेल्या तुर्कांवर कुरघोडी केली. भारताच्या मोठया भूभागावर कब्जा मिळवून, या सुजलाम् सुफलाम् अशा सुवर्णभूमीची मनाला येईल तशी मोठ्या प्रमाणावर लुट केली. या संदर्भात विल्यम डिग्बी लिहितो की, "इ.स. १७५७ ते १८१५ या कालखंडात हिंदुस्तानच्या संपत्तीमधून १००० दशलक्ष पौंड एवढी रक्कम इंग्लंडच्या बँकेमध्ये स्थलांतरीत झाली होती.'' अशा परकीय आक्रमकांशी प्रदीर्घ काळ संघर्ष करून आपली अस्मिता आणि धर्म टिकवून स्वातंत्र्य मिळवणारे एकमेव राष्ट्र म्हणजे भारत. युरोपियन राष्ट्रांकडून स्वातंत्र्य मिळवणारे एकमेव राष्ट्र म्हणजे भारत. युरोपियन राष्ट्रांकडून स्वातंत्र्य मिळवणाऱ्या भारताशिवाय एकाही राष्ट्राला स्वत:ची अस्मिता, संस्कृती आणि धर्म टिकवता आला नाही. अनेक देशांमधील प्राचीन संस्कृती या सत्तापिपासू, धर्मांध युरोपियनांनी नष्ट केल्या.

प्रथम तुर्क आक्रमकांविरूध्द आणि नंतर युरोपियन आक्रमकांविरूध्द सतत पराकोटीचा संघर्ष करून भारताने स्वातंत्र्य मिळवले त्यासाठी देशाला अपरिमित हानी सोसून मोठी किंमत मोजावी लागली. या प्रदीर्घ काळ चाललेल्या स्वातंत्र्य समरामध्ये अनेक देशभक्तांच्या, क्रांतिकारकांच्या घरादारांची आणि संसाराची राखरांगोळी झाली. अनेकांनी अजन्म कारावास भोगला. क्रांतिकारकांना फाशी सहन करावी लागली. कित्येकांना देश सोडून परागंदा व्हावे लागले, तर कित्येकांनी विजनवासात दिवस कंठले. विविध मार्गांनी लढल्या गेलेल्या या स्वातंत्र्य समरात देशभक्तांनी, क्रांतीकारांनी आपल्या प्रखर राष्ट्रनिष्ठेने, ज्वाज्वल्य राष्ट्रभक्तीने, रोमहर्षक पराक्रमाने, अत्यंत हाल अपेष्टा

सोसून भारताला स्वातंत्र मिळवून दिले. या स्वातंत्र्य लढयात अगदी सुरूवातीस इंग्रजांविरुध्द दंड थोपटून उभा राहणारा महाराष्ट्रातील पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील रामोशी समाजातील एक ढाण्या वाघ 'उमाजी नाईक' पुढे आला. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे, ती म्हणजे सर्वात अगोदर ब्रिटिशांविरूध्द सशस्त्र लढा देऊन फासावर गेलेल्या, या आद्यक्रांतिकारकाचा इतिहास आजही फारसा प्रकाशात आलेला नाही. महाराष्ट्रात जे आदिवासी बंडखोर होते, त्यात खानदेशातील भिल्ल व सातारा जिल्हयातील रामोशी प्रमुख होते. पुणे व साताऱ्याकडील रामोशांना इंग्रजी राजवटीत कामांवरून कमी केले. त्यांची इनामे जप्त केली. त्यामुळे त्यांनी चिडून जाऊन इंग्रजांविरूध्द सशस्त्र उठाव केले. त्यांनी उमाजी नाईकांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांना घालवून देण्यासाठी बंड उभारले. रामोशी गोरगरिबांना व रयतेस छळत नसत. वेळप्रसंगी, गरिबांना अंगावरची वस्त्रेसुध्दा दान करीत. ब्राम्हणांना दक्षिणा देत. मंदिरांना देणग्या देत असत. उमाजी नाईकास पकडणारा ब्रिटिश अधिकारी कॅप्टन अलेक्झांडर मॅकिंन्टॉश म्हणतो की, "उमाजीच्या दृष्टीपुढे नेहमी छत्रपती शिवाजीचे उदाहरण होते. शिवाजीप्रमाणे आपणही मोठे राज्य कमवावे, अशी त्याची उमेद होती."

पुणे व साताऱ्याकडील रामोशांच्या ७-८ वर्षे सतत चाललेल्या उठावांमुळे इंग्रज त्रस्त झाले होते. उमाजी नाईकांसंबंधी त्यांच्या शत्रुने मॅकिंन्टॉशने काढलेले हे उद्‌गार म्हणजेच उमाजीच्या उद्देशाची आणि क्रांतिकार्याची पावती होय. उमाजी नाईकांचा हा लढा म्हणजेच भारतीय स्वातंत्र्य लढयाची ती नांदी होती. भारतीय त्यापासून प्रेरणा घेतील आणि मग आपणास भारतावर राज्य करणे अवघड जाईल अशी ब्रिटिशांची धारणा होती. नुकतीच पेशवाई संपुष्टात आली असली तरी मराठेशाही अजून संपुष्टात यायची होती. उमाजीचं लोण न जाणो सगळीकडे पसरले तर हे लोक पुन्हा येऊन आपल्या विरूध्द सशस्त्र लढा देण्याच्या भीतीने, इंग्रजांनी उमार्जीच्या स्वातंत्र्य लढयाला फारसे प्रचारात येऊ दिले नाही. स्वातंत्र्योत्तर भारतातही इतिहासकारांनी या थोर स्वातंत्र्य वीराला उपेक्षितच

ठेवले. या उपेक्षित आणि इतिहासापसून वंचित असलेल्या उमाजी नाईकांचा इंग्रजांविरूध्दचा स्वातंत्र्य संघर्ष मांडण्याचा प्रयत्न या शोधप्रबंधामध्ये केलेला आहे.

या देशात कंपनीसरकारला जे लोक सहकार्य करीत, त्यांना उमाजी चांगली अद्दल घडवित होते. उमाजीने फितूर लोकांना आणि कंपनीसरकारला सळो की पळो केले होते. उमाजीने प्रतिसरकारची घोषणा करून १६ फेब्रुवारी १८३१ रोजी संपूर्ण भारतातील रहिवाशांना उद्देशून एक वैशिष्टयपूर्ण जाहीरनामा काढला. नव्या सरकारचा प्रमुख म्हणून सर्व प्रजाजनांनाच नव्हे तर नवे-जुने राजे, सरदार इत्यादींना अनेक हुकूम उमाजीने सोडले होते. जाहिरनाम्यातील विशेष गोष्ट म्हणजे उमाजी नाईकांनी सगळयाना एकदम एकाचवेळी उठाव करण्याचे मुद्दाम बजावले होते. नवीन सरकारने एकत्रीतपणे आणि योजनाबध्दरीतीने इंग्रजांशी सामना करून त्यांचे भारतात नामोनिषानही राहणार नाही हे उमाजीस पहावयाचे होते. जाहीरनामा लहान असला तरी त्यात फार मोठा स्वातंत्र्यलढयाचा विचार ठासून भरलेला होता. प्रत्येक शब्दाला मोठा आशय व तिक्ष्ण धार होती.

उमाजी नाईकांच्या स्वातंत्र्य लढयाचे प्रेरणास्थान छत्रपती शिवाजीमहाराज हे होते. उमाजीचे जन्मगाव 'भिवडी' हे पुरंदरच्या परिसरातच आहे. हा सर्व परिसर दऱ्याखोऱ्यांचा असल्याने क्रांतिकार्यास अनुकूल असाच होता. याच परिसरात छत्रपती शिवाजीमहाराजांनी जो इतिहास घडविला व रयतेच्या सुखासाठी निर्माण केलेल्या सुराज्याच्या कथा उमाजीने ऐकल्या होत्या. शिवरायाप्रमाणे आपणही रयतेचे कल्याण करणारे सुराज्य निर्माण करावे अशी प्रेरणा त्यांच्या मनात निर्माण झाली. उमाजी नाईकांनी स्वतःचे राज्य निर्माण झाल्याचे घोषित केले व शिवरायांप्रमाणे गोरगरिबांना मदत केली. स्त्रियांच्या अब्रुचे रक्षण केले. हेच रयतेचे राज्य निर्माण करण्यासाठी उमाजी आयुष्यभर झगडले म्हणून त्यांच्या कार्याची नोंद इतिहासाला घ्यावी लागली. उमाजी नाईक यांचे क्रांतीकार्य 'स्वातंत्र्यसंघर्ष' या नात्याने कोणी प्रकाशात आणले नाही, ते इतिहासापासून वंचित राहिले. अशा आद्यक्रांतिकारकाचा

इतिहास नव्याने प्रकाशात यावा याच हेतूने मी "आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य" हा विषय माझ्या शोध प्रबंधासाठी निवडला आहे.

संशोधन पध्दती : संशोधन कार्याचा आढावा

संशोधन समस्या

उमाजी नाईक यांच्या क्रांतिकार्याबददल चार दोन पुस्तके व कादंबऱ्यांच्या द्वारे थोडे फार लेखन झाले आहे परंतु त्यांचे खरे क्रांतिकार्य, प्राथमिक साधनांच्या आधारे कोणी मांडल्याचे दिसत नाही. याचे कारण असेही असू शकते की उमाजीचे व्यक्तिमत्व वंचित समाजातील होते. उमाजी नाईकांचे क्रांतिकार्य 'स्वातंत्र्य संघर्ष' या नात्याने कोणी प्रकाशात आणले नाही. ते इतिहासापासून वंचित राहिले आहे.

१९७० च्या सुमारास 'ॲन्तोनिओ ग्रामचीने' सबाल्टर्निझमचा विचार मांडला आणि त्याला तात्विक बैठक दिली. सबाल्टर्न म्हणजे 'कनिष्ट दर्जाचे, कमी दर्जाचे', दुय्यम. उदा. ग्रामचीच्या मते एखाद्या लढाईतला विजय सेनापतीच्या किंवा राजाच्या नावे नोंदला जातो पण हे त्याचे एकटयाचे श्रेय नसते. हा विजय प्रत्यक्ष रणभूमीवर लढणाऱ्या सामान्य सैनिकांचाही असतो. याच दुर्लक्षीत गटाला केंद्रस्थानी मानून इतिहासाचा अभ्यास होऊ लागला. भारतातही या वंचितांच्या कर्तृत्वाला केंद्रस्थानी ठेऊन रणजित गुहा यांनी सबाल्टर्न हिस्ट्रीचा प्रकल्प राबविला. याच प्रकल्प अभ्यासातून निरनिराळया भागातील आदीवासींचे व शेतमजुरांचे योगदान नोंदवले गेले. इतिहास अभ्यासाची ही नवी शाखा आता स्थिर होताना दिसते आहे.

म्हणूनच सबाल्टर्न (वंचित) हे इतिहासाचे कर्ते बनले आहेत. सबाल्टर्न चळवळी, लढे हे वाढत्या शोषणाविरुध्द झाले आहेत. त्यांचा हा विरोध अधिसत्तेची केंद्रे यांच्यावरील हल्ल्याने स्पष्ट होतो. सबाल्टर्नवादी इतिहासकारांनी सबाल्टर्न जाणीव केंद्रस्थानी ठेऊन इतिहास लिहिण्याचा उद्देश ठेवला आहे. वंचितांचा इतिहास हया संकल्पनेच्या अगोदर

म्हणजे इ.स.१७९१ ते १८३२ हा उमाजी नाईकांचा कार्यकाल असल्याने त्यांचेकडे तत्कालीन व आजपर्यंतच्या इतिहास लेखकांचे लक्ष गेले नाही.

म्हणूनच आद्यक्रांतिकारक या नात्याने उमाजीचे प्रकाशात न आलेले क्रांतीकार्य हीच एकमेव समस्या मनी धरून हया विषयाचा विचार केला. कारण हा विषय महत्वाचा असल्यामुळे यावर संशोधन होणे आवश्यक आहे.

संशोधनाचा उद्देश

भारतीय क्रांतिकारी चळवळीत महाराष्ट्रराज्य आघाडीवर होते. यामध्ये साताऱ्याचे क्रांतिसिंह नाना पाटील, वासुदेव बळवंत फडके, कुंवरसिंह, वीर लहुजी वस्ताद, बेगम हजरत महल अशा अनेक क्रांतिकारकांनी योगदान दिले. त्यापैकी एक महान क्रांतिकारक 'उमाजी नाईक' यांचे क्रांतिकारी चळवळीतील योगदान व ब्रिटिश विरोधी लढा आज काळाच्या पडदयाआड गेला आहे. त्यांचे हे कार्य आजच्या तरुण पिढीला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरू शकेल. त्यांनी प्रतिकुल परिस्थितीमध्ये गनिमी काव्याच्या मदतीने त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून टाकले होते.

उमाजी नाईकांनी स्वतःचे सैन्य उभे करून डोंगर दऱ्यामध्ये राहून ब्रिटिशांना जबरदस्त आव्हान देऊन मोठा हादरा दिला. उमाजीने डोंगर दऱ्यांमध्ये छोटसं राज्य उभारण्याचा प्रयत्न केला.म्हणून या भुमीपुत्राचा खरा इतिहास स्फुर्तिदायक आहे. चेतना व प्रेरणा देणारा आहे. परंतु आजही हे व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआडच दडले आहे. इंग्रजांविरूध्द लढताना फासावर गेलेला पहिला क्रांतिकारक नरवीर उमाजी राजे नाईक यांचे कार्य मार्गदर्शक व तितकेच मोलाचे आहे. त्यांचा शोध घेऊन आजच्या समाजापुढे त्यांचा आदर्श मांडण्याची आवश्यकता आहे म्हणूनच मी या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१) रामोशांच्या वैभवशाली इतिहासाचा थोडक्यात आढावा घेणे.

२) उमाजी नाईकांच्या पूर्व आयुष्याबद्दल समाजाला माहिती करून देणे त्यांची शिकवण व त्यांची प्रेरणा याची ओळख करून देणे.

३) उमाजी नाईकांच्या समकालीन ऐतिहासिक, राजकीय, भौगोलिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

४) दुसऱ्या बाजीरावाच्या अन्यायी धोरणांमुळे रामोशांची व उमाजी नाईकांच्या स्थलांतराच्या व हालाखीच्या पेचप्रसंगाच्या परिस्थितीचा आढावा घेणे.

५) उमाजी नाईकांचा क्रांतिकारी लढा समाजापुढे आणावा हे उद्दिष्ट आहे.

६) उमाजी नाईकांच्या कर्तृत्वाचा आवश्यक साधनांच्या आधारे अभ्यास करणे.

७) तत्कालीन सामाजिक, राजकीय अशा प्रतिकुल परिस्थितीत उमाजी नाईकांनी बजावलेल्या क्रांतीकारी भूमिकेचा आढावा घेणे.

८) इंग्रजांविरूध्द उमाजीने केलेल्या संघर्षाचा व त्यांच्या बंडाचा साधनांच्या आधारे अभ्यास करणे.

९) उमाजीच्या लढयामुळे सामाजिक, राजकीय जीवनावर जे परिणाम झाले त्याचा वेध घेणे.

१०) इतिहास लेखनापासून दुर्लक्षित राहिलेले क्रांतिकारक उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य प्रकाशात आणणे.

गृहितके

१) उमाजी नाईक हे महान देशभक्त होते.

२) कालखंडाचा विचार करता उमाजी नाईक हेच आद्यक्रांतिकारक होते.

३) उमाजी नाईकांचे क्रांतिकारी चळवळीतील कार्य महत्वपूर्ण आहे.

४) ब्रिटिशांविरूध्द लढण्यासाठी उमाजीने जनमाणसांत प्रेरणा व स्फुर्ती निर्माण केली.

५) उमाजी नाईकांचे कार्य तरुण पिढीला मार्गदर्शक ठरणार आहे.

६) उमाजी नाईकांची जडण - घडण प्रतिकुल परिस्थितीत झाली आहे.

७) उमाजी नाईकांनी सामान्य माणसांच्या हिताचे राज्य निर्माण झाल्याची घोषणा केली.

८) स्वराज्य व सुराज्य निर्मितीमध्ये रामोशी नाईकांचा सिंहाचा वाटा आहे.

९) उमाजी नाईक प्रचंड धाडशी, चतुर, गरिबांचा वाली, रयतेचा राजा व स्त्रियांचे रक्षक होते.

१०) उमाजीला शिवरायांप्रमाणे रयतेचे कल्याण करणारे स्वराज्य निर्माण करावयाचे होते.

११) ब्रिटिशांविरूध्द लढा देऊन प्राणाचे बलिदान करणारे इतिहासातील पहिले क्रांतिकारक उमाजी नाईक आहेत.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

'आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे जीवन व कार्य' या विषयावर संशोधनात आढावा घेण्यात आला आहे. त्यासाठी (इ.स १७९१ ते १८३२) हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. उमाजी नाईक हे वंचित समाजातील एक महान व धाडशी क्रांतिकारक होते. त्यांनी परिस्थिती प्रतिकुल असताना सुध्दा इंग्रजांशी कसा संघर्ष केला हे पटवून देऊन उमाजीचे स्वातंत्र्य लढयातील योगदान महत्वाचे आहे.

संशोधन पध्दती

जिज्ञासाने ज्ञान प्राप्त करणे हे माणसाची मुलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियाचा उपयोग करीत असतो. सभोवतालच्या जीवनाचे अवलोकन करतो त्याच्यापासून विविध प्रकारचे अनुभव घेतो. संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे व तथ्ये परीक्षणासाठी तयार केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय.

इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पध्दती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. आपण कोणती संशोधन पध्दती वापरायची, आपणास कोणत्या प्रकारची माहिती गोळा करावयाची आहे. त्यावरही आधारीत असते. मी माझ्या या शोध प्रबंधासाठी १) वर्णनात्मक संशोधनपध्दती

२) सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दती ३) संदर्भ संशोधन पध्दती ४) विश्लेषणात्मक संशोधन पध्दती. या पध्दतींचा उपयोग केलेला आहे. कागदपत्रांच्या आधारे प्रचलित ज्ञानामध्ये भर घालून एखाद्या प्रश्नावर नवा प्रकाश टाकणे तसेच मुलभूत संशोधनामध्ये काहीतरी नवीन भर घालणे हा ऐतिहासिक संशोनधनाचा हेतू असतो. त्यासाठी वरील सर्वच पध्दतींचा उपयोग करून उमाजी नाईक यांच्यावर अप्रकाशित स्वरुपाचे महाराष्ट्र शासनाच्या मुंबई येथील अभिलेखागारातील ज्यूडीशियल डिपार्टमेंट व पॉलीटिकल डिपार्टमेंटचे विविध खंड, त्यातील महत्त्वाचे ब्रिटिशांचे हस्ताक्षरातील काही पत्रांचा व पुणे येथील पेशवे दप्तरातील काही मोडी लिपीतील पत्रांचा प्राथमिक साधने म्हणुन उपयोग केला आहे. त्याचप्रमाणे कॅप्टन अलेक्झांडर मॅकिंन्टॉश यांनी लिहिलेले उमाजीचे चरित्र याचाही उपयोग केला आहे.

वर्णनात्मक संशोधन पध्दती

यामध्ये नवीन माहिती प्रकाशात आणण्यापेक्षा उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक माहितीचा, ऐतिहासिक साधनांचा नव्या दृष्टिकोनातून अभ्यास करून प्रस्थापित प्रयोगाहून भिन्न प्रमेये मांडणे हा उद्देश असतो. उपलब्ध साधन सामग्रीचे पुन:परीक्षण करून प्रचलित मतांपेक्षा वेगळा निष्कर्ष काढण्याचा संशोधनाचा प्रयत्न असतो. यात नव्या साधनांच्या संशोधनाला स्थान नसते असे नाही. नवी सामग्री, नवा पुरावा हाती लागल्यामुळे नवी प्रमेये मांडण्यास पुष्टी मिळते.मात्र अशा संशोधनात संपूर्णभर नव्या पुराव्याच्या मांडणीवर असतो. उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ लावण्याचा संशोधनाचाहेतू असतो.

सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दती

इतिहासामध्ये मोठया प्रमाणात ही पध्दती वापरली जाते. समाजशास्त्रीय संशोधनही या पध्दतीवरच आधारित असते. सर्वेक्षणात मिळालेली माहिती संकलित करून तिचे निरनिराळया प्रकारे विश्लेषण करावे लागते या विश्लेषणाची पध्दत संशोधन विषयावर अवलंबून असते. सर्वेक्षण म्हणजेच संशोधन नव्हे. सर्वेक्षणातून मिळालेली माहिती

कितपत नवी आहे आजपर्यंतच्या अभ्यासकांना ती खरोखरच अज्ञात होती का, हे महत्त्वाचे असते. अशा प्रकारे सर्वेक्षणातून उपलब्ध माहितीचा उपयोग संशोधनात करता येतो.

संदर्भ पध्दती

या पध्दतीची पहिली पायरी म्हणजे संदर्भ ग्रंथांची यादी तयार करणे, संदर्भ ग्रंथांची विश्वसनियता तपासावी लागते, इतिहास म्हणजे मानवी जीवनाचा समग्र आलेख ही भूमिका स्विकारल्यानंतर प्रकाशित वाङ्:मय व ग्रंथातून अभिव्यक्त होणारे सामान्यांचे, तळागळातल्या लोकांचे जीवनही अभ्यासले जाऊ शकते. या प्रकारच्या संशोधनात समग्र वाचन व उपलब्ध माहितीचे विषयानुरूप विश्लेषण अपेक्षित असते. या विश्लेषणात काही प्रमाणात तर्कशुध्द असे अनुमानेही काढावी लागतात. या तर्कशुध्द विवेचनाला समर्पक असा पुरावा देत जाणे आगत्याचे असते. आणि हे पुरावे म्हणजे पूर्वाश्रमीचे लिखाणच असते.

विश्लेक्षणात्मक संशोधन

या प्रकारात उपलब्ध माहितीच नव्या दृष्टीकोनातून अभ्यासता येते. व तिचे विश्लेषण करता येते. यामध्ये ऐतिहासिक साधनांचे पुनर्मुल्यांकन करावे लागते. साधनांची विश्वसनियता नव्याने तपासली जाते व उपलब्ध माहितीची तर्कशुध्द मांडणी केली जाते. त्या विश्लेषणातून नवा अर्थ निघतो किंवा प्रस्थापित अर्थ पुनर्प्रस्थापित होतो. थोडक्यात उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ लावण्याचा संशोधकाचा हेतू असतो.

इतिहास संशोधनाचे वरील प्रमाणे विविध प्रकार असले तरी माझे सदर संशोधनाचा विषय वरील सर्वच संशोधन पध्दती प्रकारात मोडतो म्हणजेच इतिहास संशोधनात अशा निरनिराळया संशोधन पध्दती वापरल्या जातात. शेवटी संशोधन ही एक शिस्तबध्द प्रक्रिया आहे. एक तर्क सुसंगत अशी वैचारिक प्रक्रिया आहे.

इतिहासाचे पुनर्लेखन

एखाद्या ऐतिहासिक घटनेची कारणमीमांसा करताना किंवा त्या घटनेचे स्पष्टीकरण देताना त्या घटनांची कारणे त्यांची वर्गवारी इतिहासकार करतो आणि अनेक कारणांमधून एखाद्या कारणाला अग्रक्रम देऊन त्या आधारे संशोधन करीत असतो. त्यासाठी इतिहासाचे पुनर्लेखन आवश्यक ठरते. त्यामुळे इतिहास लेखनात विविधता येते इतिहासाच्या पुनर्लेखनामुळे एकाच गोष्टीकडे पाहण्याचे अनेक वेगळे दृष्टिकोन असू शकतात याचा प्रत्यय येतो.

एखाद्या घटने बाबत उपलब्ध असलेले सर्व पुरावे तपासतांना त्यामधून सर्व दुवे, शर्ती येतील असे नाही काही दुवे संदिग्ध अभ्यास वाटतात तर काही ठिकाणी लहानशी पोकळी आहे असे वाटते. ती भरून काढणे इतिहास संशोधकाचे कर्तव्य असते. अशा स्थितीमुळे इतिहासाच्या पुनर्लेखनाला किंवा पुनर्संशोधनाला वाव मिळतो. प्रत्येक संशोधक आपल्या बौध्दिक व मानसिक क्षमतेनुसार वैचारिक धारणेनुसार व कल्पनाशक्तीच्या मदतीने सुटे दुवे साधतो. थोडक्यात प्रत्येक इतिहासकाराच्या कल्पना शक्तीचा वापर वेगवेगळया प्रकारे होत असल्यामुळे इतिहासाचे पुनर्लेखन करण्यास संधी मिळते.

सिध्दांत कल्पना

इतिहास म्हणजे मानवी जीवनाचा आलेख आहे. राजकीय घडामोडी हाच केवळ मानवी जीवनाचा महत्वाचा पैलू नाही. मानवी जीवन विविधांगी आहे. व्यक्ती, मग ती कितीही महान असो. समाजाचा केवळ ती एक घटक आहे. त्यामुळे व्यक्तीचा नव्हे तर समाजाचा आणि केवळ राजकीय नव्हे तर इतरही पैलुंचा अभ्यास केल्याखेरीज मानवी कृत्याचे व जीवनाचे यथार्थ आकलन होणार नाही.

सामाजिक इतिहास आणि समाजशास्त्रीय इतिहास या दोन्हीतील समान घटक म्हणजे मानवी समाज होय. ट्रिव्हेलियनच्या मतानुसार भिन्न गटांचे दैनंदिन जीवन, भोजनपध्दती, वेशभुषा, चालीरिती, धार्मिक निष्ठा, परंपरा, मुल्यव्यवस्था, उपजीविकेची

साधने, कौटुंबिक जीवन तसेच सामाजिक स्थित्यंतरे यांचे वर्णन सामाजिक इतिहासात अपेक्षीत आहे. तर विषयाची मांडणी, त्याची शास्त्रीय पध्दतीने चिकित्सा आणि या चिकित्सक विश्लेषणातून सामाजिक सिध्दांताचा उद्‌भव हे समाजशास्त्रीय इतिहासाचे रुप आहे.

फ्रेंच तत्वज्ञ ऑगस्त कॉम्त याने १८३८ साली हा विचार व्यक्त केला. समाजशास्त्र या संज्ञेचा जनकही ऑगस्त हाच आहे. मानवी विकासाचा व कृतींचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास हा विचार मांडून त्याने इतिहास व समाजशास्त्र यांची निकटता प्रस्थापित केली. ऐतिहासिक घटनांच्या सत्यतेची खातरजमा करून घेतल्यानंतर भोतिकशास्त्राप्रमाणे संशोधकाने घटितांची तर्कनिष्ठरित्या संगती लावून, कार्यकारण मीमांसा केली तर त्यातून सार्वकालीन स्वरुपाचे सामान्य सिध्दांत शोधून काढता येतील. असे त्याचे मत होते.

मानव आपला इतिहास स्वत: घडवितो असे मार्क्स म्हणत असला तरी हवा तसा इतिहास तो घडवू शकत नाही. गतकाळापासून जी परिस्थिती अस्तित्वात येते त्या परिस्थितीत इतिहास घडतो म्हणूनच प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भातच मानवी व्यवहारांचा व समाजाच्या मानसिकतेचा विचार आवश्यक ठरतो. मानवी समुहांचे होणारे स्थलांतर, त्यामागील मानसिकता तसेच समाजात अनिष्ट विकृती, प्रवृत्ती, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, नीतिमूल्यांचा ऱ्हास निर्माण होण्याची मीमांसा या सर्व बाबींचे तर्कशुध्द विश्लेषण व विवेचन समाजशास्त्रीय इतिहास संशोधनात अपेक्षित असते.

प्रकरण रचना

१. रामोशांचा वैभवशाली इतिहास - एक मागोवा

२. उमाजीचे पूर्वचरित्र

३. दुसऱ्या बाजीरावाचे अन्यायी धोरण व उमाजी नाईक आणि रामोशांची वाताहात.

४. उमाजी नाईकांचा कंपनी सरकार विरूद्धचा सशस्त्र लढा.

५. आद्यक्रांतिकारक उमाजी नाईक

६. उपसंहार

निष्कर्ष

सभोवतालच्या प्रादेशिक आणि सांस्कृतिक वातावरणाचा आणि स्वत:च्या कौटुंबिक परिस्थितीचा उमाजीवर पगडा होता, म्हणूनच त्यांनी ब्रिटिशांच्या प्रशासकीय पध्दती विरूध्द प्रतिकुल परिस्थितीतही काही सहकाऱ्यांना बरोबर घेऊन ब्रिटिशांशी सशस्त्र लढा दिला. इ.स. १८१८ ते १८३१ हया दरम्यान उमाजीने आपल्या अंगी जे काही विध्वंसक व विधायक कर्तृत्व होते ते दाखवून दिले. रामोशी कुळातील उमाजीने एक चोर लुटारू म्हणून लौकिक जीवनाचा आरंभ केला. परंतु नंतरच्या काळात परकीय सत्तेविरूध्द त्यांच्या मनात चीड निर्माण झाली होती. त्याच्याकडे संघटन कौशल्य होते.

इ.स. १८२७ पासून १८२८ च्या दरम्यान उमाजीच्या दृष्टीकोनात अगदी निश्चित असा सरकारला आणि सर्वसामान्य रयतेलाही ठळकपणे जाणवलेला एक बदल झाला. तो म्हणजे त्याने चोऱ्यामाऱ्या दरोडे इ. सोडले नाही परंतु आपण चोर नाही सरकार आहोत. इंग्रजांची जागा घेणाऱ्या नव्या सरकारचे प्रमुख आहोत अशी विलक्षण भुमिका त्याने घेतली.

छत्रपती शिवरायाप्रमाणे नवीन राज्य स्थापन करण्याची आपल्या स्वत:च्या कर्तबगारीवर, शौर्यावर मोठी महत्त्वाकांक्षा धरली. उमाजीच्या अंगी नीतिमत्ता, शुध्द वर्तन, शुध्द चारित्र्य, निर्व्यसनी बाणा व शौर्य इ. गुण होते. म्हणूनच परकियांच्या गुलामगिरीतून मुक्ती मिळविण्यासाठी पुरंदरच्या परिसरात दऱ्याखोऱ्यांमध्ये छोटंसं सैन्य जमवून ब्रिटिशांच्या विरोधात दंड थोपटून संघर्षाचा पवित्रा घेतला होता. आपल्या मातृभुमीवर, गरीबांवर अन्याय झाल्याच्या भावनेने परकीय सत्तेविरुध्द बंड करून उघड ताठ मानेने संघर्ष करणारे उमाजी राजे हे महाराष्ट्रातील, देशांतील पहिले क्रांतिकारक होते.

त्याचप्रमाणे उमाजीचे क्रांतीकारी चळवळीतील कार्य महत्त्वपूर्ण आहे. उमाजीने सामान्य माणसांच्या हिताचे राज्य निर्माण झाल्याची घोषणा करून एक जाहिरनामा काढला होता. उमाजीस शिवरायांप्रमाणे रयतेचे कल्याणकारी राज्य निर्माण करावयाचे होते.

ब्रिटिशांनी बऱ्याचशा भारतीय प्रांतावर सत्ता स्थापली होती म्हणून त्यांना येथून हाकलून देऊन आपली भूमी आपल्या ताब्यात ठेवायची, आणि आपल्या भूमीवर आपल्याच लोकांची सत्ता कायम राखण्याचा एक मोठा विचार उमाजींनी मांडला होता. त्याच दृष्टीने कार्यक्रम आखून तो प्रत्यक्षात आणण्यासाठी उमाजी नाईक पूर्ण शक्तीनिशी झटले, धडपडले.

थोडक्यात गुन्हेगार मानल्या जाणाऱ्या रामोशी जातीत जन्मलेल्या एका धुरंदराने "आम्ही चोर नाहीत, बंडखोर आहोत"असा खणखणीत इशारा इंग्रजांना पाठवावा. सुडाने पेटुन उठून ब्रिटिशांशी गणिमी काव्याने लढा देऊन त्यांना सळो की पळो करून सोडावे आणि एका देशव्यापी क्रांतीचे स्वप्न पहावे. यातच उमाजीचा मोठेपणा व कर्तृत्व दिसते. उमाजी निरिच्छ वृत्तीचे होते. त्यांनी स्वत:साठी संपत्ती बाळगली नाही. त्याकाळातील सर्व संस्थानिक सरंजामदार विलासी जीवनात लोळत पडले असतांना उमाजी सारखा एक स्वातंत्र्य पिपासू रामोशी आपल्या मुठभर सहकाऱ्यांनिशी ब्रिटिशांविरुध्द सशस्त्र उभा राहिला. याची इतिहासाला नोंद घ्यावीच लागली.

संशोधनाची साधने

सदर संशोधन पूर्ण करण्यासाठी संबंधीत विषयाशी जाणकार अशा व्यक्तिच्या मुलाखती प्रत्यक्ष जाऊन घेतल्या. त्यामध्ये उमाजी नाईक यांच्यावर लिखाण करणारे पाबळ येथील श्री. शंकरराव नऱ्हे, सासवडचे शिवाजीराव एक्के यांच्या मुलाखती घेतल्या. क्रांतिकारक उमाजी नाईकांच्या विषयी त्यांच्या नंतरच्या सातव्या पिढीतील त्यांचे वंशज चंद्रकांत व कांता खोमणे यांच्याकडूनही काही माहिती जाणून घेतली. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष त्या क्षेत्राची पहाणी करून उमाजी नाईकांचे समाधी स्थळाविषयी, समाधी स्थळावर जाऊन माहिती घेतली. जेजुरी ते पुरंदर दरम्यान पांगरी, कऱ्हेपठार, भिवडी या उमाजीच्या वास्तव्याच्या सर्व ठिकाणांचा अभ्यास प्रत्यक्षपणे अनुभवला.

त्याचप्रमाणे संशोधनाचे प्राथमिक साधन म्हणून जे काही कागदपत्रे वापरली ते पुढीलप्रमाणे आहेत.

अ) अप्रकाशित कागदपत्रे

यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या मुंबई येथील अभिलेखागारातील महत्वाचे अप्रकाशित खंडांतील संशोधनास उपयुक्त असे काही कागद वापरले. त्यात सर्व सरकारी पत्रे आहेत. त्यामध्ये मूळ अस्सलपणा आहे कारण ते सर्वच ब्रिटिशांच्या हस्ताक्षरामध्ये आहेत. ही सर्व पत्रे इंग्रजीत असून सर्व फायर्लीमध्ये विषयावार व सालावर बांधलेली आहेत. यामध्ये Judicial DepartmentवPolitical Departmentहया दोन प्रकारच्या फायली महत्वाच्या आहेत.

त्याचप्रमाणे पेशवे दप्तरातील (पुणे येथील) काही मोडी कागदपत्रे सातारा महाराज रेसिडेन्शी मराठी दप्तर, अशा नावाने काही रुमाल आहेत त्यातील रुमाल नं. ४७ व ४७ (४४) मधील बरेच मोडीतील पत्रे या सर्वांचा वापर मी माझ्या संशोधनात केला आहे. वरील महत्वाच्या कागदांपैकी काही इंग्रजी व मोडी पत्रे मी परिशिष्टात सामाविष्ट केली आहेत.

ब) प्रकाशित कागदपत्रे

१)Account of the origin present condition of The Tribe of Ramossies (including the Life of The chief oomiah Naik)हे कॅप्टन अलेक्झांडर मॅकिन्टॉश यांनी उमाजीचे लिहिलेले चरित्र

२)The Tribes and castes of Bombay हे R.E. Enthoven यांचे volume No. III

३)People of India, Maharashtra, Volume XXX Part Theree

इ.स. १८३२ मध्ये उमाजी नाईकांना फाशी दिल्यानंतर त्यांना पकडणारा व फाशी देणारा ब्रिटिश अधिकारी अलेक्झांडर मॅकिन्टॉश यांनी उमाजीस पडकल्यापासून ते त्यांना फाशी दिले या दरम्यानच्या कालावधीत स्वतः उमाजी नाईकांबरोबर बातचीत करून चर्चा

करून व माहिती घेऊन त्याचप्रमाणे सरकार व उमाजी यांचा संघर्षाचा आढावा घेऊन अगदी खात्रीलायक व विश्वसनिय असे उमाजी नाईकांचे चरित्र इ.स. १८३४ मध्ये लिहिले. याच इंग्रजीत लिहिलेल्या चरित्राचे मराठी भाषांतर अ.ना. भागवत यांनी १९१० मध्ये केले. मराठी भाषेत उमाजी नाईकांवर नाटक, पोवाडे लिहिलेले आहेत परंतु असे ललित साहित्य मी माझ्या शोध प्रबंधात त्याचा आधार घेतलेला नाही.

पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळातील संपादक कै. पा.न. पटवर्धन यांचा ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड - ५ यामध्ये उमाजी नाईकांची काही पत्रे आहेत.त्यांचाही उपयोग व आधार घेतलेला आहे. त्याचप्रमाणे "महाराष्ट्रीय ज्ञानकोश" "देशभक्त कोश" वा. कृ. पुरंदरेची "ऐतिहासिक ग्रंथमाला". तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचा "मराठी विश्वकोश (खंडे १४)", कृं.पां. कुलकर्णीचा "मराठी व्युत्पत्ती कोश" "अभिनव मराठी शब्द कोश" डॉ. दुर्गा दिक्षितांचा "डायमंड मराठी संस्कृती कोश" त्याचप्रमाणे शिवाजी पाटोळे, सदाशिव आठवले, यांनी लिहिलेली उमाजी नाईकांची चरित्रे, वि.गो. खोबरेकरांचे 'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे', अ.रा. कुलकर्णींचे 'कंपनी सरकार', केळकरांचे "शमी पूजन", प्रमोद मांडे यांचे "स्वातंत्र्य संग्रामातील समिधा", अ.ना. भागवतांचा "भोर संस्थांचा इतिहास", म.श्री. दिक्षितांचे "पिचलेली मनगटे", खोबरेकरांचा "इंग्रजी सत्तेविरूध्दचा महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव", भारत इतिहास संशोधन मंडळातील "पुरंदरे दप्तर", वा.कृ. भावेचा "शिवकालीन महाराष्ट्र", वा.सी. बेंद्रे यांचे "छत्रपती शिवाजी महाराज", डॉ. गणेश राऊत यांचे "छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ", वा. कृ. भावे यांचे "पेशवे कालीन महाराष्ट्र".

त्याचप्रमाणे पुणे, सातारा, मुंबई जिल्हयांचे गॅझिटियर त्याचप्रमाणे आणखी दुय्यम साधने म्हणून 'मासिके', व काही वृत्तपत्रांचाही संशोधन कार्यात आधार घेतेलेला आहे.

प्रकरण १ ले

रामोशांचा वैभवशाली इतिहास :एक मागोवा

पार्श्वभूमी

साधारणपणे कोणत्याही क्षेत्रातील एक विशिष्ट असा ठसा उमटवणारे व्यक्तिमत्व त्या परिसरातील वातावरणाशी व परिस्थितीशी अनुकूल असेच बनत असते. कळत वा नकळत त्या सभोवतालच्या वातावरणाचा त्या व्यक्तिमत्वावर परिणाम होत असतो. म्हणून क्रांतिकारक उमाजी नाईक हे सुध्दा त्यास अपवाद नाहीत. म्हणून उमाजी नाईकांच्यापुर्वीची किंवा समकालीन ऐतिहासिक, सामाजिक, भौगोलिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती समजाऊन घ्यावी लागते.

१) ऐतिहासिक पार्श्वभूमी व सांस्कृतिक वारसा

महाराष्ट्र ही भूमी संतांची, विरांची व विरांगणांची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य याच भूमीत स्थापन केले. अत्यंत न्यायप्रिय व आदर्श राज्यकारभाराचे उदाहरण शिवाजी राजांनी महाराष्ट्राला घालून दिले. ते अगदी भुषणावह आहे. लोकमान्य टिळकांनी इंग्रजांविरूध्द असंतोष येथूनच संपूर्ण भारतभर पसरविला. न्यायमुर्ती गोखले, दादाभाई नौराजी, महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले, राजर्षी शाहुमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांनी याच भुमीतून देशाला योग्य दिशा देण्याचे काम केले व देशाला आयुष्य वाहिले.

स्वराज्याची स्थापना

महाराष्ट्रातील स्वराज्याचे संकल्पक, समर्थक म्हणून शहाजी राजे व जीजामाता यांचा, तर संस्थापक म्हणून शिवरायांचा उल्लेख अभिमानाने केला जातो. सहयाद्रीचा पूर्व व पश्चिम परिसरातील मावळ भागात इ.स. १६४५ ला रोहिडेश्वरी स्वराज्य स्थापनेचा मुहुर्त होऊन एकाच वेळी आदिलशाही व मोगलसम्राट यांच्याशी लष्करी व राजकीय

संघर्षाला प्रारंभ झाला व अनेक संकटावर मात करून दोन्ही मुस्लिम सत्तांना नमवून इ.स. १६७४ साली शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाद्वारे स्वराज्य पूर्णत्वास नेले ते याच भूमीत.[१]

पेशवेकालीन महाराष्ट्र

महाराणी ताराबाई व युवराज शाहू यांच्यातील वारसा हक्कांच्या वादातून सातारा व कोल्हापूर या दोन राज गाद्या उदयास आल्या व पेशवाई उदयास आली. पहिल्या बाजीराव पेशव्याने राज्याच्या सीमारेषा पश्चिम-पूर्व दिशेस अहमदाबाद ते बंगाल व दक्षिण-उत्तर दिशेला वारणा नदी ते दिल्ली पर्यंत विस्तारल्या होत्या. त्याचप्रमाणे पुढे अफगाणिस्तानातील अटकेपार झेंडा लावला. वैभवाच्या शिखरावरील मराठी सत्तेला इ.स. १७६१ च्या पानिपतच्या युध्दात जबरदस्त तडाखा बसला. इ.स. १७७५ पासून १८१८ पर्यंत इंग्रज व मराठे यांच्यात तीन युध्दे झाली. पहिल्या युध्दात महादजी शिंदे यांनी इंग्रजांचा पराभव केला. दुसरे इंग्रजांनी जिंकले, नंतर 'आष्टी' येथे झालेल्या तिसऱ्या युध्दात इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावाचा पराभव करून मराठी सत्तेवर विजय मिळविला. गोपाळ आष्टीची ही लढाई माघ शु।। १५ ता. २० फेब्रुवारी १८१८ मध्ये झाली.[२]

थोडक्यात महाराष्ट्राला गौरवशाली इतिहास लाभला आहे. या इतिहासाची समाप्ती इंग्रजी राजवटीमुळेच झाली. शनिवारवाडयावर ज्या दिवशी 'युनियन जॅक' फडकला. ती घटना दुर्दैवी होती. मध्ययुगात अनेक परकीय आक्रमणातून ताऊन सुलाखुन निघालेला महाराष्ट्र इंग्रजी आक्रमणापुढे मात्र टिकाव धरू शकला नाही. १७ व्या व १८ व्या शतकात मराठयांचे साम्राज्य प्रचंड होते, त्यांचा दरारा संपूर्ण भारतात होता. मराठेशाहीची साधनसामग्री व बलस्थानेही तेवढीच अफाट व तुल्यबळ होती.

२) महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती

१९ व्या शतकात आरंभीच्या काळात महाराष्ट्रातील समाजजीवनावर वर्ण व्यवस्थेचा पगडा होता. 'मनुस्मृती' सारख्या धर्मग्रंथावर आधारीत अनिष्ट सामाजिक रुढी

प्रचलीत होत्या. समाजात 'कर्मकांडावर' आधारीत 'चातुवर्ण्य' व्यवस्था पध्दती बोकाळलेली होती. समाजातील दीन-दलितांना सवर्ण जातीचे लोक अतिशय हलके समजून त्यांना तशीच कनिष्ट प्रकारची वागणूक देत असत. स्त्रियांची परिस्थितीसुध्दा याहून वेगळी नव्हती. लोक सोवळे-ओवळे, जातीभेद, यांचा विचार करत त्याचप्रमाणे उच्च-निचपणा फारच बोकाळला होता.

समाजामध्ये प्रचंड अंधश्रध्दा होत्या. परदेशगमण करणे, समुद्र पर्यटन करणे, ग्रंथ लेखन करणे, इ. धर्माविरोधी मानले जाई, सतीची चाल, बालविवाह, बालहत्या, नरबळी, विधवांचे केशवपन, दैववादी विचार, अनुष्ठाने, व्रतवैकल्ये, गृहशांती, गुलामगिरी वेठबिगारी, ग्रहदशा साडीसाती, अशा अनिष्ठ प्रथा, रुढी प्रचलीत होत्या. अस्पृश्यांची स्थिती तर फारच बिकट असायची. त्यांनी अंगावर फक्त लज्जारक्षणापुरतेच कपडे घालावेत असा दंडक असे. गावगाडयाचे बलुतेदार हे नोकरच होते पण जातिभेदांमुळे जनावरे ओढणे, प्रेताच्या वस्तु व कपडे वापरणे, एका गावाहून दुसऱ्या गावाला निरोप देणे, चोरांचा माग काढणे, उदरनिर्वाहासाठी टाकाऊ अन्नाचा वापर करून अन्न मागुन खाणे अशी स्थिती शुद्रांची होती.[३]

उत्तर पेशवाईत व इंग्रजी राजवटीत महाराष्ट्रात देवभोळेपणा, भाबडेपणा आणि अंधश्रध्दा भरपूर होत्या. शकुन - अपशकुन, उपास-तपास, कर्मकांड, तीर्थ यात्रा यांचे प्रस्थ फारच वाढले होते. जहागीरदारांवर, वतनदारांवर व जमीनदारांवर राज्य यंत्रणेचा दबाव राहिला नव्हता. न्यायव्यवस्था अत्यंत भ्रष्ट होती. न्याय पध्दतीही मनुस्मृतीनुसार होती. पुण्यात तर सगळीकडे जिकडे-तिकडे लुच्चेगीरी, कपट सौदेशाही माजली होती. लोकांमध्ये धर्म व निती बुडाली होती. रांडेपणाची श्रीमंती, अविचाराची खराब कामे, भडवेपणा, मनास येईल तशी वर्तणुक ही जितके मोठे लोक त्यांच्या घरी होती.[४]

स्त्रियांचे जीवन

बालपणी मुली वडीलांच्या आज्ञेत, तरुणपणी नवऱ्याच्या व म्हातारपणी मुलांच्या बरोबरच राहून जीवन जगावे लागत. एकत्र कुटुंबपध्दतीमुळे स्त्रियांच्या विकासाच्या संधी वाढण्याऐवजी मर्यादीत झाल्या होत्या. विधवांचे जीवन अधिक दु:खमय होते. वैधव्य त्या स्त्रीचे सुख, सन्मान, आशा आकांक्षा शोषून घेई. अर्धमृत कंटाळवाणे असहाय्य अपमानित जीवन होते.

बालविवाह -पाळण्यातील लग्ने, कडेवरची लग्ने, एवढेच नव्हे तर पोटात मूल असतानाच, गरोदर बायकांच्या पोटाला कुंकू लावून विवाह संबंध जोडले जात असत. म्हणजेच बालविवाहाची प्रथा प्रचलीत होती. यामध्ये दुसरा बाजीराव त्यांचा भाऊ चिमणाजी यांची लग्ने लहान वयातच झाली. त्याचप्रमाणे जरठ-कुमारी विवाह, ही प्रथा सुध्दा प्रचलीत होती. "रत्नागिरी तालुक्यातील एका ब्राम्हणाने ठराविक दर ठरवून मुली विकल्या होत्या."[५]

विधवापण - विधवा स्त्रियांचे जीवन खूप किळसवाणे होते. यातनामय होते. अंधाऱ्या कोपऱ्यात वळचणीस बसून तिला दिवस घालावावा लागत. तिचे दर्शनही अशुभ होते. जरठ -कुमारी विवाह हेच एकमेव विधवापणाचे कारण होते. आणि दुसरे म्हणजे सर्वत्र युध्दाची धामधुम असल्याने रणांगणावर कामी आलेल्या पुरुषांची संख्या मोठी होती.

विधवा पुनर्विवाह - १८१७ पासून मुंबई शहरात विधवाविवाहाच्या चळवळीला प्रारंभ झाला. गंगाधर शास्त्री फडके, जगन्नाथ शंकर शेठ व विष्णुशास्त्री पंडित हे या चळवळीचे प्रणेते मानले जातात.

केशवपन - विधवा पत्नीने लग्न करू नये, तिच्याकडे कोणी वाकडया नजरेने पाहू नये याच कल्पनेतून ही प्रथा उदयास आली होती. विशेष बाब म्हणजे तत्कालीन शंकराचार्यांनी या सर्व रानटी प्रकारांना आशिर्वाद दिला होता. इ.स. १८५४ मध्ये शंकराचार्याचे आगमण अहमदनगरमध्ये झाले. प्रत्यक्ष प्रवेशापुर्वी जगदगुरू शंकराचार्यांनी नगरच्या सर्व नागरिकांना सर्व विधवांची डोकी भादरण्याची आज्ञा दिली होती.[६]

सतीप्रथा - पतीच्या निधनानंतर घरात व घराबाहेर जी मानहानी होणार, त्यापेक्षा त्या मेलेल्या पतीबरोबर सहगमण करणे काय वाईट, या विचारातून सती जाणे ही कल्पना उदयास आली. पतिव्रत्य, बलिदान, स्वार्थ त्याग यांचे सती हे मुर्तिमंत प्रतीक आहे.

इ.स. १८२१ ते १८२७ च्या काळात मुंबई प्रांताच्या मराठी प्रदेशात सती गेल्याची आकडेवारी.[७]

सतीची प्रकरणे

	१८२१	**१८२२**	**१८२३**	**१८२४**	**१८२५**	**१८२६**	**१८२७**	**एकुण बळी**
उत्तर कोकण	-	-	-	१	१	१	-	३
दक्षिण कोकण	५०	४७	३८	२७	३२	२८	२७	२४९
खानदेश	-	-	-	१	१	२	६	१०
पुणे	-	-	-	-	-	-	१	१

थोडक्यात मध्ययुगीन कालीन समाज जीवन किंवा सामाजिक परिस्थिती म्हणजे वर्णाश्रम, जातिधर्म, व वतन ही महाराष्ट्राची परंपरा होती. वर्णाश्रम व्यवस्थेत व्यवसाय हे जन्मसिध्द होते. म्हणजे ते जन्मावरून ठरत. व्यवसायात बारिक सारिक पोटभेद पडून ते जाती आणि पोटजाती आणि वर्णाश्रमाची सहस्त्रावधी शकले जाती धर्माच्या रुपाने दृष्टीत पडत होती. समाज मोठया प्रमाणात विभागला जाऊन जो तो विभाग आपल्या अंधश्रध्दाळू विचारात राहून अमर्याद एककल्ली व एक धोरणी बनला होता.

एकदंरीत समाज एका अंधकारमय युगात जगत असताना स्वातंत्र्यभावनेने पेटून उठलेले उमाजी नाईक याच काळात जन्मास आले होते. आणि विशेष हे की या सर्व रुढी

परंपरांमध्ये अडकून न रहाता आपले एक वेगळे अस्तित्व उमाजी नाईकांनी दाखवून दिले आहे.

ड) आर्थिक परिस्थिती

१९ व्या शतकात महाराष्ट्राचा आर्थिक कणा प्रामुख्याने शेतीवरच उभा होता. संपूर्ण अर्थ व्यवस्थाही शेती व्यवसाच्या भोवतीच केंद्रीत झाली होती. असे असतांनाच शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय हालाखीची होती. त्यांच्या नशिबी दारिद्रय ठरलेलेच होते. आलुते-बलुते यांचे मोबदले व मापे खळयावरच दिली जात. त्यातून सरकारी सारा, सावकारांचे कर्ज इ. गोष्टी भागवाव्या लागत. उर्वरित धान्यावर आपल्या कुटुंबाची पालपोषणाची जबाबदारी पार पाडावी लागे.

म्हणजेच त्याकाळी खेडे हा 'स्वयंपूर्ण' घटक होता. इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीने उत्पादनांवर क्रांतिकारक असे बदल केले गेले. प्रचंड उत्पादनाचा योग्य व विनास्पर्धा क्रय विक्रय करण्यासाठी आणि हव्या त्या किंमतीला कच्चा माल खरेदी करण्यासाठी, ब्रिटिशांना भारतात साम्राज्य विस्ताराची आवश्यकता होती त्यांच्या (युरोपियनांच्या) या स्पर्धेमुळेच येथील जनता आर्थिक दृष्टीने पिळवटून निघाली होती. कुटीर उद्योग बुडाल्यामुळे बेकारांची संख्या वाढली होती.

"शेतकऱ्यांना शेतसारा पैशाच्या रूपाने सरकारला आणि व्याजही रोख पैशांच्या रूपाने सावकाराला द्यावे लागत असत. हा शेतसारा वसूल करताना आवर्षण, दुष्काळ, इतर आपत्ती, याचा विचार सरकारने बिलकुल केलेला नव्हता. त्यातच सन १८२४ मध्ये महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला. या दुष्काळी परिस्थितही शेतकऱ्यांकडून सारा वसुली कायमचीच ठेवली होती. त्यामुळे लोकांवर घोर प्रसंग यायचे शेतकरी घरेदारे सोडून विकून वाट दिसेल तिकडे जायचे. एकटया इंदापूर तालुक्यात ५७ गावे सोडून कुटुंबे गेली होती."[८]

आवर्षणामुळे पीक नाही, पीक नाही म्हणून धान्य नाही आणि धान्य नाही म्हणून लोक अन्नान्न दशेला पोहोचलेले. त्यातच कॉलरा सारख्या साथीच्या रोगाने कैक लोकांचे बळी गेले. चारा आणि पाण्याच्या टंचाईने जनावरेही मेली. थोडक्यात गावेच्या गावे ओस पडली. जमिनी उजाड राहील्या त्यांच्या घरांवर छपरे ही राहिली नव्हती. फक्त घरांच्या भिंती उभ्या होत्या. इ.स. १८३२ मध्ये पुण्याचे धान्याचे दर वाढले होते. ते भराभर वाढतच गेले ऑक्टोबर १८२६ मध्ये १ रुपयास प्रत्येकी बाजरी २५ शेर, ज्वारी ३२ शेर, गहु २२ शेर चणा १७ शेर, तांदुळ १३ शेर, असा धान्याचा भाव होता.

६ नोव्हेंबरला १ रुपयात प्रत्येकी ८ शेर बाजरी, १० शेर ज्वारी, १५ शेर गहू, ८ शेर चणे व ८ शेर तांदुळ अशी दुप्पट भाव वाढ झाल्याचे निदर्शनात येते.[९] थोडक्यात महागाईच्या भडाग्नीमध्ये सामान्य जनता होरपळली जात होती.

शैक्षणिक परिस्थिती

१९ व्या शतकाच्या आरंभी महाराष्ट्रात अज्ञानाचा अंध:कार पसरलेला होता. थंड गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्राच्या देहाची तपासणी करताना, तो देह अनेक व्याधींनी ग्रस्त झाला होता. त्यातील पहिली व्याधी म्हणजे 'अज्ञान' ही होती. हे अज्ञान अतिशय केविलवाणे व घृणास्पद होते. पुरोहितांना अजूनही वाटत होते की पृथ्वी ही शेषावर असून ग्रहणात राहू चंद्र व सुर्यास ग्रासतो (गिळतो). हिंदुस्तानाएवढीच पृथ्वी असून त्यापलीकडे गतीच नाही. अशा प्रकारचे अज्ञान हिंदुस्तानात सर्वदूर होते.

इंग्रज त्यांची विद्या, यंत्रकला,ज्ञान-विज्ञान घेऊन आले. एवढेच नव्हे तर त्यांनी त्यांच्या ज्ञानाचे संस्कृतीचे ठसे इकडील लोकांवर उमटविले. या प्रयत्नांचे फळ म्हणजे पुण्यातील अनेक शिक्षण संस्थांचा उदय होय. शिक्षण प्रसाराच्या कार्यात 'माल्कम' ने धाडशी पाऊल उचलले. रत्नागिरी जिल्हयात स्थापन झालेली 'द नेटिव्ह स्कुल ऑफ सोसायटी ऑफ द साऊथ कोकण' ही मुंबई इलाख्यातच नव्हे तर ब्रिटिशांनी भारतात स्थापन केलेली पहिली 'नेटिव्ह' लोकांची शिक्षण संस्था आहे. या संस्थेच्या मराठी शाळेत

६ मुली व इंग्रजी शाळेत १ मुलगी शिकत होती. हा काळ होता १८२३ चा. या कामी ज्या सद्‌गृहस्थाने पुढाकार घेतला त्याचे नांव होते कॅप्टन जर्विस. सन १८३६ पर्यन्त त्या संस्थेच्या ६ शाळा झाल्या होत्या पण विद्यार्थी संख्या मात्र कमीच होती.[१०]

इ.स. १८२८ च्या सुमारास धाकजी दादाजी प्रभू हया सनातनी पुढाऱ्याच्या इच्छेखातर मुंबईच्या सरकारी मराठी शाळेतून मराठे, कुळंबी, भंडारी या जातीच्या मुलांना काढून टाकण्यात आले. पुण्याच्या पाठशाळेतही इ.स. १८५१ पर्यन्त फक्त ब्राम्हण विद्यार्थीच घेतले जात असत.[११] या भेदनितीमुळे एकाच प्रदेशांत दुजाभाव निर्माण झाला होता. त्यामुळे खेडयांतील लक्षावधी लोकांचे जीवन परंपरागत रुढीच्या ठराविक चाकोरीतून दिर्घकाळ रेंगाळत राहिले.

पुण्यातील विश्रामबाग वाडयात संस्कृत पाठशाळा सुरू होऊन (१८२१) नंतर तिला इंग्रजी वर्ग जोडला गेला. १८२२ मध्ये याच पाठशाळेला "पुना कॉलेज" हे नाव देण्यात आले. (१८५१). पुढे १८६८ मध्ये डेक्कन कॉलेजची स्थापना झाली. मुंबई इलाख्यात गव्हर्नर एलफिस्टनने शैक्षणिक सुधारणा केल्या. सुविधा केल्या. १८२३मध्ये एलफिन्स्टनने इंग्रजी भाषा व युरोपियन विज्ञानासाठी शाळा उघडल्या. या शाळा मुंबई व पुण्यात सुरू केल्या. १८३४ मध्ये 'एलफिन्स्टन कॉलेज' सुरू होऊन उच्च शिक्षणाची सोय झाली. १८६८ मध्ये पुण्यात १ सरकारी शाळा, १ हायस्कुल ११ चौथीपर्यंतच्या इंग्रजी शाळा, १ ट्रेनिंग स्कुल, ८३ मराठी शाळा आणि या सर्व शाळेमधून ५१२५ विद्यार्थी शिकत होते.[१२]

ज्योतिराव गोविंदराव फुले यांनी इ.स. १८४८ साली देशातील पहिली सर्वाच्या मुलींसाठी शाळा सुरू केली आणि १८५२ साली बहुजनांच्या मुलांसाठी शाळा सुरू केली. ज्योतिरावांच्या (फुलेंच्या) आगोदर या देशांत बहुजनांच्या शिक्षणासाठी कोणीही शाळा सुरु केली नव्हती.[१३] शिक्षणाचे महत्व सांगणारे अत्यंत हदयस्पशी विचार भारतात प्रथम जोतीराव फुले यांनी मांडले.

विद्येविना मती गेली । मतीविना निती गेली ।

नितीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।

वित्तविना शुद्र खचले । इतके सारे अनर्थ ।

एका अविद्येने केले ।[१४]

शिक्षणाअभावी देशातील बहुजनांची कशी वाईट अवस्था झाली याचे विदारक चित्र फुलेंनी जानले होते. त्यामुळेच त्यांनी एका वर्षातच २० शाळा सुरू केल्या.

१९ ऑक्टोबर १८८२ रोजी राष्ट्रपिता जोतीराव फुले यांनी हंटर यांची भेट घेऊन निवेदन दिले त्यामध्ये ते म्हणतात.

"बहुजनांच्या मुलांना वयाच्या १२ व्या वर्षापर्यन्त प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत द्यावे, सरकारला मिळणारा महसुल बहुजनांचा आहे. या महसुलावर ब्राम्हण शिक्षण घेतात पण बहुजनांना शिक्षण घेण्यास विरोध करतात." हे कटु सत्य फुलेंनी हंटर आयोगाच्या लक्षात आणून दिले. म्हणजेच गोरगरीब कष्टकरी शेतकरी यांच्या मुलांना शिक्षण मिळण्यासाठी ब्रिटिशांना सुद्धा फुलेंनी धारेवर धरले होते.[१५]

रामोशांचा इतिहास - एक मागोवा

अशिक्षित, असंघटीत व नागर संस्कृतीच्या चौकटीबाहेर राहून जीवन जगणाऱ्या आदिवासी, भिल्ल, कोळी, रामोशी या जमातींनी इंग्रज राजवटीविरुध्द प्रदीर्घ लढा दिला. मराठयांच्या काळात शिवाजी सारख्या दूरदर्शी राजाने रामोशी लोकांच्या त्याचप्रमाणे कोळी, भिल्ल, यांच्या पिढीजात कौशल्याचा स्वराज्यासाठी चांगला उपयोग करून घेतला होता. रामोशांना जागल्याच्या, रात्रीच्या पहारेकऱ्याच्या कामावर नेमून त्यांचा दुवा व पाठिंबा मिळवण्यात शिवाजी महाराज यशस्वी झाले होते. त्यांना राज्य व्यवस्थेतच नव्हे तर ग्रामव्यवस्थेतही चांगले सामावून घेतले. म्हणून मराठेशाहीच्या अस्तापर्यन्त 'रामोशी' निष्ठेसाठी व प्रामाणिकतेसाठी महाराष्ट्राच्या इतिहासात प्रसिध्द आहेत. [१६]

शिवाजी महाराजांनी ५ ऑक्टोबर १६४८ मध्ये पुरंदर किल्ला निळकंठ बंधूकडून (निळोजी, शंकराजी, पिलाजी) हस्तगत केल्यानंतर मावळे व रामोशी यांना किल्याच्या

रखवालदारीस ठेवले. व त्याठिकाणी किल्याच्या संरक्षणासाठी त्यांचा उपयोग केला.[१७] त्याचप्रमाणे शिवाजीमहाराजांनी आदीलशाही व कुतुबशाही व मोगल यांच्याशी झालेल्या संघर्षात रामोशांचा उपयोग करून हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांनी संधी साधून अनेक किल्ले हस्तगत केल्यानंतर त्याठिकाणी नियमित रखवालदाराची नियुक्ती केली होती. किल्याशेजारील जमिनी त्या शिपायांना देण्यात आल्यानंतर तेच शिपाई 'गडकरी' झाले. असे प्रत्येक किल्यांवर रामोशी व मांग यांचे लष्कर ठेवले. त्यामध्ये 'बेरड' ही जमात होती.[१८] त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांना आग-याहून सुटून आल्यानंतर रामोशांच्या मदतीने पुरंदर किल्याचा मोगली किल्लेदार महंमद याच्याकडून किल्ला हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्याच्यावेळी "वर्धोजी खोमणे" याने सहभाग घेतला होता. वर्धोजी खोमणे हा सुप्रसिध्द "उमाजी नाईकांचा" पुर्वज होय.[१९] या वेळी महंमदाच्या प्रतिहल्याने वर्धोजी खोमणे मरण पावला व त्याची पत्नी सती गेली.

ज्या व्यक्तीनी मराठा साम्राज्यासाठी सहकार्य केले अशा व्यक्तींना शाहु महाराजांनी योग्य बक्षिसे दिली. पुरंदरवरील धुलई भांडवलकर रामोशाच्या वंशजांना शाहू महाराजांनी त्यांच्या परिसरातील जमिनी इनाम दिल्या. तर साकुर्डे गावचा 'मोकासा' हक्क सुध्दा देण्यात आला. शाहु महाराजांची ही भूमिका लक्षात घेउन पेशवा बाळाजी विश्वानाथ यांनी १२० बिघे जमीन प्रत्येक रामोशांना विभागून दिली. 'मोकासा' व जमिनीचा मालकी हक्क १८३४ पर्यन्त रामोशांच्या स्वाधीन होता. त्यावेळी पुरंदर किल्यावरचे उत्पन्न होते वार्षिक ७५०० रुपये.[२०]

इ.स. १७३० मध्ये पिलाजी जाधवराव यांची रामोशांचा सरनाईक म्हणून नेमणूक झाली. त्यास भौगोलिक परिस्थितीची माहिती होती. त्याचप्रमाणे रामोशांच्या सवयी सुध्दा माहिती होत्या. त्याने भिमा नदी किना-यावरील चो-या दरोडेखोरी करणा-या रामोशांना पेशव्यांच्या परवानगीने नोकरीस घेतले आणि ज्याठिकाणी नेहमी चो-या होत. अशा

ठिकाणी त्या रामोशांपैकी ५ जणांना रखवालदार म्हणून पुणे परिसरात नेमले ती ठिकाणे पुढीलप्रमाणे.

१) आबाजी - आळंदी - वळती (तालुका हवेली)

२) मुळे - आळंदी (तालुका खेड)

३) बहिर्जी - माळशिरस (तालुका पुरंदर)

४) जानोजी - लोणी काळभोर (तालुका हवेली)

५) सुक्रोजी - उंदी (उंद्री) (तालुका हवेली)[२१]

१७५० पर्यन्त नानासाहेबांच्या कारकिर्दीत रामोशी व कोळी हे पुरंदर किल्याचे वतनदार होते. कारण राजारामाच्या काळात त्यांना पुरंदर किल्याचे वतनी हक्क मिळाले होते. पुरंदर किल्याच्या वंश परंपरागत गडकऱ्यांत कोळी, रामोशी व परवारी या तीन जातीच्या लोकांचा विशेष भरणा होता.[२२]

पुरंदर किल्ला सक्षमपणे व खंबीरपणे रक्षण करणाऱ्या गडकऱ्यांना उद्देशून बाबासाहेब पुरंदरे म्हणतात

"पुरंदरच्या तटातटावर काळेक्षार पोलादी पुतळे गस्त घालत त्यात सगळे 'कोळी' आणि 'रामोशी' पुरंदरची ही लेणी भुषणे,

गड कोळयांचा, रामोशांचा आणि महारांचाच मग गडकरी कोणी का असेनात. हया तिघांच्या मांडीवर मान ठेऊन गडाने झोपावे स्वप्नातही दगा नाही व्हायचा"[२३]

बहिर्जी नाईक -

बहिर्जी नाईक जाधव हे प्रमुख हंगेवाडी ता. श्रीगोंदा येथील रहिवाशी होते.[२४] छत्रपती शिवाजी राजांच्या लष्करी विभागाचा अत्यंत महत्वाचा भाग म्हणजे त्यांचे हेर खाते. त्यांच्या हेरखात्यात निरनिराळया राज्यात नेमलेल्या दुतांचाही समावेश होता. शत्रुराष्ट्राची इत्यंभूत माहिती मिळवणे व ती राजाला कळविणे. यासाठी विश्वासू व

पराक्रमी लोकांचीच गरज होती. म्हणून राजांनी मोहिमेवर असताना बहिर्जीचे कसब ओळखून हा नाईक स्वराज्याच्या निर्मितीच्या कामात हिरा आहे. हे राजांनी ओळखले. बहिर्जी नाईक कोणत्याही नकला व वेशांतरे करायला अगदी पटाईत होता. तसेच तो बोलण्यातही हुशार त्यामुळेच त्यांनी त्याची नेमणूक गुप्तहेर खात्यात केली.[२५] महाराजांच्या गुप्तहेर खात्यात तीन ते चार हजार गुप्तहेर असायचे. या सर्वांचे नेतृत्व बहिर्जीकडेच होते. शिवाजी महाराजांनी इ.स. १६६४ मध्ये पहिल्यांदा सुरत लुट केली. सुरत लुटीपुर्वी बहिर्जी नाईकाने सुरत शहराची सर्व माहिती, शहरातील सधन लोक, त्यांच्या संपत्तीचा अंदाज इ. बाबतची माहिती कळवली होती. शिवाजीच्या हेरखात्याच्या कामगीरीबाबत जोसेफ-टी-ऑर्लिन्स लिहितो "शिवाजी सुरत लुटण्याकरिता येणार आहे याची वार्ता कोणासही नव्हती. शहर लुटण्याचे कित्येक दिवस आगोदर त्याने आपले २०० शिपाई, खलाशी, व्यापारी इ. ना पोषाख देऊन सुरत शहरात पाठवून दिले. या लोकांनी शिवाजी येण्यापूर्वी तेथील संपत्तीची सर्व माहिती मिळवून ठेवली होती. याच माहितीच्या आधारे शहराची लूट करण्याचे काम त्याने अतिशय थोडया अवधीत संपवले" आपार संपत्तीची लूट घेऊन सुरक्षितपणे निघून गेले.[२६] बहिर्जी शूर, धाडशी होताच पण हरहुन्नरीही होता.

तो निरनिराळी सोंगे घेऊन चलाखीने शत्रुच्या गोटातील माहिती मिळवित असत. कधी फकीर, कधी गोसावी कधी टाळकरी, तर कधी भिकारी होऊन वेश पालटून आपल्या राजासाठी प्राण हातावर घेऊन गुप्त बातम्या काढीत असत. हे काम पगारवाढ, मान, सन्मान, इनाम यासाठी नव्हे तर महाराजांनी हया कामगीरीबद्दल चार - चौघात शाबासकी दिली की त्यात सर्व काही आले, अशी बहिर्जी नाईकाची मनोवृत्ती होती. शिवाजी महाराजांकडे जी नवरत्ने होती. त्यापैकी बहिर्जी हे महत्वाचे होते.[२७] बहिर्जी म्हणजे हजार गुणांचा खंडोबा होता. त्याने अतिप्रचंड अत्यंत श्रीमंत आणि अत्यंत संरक्षित शहराची खडानखडा माहिती हेरगिरी करून औरंगजेबाची लंका लुटली.[२८] सुरतेहून बहिर्जी जाधवने

सुरतेची पहाणी केली व सुरत मारिल्याने अगणित द्रव्य हतास लागेल असे महाराजांना सांगितले होते.[२९]

येसाजी नाईक -

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात जे किल्ले होते त्या किल्याचे बुरूंज भक्कम करणारा हा एक युध्द निती निपून धडाडीचा सेनानी होता. आपला स्वत:चा मुलगा व सुन यांना किल्याचे पायात बळी देऊन, याने जी स्वामिनिष्ठा दाखवली तिला तोड नाही. महाराजांचे अत्यंत स्वामिनिष्ठ सेवकात येसाजी नाईक यांचा अत्यंत आदराने व कृतज्ञतेने उल्लेख केला पाहिजे.[३०]

दौलती नाईक -

रामोशी समाजात जन्म घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांवर कमालीची निष्ठा बाळगणारा व त्यासाठीच हौतात्म्य पत्करणारा एक शूर रामोशी सैनिक क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडात सक्रिय योगदान देऊन, दौलतीने बलीदान दिले होते. देशाचा स्वातंत्र्यासाठी बलीदान देणारा रामोशी समाजातील धडाडीचा सेनानी म्हणून सदैव स्मरणात राहील. भांडवलकर या कुळात जन्म घेतलेल्या या शहिदाचे जन्मगाव पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यातील भिमा कोरेगाव हे होते. वासुदेव बळवंताच्या सहका-यामध्ये दौलतराव नाईक हा एक शूर सरदार होता. वासुदेव बळवंत त्याचा विश्वासू सरदार म्हणून उल्लेख करतात. त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात व दैनंदिनीत या दौलतरावांच्या नावाचा उल्लेख २-३ वेळा केला आहे. यावरून दौलतराव हे एका तुकडीचे नेतृत्व करीत होते हे लक्षात येते. दौलतरावांनी पाबळ व जवळची दोन खेडी लुटल्याचा उल्लेख आढळतो. मे. डॅनिअलशी लढता-लढता हे दौलतराव कामी आले.[३१]

ब्रिटिशांविरोधी सशस्त्र बंड करून त्यांच्या आसनाला सुरुंग लावण्यासाठी आपणास पांढरपेशा लोकांकडून फारशे सहकार्य मिळणार नाही. याची खात्री फडक्यांना झाल्याने त्यांचे लक्ष पुणे व सातारा जिल्हयातील विखुरलेल्या रामोशी जमातीकडे गेले.

रामोशी हे बेडर स्वामीनिष्ठ म्हणून प्रसिध्द होते. त्यातच ब्रिटिश राज्यात त्यांचा किल्लेदारांचे हक्क व वतने नष्ट झाल्याने ते असंतुष्टच होते.

फडक्यांनी रामोशांच्या म्होरक्यांना पागोटी दिली. दारू जेवणे दिली. पुण्यातील लोणी या गावी (१८७९) महाशिवरात्रीच्या दिवशी दोनशे रामोशी सहकाऱ्यांना एका शेतात जेवण दिले त्यांचे उजवे हात असलेलेसरदार दौलतराव नाईक हे सुध्दा तिथे होते. फडक्यांच्या अनुपस्थितीत दौलतराव नाईकांकडे नेतृत्व असे. त्यावेळी दौलतराव विसीच्या आसपास असून धिप्पाड काळेकुट्ट वर्णाचे व पाणीदार डोळ्यांचे होते. फडकेंच्या बंडात भिमा व भवानी या दोन रामोशी स्त्रियाही सामील होत्या.[३२]

वासुदेव बळवंताच्या तीन तुकडयांपैकी एक तुकडी साताऱ्याच्या रामोशांची होती. दुसरी पुण्याच्या रामोशांची आणि तिसरी पुण्याची कोळयांची होती. पहिल्या तुकडीचे प्रमुख हरि, तात्या, मकाजी व दुसरीचे स्वतः वासुदेव बळवंत आणि तिसरीचे कृष्ण व मारुती साबळे होते. या तुकडयांनी एकूण १८ दरोडे घातले.[३३]

हिरोजी फजल -

या चमत्कारिक नावाने ओळखला जाणारा आणि रामोशी समाजात जन्मलेला हा सेवक वेशांतरकलेत अत्यंत निपुन होता. शत्रुंच्या गोटात निरनिराळया वेशांत जाऊन स्वराज्य स्थापनेत अनुकुल माहिती संकलीत करून ती महाराजांना देणे आणि शत्रुंचा गोंधळ उडेल अशा कपोलकल्पित बातम्या पसरवून शत्रुंचे डावपेच उधळून लावण्यात त्यांचा हातखंडा होता.[३४]

परकिय साम्राज्यवादाविरुध्दच्या पहिला स्वातंत्र्य लढा -

इ.स. १५४३ च्या अखेरीस पोर्तुगीजांनी गोव्यात सत्ता मिळवल्यानंतर ख्रिश्चनांनी धार्मिक व सांस्कृतिक आक्रमणाला सुरूवात केली. यामुळेच गोव्यातील कुंकल्ली, वेळळी, वरोडा, आंबोली या साळ नदीच्या काठावरील गावात पोर्तुगीजांच्या विरोधात असंतोष निर्माण झाला. आणि त्यातून भारतीय जनतेने दिलेल्या स्वातंत्र्यासाठीचा पहिला

लोक लढा उभा राहिला. या लढयाचे नेतृत्व काळू नाईक, मोलू नाईक, वाघ नाईक, शांतू चार्वी, रामा नाईक, खाप्रू नाईक, शाबू नाईक, टोपी नाईक, झांग नाईक, बोचरो नाईक, शांताशेठ, विठोबा नाईक, येसू नाईक, गुणो नाईक, जिवला नाईक या १६ लोकनायकांनी केले होते.

पोर्तुगीजांनी शांततेचा तह करण्यासाठी कपट नितीने या १६ नायकांना बोलावले व तहाच्या ठिकाणी म्हणजेच किल्याच्या आत जाताच किल्याचे दरवाजे बंद करून चहू बाजुंनी त्यांच्यावर हल्ला केला. यामध्ये १५ लोकनायकांना किल्यातच वीर मरण आले. काळू नाईकाने मात्र लढतलढत किल्याचा तट गाठला आणि तटावरून कुशावतीच्या पात्रात उडी घेतली त्यामुळे त्याचा जीव वाचला परंतु साथीदारांच्या मृत्युमुळे नंतर तो कुंकळ्ळी सोडून कर्नाटकात स्थायिक झाला. त्यांचे वारसदार कर्नाटकात आजही आहेत. इ.स. १५५३ च्या ऑगस्ट महिन्यात या लोक नाईकांची हत्या झाली.

युरोपियन साम्राज्यवादाला रोखण्याचा पहिला प्रयत्न ५०० वर्षापुर्वी झाला या लढयाचे नेतृत्व काळू नाईकाने केले. पोर्तुगीजांविरोधातील रणकंदनात १५ लोकनाईकांचे प्राण गेले त्यांच्या स्मृती जागवणारा स्मृतिस्तंभ आजही गोव्यात आहे.[३५]

बाज्या-बैजाचे बंड -

सातारा जिल्हयाच्या पूर्व भागात इ.स.१९२१ मध्ये रामोशांनी बाजी आणि बैजी या दोन म्होरक्यांच्या नेतृत्वाखाली मोठा धुमाकुळ घातला होता. माण व खटाव तालुक्यातील अनेक गावांवर दहशत, जरब बसवली होती. जवळजवळ ३३ गावातून बाजी बैजाने खंडणी वसुल केली होती. माण तालुक्यातील डोंगर कपारीत वसलेले 'कुकुडवाड' हे दुर्गम ठिकाण बाजी-बैजाच्या हालचालीचे मुख्य केंद्र होते. बाजी बैजाच्या पुंडावा म्हणजे ग्रामीण भागातील सावकारशाही आणि गुंडगिरी विरूध्दचे बंड होते. याच भागात शांतता व सुव्यवस्था राखण-या ब्रिटिश सत्तेला हे एक मोठे आव्हान होते. हे बंड यशस्वी करण्यासाठी

त्यांच्या जीवलग साथीदारांची एक बलवान संघटना बांधली होती. या बंडातील बाजी बैजाचे काही साथीदार होते ते असे-

१) बापू भिमा जाधव
२) खंडु हरी जाधव
३) धोंडी खंडू पाटोळे
४) बाळू नाथा पाटोळे
५) येसु रामा पाटोळे
६) धोंडी नागू जाधव
७) शंकर बाळु जाधव
८) पांडु भिमा जाधव
९) तात्या लिंबा जाधव
१०) हरिबा धोंडीबा शिरतोडे
११) केसू रामा पाटोळे
१२) गणु बाळा जाधव
१३) तात्या मारुती जाधव
१४) मल्हारी तय्याप्पा जाधव[३६]

याशिवाय लक्ष्मण वंजारी व बहिरू तुपारी हे दोघेही पुंडाव्यातील निकटवर्ती सहकारी होते. लक्ष्मण वंजारी हा हेरगिरीची कामगीरी उत्तम प्रकारे पार पाडीत असे.

गाव गुंड व सावकार हे इंग्रजांचे बगल बच्चे होते. त्यांनाही बाजी बैजाने चांगला चोप दिला.

बाज्या बैजाने ज्या गावांतून खंडण्या वसूल केल्या ती गावे म्हणजे

बनपुरी २०० रुपये
कलेढोन ६०० रुपये
कारडवाडी ३०० रुपये
पुळकोटी ५०० रुपये
बनगरवाडी ५०० रुपये
विरकरवाडी ५०० रुपये
गंगोती ३०० रुपये
पालवण २५० रुपये
कातर खटाव ५०० रुपये इत्यादी.

बाज्या बैजाच्या याच उपद्रव्याने गावकरी वैतागले होते. पोलीस खात्याने त्यांना पकडून देण्यासाठी ५०० रुपयांचे बक्षिस ठेवले होते. ब्रिटिश पोलीसांच्या तुकडीला त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांच्या लव्याजम्यालाही बाज्या बैजाने पिटाळून काढले होते. परंतु

ज्यावेळी ब्रिटिशांची फौज रामोशी वाडयात घुसली त्यावेळी मात्र बाज्याने डोंगरावर जाऊन बंदुकीचे बार काढून त्याने साहेबाला लढण्याचे आव्हान दिले होते. यामध्ये रामोशांनी डोंगरावरून गोफण व धोंडयाच्या माराने साहेबांच्या तुकडीला हैरान केले होते.

बाज्याने खानापूर तालुक्यात झरे येथे पोलीसांच्या बंदुका व कपडे हिसकावून घेतले होते.

शेवटी मान तालुक्यात ढाकणी गावात नाटयमय रित्या बाजी बैजाच्या बंडाचा शेवट झाला. आप्पा ओंबासेच्या करवी यांनाही कैद फितुरीने व विश्वास घाताने मारले गेले.[३७]

चिक्क व्यंकटापा नायक

चिक्क व्यंकटापा नायक हे १८५७ च्या क्रांतीयुध्दातील दक्षिण भारताचे सुत्रधार व सुरपूर संस्थानाचे "वीर राजा" होते. त्यांचा जन्म १८३४ साली सुरपूरच्या संस्थानात झाला. सुरपूर गावाचे पहिले नाव. "शुरपूर" आता जनरुढीप्रमाणे त्याला 'सुरपूर' म्हणतात. गुलबर्गा जिल्हयात भिमा कृष्णा नदीच्या मधील प्रदेशात सुरपूर महाराजांचे राज्य चालत होते चिक्क व्यंकटापाच्या मातोश्री ईश्वरम्मा हीने राजसुत्रे ब्रिटिशांना सोडण्यास कबूल झाली नाही. तिचा मुलगा शूर व स्वाभिमानी व्हावा म्हणून प्रयत्नशील राहिली. चिक्क व्यंकटापा वयात आल्यावर आईकडून राजसुत्रे आपल्या हाती घेतली.

चिक्क व्यंकटाप्पा नायक वयाने लहान असले तरी मोठया साहसाने राज्यात होणाऱ्या घडामोडीकडे लक्ष देऊन राज्य कारभार करीत होते. बालपणीपासूनच कित्तुरची राणी चन्नम्मा संगोळी रायाण्या या सारख्या शुरांची हकिकत ऐकत होते. ब्रिटीश हे किती झाले तरी परकीयच आहेत. त्यांना आज नाही तरी उद्या सातासमुद्रापलीकडे पाठविले पाहिजे हे तो जाणून होता. वयाने लहान असूनही आपल्या प्रयत्नात मागे नव्हता. आत्मविश्वासाने आपले प्राबल्य वाढवित होता. "सुरपूरमध्ये त्याच्या आधिपत्याखाली बारा हजार (१२०००) बेडर सैन्य सुसज्ज होते."[३८]

१० मार्च १८५३ ला गव्हर्नर जनरल डलहौशीने पत्र पाठवून चिक्क व्यंकटापाला कळविले होते की एका ब्रिटिश व्यक्तीला आपल्याकडे राज सल्लागार म्हणून पाठवितो त्याचा खर्च दरवर्षी आपण वीस हजार (२००००) द्यावेत असा हुकुमच त्या पत्रात होता. परंतु हे सर्व चिक्क व्यंकटापाने नाकारले होते.

सन १८५७ चे क्रांतिवर्षे उजाडले भारतीय सैन्यामध्ये असंतोष पसरायला सुरूवात झाली होती. मार्च महिन्यात जिकडे तिकडे क्रोधाग्नी भडकू लागल्या. दि. २९ मार्चला बराकपूर मध्ये त्याचा स्फोटझाला मंगल पांडेने इंग्लिश अधिकाऱ्याचे प्राण घेऊन स्वातंत्र्याच्या यज्ञात पहिला बळी दिला होता. खेडोपाडी क्रांतीच्या ठिणग्या उडू लागल्या. त्याचवेळी दक्षिण भारतात ब्रिटिशांना मार बसला तर स्वातंत्र्यप्राप्ती सुलभ होणार असे क्रांतीचे नायक नानासाहेब यांनी योजिले. त्यावेळी त्यांच्या विश्वासातली खात्रीची व्यक्ती म्हणजे सुरपूरचे राजे चिक्क व्यंकटाप्पा नायक, चिक्क व्यंकटाप्पाचा स्वांतंत्र्योत्साह दिवसेंदिवस प्रज्वलीत होऊ लागला. त्यासाठी सुरपूरच्या आजुबाजुच्या विरांना क्रांतिकार्यासाठी एकत्रीत जमवू लागला.

जंवगीचे देशमुखांनी दारूगोळा तयार करण्याचे काम स्वत:हून हाती घेतले. शस्त्रास्त्रेही जमवून साठवू लागले. नंतर दक्षिणेकडील क्रांतिकारकांना स्फुर्ती व मार्गदर्शनासाठी व्यंकटापाने नानासाहेबांना सोलापुरास भेट देण्याचे निमंत्रण बसवलिंगप्पामार्फत दिले.

परंतु हया सोलापूरातील सर्व हालचालींचा सुगावा सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना लागला. त्या जिल्हाधिकाऱ्याने त्याच क्षणी कारवाई करून बसवलींगप्पा व त्याचा मुलगा दोघांनाही पकडून बंदीस्त केले. जंवगी तालुक्यातील त्याचे केंद्र असलेले कोटनाळ किल्ला जमीनदोस्त करून शस्त्रास्त्रे व दारूगोळा ताब्यात घेतले. व्यंकटाप्पाचा हा पहिला प्रयत्न असफल झाला.[३९]

व्यंकटप्पाने कोल्हापूर धारवाड व बेळगाव या ठिकाणी सैनिकांमध्ये स्वातंत्र्योत्साह जागृत करण्यासाठी गुप्तहेर पाठविले व सैनिकांना आपल्या बाजुने वळवण्याचा प्रयत्न केला. अरबांना व रोहिल्यांना जास्तीत जास्त आपल्या सैन्यात दाखल करून घेण्यास प्रारंभ केला. कॅम्बेल नामक ब्रिटिश अधिकारी १८५७ च्या डिसेंबर महिन्याच्या शेवटी वाटाघाटी करण्याच्या निमित्ताने सुरपुरला आला होता. व्यंकटप्पा ब्रिटिशाविरोधी असला तरी आपली रणनिती, नियम न सोडता कॅबेल साहेबांचा सत्कार केला. या वाटाघाटींमध्ये तुम्ही रोहिल्यांना व अरबांना सैन्यात दाखल करून सैन्यात वाढ केली याचे कारण काय? असा प्रश्न कॅबेलने विचारला असता त्यावर व्यंकटप्पाने अगदी सफाईदार पणे उत्तर दिले, त्यात तो म्हणतो "परकीय असलेले ब्रिटिश आक्रमण करणार म्हणून बातम्या येतात म्हणून सुरपूरचे संरक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे."

शेवटी कॅबेलने इंग्रजांकडून आपणास काही त्रास होणार नाही, तेव्हा सैन्य भरती करण्याचे बंद करा? त्यावरही व्यंकटापाने त्वरित उत्तर दिल्याचे दिसते तो म्हणतो "लोक आपण होऊन सैन्यात दाखल होतात. त्यांना उपजीवीकेसाठी रोजगारी देणे राजा म्हणून आमचा धर्म आहे."[४०]

७ फेब्रुवारी १८५८ दिवशी लिंगसुरहून ब्रिटिशांची फौज सुरपूरच्या बाजूस येऊन दाखल झाली. हे पाहून व्यंकटाप्पाची तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याच रात्री त्यांनी किल्याचा दरवाजा उघडा ठेऊन शत्रुवर हल्ला चढवला पहाटेच्या वेळी मेजर हयूजेस याने मद्रास घोडदळ व ७४ वी हैलंडर्स फौज घेउन आले. पण सुरपुरची जनता डगमगली नाही. त्यांनी आश्वदलाचे नायक कॅप्टन न्यू बॅरी यास यमसदनास पाठवले. शत्रुंनी हार खाल्यावर किल्यात परत येऊन दरवाजा बंद केला. विंडनहॅमला परत किल्याजवळ जायचे धाडस झाले नाही.

काही दिवसांनी किल्याचे दरवाजे शोधणाऱ्या ब्रिटिश शिपायांना पहाऱ्यावर असलेल्या रोहिले सैनिकांनी तीन शिपायांचे तुकडे तुकडे केले. किल्ला घेण्यास अपयश आल्याने ब्रिटिशांनी कुटिल नितीचा खेळ खेळला.

आपल्या देशात ज्याप्रमाणे देशभक्त व रणधुरंदर पुष्कळ होऊन गेले त्याचप्रमाणे देशद्रोहीही कमी नव्हते. व्यंकटप्पा नाईकाचे अरब संबंधातला वागनगेरी भिमराव याने परकीय इंग्रजांना पैशांच्या लोभाने फितुर होऊन सांयकाळच्या वेळी विश्वासघाताने किल्याचा दरवाजा उघडून इंग्रजी सैन्यांना आत घेतले. नंतर व्यंकटप्पा ब्रिटिशांना शरण गेला. अशी खोटी अफवा पसरवली व सैन्यांमध्ये गैरसमज निर्माण केले.[४१]

स्वाभिमानी व्यंकटप्पाला ब्रिटिशांचे कैदी होण्याची कल्पना असहाय्य झाली व सायंकाळच्या अंधाराचा फायदा घेउन घोडयावर स्वार होऊन हैद्राबादचा रस्ता धरला. दुसऱ्या दिवशी निजामाच्या राजधानीत जाउन सैन्य जमवण्याचा प्रयत्न केला पण त्यास यश आले नाही. नंतर तिथे असलेला दिवान सालार जंग हा महान कपटी व महान स्वार्थी मनुष्य याने सुरपूरच्या महाराजांना पकडून बंदीस्त करून ब्रिटिशांच्या हवाली केले व ब्रिटिशांनी सिकंदराबादच्या जेलमध्ये व्यंकटप्पा नायकांना नेऊन ठेवले.

न्यायाधिशाने आगोदर मरणदंडाची शिक्षा नंतर सहानुभूती दाखवून जीव असे पर्यन्त शिक्षा, पुन्हा उदार अंत:करणाने ती शिक्षा कमी करून चार वर्षांची शिक्षा ठरवली. व्यंकटप्पाला जीवदान मिळाले अमरण शिक्षा रद्द होऊन केवळ चार वर्षाची शिक्षा झाली होती.[४२]

परंतु परकियांच्या बंदीवासात राहण्यापेक्षा असले हीन जीवन जगण्यापेक्षा परदास्यात पारतंत्र्यात दिवस काढण्यापेक्षा मरण पत्करलेले बरे. स्वाभिमानाने आलेले मरण पुढील पिढीला चैत्यन्य व प्रेरणा देईल अशी भावना असणाऱ्या या विराने दुसऱ्याच क्षणी पहारेकऱ्याला जोराने हिसका मारला व त्याच्या पिस्तुल ओढुन घेउन लगेचच

स्वत:च्या अंगावर ते पिस्तुल झाडले. चिक्क व्यंकटप्पा नायक स्वातंत्र्यप्रीय वीर, स्वातंत्र्यसाधनेसाठी आत्माहुतीचा संदेश देऊन गेला.

तुका व म्हांकाळाचे बंड

शेर का बच्चा शेर होता है । याप्रमाणे नरवीर उमाजी नाईक यांचे दोन महान क्रांतिकारी सुपुत्र तुकाराम व म्हांकाळा यांच्या कार्याची ओझरती ओळख करून देणे क्रमप्राप्त ठरते. तुकाराम व म्हांकाळा हे उमाजी नाईकांचे दोन पुत्र होते.[४३]

शुक्रवार दि.३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुणे येथील खडकमाळ पोलीस चौकी शेजारी उमाजीस ब्रिटिशांनी क्रुरपणे फाशी दिली आणि एक क्रांतियुगातील तेजेस्वी तारा निखळून पडला. परंतु त्यांचे उर्वरीत कार्य पुढे चालूच ठेवण्याची शपथ त्यांचे दोन्ही पुत्रांनी घेतली.

तुकाराम व म्हांकाळा हे वडीलांप्रमाणेच शूर, धाडशी व चारित्र्यसंपन्न होते. त्यांनीही आपल्या वडिलांप्रमाणेच डोक्याला कापडी (पट्टी), गळयात खंडेरायाचा ताईत व हत्यारबंद राहण्याची सवय ठेवली होती. दि. ७ नोव्हेंबर १८४४ मध्ये त्यांनी पहिला दरोडा पनवेल ता. कराड येथे टाकून त्यात सुमारे १ लाख ९० हजार रुपये लुटले. कंपनी सरकारने तपासाची चक्रे सुरू केली आणि दरोडयाचा माग पुरंदर तालुक्यातच लावला. भिवडी हे गाव उमाजीची जन्म व कर्म भूमी. याच गावच्या जंगलातून लहान मोठे दरोडे व सरकारी छावण्यांवर छापे टाकण्याचे नियोजन होत असल्याचे इंग्रजी अधिकाऱ्यांचे मत होते.

बहिरू मोकाशी व गणू चौगुला यांनी दिलेल्या माहितीवरून जानेवारी १८४५ मध्ये पुरंदरच्या मामलेदाराने काही लोक पकडले. त्यात तुकाराम होताच त्याचा या दरोडयात महत्वाचा वाटा होता. यावेळी दरोडयातील ५०००/- रुपयांची लूट परत मिळवली. या कामी पनवेल पुरंदरच्या मामलेदारांनी दाखविलेल्या शौर्याबद्दल कंपनी सरकारने 'रावसाहेब' हा किताब देण्याचे ठरविले. परंतु या मामलेदारास १७ जानेवारी १८४५ रोजी तुकारामाने फसविले, चकविले आणि त्यांच्या तावडीतून निसटला.

पकडण्यासाठी बक्षीस जाहीर

पानवडीचा पार्वती व आंदू रामोशी व त्याचा भाऊ हणमंता उमाजीचा पुतण्या हे दरोडयांप्रकरणी सरकारला हवे होते. पर्वती रामोशी १८४३ मध्ये पकडला. अहमदनगरच्या तुरुंगात असताना जुलै १८४३ मध्ये फरारी झाला. कराडच्या दरोडयामध्ये त्याचा हात असल्याच्या संशयावरून त्यांना पकडण्यासाठी बक्षीस जाहीर करण्यात आले.

एकंदरीत तुकाराम-म्हांकाळा-पार्वती हणमंता हे सर्व उमाजीच्याच कुटुंबातले, ते सरकारला हवे होते. हे सर्वच फरारी गुन्हेगार पुरंदर व आसपासच्या डोंगरात राहून त्याठिकाणी त्यांनी बंड उभे केले. त्यातचकामथडीचा बाबा जाधव रामोशी सावळा व हरी रामोशी काळदरीचा बहिरू शेलार सिंक्या रामोशी, कडुलकर आवळीचा आवळया रामोशी (ता.पन्हाळा), कल्या, विठुजी, राऊ येसाजी, जानुदा, सखाना, भिवा रामोशी, हैब्या रामोशी अशी सांगली कोल्हापूरकडील बरीच मंडळी त्यात सामील असून, त्यांची एक भली मोठी फलटनच तयार झाली होती.[४४] जातीला जात मिळाली होती. सर्वजन बदला घेण्यात अतिशय पटाईत होते.

१४ एप्रिल १८४५ च्या रात्री ही टोळी भिवडीत घुसली. म्हांकाळा एकटाच गावात गेला व बाकीचे गडी गावाच्याबाहेर मारुतीच्या देवळात बसले. म्हांकाळाने गाव पाटलास मामलेदाराकडे घेउन चल म्हणण्याची विनंती केली. पाटलाने नकार दिल्यावर त्यास तो घेउन बहिरू मोकाशीच्या घरी आला व पाटलांमार्फत त्यास बोालावले व पाटील आणि मोकाशीस घेऊन तो मारूतीच्या देवळात आला तेथे सर्वजन बंडवाले होतेच. पाटील व मोकाशी थरथर कापत होते. बहिरू मोकाशाला काठीने झोडपून कान व ओठ कापले. बापू नाईकाने त्याचा नाकाचा शेंडा उडविला.

दुसरा बळी पांडू महार, महारवाडयात जाऊन त्यास भरपूर मार दिला. त्यास कायमचाच पांगळा करून ठेवला. त्यानंतर भिवडीचा दाद्या भैरा न्हावी, हा कराड दरोडयातील भागीदार आणि माफीचा साक्षीदार होता. त्याने बंडवाल्यांना पकडून देण्याची

हमी सरकारला दिली होती. त्याचा शोध लावला पण हे सर्व समजताच त्याने रातोरात जंगल गाठले आणि तो वाचला.

भिवडी गावातील दंगलीनंतर सरकारला हुलकावणी देत एका रात्री सातारा भागातील पळसे गावी केवलचंद गुजर नावाच्या व्यापाऱ्याच्या दुकानावर धाड घालून १०० रुपये खंडे व ३०० रुपयांचे सामान लुटले. ५ मे रोजी भल्या पहाटे वाल्हे गावाजवळ एका कापड व्यापाऱ्यास लुटले. पिंगोटी गावातील बंडू चौधरी येसू बाळाजी यांनाही नाक कापण्याचा धाक दाखऊन ३० खंडे वसूल केला व दोन तलवारी काढून घेतल्या. २३ मे रोजी बापुसाहेब ओहेळ व कामथडीच्या सात प्रवाशांना लुटले. साताऱ्या जिल्हयातील भोरपे गांवात जेवणाची मागणी केली. अशा तऱ्हेने पुणे व सातारा भागात फार मोठे प्रस्थ माजविले होते.[४५]

नंतरच्या काळात मिलिटरीमधील इंजिनिअर्स विभागातील एका अधिकाऱ्यास तुका व म्हांकाळाचे बंड मोडण्यासाठी ब्रिटिश सरकारने पुण्याच्या फलटनीतील ५० स्वारांची तुकडी दिली. परंतु बंडवाल्यांनी, सहा महिने त्यांचा थांगपत्ता सुध्दा लागू दिला नाही. शेवटी तुका व म्हांकाळा आणि महादू वाल्हेकर यांना पकडण्यासाठी ८०० रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले.

सन १८४६ च्या डिसेंबरमध्ये बंडवाल्यांपैकी जखमी गणू भंडलकर नावाचा रामोशी पकडला गेला. सासवडहून बापू रामोशाची सुटका करण्याच्या कामी तुका म्हांकाळा या बंडात सहभागी होउन राजद्रोह केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. एप्रिल १८४७ मध्ये म्हादू चव्हाण वाल्हेकर हा आणखी एक साथीदार पकडला गेला. त्याला पकडण्यासाठी ३०० रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. तुक्या व म्हांकाळयाच्या बंडात अनेक प्रकरणात त्यास साथ केली आशा आशयाचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला होता.

११ मे १८४९ रोजी रिव्हजने तुक्या, म्हांकाळाने केलेले गुन्हे त्याचे साथीदार त्यांची नावे सरकारकडे देणारास व पकडण्यासाठी प्रत्येकी १०००/- रु. रोख बक्षीस जाहीर केले. २० मे रोजी जादा शिपायांची कुमक व ती मोक्याच्या ठिकाणी गटागटाने सतत उभी गस्त सुरू ठेवली. सरकारने जाहीर केलेले बक्षीस सर्व जिल्हयांतून जाहीर करून पाटील जाहगीरदार व फितूर रामोशी यांना बक्षीसाचे आमीश दाखवून कामाला लावले.

या कामी सातारा जिल्हयातील केशव लक्ष्मण भागवत (ब्राम्हण) यानेही माहिती पुरवण्याचे आश्वासन दिले.

१४ जुलै १८४९ ला पाठलाग करीत असलेल्या एका तुकडीने कात्रज घाटात नम्माजी कृष्णाजी नावाचा रामोशी पकडला व हणमा रामोशी थोडक्यात निसटला. थोडक्यात सांगायचे झाले तर बंडवाले कोठे दुसरीकडे कधीच गेले नव्हते. ते पुरंदर परिसरातच लपून छपून होते. पण खोटया खबरींमुळे ब्रिटिश शिपायांची धांदल उडत, शिवाय खरी माहिती कुणीच सांगत नसत. कारण गावात बंडवाल्यांचेही खबरे होते. शिवाय आणखी एक जमेची बाजू म्हणजे क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या मुलांबद्दल जनमाणसात आदराचे व आपुलकीचे स्थान होते. शिवाय स्थानिक बडया लोकांची त्यांना आतून फूस व मदत होती.

तुकाराम व म्हांकाळला पकडण्याची कॅ. वेल्सची कामगिरी

१८५० साली भिवडी-साकुर्डी-पानवडी म्हणजेच पुरंदरच्या आसपासच्या परिसरात कॅ. वेल्सने लक्ष केंद्रित केले. आजुबाजुच्या जंगलातही शिपाई छावण्या ठेवल्या होत्या. परंतु अचानक एक बातमी सरकारला मिळाली की १७ एप्रिल रोजी साकुर्डीला त्याच्या सासुरवाडीला, तुक्या व त्याची आई त्याच्या साथीदारांसह (खंडोबाच्या जागरणासाठी) (मेजवाणीला) जाणार होते. हाच धागा पकडून तसा बंदोबस्त केला आणि साकुर्डीच्या झाडाझुडपात पोलीस ठेवण्यात आले.

रात्रीच्या काळोखाचा फायदा घेत तुका व म्हांकाळ हे अंगावर काळया घोंगडया घेऊन मध्यरात्री घरात शिरले. त्याच बरोबर शेजारीच दबा धरून बसलेल्या पोलिसांनी घराला वेढा दिला त्याचबरोबर तुका व म्हांकाळाने बाहेर येऊन काही फैरी झाडल्या त्यात पोलीसांकडील "अनु सावंत" नावाचा शिपाई जखमी झाला. त्याचबरोबर सर्वच शिपाई त्या दोघावर तुटून पडले आणि ज्यांच्यासाठी कंपनी सरकार पाच वर्षे धावपळ करीत होते ते तुका व म्हांकाळा हे पोलीसांच्या हाती मोठया प्रयत्नाने लागले.

त्या प्रसंगी झालेल्या चकमकीत दोघेही जबर जखमी झाले. सकाळी त्यांना पुण्याला नेत असताना दिवे घाटातच भयंकर जखमांच्या रक्त स्त्रावामुळे तुक्या मरण पावला आणि म्हांकाळाची कोठडीत रवानगी करण्यात आली.

जबान्या आणि शिक्षा

म्हांकाळ-हऱ्या-सावळा यांच्यावर खटला भरण्यात आला. सशस्त्र माणसे जमवून सरकारविरूध्द उघड उठाव केल्याचा राजद्रोहाचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला.

बहिरू मोकाशी, पांडू महार यांच्यापासून ते पकडेपर्यन्त ज्यांना ज्यांना गंभीर शिक्षा दिली होती अशा सर्वांच्या जबान्या घेण्यात आल्या.

जुलै १८५० ॲक्टिंग सेशन जज्ज समोर खटला सुरू झाला. म्हांकाळाने सर्व गुन्हे कबूल केले. हऱ्या आणि सावळया यांनी गुन्हे नाकबुल केले पण त्यांच्या विरूध्द साक्षी पुरावे भक्कम असल्यामुळे ते निर्दोष सुटू शकले नाहीत. अखेर खटला पूर्ण झाल्यावर फाशीची शिक्षा ठोठावण्यात यावी असा निर्णय सेशन जज्ज कोर्टाने दिला आणि पुढे तो मंजुरीसाठी फौजदारी आदालतीकडे पाठविण्यात आला. त्याच्यावर निर्णय होऊन सप्टेंबर १८५० मध्ये म्हांकाळाला १४ वर्षांची आणि हरी व सावळा यांना १२ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा मंजूर झाली.[४६]

अशा प्रकारे तुकाराम व म्हांकाळा यांच्या बंडाचा शेवट झाला.

तुका व म्हांकाळाच्या एका धाडशी छाप्याची माहिती मिळते तो कागद कै. पांडोबा पटवर्धन मंडळ यांच्या संग्रहातील आहे तो पुढीलप्रमाणे-

श्री

शके १६६७ माघ व.१९

ले.क्र.८

इ.स. १८४५ फेब्रु.१२

स्मरणार्थ मार तुक्या व म्हांकाळा बि उमाजी रामोशी भिवडीकर यांचे बंड होऊन मार्ग चोरून रानात हिंडतात. पौष मासी पुणे मुक्कामी हटसाहेब यांच्या बंगल्यावर दरवडा सोळा सतरा आसार्मीनी घातला ते लोक काही सापडले त्यात पानवडीकर हणमंत रामोशी यांचा लेक किंवा पुतण्या बापू रामोशी हा बंडात होता. तो सदरहू चोरीत सापडला तो ठाणे सासवड येथे चौकशी करिता हुजुरून आला त्याजला कैदेत बेडया पायात घालून कचेरी मंडपात होता. तो माघ शु.।। १५रोजी बुधवारी दिवसा बराबर चार वाजता म्हणजे अस्तमानचा पाच घटका दिवस होता. ते वेळसे सदरहून कैदी यास परसाकडे नेण्याकरिता बरोबर तुकाराम भोंगाला व रामजी जैन शिपाई नि।। कुपणी सरकारचे हे दोन आसामी शिपाई चांबळीवर (नदी) सोपानदेवाकडे घेऊन गेले. तेथे तुक्या व म्हांकाळा व हणमंता पानवडीकर व आणखी पाच येक आसामी असे मिलोन शिपाई याजवर चालोन भोगला याचे हातावर तलवारीचा वार केला व जैन शिपाई याची पांघुरणे व तलवार घेउन कैदी बेडया सुध्दा उचलून घेऊन गेले.

मागाहून शिपाई व स्वार चालून गेले त्याची व बंडवाले यांची झटापट झाली परंतु बंडवाले यांनी बाण्या याच्या पायात बेडी होती ती मोडून शिपाई याजवर गोळया घालून स्वार याचा घोडाही आजारी केला. शिपाई माघारी आले बंडवाले निघोन गेले काशिनाथ

विनायक मामलेदार निबुत मु।। होते. हे वर्तमान बापू अभंग यांनी वाल्हे मु।। सांगितले ते लि।। असे मि।। माघ व।।१ गुरुवार सन १२५५ शके १७६७.[४७]

नंतर १८५७ मध्ये फार मोठया प्रमाणावर झालेला राष्ट्रीय उठाव. या कारणांनी इंग्रजांचे या देशातील सरंजामदार, सरदार, वतनी हक्कदार जमीनदार १) वतने जहागिऱ्या खालसा करणे २) दत्तकवारस नामंजूर करणे इ. बाबतचे धोरण बदलले आणि इंग्रज सरकारने पुण्याचे कलेक्टरमार्फत उमाजीची बायको श्रीमती गंगाबाई हिला इ.स. १८६४ मध्ये त्यांच्या ताब्यात असलेल्या व इतर काही जमिनीचा कागद व सनद करून दिली. तोच सुपीक खोमणे मळा होय. हा मळा भिवडी गावच्या उत्तरेस असून त्यात उमाजीचे सातवे वंशज चंद्रकांत सुदाम खोमणे राहतात. याच मळयात उमाजीचे स्मारकही आहे.[४८]

याशिवाय थोर क्रांतीकारकांच्या विचाराचा वारसा घेउन रामोशी समाजाने देशधर्म संरक्षणासाठी अनेक वीररत्ने बळी दिली थोडक्यात त्यांचा परिचय -

१) बहिर्जी नाईक - शिवछत्रपतीच्या अष्टप्रधान मंडळातील एक महत्वाचे खाते ते म्हणजे हेरखाते या खात्याचा प्रमुख.

२) येसाजी नाईक - स्वराज्याचे बुरुज भक्कम व्हावेत यासाठी मुलगा व सुनेला बळी देणारा वीर.

३) भद्राप्पा नाईक - स्वातंत्र्य प्रेमापोटी तंजावरची जहागीरी सांभाळण्यात आक्रमक वीर राजा.

४) हिरोजी फर्जद - वेषांतर करून बातम्या पुरवणारा एक कल्पक तारा.

५) राजा मदकरी नाईक (१७३५ ते १७८०) - हैदरअली सुलतानशाहीमध्ये शत्रु फौजांशी सामना करून आपले राजेपद पणाला लावणारा पराक्रमी राजा.

६) राजा व्यंकाप्पा नाईक (१८५७ ते १८५८) - सुरपूरच्या संस्थानात पराक्रम गाजवून इंग्रजांना नामोहरम करणारा पराक्रमी वीर प्रतापी राजा.

७) युगपुरुष उमाजी नाईक (१७९१ ते १८३२) - शिवछत्रपतींचा आदर्श डोळयासमोर ठेऊन शिवाजीराजांसारखे स्वराज्य स्थापावे अशी जबरदस्त इच्छा व महत्वाकांक्षा आणि ब्रिटिशांना जबरदस्त हादरा देणारा रामोशी राजा.

८) सिंधूर लक्ष्मण (१८९० ते १९२०) - क्रांतीची बीजे पूर्व कर्नाटकात व उत्तर महाराष्ट्रात पेरणारा व स्वातंत्र्यासाठी बलिदान करणारा शूर सेनानी (सिंधुर संस्थान)

९) दौलती नाईक - स्वातंत्र्याच्या चळवळीत उमाजी नाईकांचा आदर्श डोळयासमोर ठेऊन इंग्रजांविरूध्द लढणारा थोर स्वातंत्र्य सैनिक हा पुणे जिल्हयातील भीमा कोरेगावचा होता.

१०) व्यंक्या बेरड
आवळया रामोशी
शिवा रामोशी
} इंग्रजी अधिकाऱ्याचे कर्दनकाळ

११)हरी रामोशी - १८५७ च्या स्वातंत्र्य लढयात ब्रिटिश सत्तेला हादरे देणारा थोर क्रांतीकारक - याचे बंड मोडण्याकरिता रामोशी समाजास व इतरांना धाक बसावा म्हणून जेजुरी येथे सोमवती अमावसेच्या दिवशी फासावर लटकवले आणि प्रेत २४ तास तसेच लटकवत ठेवले.

१२) खानदेश धुळे येथील हंसाजी, पंताजी, खंडोजी नाईक, बाळाजी नाईक, संतू बेरड वर उल्लेखिलेल्या सर्व क्रांतिकारकांनी स्वराज्यासाठी आणि स्वातंत्र्यासाठी आपले प्राण गमावले आहेत. म्हणजेच त्यांचे स्वातंत्र्य व स्वराज्य निर्मितीत महत्वाचे व मोलाचे योगदान ठरले आहे.[४९]

रामोशी क्रांतीकारकांविषयीचे गौरवोद्‌गार

१) छत्रपती शिवाजी महाराज

रामोशी ही जमात इमानी तर आहेच पण प्राणांची त्यांना पर्वा नाही. आपल्या स्वामीच्या निष्ठेपायी स्वत:चा जीव धोक्यात घालून त्याचे रक्षण करतात. हे उत्तम हेर आहेत, योध्दे आहेत. स्वराज्यात त्यांचा वाटा माझ्याबरोबरीने आहे.-शिव बखर

२) श्रीमंत पेशवे

मराठयांचे राज्य पुन्हा उभारण्यात जर कोणाचे सहाय्य झाले असेल तर ते शूर धाडशी रामोशांचे, त्यांच्या विचाराचे.

३) कॅ. मॅकिंन्टॉश -

उमाजी नाईक हा सामान्य माणूस नव्हे तर त्यांच्या दृष्टीपुढे नेहमी छ. शिवाजीचे आदर्श होते. उमाजीला देश स्वातंत्र्याची फार मोठी लालसा होती म्हणूनच त्याने क्रांतीचा भडका उडविला.

४) कॅ. स्मिथ (१८५७) -

रामोशाहून शूर जगात इतरत्र कोठेही मिळणार नाहीत.

५) कॅ. मेडोज टेलर (१८५७) -

सुरपूरच्या संस्थानाचा राजा व्यंकटप्पा नाईकांचा पराक्रम पाहून म्हणतो "बेरड इज व्हेरी फायटर ट्राईब्ज"

६) कॅ. डॅनियल -

दौलत रामोशीला टिसुबाईच्या डोंगरात पकडणारा डॅनियल म्हणतो, रामोशी लोक फार आक्रमक आणि पेटून उठलेले आगडोंब आहेत. त्यांच्यात स्वातंत्र्याची उर्मी आहे व त्यांना प्राणांची पर्वा नाही.[५०]

७) पुण्याचे कलेक्टर रॉबर्टसन म्हणतो (१८२०) -

१८२४ मध्ये भांबुडर्याचा खजिना लुटला ते पाहून रॉबर्टसन सरकारला लिहितो हे सर्व रामोशी बेडर कोणत्यातरी राजकीय बदलाची वाट पहात आहेत. त्यांच्या मनात इंग्रजांविषयी असंतोष आहे. तिरस्काराने ते पेटले आहेत. त्यांना जनताही मदत करते आहे. पुण्याचे लोक तर उघड बोलत आहेत की, "कुठे आहे इंग्रजांचे राज्य" समरांगणावर ते लढतील पण इथे रामोशांपुढे त्यांचा निभाव लागणार नाही. कोणी सांगावे हा उमाजी नाईक रामोशांचा राजा होऊन छ. शिवाजीसारखे मराठयांचे राज्य स्थापन करणार नाही कशावरून.[५१]

उमाजी नाईकांची समाधी

उमाजी नाईकांच्या मूळगावी (भिवडी) या ठिकाणी खोमणे मळयामध्ये उमाजीचे प्रेत पुरले होते. नंतर (१९७६) साली समाधीची डागडुजी करण्यासाठी व जुन्या समाधी स्थळी नविन सिंहासन बांधण्यासाठी खोदकाम केले असता त्यात प्रथम उमाजीची कवटी व खांद्यापर्यन्तचा सापळा दिसला. यावरून उमाजीचे प्रेत दफन केले होते हे सिध्द होते.

(प्रत्यक्ष मुलाखत चंद्रकांत खोमणे - २१-५-२०१३ उमाजीचे सातवे वंशज)

समाधी स्थळ

चंद्रकांत सुदाम खोमणे (उमाजीचे सातवे वारस) यांच्या मालकीच्या जमिनीत हे समाधी स्थळ आहे. समाधी साध्या स्वरूपाचीच आहे. साधारणतहः एक छोटेसे देऊळ आहे त्यामध्ये काही मूर्ती आहेत. त्या दगडामध्ये ओबड धोबड कोरून तयार केलेल्या दिसतात. त्यावर शेंदूर फासलेला आहे. या मूर्तीमध्ये मधली मूर्ती उमाजीची आहे. उजव्या हाताला म्हांकाळा (उमाजीचा थोरला मुलगा), डाव्या हाताला तुकाराम (उमाजीचा धाकटा मुलगा)त्याचप्रमाणे डावीकडील बाजूस खंडोबाच्या मूर्ती आहेत (मुलाखत चंद्रकांत खोमणे व प्रत्यक्ष क्षेत्रभेट-२१/५/२०१३) समाधीचे छायाचित्र परिशिष्टात समाविष्ठ केले आहे.

स्मारक

अे. आर. आंतुले हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी सर्वच स्वातंत्र्य विरांची (हुतात्म्यांची) स्मृती चिंतन रहावी म्हणून स्मारके बांधलेली आहेत. महाराष्ट्रामध्ये अशी एकूण २०४ स्मारके आहेत. त्यामध्ये ८ स्मारके ही रामोशी समाजातील हुतात्म्यांची आहेत. आणि त्यामध्ये पुणे जिल्हयातील पुरंदरच्या पायथ्याशी असलेले भिवडी, ता. पुरंदर येथे क्रांतिसिंह उमाजी नाईक यांचे स्मारक आहे. त्याचप्रमाणे जेजुरी येथे हरी रामोशाचे स्मारक आहे.

संदर्भ (मुलाखत शिवाजीराव एक्के सर (सासवड) आणि दैनिक प्रभात बातमी - ११-६-१९९८) उमाजी नाईकांचे भिवंडी येथील स्मारकाचे छायाचित्र परिशिष्टात आहे.

वतने -

उमाजीस सात गावांची वतने होती ती म्हणजे

१) साकुर्डे -१२० बिघे

२) जोगवडी

३) मावडी

४) सासवड (१८५एकर खोमणे मळा)

५) भिवडी

६) घेरा

७) पुरंदर (१०१ एकर)

संदर्भ मुलाखत चंद्रकांत सुदाम खोमणे (वय -५२) दि.२१-५-१३

संदर्भ सूची

१) सवदी प्रा. ए. बी.-महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, ५ मार्च १९९९, पृ.क्र. १

२) सरदेसाई गोविंद सखाराम- मराठी रियासत, खंड ८वा, संपादक- स.मा. गर्गे, प्रकाशक- रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९३२ पृ.क्र. ५२२.

३) अत्रे चिं. ना.- गावगाडा, पृ.क्र. ३५

४) घोडके डॉ. ह.म.- महाराष्ट्रगाथा, प्रकाशक - दिलीप माजगांवकर, राजहंस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती- २०००, पृ.क्र. ६८

५) डॉ. राउत गणेश- छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ १६३० ते १७०७डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ.क्र. ११८

६) मालशे स. गं.- विधवा विवाह चळवळ १८००-१९०० पुणे व आपटे नंदा, १९७८ पृ. ५

७) घोडके डॉ. ह.म.- पृ.क्र. ७६

८) कित्ता- पृ.क्र. ८१

९) खोबरेकर डॉ. वि. गो.-महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८ - १८८४), प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ी पृ.क्र. १४

१०) कित्ता-पृ.क्र. १५

११) घोडके डॉ. ह.म.-महाराष्ट्रगाथा, प्रकाशक - दिलीप माजगांवकर, राजहंस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती- २०००, पृ.क्र. ४५

१२) खोबरेकर डॉ. वि. गो.-महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८-१८८४) प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १९९४, पृ.क्र. २०

१३) बावळे प्रा. डॉ. अर्जुन सावळाराम - क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके आणि तत्कालीन कागदपत्रे, प्रकाशक श्री. रमेश दशरथ शेळके, मिलिंद ऑफसेट जळगांव, प्रथमावृत्ती - ४ नोव्हेंबर २००४, पृ.क्र. ४

आणि देवगीरीकर त्र्यं. रं.-वासुदेव काका जोशी आणि त्यांचा काळ, पृ. ८

१४) कोकाटे श्रीमंत-खरा शिक्षक दिन २८ नोव्हेंबर, प्रकाशक - संभाजी ब्रिगेड, महाराष्ट्र, 'जिजाई' प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती - ११ मार्च २००८, पृ.क्र. ३

१५) कीर धनंजय (संपादक)-महात्मा फुले समग्र वाङमय (शेतकऱ्यांचा आसूड) फडके य.दी., सहावी आवृत्ती - नोव्हेंबर २००६, मालशे स.ग.प्रकाशन - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. क्र. २६३

१६)Sir Jadunath Sarkar-Shivaji & his Times. Page. 39

17) Sir Jadunath, Sarkar – Shivaji and his Times, P - 40

18) Gune Dr. V. T.– Judicial System of the Marathas, P - 116

१९) पटवर्धन कै. पा. न.-ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड- ५, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, लेखांक २१ या मध्ये वंशावळ आहे.

20)Mackintosh – P - 57

21) I bid – P - 58

22) I bid – P – 59

२३) पुरंदरे बाबासाहेब-'पुरंदर', प्रकाशक- महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान, सातारा, पुनर्मुद्रन १९७२ - पृ.क्र. ७०

२४) दैनिक सकाळ (नाशिक)- दि. २६ जुलै १९९८

२५) दैनिक देशदुत (अहमदनगर)-शनिवार दि. ३०/४/२०११ पृ. १३

२६) गायकवाड आर. डी. व इतर- मराठेकालीन संस्था व विचार, प्रकाशक - मोरेश्वर फडके, 'फडके' प्रकाशन - कोल्हापूर, तिसरी आवृत्ती- १९९०, पृ.क्र. ३१७-३१८

२७) कुंभार गुरुजी ब.ना.- शिवरायांची नवरत्ने, प्रकाशक - गुलाबराव मारुती कारले, 'नवमहाराष्ट्र' प्रकाशन, पुणे, दि. २५/११/१९६८ पृ.क्र. ३१-३२.

२८) पुरंदरे बाबासाहेब- 'पुरंदर', प्रकाशक - महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान, सातारा, पुनर्मुद्रन १९७२ - पृ.क्र. ११

२९) बेंद्रे वा. सी. -छत्रपती शिवाजी महाराज, "पुर्वार्ध", प्रकाशक - सौ. पुनम राहुल मेहता, पार्श्व पब्लिकेशन- कोल्हापूर,द्वि. आ.- १८ मार्च २०१३, पृ.क्र. ३६७

३०) दैनिक प्रभात- दि. ११ जून १९९८

३१) बावळे प्रा. डॉ. अर्जुन सावळाराम- क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके आणि तत्कालीन कागदपत्रे, प्रकाशक श्री. रमेश दत्तात्रय शेळके, मुद्रक मिलिंद ऑफसेट, जळगांव, प्रथमावृत्ती - २००४, पृ.क्र. ६३

३२) ताटके अरविंद-आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके प्रकाशक - संजयरामचंद्र लिमये, मीनल प्रकाशन - कोल्हापूर, १५ ऑगस्ट १९९३ पृ.क्र. ५५

३३) उपरोक्त (बावळे अर्जून)- पृ.क्र. ६३

३४) दै. सकाळ (नाशिक) वृत्तपत्र-पत्रकार गोरवाडकर गोविंदराव यांचा लेख दि. २६ जुलै १९९८, ढगे प्रभाकर (गोवा) "चित्रलेखा", १७ डिसेंबर २००७, पृ. क्र. ३५.

३५) भोसले प्रा. डॉ. अरुण- भारत इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, (इतिहास विभाप्रमुख) वर्ष २१ वे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ.क्र. ८३

३६) कित्ता- पृ.क्र. ८४

३७) चव्हाण वसंतराव- रामोशी समाज एक क्रांतिज्योत, प्रकाशक - मा.आरडे प्रभाकर,पृ.क्र. ७४

३८) कित्ता- पृ.क्र. ७७

३९)कित्ता- पृ.क्र. ७८

४०)कित्ता- पृ.क्र. ७९

४१)कित्ता- पृ.क्र. ८१

४२)उमाजी नाईकांची वंशावळ (परिशिष्टात समाविष्ट आहे.)

४३) चव्हाण वसंतराव- रामोशी समाज एक क्रांतिज्योत प्रकाशक - मा. आरडे प्रभाकर पृ.क्र. २६

४४) कित्ता- पृ.क्र. २७

४५) कित्ता- पृ.क्र. ३२

४६)एक्के शिवाजीराव- आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक प्रकाशक- एक्के गजानन शिवाजीराव पृ.क्र. ९७

४७) खोमणे चंद्रकांत सुदाम- उमाजीचे सातवे वंशज, यांची प्रत्यक्ष मुलाखत दि. २१/५/२०१३

४८) चव्हाण वसंतराव-रामोशी समाज एक क्रांतिज्योत, प्रकाशक- मा. आरडे प्रभाकर, पृ.क्र. ४७,४८

४९) कित्ता- पृ.क्र. ४९

५०) कुलकर्णी अ. रा.- कंपनी सरकार (महाराष्ट्र पुर्वरंग:३) (इस्ट इंडिया कंपनी), प्रकाशक - दिलीप माजगांवकर, 'राजहंस' प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, डिसेंबर २०१३, पृ.क्र. १३९, १४०

प्रकरण दुसरे

उमाजीचे पूर्वचरित्र

क्रांतिकारक उमाजी नाईक हे मूळ हिंदू धर्मातील रामोशी जातीत जन्मास आलेले, म्हणून कोणताही माणूस ज्या वातावरणात लहानाचा मोठा होतो त्या वातावरणाचा व जातीचा त्याच्यावर कळत नकळत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या परिणाम होत असतोच. म्हणूनच उमाजी नाईकांच्या बाबतीतही काही वेगळे नाही. रामोशी जातीत जन्म झाल्यामुळे या जातीतील रूढी, परंपरा रितिरिवाज, उपजिविकेची साधने, व्यवसाय या सर्वांचा त्यांच्यावर प्रभाव पडणे ओघाने आलेच. जाती बंधनाच्या आणि जातीप्राप्त जीवन पध्दतीच्या जगातून बाहेरे पडणे ही गोष्ट फारच कठीण. या सर्व गोष्टी उमाजीस तंतोतंत बसत होत्या.

रामोशी नाम आणि उद्‌गम्

रामोशी या शब्दाची उत्पत्ती अशी- 'रामोशी' हा शब्द रामवंशी या शब्दांपासून झाला असावा.[१] प्रभूराम सितेच्या शोधासाठी श्रीलंकेला गेले त्यावेळी त्यांनी ज्यांना स्थापन केले त्यांस रामवंशी म्हणतात. त्याच प्रमाणे त्यांना रामाचे पूत्र असेही म्हणतात. किंवा रामाने उत्पन्न केलेले. दुसरी व्युत्पत्ती म्हणजे रामोशी हा शब्द रानवासी याच शब्दापासून निघाला असावा असे वाटते, कारण त्या शब्दात आणि रामोशी लोकांच्या चाली रितीत पुष्कळ साम्य दिसून येते. रानवासी म्हणजे रानात राहणारे म्हणून रामोशी.[२] हे रामोशी स्वत:ला 'रामवंशी' म्हणवितात. या मूळ नावाचा अपभ्रंश होऊन रामोशी हे नाव इतिनाम बनले असावे.[३] त्याच प्रमाणे आणखी एक व्युत्पत्ती अशी की रामू(मो)शी.

पु. एक विशिष्ट जात रखवालदार

सं. अरण्यावासी राणवासी. रामवंशी (?)[४] तथापि कॅम्पबेलने रामोशी या नामाची व्युत्पत्ती अशी सांगितली आहे की, रामवंशी म्हणजे रानात वनांत राहणारे त्यांच्या

व्युत्पत्तीनुसार रामोशी लोक गावच्या बाहेरील बाजूस राहतात. त्यांना 'नाईक' अथवा 'नाईकवाडे' संबोधले जाते. या समाजातील जे लोक मांसाहारी नसतात. ते त्यांना 'शाकाहारी' अर्थात रामभक्त म्हणतात.[५] राम व रावणाच्या दंत कथेतील नायकावरून रामोशी हा शब्द आलेला दिसतो. रामाच्या उशीची काळजी आणि रक्षण करणारे म्हणून रामोशी असाही एक मतप्रवाह आहे. [६] रामोसी-शी ! रामोशी अव.शी.सा.श्या

(सं. रामवंशी किंवा आरण्यवासी) पु. १ एक जातिविशेष; त्या जातीतील व्यक्ती (ल) अतिशय बिलंदर मणुष्य [७]

वरील सर्वच व्युत्पत्तींचा मागोवा घेता राम दक्षिणेतून म्हणजे दंडकारण्यातून जेव्हा लंकेला गेला तेव्हा त्यांनी उत्पन्न केलेले किंवा संस्थापिलेले लोक ते म्हणजे रामोशी. परंतु या विचाराशी जवळजवळ कोणाचाच विश्वास बसणार नाही कारण इतिहास सुध्दा विज्ञाना एवढाच सत्य असतो. पुराव्याशिवाय इतिहास सांगता येत नाही. No Documents no History पुरावा नाही तर इतिहास नाही. पुराव्या अभावीचा इतिहास कमी विश्वासार्हतेचा ठरतो. याशिवाय ते जर रामाचे वंशज समजले जात होते तर त्यांना समाजात मानाचे आणि आदराचे स्थान का नाही. माणसाची ओळख त्याच्या सहवासाच्या ठिकाणावरून केली जाते. याची इतिहासात अनेक उदाहरणे सापडतात. उदा. मंगोलियनचे मोगल, तुर्कस्तान चे तुराणी, राज्यस्थानचे राजस्थानी वगैरे म्हणून रानवासी हा शब्द मात्र जवळजवळ तंतोतंत जुळतो.

संस्कृत कोशात रामोशी हा शब्द आढळून येत नाही. त्या ऐवजी 'भारूर' हा शब्द योजला आहे. रामोशी लोकांसारखी ज्यांची राना-वनांत वस्ती आहे त्यातच ते राहतात, आणि जे त्यांच्याच सारखा धंदा करून आपली उपजिविका करतात. त्यांना निषाद, भिल्ल, कोळी, बेरड, वगैरे म्हणतात. या सर्वच जाती खालच्या वर्गातील आहेत. निषाद जातीचा पुरूष अणि शुद्र जातीची स्त्रियांपासून जी जात उत्पन्न झाली, तिला 'पुलकेशी'

म्हणतात. डोंब जातीचा पुरुष व पुलकेशी जातीच्या स्त्रियांच्यापासून झालेल्या संततीस भारूर म्हणतात. आणि रखवालदारी करणे हा त्यांचा मुख्य धंदा होता.[८]

आठराव्या शतकात रामोशी लोक दरोडेखोर म्हणून जरी ओळखले जाऊ लागले असले, तरी प्रश्न हा पडतो की रखवालदारी करणारे दरोडेखोर कसे? रक्षण करणारे भक्षक कसे बनतील? त्यांच्यावर लावण्यात आलेले हे कलंक इतिहासकाराने नि वाचकाने पाण्यात राहूनही मासा जसा कोरडा राहतो हया न्यायाने पुसला पाहिजे. त्यांचे अंगभूत गुण म्हणजे इमान होते म्हणूनच शिवाजी राजांनी त्यांना गड रक्षणची जबाबदारी दिली होती हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ते बंडखोर होते पण लुटारू नव्हते याचा इतिहास पुढे येईलच. पुर्वी प्रत्येक खेडयांमध्ये जागला किंवा रखवालदार म्हणून एक निराळीच जात होती. रामोशांनी पुढे रखवालदारीचे काम स्विकारलेले दिसते.

रामोशी लोक उत्तरेकडील कनारसे अथवा तेलगू जातीतील घटक असावेत. तेलगू जातीत अनेक उप जातींचा समावेश झलेला आहे. त्यापैकी 'बेदार' या घटकाशी रामोशी जातीची जवळीक व साम्य दिसते. याचा पुरावा म्हणजे बेळगावातील रामोशी आजही स्वत:ला बेदारचे (बेदर) समजतात. त्यांच्या बरोबर रामोशी लोक रोटी व्यवहार करतात पण बेटी व्यवहार करीत नाहीत. त्यांची बेदार जाती बरोबरची जवळीक म्हणजे त्यांची कनारसे किंवा तेलगू मूळ सांगणारी नावे तेलगू भाषेतील शब्दप्रयोग, त्यांची नाईक इत्यादी शिर्षक नावे, त्यांच्या परंपरा इ. त्यांचे बेदार समाजा सारखेच रागीट वर्तन इत्यादी सर्व बेदार या जातीचेच मूळ दाखवितात. रामोशी ही जमात मुख्यत: कुणबी आणि मांग या जातींच्या संकरातूनही तयार झाली असावी त्या पैकी काही जण कुणबी स्त्रियांशी विवाह करीत किंवा त्यांना रखेल म्हणूनही ठेवत असत. म्हणूनच या जातीचे मांग या जातीशी असलेल्या साम्यामुळेच पुढे मांग रामोशी ही पोटजात तयार झालेली दिसते.[९]

रामायणाचा नायक राम हा जेव्हा कैकईच्या इच्छेनुसार वनवासात पाठविला गेला. तेव्हा राम प्रथम दक्षिणेकडील नर्मदा नदीकडे आले. कैकईच्या इच्छेखातर रामानंतर

भरताने गादीवर बसावे असे ठरले होते. पण भरताला पश्चाताप होऊन रामा पाठोपाठ नर्मदेकडील जंगलात भटकंती करावी लागली. त्यात जंगलातील अनेक लोक (रानवासी) येऊन भरताला मित्र म्हणून लाभले. रामाचे आयोध्येमध्ये पुनरागमण झाल्यानंतर भरताने या जंगलातल्या आपल्या सहकारी मित्रांना स्वत:बरोबर आयोध्येत आणले आणि रामा समारे उभे केले. रामाने या सहका-यांना ग्रामरक्षक म्हणून नेमले. तेव्हापासून त्यांना रामवंशी अर्थात रामाची मुले असेही संबोधले जाऊ लागले. [१०]

रामोशी लोक मुख्यता मशागत, शेती काम व मेंढपाळ व्यवसाय करताना आढळतात. महाराष्ट्रातील हे लोक पुर्वीच्या काळी चौकीदार किंवा ग्रामरक्षकाची कामे करीत असत. कर्नाटकातील बेदार जातीची एक शाखा म्हणजे महाराष्ट्रातील रामोशी समाज ओळखला जातो. पुर्वी हे लोक महाराष्ट्र व कर्नाटकच्या सीमावर्ती भागातील सांगली, कोल्हापूर जिल्हयात दिसतात. कर्नाटकातील बेदार किंवा महाराष्ट्रातील रामोशी हे लोक प्रामुख्याने बंडखोर प्रवृतीचे म्हणून ओळखले जात असत. ते असे जरी असले तरी रामोशी हे बंडखोरच होते, इंग्रजांचे खजिने लुटून त्यांना सळो की पळो करून सोडणारे होते. म्हणून इंग्रजानी त्यांना लुटारू म्हटले आहे आणि आपण आजतागायत तेच स्विकारले आहे. इंग्रजांना ज्यांनी ज्यांनी त्रास दिला त्यांना त्यांना इंग्रजांनी अशीच दुषणे लावली आहेत. संयुक्त हिंदुस्तानात ब्रिटिश शासन काळात रामोशी ही जमात गुन्हेगारी वर्गात सामाविष्ठ केलेली होती. [११]

रामोशांची सध्या महाराष्ट्रातील एक मागासलेली जमात, विमुक्त जमात असून त्यांची वस्ती मुख्यता पुणे, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, अहमदनगर आणि औरंगाबाद या जिल्हयांमध्ये आढळते. कर्नाटक राज्यातही त्यांची वस्ती आहे तेथे त्यांना 'बेरड' या नावाने ओळखतात.

मराठा आमलांत गावगाडयाच्या ग्रामव्यवस्थेत त्यांना बलुतेदार म्हणून मान्यता दिलेली होती. बारा बलुतेदारांप्रमाणेच त्यांना खास पारंपारिक व्यवसाय नसला तरी त्या

काळी गावच्या रक्षणाची जबाबदारी रामोशांवार असे. पुढे हाच त्यांचा व्यवसाय मानला गेला. त्याचा मोबदला गावचे शेतकरी पाटील व ग्रामस्थ त्यांना देत असत. त्यास बलुते असे म्हटले जाई. काही गावांमध्ये त्यांना 'इनाम' म्हणून जमिनीही दिल्या जात होत्या. [१२]

१९०१ च्या जनगणनेनुसार त्यांची एकूण लोकसंख्या ६०,५५५ इतकी होती त्यामध्ये ३१,४४४ पुरुष तर २९,१११ स्त्रिया असे प्रमाण होते.

रामोशी भाषा व नावे

साधारणपणे विसाव्या शतकात म्हणजे १९०१ च्या आगोदर व नंतर रामोशांची बोली भाषा मराठी होती व देवनागरी ही त्यांची लिहिण्याची भाषा होती. इतर समाजाशी बोलताना ते हिंदी भाषेचाही उपयोग करतात. अलीकडील काळात सर्वसाधारण रामोशी लोक मराठी भाषेतच बोलतात. पण जेव्हा त्यांच्या पारंपारिक गुन्हेगारी व्यवसायासंबधी काही संदेश दयायचा असेल तेव्हा ते त्यांच्या खास भाषेत वार्तालाप करत असत. उमाजी नाईकाच्या काळात रामोशांची काही सांकेतिक भाषा होती उदा. तुन्नुक तागणे म्हणजे (मटन खाणे) रामोशांच्या सांकेतिक भाषेला 'बुएल' भाषा किंवा 'फारशी' म्हणूनही ओळखले जाते. उदा. मुलवड (मुसलमान), बनगड (गुजर), गोरोळ (बकरे), बोलम (गुळ), गोत (मार) आणि उकन (पळ).

- रातुलीन - रई करायला जायच म्हणजे रात्रीला चोरी करायला जायाचे
- बनगडे - वाणी
- गुडस - घर
- हुरकाडलय - हेरलं आहे
- मंगड - मांग

(रानात बनगाडयाचं चांगलं गुडसहुर काडल्या) म्हणजे वाण्याचं चांगलं घर हेरलंय[१३]

त्याचप्रमाणे फेब्रुवारी-मार्च १८३१ चे उमाजी रामोशाचे पत्र इतर रामोशांना गेले त्यात त्याने त्याचे सांकेतिक भाषेचे शब्द लिहिले आहेत. त्याचा अर्थ दाजी रामोशी रहिमत पूरकर याच्या सांगण्यावरून आहे तो पुढीलप्रमाणे.

	सांकेतिक भाषा		**अर्थ मराठी मध्ये**
१	माचुने	म्हणजे	समजू नये.
२	कुपनवाडी	म्हणजे	कोणास न समजता जलद यावे.
३	पारडी	म्हणजे	ब्राम्हणास न कळावे.
	पदवाड माचूने	म्हणजे	सरकारास व मराठे यास समजू नये.
५	माटुळ वहीवी आड मालकी माटुळ करू नये	म्हणजे	आमचे नांव कळू नये व वतन प्रकरणी बंड असा भाव.

रामोशांची नावे

पुरूष नावे - पुरूष मंडळीत नावे सामान्यत: मराठा समाजाशी मिळती जुळती वाटतात. उदा. धोंडी, ईटु, खूंड, लक्ष्मण, नारायण, नरसू, पांडू, पंग्या, तात्या, तुकाराम, नागप्पा, शिवाप्पा.

स्त्रियांची नावे - आयजा, बैजू, चैत्रा, धोंडी, कोंडी, लक्ष्मी रकमा, रखमा अशा प्रकारची आहेत. [१५]

पोटजातीय विभाग

रामोशी जातीमध्ये खालीप्रमाणे पाच (०५) स्वजातीय पोटभेद दिसतात.

१) बंदते २) बेरड ३) हालगे ४) कडू ५) मांग इ.[१६]

बंदते ही पोटजात हलगे पेक्षा सामाजिक दृष्या श्रेष्ठ मानली जाते तर मांग रामोशी ही पोटजात मांग व रामोशी यांच्या आंतरजातीय विवाहातून निर्माण झालेली आहे. यांचा स्पर्श अशुभ मानला जातो. ते गावकुसा बाहेर राहतात.

हलगे हे बेदार पोटजातीचा घटक समजले जातात.[१७] सुरापूर , बेदनूर , तुंगभद्रा नदीकाठचा मुलुख आणि विजापूर जिल्हयाचा पूर्वेकडील भाग या प्रांतात बेरड लोक आहेत. सुरापूर हे निजाम शाहीतील बेरड लोकांचे संस्थान पूर्वी पासून प्रसिध्द आहे. [१८]

रामोशांच्या चालीरिती (लोकजीवन)

आहार

रामोशी लोक हे बहुतांश मांसाहारी आहेत. असे असले तरी ते गोमांस व डुकराचे मांस भक्षण करीत नाहीत. त्यांच्या नित्य जेवणात भात या मुख्य पदार्था बरोबरच गहू, बार्ली, इत्यादी ध्यान्यांचाही वापर दिसतो. ऋतुनुसार फलाहार व शेंगदाना त्याचप्रमाणे सुर्यफूल तेलाचा वापर ते जेवणात करतात. त्याच बरोबर दूध व त्यापासून बनवलेले पदार्थांचा वापर आहारात करतात.

रामोशांची आडनावे

रामोशी जातीत चव्हाण आणि जाधव या दोन मुख्य शाखा अथवा घराणी आहेत. या दोन मुख्य घराण्यातच लग्न व्यवहार होऊन त्यापासून पुढे शेकडो कुळे उत्पन्न झाली. आणि पुढे त्याच कुळांना वेगवेगळी अडनावे पडली. पुढे चव्हाण व जाधव यांमध्ये विभाजन झालेले दिसते. पैकी चव्हाण ही जाधवांपेक्षा श्रेष्ठ जमात मानली जाते. कारण कोणत्याही समारंभाची सुरूवात चव्हाणांशिवाय होत नाही. [१९]

रामोशी लोकांत सुमारे १२५ च्यावर आडनावे आहेत. ही आडनावे त्यांच्या जन्म भूमीवरून पडलेली आहेत. एखाद्या रामोशाचे कूळ एका गावाहून उठून दुसऱ्या गावी जाऊन स्थाईक झाले म्हणजे त्यास त्या नवीन गावी त्याच्या पुर्वीच्या गावच्या नावावरूनच लोक त्यास हाका मारीत अशा रितीने त्या कुटुंबास आडनाव मिळते.

पुरंदर प्रदेशातील काही रामोशी लोकांची कुटुंबे जेव्हा निजामशाहीत काही दिवस राहिली तेव्हा त्यांना तेथील लोक पुरंदरकर रामोशी म्हणत.

त्याचप्रमाणे काहींना त्यांच्या धंद्यावरून किंवा त्यांच्यात असलेल्या एखाद्या विशेष गोष्टीवरून किंवा वैशिष्ठयांवरूनही आडनावे पडली. उदा. निकारी व शेळके ही दोन अडनावे धंदयांवरून पडली. शेळके (शेळया हाकणारे) भांडोलकर, गोरगल, शेळके, गुरगुळ, वाघमारे वगैरे चव्हाण वंशातील आणि खोमणे, येलमार, माकर, बोरधन, इ. जाधव वंशातील रामोशांची घराणी आहेत. [२०] त्याशिवाय अजगिरे, ढोरजे भोसले चुकती, फोकणे, गारगल, गोफणे, झावळे, झापडे, क्षिरसागर, कौंडे लांडगे मदने , रोडे , सपरडे, शेलार, शिंदे शिर्के, वाघमारे,पाटोळे, शिरतोड, हाडके, माने, मलमे,शेरकर, शितोळे, सोरगे, बोंद्रे, गुळवे आणि येलमार इ. अडनावे आढळतात.

रामोशांच्या विवाह पध्दती

रामोशी जातीत मुलगी वयात आल्यावर वर शोधण्यासाठी वराकडे जातात. पुर्वी मुलीच्या पित्यास वरपक्षा कडून पैसे दिले जात त्यास 'ठेव'म्हणत. हल्ली मात्र वधूगृही विवाह संपन्न होतो. मुलगी पसंत केल्यानंतर मुलीच्या वडीलांना २५ ते १५० रुपये मुलाचे वडील देत असत. त्यानंतर त्या मुलीला कुंकू लावले जाई. कुंकू लावण्याचा कार्यक्रम जंगम पार पाडला जाई. नंतर वधूमंडपी वधुवरांना हळद लावतात.

हळदी समारंभ

यामध्ये ज्वारीची पाच ताटे दोऱ्याने एकत्र बांधून त्यांचे बुंधे मातीने अच्छादुन ग्रह देवेतेसमोरे रोपवून, त्यांना दररोज पाणी घालून ग्रहदेवतेची पूजा केली जाते. खंडोबा, बहिरोबा, या देवकांचे तसेच भवानी व नवलाई या देवींचे प्रतिनिधीत्व करणारी चार पाने व सुपाऱ्या मांडून या देवांना हळदी कुंकुवाने पूजले जाते. नंतर कुणबी जातीप्रमाणे देवक बसवणे हा समारंभ होतो. वर वधूच्या घरी मेजवानी बरोबर दारू वाटप होऊन जागरण गोंधळाचा कार्यक्रम होतो.[२१] लग्नाच्या दिवशी देवक गावातून फिरवून आणतात. त्यानंतर सोनाराकडून कुलदेवतांच्या मूर्ती वाजत-गाजत दोन्ही कडचे पाहुणे जोडप्या सह आणतात. समान कुके अथवा समान देवक असल्यास विवाह संबंध होत नाहीत. वासनवेल, उंबर,

जांभूळ, कदंब, शमी, आपटा, पाचपालवी, पाणकणिस, ही मुख्य देवके मानली जातात. ही देवके व लता-वेली वृक्ष कुलाचार धर्माप्रमाणे काळजी पुर्वक जपल्या व सांभाळल्या जातात. ते ते देवक असलेले लोक त्यांच्या देवक असलेल्या लता व वृक्षाचे सेवन करणे, इजा करणे कटाक्षाणे टाळतात. आते बहीन किंवा मामे बहिनीशी विवाह निशिध्द नाही.

रामोशांचे खंडोबा हे कुलदैवत असून लग्नप्रसंगी कुलदैवत व इतर देवतांची ते पूजा करतात. वराला घोडयावर बसवून मारूतीच्या देवळात नेतात. त्या वेळी दोन्ही पक्षाकडील लोक तेथे जमतात. तेथे वर मंगळसुत्रातील मणी ओवतो त्या वेळी विवाहीत पुरुषमंडळी वराला लिंबोळया (कणकीचे गोळे) मारून उखाण्यासह नावे घेतात. वधू कडून वराचा पोशाख काठीला बांधून त्याला देण्यासाठी वाजत-गाजत आणतात. त्यानंतर वरात वधू मंडपी येते. त्या प्रसंगी वधुच्या आत्यास (मावळण) वराचे वडील साडी चोळी भेट देतात.

सगुण घागर ही असते. करवल्या वरास मंडपात आंघोळ घालतात. वधू वर लग्नास सज्ज झाल्यानंतर पुरोहित किंवा जंगम लग्नविधी पार पाडतो. लग्नविधी प्रसंगी होम हवण होत नाही पण सप्तपदी होते. त्यानंतर लग्न सभारंभाचा कार्यक्रम पूर्ण होऊन वधु वराच्या घरी जाते वराच्या घरी सत्यनारायणाची पुजा करतात. दुसऱ्या दिवशी नव दांपत्य त्यांच्या कुलदैवतांच्या दर्शनास जातात. व जागरणाचा कार्यक्रम सुध्दा करतात.[२२] थोडक्यात सांगायचे झाले तर कुणबी समाजाप्रमाणेच सर्व लग्न विधी होतात. यामध्ये लग्न जमवतांना कुलदेवता, देवक तपासून घेणे, पसंती, नंतर हळदी कुंकवाचा कार्यक्रम, लग्न, देवदर्शने, जागरण गोंधळ घालणे अशा या विविध प्रक्रिया करता करता हा रामोशांच्या विवाह समारंभ जवळजवळ तीन ते पाच दिवस चालतो.

काडीमोड व पुनर्विवाह

जात पंचायतीकडून जात निश्चिती व काडी मोड करण्यास अनुमती घेता येते. काडी मोड घेण्याची कारणे म्हणजे पती आणि पत्नी यांची एकत्र राहण्याची तयारी नसेल, तर, पत्नीचे वर्तन वाईट असणे, पत्निला अन्य पुरूषाशी विवाह करण्याची इच्छा असणे, स्त्री व्यभिचारी असणे, तिच्यात वंध्यत्व असणे, या सर्व कारणांमुळे पत्नीकडून घटस्फोट घेता येतो. तर समागमास असमर्थ शारिरिक अथवा असाध्य रोग इ. कारणांमुळे पती पासून पत्निला घटस्फोट घेता येतो. घटस्फोटीत स्त्रिला विधवा विवाहाच्या पध्दतीने पुनर्विवाह करता येतो.

पुनर्विवाहास पाट लावणे असे म्हणतात. तो निर्जन स्थळी रात्रीच्या वेळी व जातीतील जेष्ठ लोकांच्या उपस्थितीत लावला जातो. दिवंगत पतीच्या कुटुंबा बाहेरील व्यक्तिशी विधवा स्त्री विवाह करू शकते, अर्थात असा विवाह समान प्रतिष्ठा असलेल्या व्यक्तिंशीच केला जातो. पाट लावणे अशुभ व अमंगल समजले जाते म्हणून विवाहीत स्त्रिया व कुमारिकेंना अशा विवाहास उपस्थित राहू दिले जात नाही. या विवाहाचे विशेष म्हणजे तो कृष्ण पक्षात (काळोख्या रात्री) केला जातो हा विवाह लिंगायत पुरोहिताकडून हळू आवाजातील मंत्रोच्याराने केला जातो. विधवा विवाह होऊ घातलेल्या नवऱ्याने तिला जोडवे, नथ, चार बंगडया, साडीचोळी देणे हे बंधनकारक असते. असा विवाह फक्त पुरुषांच्या उपस्थितीत व एकांतात पार पाडला जातो. कारण हा विवाह अशुभव दुर्दैवी मानला जातो.

या प्रसंगी जातभाईंना रात्रीचे जेवन दिले जाते. विवाहनंतर नवरा-बायको एकमेकांपासून व जातीच्या लोकांपासून एक दिवसासाठी वेगळे राहतात. अशा विवाह प्रसंगी एखाद्या स्त्रिचे पुर्वीचे तीन नवरे वारले असल्यास व तिला चौथ्यांदा विवाह करायचा असल्यास असा चौथा विवाह लावतांना तिने स्वत:च्या डाव्या बगलेत कोंबडा धरावा लागतो. कारण मृत पतींनी भुताचा- पिशच्य स्वरूपात येऊन विवाहात संकटे, विघ्न आणण्याचा प्रयत्न केला

तर ते संकट प्रथम होणाऱ्या पतीवर न जाता कोंबडयावर जाते. अशी त्यांच्यात समजूत आहे. अविवाहीत मुलाला विधवे बरोबर विवाह करण्यास परवाणगी दिली जात नाही.

गरोदरपणी ७ व्या किंवा ९व्या महिन्यात ओटीभरण हा समारंभ होतो. हया प्रसंगी स्त्रीची पाने, नारळ, तांदुळ व फुलांनी ओटी भरली जाते. या प्रसंगी तिला आवडीचे भोजन दिले जाते. या समारंभासाठी शेजारणी व सुवासिनींना निमंत्रीत केले जाते. मुलगा व्हावा असा आशिर्वाद त्या देतात. बाळंतपणात दायींची भूमिका महत्वाची ठरते. ही दायी सामान्यत: महार जातीतील असून तिला या कामाच्या बदल्यात रोख पैसे व वस्तू भेटी दिल्या जातात. बाळंतपणीच्या पाचव्या दिवशी पाचवी हा विधी केला जातो. यावेळी देविला सटविला नेवैद्य दाखवून दीर्घ आयुष्याचे दान मागितले जाते. या वेळी पाच लहान मुलांना भोजन दिले जाते.

जन्मानंतर १२ व्या दिवशी बारशे अथवा नामकरण विधी सजारा केला जातो. या वेळीही नातलग मित्र मैत्रिनींना निमंत्रीत करून पक्वन्नाचे भोजन दिले जाते. यामध्ये नवजात बालकास नवीन कपडे परिधान करून पाळण्यात घालून लोकगीते व पाळणे गायणाने नामकरण केले जाते. अशा प्रसंगी ब्राम्हण आद्यअक्षर लेखन करून कुलदेवतेची पूजनासहीत नामकरण निश्चित केले जाते.[२३]

धर्मविचार

रामोशांचा धर्मविचार हिंदू प्रमाणेच आहे. या मध्ये बरेच जन वारकरी सांप्रदयाचे आहेत. हे लोक एकेकाळी लिंगायत होते असे मानले जाते. कारण आजही समारंभाप्रसंगी लिंगायत जंगम पुरोहित म्हणून काम करतात. ते स्वत:ला रामभक्त समजून मांसाहारा पासून दूर राहतात. यातील काही जण महादेव हाच श्रेष्ठ देव मानतात व लिंग पूजा करतात. तर काही खंडोबाची पूजा करतात पण ते मांसाहारी असतात. खंडोबा हा देव पूर्वी लिंगायत वाणी होता असे ते समजतात. हे लोक महादेव, विष्णुची पूजा करतात. त्याच प्रमाणे अन्य लहान लहान देवांमध्ये वेताळ बहिरोबा, अंबाबाई, काळाई, फिरंगाई, नवलाई,

तुकाई, वाघ्या इत्यादिचे पूजन करतात. त्याच प्रमाणे (मुल्लाकडून) बकरी, कोंबडी कापून (बळी देऊन) या देवतांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला जातो. [२४]

हिंदू धर्मातील सर्व धर्म संस्कार रामोशी लोक पाळतात. तिर्थ यात्रा करून देवांचे सानिध्य राखतात. साथीच्या रोगांपासुन बचाव व्हावा म्हणुन मरिआई, महालक्ष्मी किंवा श्तिळादेवीला बकरी कोंबडी अर्पन करणे हे सुध्दा ते करतात.

रामोशी लोकांचा आद्यात्मिक गुरू गोसावी असतो. विवाहानंतर प्रत्येक जण कोणत्यातरी गोसावी गुरूचा शिष्य होतो. एखाद्या गोसावी त्या घरचा पिढयांनपिढयांचा गुरू असतो. हे गुरू साधारणपणे जंगम, देशमुख, ब्राम्हण असतात.[२५] त्याचप्रमाणे या जमातील खंडोबाला मुले-मुली सोडण्याची किंवा खंडोबाशी मुलींची लग्ने लावण्याची प्रथा आढळते. अशा या देवाला साडेलेल्या मुलीस मुरुळी व मुलास वाघ्या म्हणतात. वाघे मुरुळी नाच गाण्याचे व जागरण गोंधळांचे कार्यक्रम करतात. रामोशी लोक कोणत्याही शुभकार्याला 'जय मल्हार' या उद्घोषाने प्रारंभ करतात.खंडोबाच्या जत्रेत देवाची पालखी उचलण्याचा पहिला मान रामोशांनाच दिला जातो. [२६]

रामोशांच्या पेहरावात धोतर-सदरा गळयामध्ये काळया दोऱ्यात ओवलेले ताईत, कानात बाळया व एका हातात चांदीचे कडे असते. पुरुष शरीराने राकट व बांधेसुद असून जाड-जाड मिशा ठेवतात. स्त्रिया नऊवारी हातमागाचे लुगडे व चोळी वापरतात. [२७]

जात पंचायत

रामोशी लोकांची स्वतंत्र अशी 'जात पंचायत' अथवा 'जात परिषद'असते. यांमधील सदस्य निवड आवाजी पध्दतीने केली जाते. यामध्ये एकूण १३ सदस्य निवडले जातात. यामध्ये एक अध्यक्ष, एक सचिव, एक खजिनदार म्हणून निवडला जातो. समाजातील चालीरितींचे उल्लंघन करण्यास दंड व शिक्षा कारण्याचा अधिकार जात पंचायतीस असतो. कुटुंबा कुटुंबातील वाद व इतर वाद, तंटे, बखेडे सोडविण्याचे काम

जात पंचायत करते. सर्वांचा या जात पंचायतीवर विश्वास असतो.त्यांचे निवाडे कटाक्षाने पाळले जातात.[२८] रामोशांच्या जातपंचायतीच्या प्रमुखास 'नाईक' म्हणतात.

सारासार विचार केला तर जातपंचायतीच्या रुढीबध्द नियमांच्या गुंगीत शिक्षणाच्या आणि प्रबोधनाच्या आभावाने भटक्या जाती जमाती स्वत:च्या जातीचा किंवा तत्सम पोट जातीच्या कुंपनापलीकडे पाहण्यास तयार नाहीत. वर्षानुवर्षे अलगतेची भावना निर्माण झाल्याने सार्वजनिक अवकाश अवरूध्द झाल्याने स्वत:ची जमात आणि जमातीची रूढी, परंपरा, व्यवसाय व भाषा टिकवण्याचा तो प्रयत्न करत आहे. [२९]

सण समारंभ

रामोशी मुख्यत: हिंदुच असल्याने त्यांच्या संबंध लिंगायता बरोबर येतो. गृहदेवते बरोबर ग्राम देवतेचे पूजन ते करतात. त्या त्या प्रदेशातील सण उत्सवात यात्रा व जत्रेत किंवा धार्मिक कार्यात रामोशी लोक सामविष्ठ होतात. 'पीर' या देवतेशी त्यांची निष्ठा दिसते. महाराष्ट्रातील जेजुरी, पाली आणि कऱ्हेपठार ही खंडोबाची मुख्य तीन देवस्थाने आहेत. यापैकी कोणी जेजुरीच्या कोणी पालीच्या खंडोबास मानतात. पुरंदरचे रामोशी सिंहगडच्या कोंडणपूरच्या भवानी देवीला मानतात व लोणीचे रामोशी रामाला मानतात. या सर्वच देवांच्या यात्रा- जत्रा म्हणजे त्यांचे सण होते व आहेत. [३०]

व्यवसाय

मराठा राजवटीत रामोशी लोकांकडे किल्ले रक्षणाची जबाबदारी होती . त्यामुळे त्यांच्या लुटमारीकडे दुर्लक्ष केले जात होते. त्यानंतरच्या ब्रिटिश राजवटीत मात्र त्यांना गुन्हेगार समजून दररोज चावडीवर हजेरी दयावी लागत असे. अर्थात घर बांधून ठिकठिकाणी राहण्यास अशा हजेरीची अट नसे. रामोशी लोक सर्वसाधारणपणे गुन्हेगार समजले जातात पारंपारिक व्यवसाय कमी होऊन वॉचमन (ग्रामरक्षण) किंवा गुरे ढोरे शेळया मेढया पाळण्याचा व्यवसाय ते करत असत. हे लोक स्वजातीत दगा बाजी करीत नाहीत. एकमेकांशी अतिशय प्रमाणिकपणे वागतात. प्रत्येक गावामध्ये आपल्या मालमतेचे

संरक्षण करण्या करिता स्वतंत्रपणे रखवालदार देण्याची प्रथा सुरू झाली. रखवालदार लोकांचे काम विशेषकरुण रात्रीचे जागून पहारा करण्याचे असल्याने रखवालदारास जागला हे दुसरे नाव मिळाले. ही रखवालदारीची जागा वंशपरंपरेने पुढे तशीच चालू राहिली.

काही गावांमध्ये रखवालदारांना त्यांच्या कामगिरी बद्दल बिनसाऱ्याची जमीन दिली जात. या शिवाय रामोशांना गावच्या ज्या एका ठिकाणी गाडया, घोडी किंवा प्रवाशी लोक उतरण्याची जागा असते, म्हणजे त्यांचा रात्री जिथे तळ पडतो, तेथे रात्रीच्या रखवाली बद्दल त्यास प्रत्येक गाडीमागे एक पैसा मिळतो. त्याला 'तळचा पैसा' म्हणत. थोडक्यात प्रत्येक लहान लहान गावात सुध्दा हा रखवालदार किंवा जागला असायचा, तो रामोशी जातीचा असायचा . पंधरा ते वीस खेडी येथील जागल्यावर एक मुख्य रखवालदार असतो त्यास 'नाईक किंवा सरनाईक ''देशमुख किंवा सरदेशमुख' म्हणतात. [३१]

रामोशांची शस्त्रास्त्रे

रामोशांची शस्त्रस्त्रे पुढील प्रमाणे सांगता येतील

रखवालदारी व चोरी करतांना बॅटरी, तलवार, धनुष्यबाण, काठया गोफणी, गलोर, दगड, दरवाजा तोडण्यायोग्य लहान लहान कुऱ्हाडी इ. शस्त्रे वापरत. चोरी करताना गावकऱ्यांना भिती दाखवण्यासाठी व आपल्या टोळीत विश्वास येण्यासाठी ते आग लाऊन देत असत. तसेच प्रत्येक शस्त्राचा (हत्याराचा) उपयोग नेमून दिलेल्या कामासाठीच अचूक वेळी करत असत. ज्या ठिकाणी काहीतरी मिळवण्यासाठी धाड घालण्याची त्या ठिकाणापासून १ ते २ मैलांवर ते जात. तेथे विश्रांती घेत. नंतर अनोळखी जागी कपडे, चपला व इतर वस्तू खुणेने ठेवित असत. रामोशी प्रवाशांना लुटताना शक्यतो रात्रीच्या वेळीच लुटत व दिवसा मात्र नाले, ओढे व डोंगर कपारीतून प्रवास करतांना लुटत. [३२]

शपथविधी (बेल भंडारा)

जर एखाद्या व्यक्तीवर विश्वास नसेल किंवा कोणी खोटं बोलत असेल किंवा एखादा गंभीर पेच प्रसंग त्याच्या समोर उभा रहात असे. त्यावेळी रामोशी लोक एकत्र जमून शपथविधी करत. जर एखाद्या व्यक्तिच्या चोरीच्या संदर्भातील वस्तुशी त्याच्या संबंध नसेल व त्याचे नाव त्या संदर्भात गोवले जात असेल, तर त्या व्यक्तीने शपथ घेतली म्हणजे ती व्यक्ती निर्दोष ठरत असे. शपथ ही सर्वसाधारण पणे बेल भंडारा उचलून घेत असे. हा बेल भंडारा घोंगडीवर ठेवला जात असे. त्या वेळी सर्व रामोशी हजर रहात. ती व्यक्ती देवाचे नाव घेऊन व माझा गुन्हा नाही म्हणून तो बेल भंडारा उचलत असे. होलगे रामोशी बेलाच्या पानांऐवजी तुळशीची पाने वापरत व पुरंदरचे रामोशी बेल भंडारा वापरत असत.

अंत्य संस्कार

रामोशी लोक मृत शरीर दफन (पुरतात) करतात. यामध्येही त्यांच्या परंपरेनुसार मृतदेहाचे डोके उत्तरेकडे करून पुरतात. मृत व्यक्ती अविवाहीत असल्यास त्यास पाठीवर उताणे झोपवून गाडले जाते, तर विवाहीत व्यक्तिस बसवून गाडले जाते. [३३] याप्रसंगी मृतदेह खड्डयात बसवून आधी बोंब मारुन शोककूल मुलगा आगोदर माती लोटतो नंतर इतर व्यक्ती माती दगड लोटून तो देह पुरला जातो. [३४]

मरणोत्तर विधी

अंत्य संस्कारानंतर मृत व्यक्तीचे तीन दिवसांचे सुतक पाळले जाते. नंतर उत्तरकार्य केले जाते. या मध्ये 'काकस्पर्श' किंवा गायींना घास भरवतात. या प्रसंगी मृतास शांतता लाभावी म्हणून दान धर्म केला जातो. या वेळी थोरल्या व धाकटया मुलांकडून हे मरणोत्तर विधी करवून घेतले जातात. या प्रसंगी लिंगायत ब्राम्हणाकडून हे मरणोत्तर विधी करून घेतले जातात. सुतक कालावधी मध्ये पुरुष दाढी-कटिंग इ. न करता सुतक फिटे पर्यन्त तसेच राहतात. स्त्रियाही नटणे व दाग दागीने न वापरता साधेपणाने

राहतात. काहीजन दफन स्थळावर थडगे बांधतात. त्यावर घोडा किंवा शस्त्रधारी मणुष्याच्या प्रतिमा कोरल्या जातात. [३५]

थोडक्यात आज हिंदू धर्मा प्रमाणेच रामोशांची सर्व वैशिष्टे सांगता येतील. परंतु या मध्ये रुढी परंपरांना पुर्वीच्या रामोशांनी अधिक महत्व दिल्याचे दिसते.१९९५ साली विद्यादेवी सौ सावित्रीबाई तात्याबा रोडे यांनी 'क्षत्रिय रामोशी संघ' स्थापून ही जात सुधारण्याचा प्रयत्न केला व त्यास काही यशही आले. [३६]

रामोशी लोक ज्या ठिकाणी दरोडा घालायचे त्या घराचा संपूर्ण अभ्यास अगोदर करीत. अगदी खडान्खडा माहिती हेरांकरवी मिळवत. हे हेर बैरागी, गोसावी, वाघ्या कडकलक्ष्मी, भिकारी, ब्राम्हण, भिक्षू, फेरीवला, एक तारीवाला अशा वेगवेगळया वेषांतराने तेथे जाऊन पाळत ठेऊन मुख्य नाईकास सांगत, हे लोक बहुत करून दरोडा कृष्ण पक्षात घालतात. दरोडया प्रसंगी जमातीचा एखादा इसम जखमी झाला किंवा जागच्या जागी ठार झाला तर त्यास तेथेच ठेऊन जात नाहीत. मनात किंचितही दया माया न दाखविता त्याचे डोके ताबडतोब कापून न्यायचे. मग तो स्वत:चा मुलगा असो वा भाऊ. दरोडा घालून आलेली लुट आसपासच्या डोंगराच्या एखाद्या दरीत, गुहेत जाऊन वाटणी करुन घेत असत. [३७]

दरोडयात मिळवलेल्या लुटी पैकी काहीही जवळ स्वत:करिता स्वार्थबुध्दीने लपवून ठेवायचे नाही. दरोडा घातल्यावर बरेच दिवस मद्याला स्पर्श करायचा नाही. फंद-फितुरी करायची नाही इ. नियम टोळीचे होते. [३८]

पुरंदर किल्याला लागूनच असलेला वजीर गड. या वजीर गडाच्या पायथ्याशी डोंगराच्या उतारावर जांभुळवाडी आहे. निजामशाही पासून छत्रपती व पेशवे यांच्या कालावधीमध्ये पुरंदर किल्याच्या घेराचे रक्षण करीत असलेली ही जांभुळवाडी, त्याच प्रमाणे घेराचे चारही बाजुंनी रक्षण करण्यासाठी चार-पाच पानवडया, बहीरवाडी, बांदलवाडी, रामवाडी, चिव्हेवाडी, कोंडकेवाडी, कोमुसी, मिसाळवाडी, इ. वाडयामध्ये

कोळयांच्या वस्त्या पसरलेल्या होत्या. त्याच प्रमाणे वेताळवाडीच्या पुर्वेला व वजीर गडाच्या पायथ्याला जांभुळ वाडी होती इथं मात्र संपूर्ण रामोशी समाज रहात होता.

पुरंदर किल्याची देखरेख रामोशी लोकांकडे असल्याने ही रामोशांची वस्ती पुरंदरच्या पायथ्याशीच असे. दादोजी खोमणे वजीर गडाच्या पायथ्याशी 'घेरा' या ठिकाणी मुक्काम करायचे घेरा हे ठिकाण नंतर 'जांभुळवाडी' या नावाने प्रसिध्द झाले जांभुळवाडीच्या अगदी जवळच भिवडी हे गांव अत्यंत रमनीय असून हिरवळीने अच्छादलेले गवताळ व लहान लहान शेतीचे तुकडे असलेले हे गाव आहे. याच गावात क्रांतिवीर उमाजी नाईकांचा जन्म झाला.

उमाजी नाईकांचा जन्म

वंशावळ

१) महिपतजी - १)कृष्णाजी , २) रामजी ३) रखमाजी

२) रामजी - तुकाजी -वर्धोजी-राणोजी-बहिरजी-१ मल्हारजी, २) वर्धोजी (पुढे घेतला नाही)

१ खंडोजी २ तुकाजी (घेतला नाही)

खंडोजी -१)तुकाजी, २)दादजी, ३)रखमाजी (घेतला नाही)

दादाजी - १) सयाजी, २)मालजी, ३) बहिरजी, ४)अंदोजी, ५) अमृता ६) उमाजी, ७) कृष्णाजी

पो (पैकी) सयाजी , मालजी, व बहिरजी हे तिघे सख्ये भाऊ व बाकी अंदोजी, अमृता उमाजी व कृष्णाजी असे चार भाऊ

सयाजीचा वंश माहुर (किल्याचे दक्षिणेस) व मालजी व बहिरजी नकल आहेत. अंदोजीची आता नकल , अमृता नकल,

उमाजी - मंकळा व तुका

मंकळा - सखाराम, आण्णा, व तात्या

तुका - राजाराम , नाना

कृष्णाजी - रंभाजी व रावजी,

रंभाजी = हरी, (पाच मुले)

रावजी -भाऊ [३९]

दादोजी खोमणे हा सुप्रसिध्द दरोडेखोर होता या दादाजीस दोन बायका होत्या दुसऱ्या बायकोपासून तिचं नाव लक्ष्मी. हिच्यापोटी तिसरा मुलगा जन्माला आला तो उमाजी, उमाजीची आई लक्ष्मी सातारा जिल्हातील खंडाळा या गावाच्या जवळपासच्या गावातील होती . उमाजीचा जन्म भिवडी या गावात झाला. जन्म, शैक्षणिक दृष्टया अत्यंत मागासलेल्या समाजात झाला. त्यामुळे जन्म दिवस तिथी वार नाव कुंडली याची काहीही पर्वा नाही आणि तसे लिहून तरी कोण ठेवणार? परंतु आज रामोशी बांधव उमाजी नाईकांची जयंती साजरी करतात ती ७ सप्टेबरला, म्हणून उमाजींचा जन्म ७/०९/१७९१ रोजी झाला असेच सार्वमत दिसते. सुप्रसिध्द उमाजी नाईक रामोशी यांचा जन्म पुरंदर किल्याच्या ईशान्य दिशेस एक कोसावर आणि पुण्यापासून आग्नेय दिशेस सुमारे आठ कोसावर असलेल्या लहानशा भिवडी गावी शके १७१३ म्हणजे १७९१ रोजी झाला. [४०]

उमाजी नाईकांवर त्याच जमातीच्या (रामोशांच्या) जगण्याच्या विशेष शैलीचे संस्कार झाले होते.[४१] उमाजी चे बालपण पुरंदरच्या परिसरातच गेले आणि व्यक्तिमत्व आकारास आले. [४२] उमाजी आकरा वर्षांचा असतांनाच दादाजी खोमणे (वडील) यांचा सन १८०२ मृत्यु झाला.[४३] त्यामुळे पित्याकडून उमाजीस फारशे शिक्षण मिळाले नाही. किंवा त्याचा विशेष काही प्रभाव पुत्रावर पडला असावा असे नाही. दादाजी खोमणे यांनी त्यांच्या आयूष्यात अकराशे दरोडे घातले होते.

उमाजीचे व्यक्तिमत्व (बालपण)

वडिलांचे छत्र लहानपणीच हरपल्यामुळे उमाजीस त्याच्या आईनेच आदर्शाचे धडे दिले. उमाजीची आई लक्ष्मीबाई उमाजीस अगदी शेजारी बसवून छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श तिच्या तुटपुंज्या ज्ञानाच्या आधारे देत असत. त्यामध्ये छत्रपतींच्या सवंगडयांपासून गणिमी काव्याने लढाया कशा केल्या, गडकिल्ले कसे जिंकले, या सर्वांविषयीचा इतिहास लक्ष्मीबाई उमाजीस गोष्टी रूपाने सांगत. अगदी लहान वयामध्येच या सर्व अभिमानास्पद गोष्टी ऐकूण उमाजीच्या मनात सुध्दा शिवाजी राजांसारखं रूप भरलं. पुरंदरवरच्या त्या फडकणाऱ्या भगव्या निशाणाकडे पाहून उमाजीस छत्रपती बद्दल अभिमान वाटत.[४४] दरम्यानच्या काळात पानवडीचे बाबाजी चव्हाण (रामोशी) हे विठ्ठलभक्त होते. त्यांची मुलगी 'गंगी' हिच्याबरोबर उमाजीचा विवाह झाला. हा विवाह रामोशांच्या चालीरीती नुसार म्हणजे अगदी लहान वयातच झाला. उमाजीच्या विवाहाच्या वेळी उमाजीचे वय वर्ष ११ होते, तर पत्नी गंगीचे वय अवघे ५ वर्षच होते. [४५]

ज्याप्रमाणे जिजाऊंनी शिवरायांना शिक्षण दिले, त्याचप्रमाणे उमाजीची आई लक्ष्मीने सुध्दा उमाजीस निरनिराळया लढायांचे डावपेच, भाला फेकणे, घोडयावर बसणे, व्यायामाचे निरनिराळे खेळ, शिकवले. उमाजीस अगदी लहान पणापासूनच व्यायामाची आवड होती. जेजुरी गडावरील तालीम तसेच वज्रगडावरील मारूती मंदिराजवळची तालीम या दोन्ही उमाजी नाईकांच्या तालमी म्हणून ओळखल्या जातात.[४६] उमाजीची अंगकाठी बारीक असून त्याची उंची सुमारे पाच फुट, चार इंच होती, त्याचे डोळे मोठे काळेभोर असून पाणीदार होते. तसेच त्याची दृष्टी मोठी चौकस व तिक्ष्ण होती. त्याच्या मोठमोठया डोळयांप्रमाणेच भूवयाही मोठयाच होत्या, त्याची मान (गर्दन) भरलेली होती. त्याचा रंग तांबुस असून चेहरा सौम्य आणि आनंदी होता.[४७] थोडक्यात उमाजीचे व्यक्तिमत्व हे दुसऱ्यावर छाप पाडणारे होते. आईने दिलेल्या शिकवणुकीतून उमाजीच्या

व्यक्तिमत्वाने पूर्ण आकार घेतला. तसाच तो लोकांनाही आवडू लागला. लहान वयापासूनच त्याची किर्ती वाढत गेली होती.

उमाजी एक कुशल संघटक, धाडशी व शूर होता. नेत्रृत्वाचे गुण त्याच्यामध्ये उपजतच होते. थोडक्यात गरिबांचा कैवारी, आणि गरिबांना लुटणाऱ्या सावकार, जमीनदार, वतनदार आणि ब्रिटिशांना फितुर झालेल्यांचा तो कर्दनकाळ होता. ब्रिटिशांना या देशातून हाकलून देण्यासाठी मनोमन इच्छा ठेऊन क्रांती करणारा हा महाराष्ट्रातील एकमेव क्रांतिकारक आहे.

उमाजी नाईकांसमोर नेहमी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श होता.[४८] त्याने शिवाजी महाराजांसारखेच डावपेच इंग्रजी सत्तेविरुध्द टाकले होते. या वरून उमाजीच्या अंगी धुर्त पणा, मुत्सद्दीपणा, बुध्दीमत्ता व कृतीशिलता हे गुण होते.

ब्रिटिशांविरुध्द उठाव करण्याची महत्वाची कारणे

१) दुसऱ्या बाजीरावाने रामोशांची वतने जप्त केली होती.

२) वतने जप्त केल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. पोट भरण्यासाठी छोटया मोठया चोऱ्या करायला त्यांनी सुरूवात केली.

३) इंग्रजांचं राज्य कायदेकानुनचे असल्याने त्यांनी चोरी व दरोडा या गोष्टीला गुन्हा समजले. आणि त्यासाठी शिक्षाही ठरवल्या.

४) इंग्रजांच्या या धोरणामुळे रामोशांच्या या उपजिविकेच्या साधनावर गदा आली. त्यामुळेही त्यांचे इंग्रजाविरूध्द माथे ठणकू लागले.

५) इंग्रज हे परकीय असूनही त्यांनी आम्हाला आमच्या अन्नापासून दूर ठेवले म्हणूनच त्यांच्या बरोबर होणारा संघर्ष हा अटळ आहे. त्यासाठीच उमाजीने माणसे तयार केली व इंग्रजांना या देशातून हाकलून लावण्याचा चंग बाधला.

६) संस्थानिकांना इंग्रज या देशातून गेले पाहिजेत असे वाटत असले तरी त्यांनी संघर्षासाठी पुढाकार का घेतला नाही हा मोठा प्रश्न आहे पण उमाजीने मात्र इंग्रजाविरुध्द दंड थोपटले. तेव्हा त्यास जनतेमधून साथ मिळाली हे नक्की होय.

थोडक्यात हा कालखंड राजकिय व सामाजिक दृष्टया अस्थिर होता. मराठेशाही नष्ट झाली तरी पध्दती व परंपरा तशाच होत्या. इंग्रजांचे राज्य असले तरी ते समाजात अनेकांना रूचले नव्हते. त्यांचे कायदे कानुन व पध्दती रूळल्या नव्हत्या. या परिस्थितीत उमाजी नाईक इंग्रजांना आव्हान देत होता.

संदर्भ सूची

१) केतकर श्री व्यं- महाराष्ट्रीय ज्ञानकोश (शरीर खंड), विभाग १९ वा मूर -वऱ्हाड प्रकाशक- महाराष्ट्रीय ज्ञानकोश लिमिटेड- नागपूर, पृ.क्र. १०१

२) भागवत अ.ना.-उमाजी नाईक यांचे चरीत्र, ऐतिहासिक पुस्तकमाला नं-२३, भारतभुषण, सदाशिवपेठ पुणे -१९१०, पृ.क्र. ६

३) मराठी विश्वकोश (खंड १४)- तर्कतीर्थ जोशी लक्ष्मण शास्त्री जोशी (संपादक) प्रकाशक - सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रथम प्रकाशन १९८९, पृ.क्र. (८२५-८२६)

४) कुलकर्णी कृ.पां.- मराठी, व्युत्पतिकोश, तीसरी आवृती, शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे, पृ.क्र.६६०.

5) Enthoven R.E.- The Tribes & Castes of Bombay, Vol.III, Published by J.Jetly for asian Educational, Services New Delhi madras-1990, p.n 1768

६) Sing. K.S- (Genral Editor) People of India . Maharashtra Vol-xxx, part- Three, preacher Mumbai, Popular Prakashan Mumbai, p.n. 1769

७) अभिनव मराठी- मराठी शब्दकोश, भाग तीसरा, प्रकाशक -सदाशिव कृष्ण पाध्ये, व्हीनस प्रकाशन - पुणे, पहिली आवृत्ती डिसेंबर १९८३, पृ.क्र. ३१०

८) भागवत अ.ना- उमाजी नाईक यांचे चरिञ प्र.क्र.७

9) Enthoven R.E-p.1768

10) Ibid- p.n.1768, Sing. K.S- (Genral Editor) People of India. Maharashtra Vol-xxx, part- Three, preacher Mumbai, Popular Prakashan Mumbai p.n. 1768

११) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री - मराठी विश्वकोश (खंड १४), प्रकाशक - सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश, निर्मिती मंडळ, प्रथम प्रकाशन १९८९, पृ.क्र. ८२५-८२६

१२) नऱ्हे शंकर- उमाजी राजे, प्रकाशक - अनिरुध्द अनिल कुलकर्णी, कॅन्टिनेटल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती -२००१पृ.क्र.३४

१३) सातारा महाराज रेसिडेन्सी मराठी दप्तर रुमाल नं ४७(४४) सन १८३१, पत्र क्र.६५

14) Entloven R.E.-p.298

15) Enthoven.-P 1769.

16) Mackintosh Capt. AlexanderThe Tribe of Ramoossies Bombay - American mission press, P.No. 4

18) Entbren R.E.-p.294

19) Makintosh-p.5

20) Enthoven.-P.299

२१) महाराष्ट्र शासन- महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर - सातारा जिल्हा प्रमुख जाती व जमाती, पा.क्र. २९२-९३

२२) People of India Maharashtra- Vol-xxx pant three, p. 1769 & Rnthove p.299

23) Ibid-p.no 1770

24) Enthoven- p. 302

25) Ibid- p.no 302

२६) महाराष्ट्र शासन- महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सतारा जिल्हा प्रमुख जाती व जमाती पृ.क्र. ९३

२७) People of India- Maharashtra, Vol. xxx part three, p. 1771

२८) भोसले डॉ. नारायण- भटकयांची पितृसत्ताक जातपंचायत दताईची प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ११, नोव्हेंबर २००८, पृ.क्र. ४३

२९) भागवत अ.ना.- पृ. १४

३०) कित्ता- पृ. ११,१२

३१) Makintosh- p. 23-27

32) People of India- p.1771

33) Enthover R.E- p. 302

34) People of India- p. 1771

३५) केतकर श्री व्यं- - (शरीरखंड), विभाग १९ वा, भूर- वऱ्हाड प्रकाशक- महाराष्ट्रीय ज्ञानकोश . नागपुर, प्र.क्र. १०१

३६) भागवत अ.ना.- पृ.क्र. १८ ते २१

३७) कित्ता- पृ.क्र. २४

38) Mackintsh- P. 125

३९) ऐतिहासिक संकीर्ण साहित्यखंड पटवर्धन पा. न. (संपादक)-५-भा. इ.सं.मं. पुणे, संपादक - पटवर्धन कै. पा. न. लेखांक २१.

४०) पोतदार डॉ. माधव रा.- महाराष्ट्रातील लढे आणि लढवय्ये प्रकाशक -अ,अ कुलकर्णी, अनुबंध प्रकाशन पुणे, प्रथमवृत्ती २००३, पृ.क्र. २७

४१) मांडे प्रमोद मारुती- स्वातंत्र्य संग्रामातील समिद्या, प्रफुलता प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,१५,ऑग.१९९८, पृ.क्र. २

42)Mackintosh- P. 125.

४३) नऱ्हे शंकर- उमाजी राजे, प्रकाशक- अ.अ कुलकर्णी, कॅन्टिनैटल प्रकाशन पुणे, प्र.आ. २००१ पृ.क्र. ५,६

४४) कित्ता-पृ.क्र. ७

४५) एक्के शिवाजीराव- आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक, प्रकाशक- श्री गजानन शिवाजीराव एक्के, व्दितीय आवृत्ती, ७ सप्टे २०१२, पृ.क्र. ८

46) Mackintosh- P. 125

४७) आठवले सदाशिव- उमाजी राजे, मुक्काम डोंगर, प्रकाशक- अ.अ. कुलकर्णी कॅन्टिनेंटल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती मे. १९९१ , पृ.क्र. ११०

४८) एक्के शिवाजीराव-पृ.क्र. ४,५

प्रकरण तिसरे

दुसऱ्या बाजीरावाचे अन्यायी धोरण व उमाजी नाईक आणि रामोशांची वाताहात.

पार्श्वभूमी-

महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य हे ब्रिटिशांच्या घशात घालणारा हा मराठयांच्या इतिहास पुसणारा व पेशवा म्हणून असफल ठरलेला दुसरा बाजीराव पेशवा यांनी नाना फडाणिसांच्या तंत्राने वागण्यातच आपल्या आयूष्याची २१ वर्षे घालविली. म्हणेजच ज्या काळात शौर्य पराक्रम, चातुर्य, मुत्सद्देगिरी हे गुण फुलतात त्याच काळात त्याला परावलंबी जीवन जगावे लागले होते. एखाद्या राज्यकर्त्यांच्या अंगी जे संस्कार व्हावे लागतात ते त्याच्या वर झालेच नाहीत. राज्यकारभारात त्याला फार रस नव्हता तो गादीवर आल्यापासून ते इंग्रजांना शरण जाईपर्यन्त पाच-सहा वर्षात (इ.स.१७९६ ते१८०२) पुण्यात व त्यांच्या राज्यातील बहुतेक भागात त्यांनी कोठे कोणाचा सूड उगवण्यासाठी तर कधी निव्वळ पैसे उकळण्यासाठी अनेकांचा अमानुष छळ केला. कित्येकांना हालहाल करून मारले. सुंदर स्त्रियाची अब्रु घेण्यात तो पटाईत होता. त्यातच इ.स. १८०२ मध्ये बाजीरावाने विठोजी होळकरांना शनिवारवाडयात हत्तीच्या पायी दिले. एका बलाढय व मराठेशाहीचे आधारस्तंभ असलेल्या पराक्रमी यशवंतराव होळकरांच्या भावास ही क्रूर शिक्षा देत आहोत याचेही त्यास भान नव्हते. याचा परिणाम असा झाला की यशवंतरावांनी भयंकर चिडून जाऊन पुण्यावर आक्रमण केले. त्यांना अडविण्यास गेलेल्या शिंदेच्या आणि पेशव्यांच्या सैन्यांचा हडपसर च्या लढाईत बंदोबस्त केला आणि लगेच बाजीराव महाडला पळून गेले आणि पुढे त्यांनी इंग्रजांशी वसईचा तह केला. मागे होळकरांनी इ.स. १८०२ मध्ये पुणे लुटले, म्हणजेच याचा अर्थ असा की आपलेच राज्यकर्ते आपल्याच प्रजेला छळत होते, लुटीत होते, तिला कोणी वाली उरला नव्हता. राज्यकर्तेच एकमेकांच्या विनाशास टपले होते. एकमेकांच्या जीवावर उठले होते. इ.स. १७९७ मध्ये त्याच्याविषयी (बाजीरावाविषयी) एक नोंद अशी आहे ती पुढीलप्रमाणे.

"वाडयात काही एक कारभार श्रीमंत करीत नाहीत जाबसाब करावयास अगदी कळत नाही. कोणी विनंती केली असता नानाकडे जावे, आमच्याकडे काय आहे. जुन्नरास (कैदेत) आहो ऐंसे समजोन त्याच्याकडून साबजाब करवून द्यावे ऐसे म्हणतात, देणा-याचा सुमार नाही...नाच रागरंग, पोऱ्यांचे गाणे श्रीमंत ऐकत असतात. कारभाराविषयी काही एक बोलत नाहीत, त्यावरून गावांत लोक म्हणतात की यांजवळ ऐवज(अकल) काही नाही. यांच्या हातून काही व्हायचे नाही... मन शुध्द नाही."[१] अशी तत्कालीन प्रतिक्रिया बाजीरावाच्या निश्क्रियतेबद्दल आहे.

ब्रिटिशांनी इ.स. १८०३ मध्ये बाजीरावास गादीवर बसवल्यानंतर परिस्थिती बदलली. शिंदे, होळकरांसारख्या सरदारांपासून बाजीरावास तोडण्यात आले. कोणत्याही सरदाराची किंवा सामान्य जनतेची बाजीरावा विषयीची सहानुभुती संपली होती. त्यातच आणखी सारा वसुलीचे काम ठेकेदारी पध्दतीने जास्तीत जास्त वसुलीची बोली देईल त्यास दिले. ते ठेकेदारही स्वत:ला भरपूर रक्कम मिळावी म्हणून रयतेस पिळून काढू लागले. थोडक्यात शेवटचा पेशवा दुर्दैवाची शिकार होता की पदासाठी लायक नव्हता याच त्याच्या वैशिष्ठयांमुळे मराठयांचे राज्य धुळीस मिळाले.

या उलट इंग्रजांची परिस्थिती होती या काळात आंतरराष्ट्रीय राजकारण इंग्रजांना पुर्णपणे अनुकुल होते. युरोपच्या जगज्जेत्या ठरलेल्या नेपोलियनला नमवून इंग्रज युरोपात व पर्यार्याने जगात अजिंक्य म्हणून ओळखले जाऊ लागले होते.[२]

किल्ले पुरंदर व रामोशी

उमाजीचे वडील दादजी खोमणे याने त्याची हयात चोऱ्या अन् दरोडयात घालवली असली तरी मराठेशाहीत किल्यांच्या रक्षणाची जबाबदारी ही रामोशांकडेच होती. पुरंदरवरही बंदोबस्तासाठी रामोशीच होते. दादजीचे म्हणजेच उमाजीचे कुटुंबही त्याच कामी सहभागी होते. म्हणजेच त्यावेळी पुरंदरचा गड सांभाळून आवश्यक तेव्हा पेशव्याला योग्य ती सेवा देणे हा सुध्दा त्याचा एक कर्तव्याचाच भाग होता असेच ते समजत असत.

पुरंदर रामोशी गडकाऱ्यांना गडांच्या नोकरी खेरीज 'रखवालदार' म्हणूनही नेमले होते. त्यात त्यांना आसाम्या मिळाल्या. इकडील भागात रामोशीच रखवालदार असून त्यातील बहुतेक पुरंदर गावाकऱ्यांमधीलच दिसतात.[३]

बहामणी राज्यांत मुळ गडाची वसाहत बेदरचे देशपांडे चंद्रसपंत यांनी बादशाही हुकुमाने चोरा-चिलटांच्या उपद्रवामुळे मुलखाच्या वसाहतीस व्यत्यय येऊ लागला म्हणून केली होती. तेव्हा गडाच्या व्यवस्थे करिता त्यांनी आपल्या बरोबर जे नाईक आणले तेच पुढे वंशपरंपरेने नोकर झाले. या नाईकांना कोळी, बेडर-रामोशी व महार यांच्याही नाईक्या स्थापाव्या लागल्या. हे कोळी, रामोशी परवारी (महार) गडांच्या अधिकाऱ्यांत उलथा पालथ झाली तरी कायम राहिले होते.[४]

उमाजीचे कुटुंब हे पुरंदर जवळचेच रहिवाशी असल्याने त्याचे सर्वच कुटुंब पुरंदर किल्याच्या संरक्षणची जबाबदारी इमाने इतबारे संभाळत होते. त्या मुळेच त्यांना गडनायक किंवा (नाईक) ही पदवी बहाल होऊन खोमणे ऐवजी नाईकच हे नाम इतिहासात रुढ झ ाले.[५] विशेषत: शिवकाळामध्ये किल्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी रामोशी समाजाकडेच होती. ३८ पैकी १४ किल्यांवर रामोशी समाजातील लोक किल्लेदार म्हणून काम करीत होते. त्याच्या मोबदल्यात त्यांना त्या काळी काही जमिनी इनाम म्हणून देण्यात आल्या होत्या. कोल्हापूर, पुरंदर, सोलापूर या भागात अशा प्रकारच्या इनामी जमिनी आजही त्या समाजाकडे आहेत. याच काळात त्यांना नाईक ही पदवी देण्यात आली त्यामुळेच रामोशी हे नाईक नावाने ओळखले जातात.[६]

पुरंदर किल्याच्या परिसरातील रामोशी कोळी, व महार यांना किल्याच्या सरंक्षणाचे व पहारेकऱ्यांचे काम वंशापंरपरेने शिव छत्रपतींनी दिले होते. त्या बदल्यात त्यांना परिसरात शेती करून खाण्यांचा हक्क शिवाजीराजे यांच्या काळापासून होता. म्हणजेच साधारणपणे सन १६७१ पासून हा हक्क होता म्हणून त्यांना सनदी गडकरी म्हणत.[७]

मध्ययुगाचे वैशिष्टये म्हणजे त्याकाळी सरकारी नोकरच नव्हे तर सरदार, पेशवे, वेळ प्रसंगी स्वत:च्या जनतेसच लुटीत असत. त्यामुळे उमाजी व त्याच्या कुटुंबातील व्यक्तिंनी वेगळे काही केले असे म्हणता येत नाही.

बाजीराव व रामोशी संबंध

सन १८०३ सालात दुसरे बाजीराव वसईहून परत आल्यावर त्यांच्या असे निदर्शनास आले की पुरंदर किल्याची राखण रामोशी लोक करीत होते. तसेच ब्रिटिश सरकारचेही हुकूम रामोशी मानीत नव्हते. पुरंदरच्या भागात रामोशी लोकांच्या पुष्कळ, वसत्या आहेत व त्यांचे चांगले बस्तान बसले आहे. उमाजी नाईकाने त्यांचे दोस्त मंडळी जमा करून जसे काही तेथे एक छोटेशे संस्थानच वाढविले होते. नेमकी हीच गोष्ट बाजीरावास खटकली होती.[८]

इ.स. १८०२ व १८०३ ही दोन वर्षे पुणे शहर व पेशवे पदासाठी फारच अस्थिरतेची वर्षे होती. दुसरे बाजीराव इंग्रजांच्या आश्रयाखाली गेले ही बाब कोणत्याच लहान मोठया मराठी सरदारांना आवडली नाही. सरदार विठोजी व यशवंतराव होळकर या बंधूनी अमृतरावास पेशवा माणून त्याच्या नावाने राज्यकारभार करीत होते. (अमृतराव हा राघोबादादाचा दत्तक पुत्र होय) परंतु उघडपणे ते शेवटपर्यन्त बाजीराव व इंग्रजांच्या विरोधी उभे राहिले नाहीत.

याच काळात १८०३ च्या मे महिन्यात सेनापती वेलस्लिने पुण्यात बाजीरावास पेशवेपदी स्थानापन्न केले व पुण्याच्या आसपासचे गडकोट घेण्याचे हुकुम दिले. त्यापैकी पुरंदर किल्ला ही एक मोठी मोक्याची जागा होती. आणि पुरंदर वरची व्यवस्था अगदी शिवाजीच्या वेळेपासून काही विशिष्ठ पध्दतीने लावलेली होती म्हणजेच रामोशी व कोळी हे ही किल्याच्या घेऱ्याचे आणि किल्याचेही रखवालदार म्हणून लहान मोठी कामे करीत. म्हणून थोडक्यात सांगायचे झाले तर पुरंदरच्या रामोशांच्या ठाण्याविषयीचा प्रश्न निर्माण

झाला. त्यातच अमृतरावावर रामोशांचा थोडाफार विश्वास होता पण पुढे तो पण इंग्रजांशी आणि बाजीरावाशी स्नेहाची बोलणी करू लागला.[९]

बाजीरावाने आसपासचे महत्वाचे किल्ले घेण्यास माणसे पाठविली. पुरंदरवर ही पेशव्यांची माणसे चाल करून येत आहेत. आणि महत्वाचे म्हणजे अमृतराव बाजीरावाशी वाटाघाटी करत आहे तेव्हा आपला निभाव लागणार नाही हे लक्षात येताच बऱ्याच लोकांनी पेशव्यांच्या सेवेत राहणे पसंत केले. ते पेशव्यास शरण गेले.

पुरंदर किल्ला हिच रामोशी लोकांची खरी मिळकत होती. किल्याची कमाई हेच आयुष्यभराचे पोट भरायचे साधन होते. म्हणून रामोशी लोकांनी बाजीरावास पुरंदर किल्ल्यावरील हक्क सोडण्याचे नाकारले. त्यामुळेच दुसऱ्या बाजीरावाने चिडून जाऊन रागाच्या भरात रामोशी लोकांच्या सनदा, इनामे, हक्क वतन, नेमणुका, जमिनी सर्वच जप्त करून टाकल्या. त्यातच उमाजीचे वडीत दादजी खोमणे यांचीही जमीन जप्त झाली. त्यामुळे रामोशी लोकांना निर्वाहाचे असे काहीच साधन उरले नव्हते.

उमाजीचा निजामशाहीत (परांडयाकडे) मुक्काम

रामोशांचे पुरंदरमधील हक्क, वतने, नेमणुका आणि जमिनी वगैरे सर्व जप्त करून टाकल्यावर, उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने रामोशी लोक बचैन झाले. आणि पेशवे सरकारच्या आंमलदारांपासून पुन्हा त्रास पोहचू नये म्हणून दुसरीकडे कोठेतरी जाणे त्यांना क्रमप्राप्त झाले. म्हणून त्यांनी पुर्वेकडील निजामशाहीच्या प्रदेशात जाऊन परांडयाजवळ तळ ठोकला.[१०]या मुलखातही पेशवे सरकारचे लहानमोठे जहागीरदार होते. त्यांच्याच आश्रयाखाली हे रामोशी जाऊन राहिले. यापैकी बऱ्याच रामोशांनी निरनिराळया वेळी निरनिराळया दंग्याधोप्यांत सामील होवून पेशव्यांच्या मुलखात बराच धुमाकुळ मांडला होता, आणि त्यामुळेच त्यांच्या पाठीमागे सरकारी फौजा लागल्या होत्या. शेवटी आपल्या मागचा हा ससेमिरा चुकवण्यासाठीच ही (पुरंदर ते परांडा) स्थलांतराची दुसरी युक्ती होती. परांडयाकडे गेलेल्या रामोशांनी तिकडील जहागीरदाराच्या पदरी नोकऱ्या मिळवून त्यांचे

तिकडे चांगले बस्तान बसले. पुढे काही दिवसांनी पुणे जिल्हयातील आणखी काही रामोशी त्यांना जाऊन मिळाले.

इनामदाराचे प्रकरण

इ.स.१८१४ साली उमाजीचा चुलत भाऊ राघु हाही त्याच्या बरोबर दुसरे स्नेही घेऊन मानकेश्वराच्या जवळच्या प्रदेशातच निघून आला होता. यावेळी उमाजीचे वय २५ वर्षाचे असून तो ऐन जवानीत होता. उमाजीचा चुलत भाऊ राघुजी उस्मानाबाद जिल्हयात मानकेश्वराच्या प्रदेशात एका मुसलमान इनामदाराकडे नोकरीस राहिला. त्याच्या बरोबर त्याच्या गटातले २०-२५ रामोशी असावेत. अर्थातच त्यात उमाजीही होता. इ.स.१८१४ मध्ये हया रामोशांवर एक अकल्पित असा प्रसंग गुदरला.[११]

मानकेश्वराच्या भागात त्याकाळात महादजी शिंदे (पाटील बुबा) यांचा मानलेला भाऊ 'राणोखा' याचा दुरचा नातलग रायमदचा इनामदार याच्यापदरी बीड परगण्यात इकडील रामोशी लोक जाऊन राहीले होते. खंबाटकी घाटाजवळच्या 'सोळसी' गावचा रामोशी, बापू चव्हाण हा उमाजीचा मोठा जीवलग स्नेही सुध्दा त्यात होता.

रायमदच्या इनामदारास दोन बायका होत्या. त्यापैकी धाकटी तिच्या सौदर्याने व गुणाने इनामदारास व सर्वांस अत्यंत प्रिय होती. आणि थोरली भंयकर द्वेषी व महत्वाकांक्षी होती. नवऱ्याच्या इस्टेटीमधील अर्धी भागीदार असलेली धाकटी सवत थोरल्या सवतीच्या डोळयात रात्रंदिवस खुपत होती. धाकटी बद्दल इतका मत्सराग्नी प्रज्वलीत झाला की शेवटी आपल्या वाटेतला हा काटा काढून टाकण्याकरिता तिने तिच्या नवऱ्याच्या चाकरीत जे पुरंदरचे रामोशी होते त्यांच्याजवळ तिने हे काम सांगीतले. या मोबदल्यात थोरली ने रामोशांना या कामाबद्दल ९०० रुपयांचे बक्षीसही देण्याचे कबुल केले होते.[१२]

परंतु राघोजी नाईकाने इनामदारनीला स्पष्टपणे नकार दिला व म्हणाला ''बाईसाहेब मी किंवा माझे सोबती हे खुनाचे त्यातून स्त्रीच्या खुनाचे, काम करण्यास केव्हाही तयार होणार नाहीत. हे काम मारेकऱ्यांचे किंवा मांगाचे आहे. खऱ्या रामोशांचे नव्हे.'' यापेक्षा

दुसरे वाटेल ते अवघड काम आपण आम्हाला द्या, आम्ही ते करू. पण एखाद्याचा खून करणे हे आमच्या हातून व्हायचे नाही. या दुष्ट कृत्याला मांगच योग्य आहेत.[१३]

रामोशांच्या नाईकाने, राघोजीने या प्रमाणे इनामदारीन बाईला स्पष्ट जबाब देऊन तिचे म्हणने नाकारल्यामुळे तिने रामोशांना नोकरीवरून काढून टाकले.

औरंगाबादच्या सुभेदाराशी रामोशांची चकमक

फक्त नोकरीवर गदा येऊनच प्रकरण संपले तरी फारसे बिघडले नसते परंतु राघु, उमाजी, व बापू चव्हाण यांनी हे नाकारलेले काम पुरंदरच्याच दुसऱ्या इतर रामोशांनी स्विकारले, आणि फत्ते करूनही दाखवले. थोरल्या इनामदार बाईने धाकटया सवतीचा मार्गातील काटा काढला, कायमचाच उपटुन टाकला. या कामाबद्दल त्यांना ठरवलेली रक्कमही मिळाली पण त्याच बरोबर एक मोठी लुटही सापडली. या लुटीची वाटणी करीत असता त्या रामोशांत आसपास भांडाभांडी होऊन ते त्यांचे सर्व आघोरी कृत्य शेवटी उजेडात आले. रामोशांमध्ये मोठी दंगल माजण्याची चिन्हे दिसू लागली. तेव्हा औरंगाबादच्या सुभेदाराने सर्वांना पकडण्याचे फर्मान सोडले. रामोशांना ही बातमी कळताच त्यांच्यात एकच धावपळ उडाली. निजामशाहीतून पुन्हा मागे फिरून पुरंदर कडे (मायदेशाकडे) जाण्याखेरीज त्यांच्याकडे दुसरा मार्ग नव्हता. सुमारे पन्नास साठ रामोशांची टोळी त्यांची बायका पोरे-गुरेढोरे, शेळया मेंढया, वगैरे, घेऊन पुरंदरकडे निघाली. परंतु निजामशाही फौजेने त्या टोळीस गाठले. रामोशांनीही फौजेच्या तुकडीशी मोठया धैर्याने सामना करण्याची तयारी केली. त्यांनी त्यांच्या बायकांना मेंढया-गुरे जंगलात हाकून नेण्यास सांगून त्यांनाही मार्गाला लावले, आणि एक आडोश्याची उत्तम जागा पाहून त्या फौजेच्या तुकडीवर एकदम गोळीबार सुरू केला.[१४] या निजामशाही फौजेच्या तुकडीत सुमारे शंभर लोक असून त्यांच्याशी सामना करणारे रामोशी लोक फक्त बावीसच होते. त्यांच्यापैकी काही जणांजवळ तोडयांच्या बंदुका असून काही जणांकडे तलवारी होत्या. म्हणजेच संख्येने ते घोडेस्वार रामोशांपेक्षा जरी पाचपटीने जास्त होते तरी त्यांची त्या

रामोशांच्या लहानशा टोळीवर एकदम हल्ला करण्याची हिंम्मत झाली नाही. सुरूवातीस सुभेदाराची टोळी बचावात्मक पध्दतीने नुसते पाठलाग व घिरटया घालत होती परंतु शिबंदीची आणखी कुमक आल्यावर त्यांचे मनोबल वाढले व संख्याही वाढली. पुर्वीचे १०० व नंतरचे १५० मिळून २५० (अडीचशे) झाल्यावर मग त्या निजामशाही समशेर बहादूर शिपायांनी त्या रामोशांच्या लहानशा टोळीवर मोठया नेटाने आणि शौर्याने हल्ला चढविला. निजामशाही फौजेने रामोशी टोळीस शस्त्रे खाली ठेऊन शरण येण्यास सांगताच त्यांच्या त्या धमकिला रामोशांनी मुळीच भीक न घालता उलट त्यांच्यावर गोळी झाडूनच त्याचे उत्तर दिले.[१५]

त्याच बरोबर सर्वजण रागाने बेभान होऊन त्यांच्यावर एकदम तुटुन पडले. निजामशहाच्या फौजेशी रामोशांची चकमक झाली. या चकमकीत रामोशांचे दहा लोक ठार होऊन आठ जण जखमी झाले, बाकीच्या चार जनांना मात्र त्यांच्या स्वाधीन होण्याखेरीज दुसरा मार्गच नसल्याने ते फौजेच्या स्वाधीन झाले. त्यांमध्ये उमाजी सुध्दा होता. नंतर ती निजामशाही फौज त्या लहानशा टोळीवर (रामोशांच्या) विजय मिळवून, आणि जखमी झालेल्या लोकांना बरोबर घेऊन परांडयास निघून गेली. जखमी झालेल्या लोकांपैकी उमाजीचा चुलत भाऊ राघु आणि त्याचा मुलगा हे तेथे पोहचल्यावर काही दिवसांनी मृत्यू पावले. बाकी राहिलेल्या रामोशांनी परांडयाच्या किल्याची म्हणजे तेथील कैदखान्यात तीन महीने हवा खाल्ली होती.[१६]

त्यानंतर त्यांनी त्यांची सुटका करून घेण्यासाठी तेथील अंमलदाराला त्यांच्या जवळचे होते ते सर्व देऊन म्हणजे (लाच) देऊन सुटका करून घेतली. वाचलेले इतर रामोशी परत मायदेशी पुरंदरकडे येऊन पोहचले. त्यावेळी म्हणजे इ.स.१८१६ मध्ये सर्वजन पुर्णपणे भुके व कंगाल झालेले होते.

उमाजीचे पुरंदरवरचे नंतरचे जीवन

पुन्हा माघारी पुरंदरकडे आल्यावर, आपणास पेशव्याकडून तेथील रखवालीचा पुर्वापार चालत आलेले काम मिळावे, म्हणून रामोशांनी बऱ्याच खटपटी करून पाहिल्या परंतु त्यांच्याकडे कोणीच लक्ष न दिल्यामुळे उमाजी हताश झाला होता. त्याचे सुरूवातीचे गडावरचे दिवस फारच वाईट व हालाखीत गेले. त्यातच त्यास एक मोठा आजारही येऊन गेला, त्याचे हे दुखणे (आजारपण) इतके विकोपाला गेले की तो व्यसनी बनला. दारूच्या आहारी गेला. एकदा दारूच्या नशेत उमाजीने रघुच्या धाकटया भावास खूप शिव्या व चोप दिला, रघुच्या भावाला उमाजीचे वर्तन आवडले नाही, म्हणून चिडून जाऊन त्याने जवळच एक दगड (धोंडा) होता तो उमाजीच्या कपाळावर मारला. उमाजीच्या कपाळाला खोच पडल्याने तो बेशुध्द झाला, पण शुध्दीवर आल्यावर मात्र उमाजीने दारू सोडण्याचा निश्चय केला, तो शेवटापर्यन्त नेला. नंतर मात्र उमाजी उभ्या आयुष्यात दारूला कधीच शिवला नाही.[१७]

इ.स.१८१६-१७ मध्ये उमाजी व इतर रामोशी किल्यावर असताना, पेशव्यांचे व इंग्रजांचे फार बिनसत गेले, व प्रकरण युध्दावर येणार हे स्पष्ट झाले. बाजीरावाने पुरंदरचा कारभार व हक्क रामोशी व कोळी यांना देऊन पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्नही केला असावा, परंतु आता त्याच्या बोलण्यावर कोणाचा विश्वास राहिला नव्हता. बापू गोखले, त्रिंबकजी डेंगळे हे इंग्रजांच्या विरोधात ठाम भूमिका घेऊन ऊभे राहिले होते. यांच्याशी उमाजीची यावेळी गाठ पडली असती तर त्यास त्याचे जीवित कार्य (जीवन कार्य) सापडले असते. परंतु असे घडले नाही. परिणामी उमाजीने पुरंदरच्या मुक्कामी दरोडेखोरी हाच आपला या पुढील आयुष्यभराचा व्यवसाय आहे असे निश्चित करून दरोडे खोरीचा मार्ग उपजिविकेसाठी निवडला.[१८]

याच काळात इंग्रज व मराठे यांचे खडकी येथे अंतीम युध्द होऊन १७ नोव्हेबर १८१७ रोजी एलफिन्स्टन जनरल स्मिथ, बाळाजी पंत नातू यांच्या समवेत

शनिवार वाडयावर इंग्रजी निशान फडकावले.[१९] शिवाजीने चेतावलेला स्वराज्याचा स्फुलिंग रामोशांच्या अंत:करणात धगधगत होता. शिपाई बाण्याचे हे गडी स्वराज्याचा नाश झालेला उघडया डोळयांनी व स्वस्थ चित्ताने पहायला त्यांचे मने काही मुर्दाड झाली नव्हती.

इग्रंजी राज्य म्हणजे ईश्वरी योजना मानायला लावणारी त्यांच्या अंगात विद्वत्ता ही नव्हती. त्यातच इंग्रजांच्या राज्यात घरी बसण्याची पाळी आली. ना उद्योग, ना धंदा, गुलामगिरीच्या व्देशाग्निला बुध्दीचा आग्नी मिळाला, इंग्रज परके असून त्यांचा जम आम्ही येथे बसू देणार नाही अशीच भावना त्यांच्या मनात घर करून होती. अशा स्वातंत्र्यकांक्षी लोकांनी मराठेशाही तगावी म्हणून दुसऱ्या बाजीरावाच्या शेवटच्या प्रयत्नात प्राणार्पण करण्याची तयारी दाखवली, पण मग पुढे असा धुमाकुळ मांडला की काही वर्षे इंग्रजी आमलाची साक्ष सुध्दा पटेनाशी झाली.[२०]

महाराष्ट्रातील सर्व लोकांच्या मनातील स्वराज्याबद्दलच्या आठवणी पुर्णपणे नष्ट झाल्या होत्या. जिकडे-तिकडे कंपनी सरकार तिचाच डौल, तिचेच वैभव होते. परंतु उल्कापात व्हावा त्या प्रमाणे उमाजी नाईकाने इंग्रजांविरुध्द स्वत:च्या तेजाने व धैर्याने तलवार उपसली.[२१]

यावेळी उमाजी रामोशी समाजातील एक चपळ नेता म्हणून ओळखला जाऊ लागला होता.[२२]

संदर्भ सूची

१) सरदेसाई गो.स.- मराठी रियासत , मुंबई-१९३२, प्र.क्र.५४७

२) घोडके डॉ. ह.म- महाराष्ट्र गाथा, प्रकाशक दिलीप माजगांवकर, राजहंस प्रकाशन-पुणे, पहिली आवृत्ती-२०००, पृ.क्र.११

३) पुरंदरे कृष्णाजी वासुदेव- ऐतिहासिक ग्रंथमाला- पुष्पदुसरे, भारतइतिहास संशोधनमंडळ, पुणे, प्रकाशक-पुरंदरे कृ.वा. (भा.इ.सॅ.मं (पुणे), प्र.क्र. ५६

४) कित्ता- पृ.क्र.५५

५) दै. पुण्यनगरी- अहमदनगर- बुधवार ३ फेब्रुवारी २०१०, लेख गडकरी राजेंद्र.

६) चव्हाण रामनाथ नामदेव- जाती आणि जमाती प्रकाशक- अनिलकुमार मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस-पुणे, प्रथमावृत्ती- एप्रिल १९८९, पृ.क्र.८,९

७) एक्के शिवाजीराव-आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक, प्रकाशक- श्री. गजानन शिवाजीराव एक्के, शिवाजी प्रिंटर्स-पुणे, व्दितीय आवृत्ती ७ सप्टेबर २०१२, पृ.क्र.९

८) पाटोळे शिवाजी-माझे स्वप्न साकार झाले, प्रकाशक- प्रमोद भोगटे, मायबोली प्रकाशन-मुंबई, पहिली आवृती जुलै १९९६, पृ.क्र.९

९) आठवले सदाशिव- उमाजी राजे मुक्काम डोंगर, प्रकाशक-अ.अ. कुलकर्णी, कॅन्टिनेंटल प्रकाशन -पुणे, प्रथमावृत्ती मे १९९१, पृ.क्र.१९

१०) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकमाला नं. २३, भारतभुषण- सदाशिव पुणे १९१०, पृ.क.२६

11) Mackintosh- p-126

12) Ibid- p-126

१३) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकमाला नं. २३, पृ.क.२७-२८

१४) कित्ता- पृ.क्र. २८,२९

15)Mackintosh- p-127

16)Ibid- 127

17)Ibid- 128

१८) एक्के शिवाजीराव- आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक, पृ.क्र. ११

१९) केळकर न.ची.- मराठे व इंग्रज, पृ.क्र.११२

२०) खोबरेकर वि.गो.-इंग्रजी सत्ते विरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव, १८१८-१८६०, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई-७. प्रथम मुद्रण जून १९५९, पृ.क्र. २६ व २७

२१) भागवत अ.ना- भोर संस्थानचा इतिहास, पृ.क्र.२१३.

२२) Mackintosh- p.128

प्रकरण चौथे

उमाजी नाईकांचा कंपनी सरकार विरूद्ध सशस्त्र लढा.

उमाजी म्हणजे खरोखरच दुखावलेला नाग होता. त्याला उपजिविकेचे साधन नव्हते. त्याला मोठा पराक्रमही करायचा होता परंतु त्यास वाव नव्हता. त्याचे पोलादी मनगट गंजून चालले होते. पिचलं तरी बेहत्तर पण माझ्या मनगटाची रग जिरू देणार नाही, अर्थातच त्याच्या बेडर मनाची आकांक्षा होती. रामोशी वंशाचा त्यास अभिमान होता. पुरंदरवरील पिढीजात वतनदारी रद्द व्हावी ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागली होती. रक्त सळसळत होते. मनही चरफडत होते. बाहु स्फुरण पावत होते. परंतु शेवटी उकळलेल्या पाण्याची वाफ ज्या प्रमाणे झाकणाबाहेर पडते, त्या सम उमाजीचे पौरुषत्व उफाळुण आले.[१]

उमाजीने साकुर्डी व सासवड येथे जाऊन काही मित्र मंडळींची भेट घेतली व तेथील सतू नाईकास सर्व काही समजावून सांगुन आपलेसं करवून घेतले. सतू नाईकास सांगितले की आपल्या भागातील काही पैसेवाले कंपनी सरकारला फितुर झाले आहेत. ते गोरगरिबांकडून अनेक तऱ्हेने पैसे उकळतात व कंपनी सरकारला देतात म्हणून आपणास पहिली कंपनी सरकारची मदत बंद करावयास पाहिजे. उमाजीचे बोलणे सतू नाईकास पटले. उमाजीने आसपासचा खेडयात जाऊन गरिबांवर अन्याय होत असल्याचे पाहिले, तेव्हा उमाजीच्या लक्षात आले की या अन्याय करणाऱ्यांमध्ये पाटील सुध्दा सहभागी आहेत. या गोष्टी सुध्दा उमाजीने सतू नाईकास खुलाशेवार पटवून दिल्या. उमाजीच्या बोलण्यावर सतू नाईकाने पूर्ण विश्वास ठेवला आणि उमाजीने जे कार्य आरंभिले होते, त्या कार्यास सतू नाईक आपल्या टोळी सह सामील झाला आणि उमाजीस सर्व प्रकारची मदत करू लागला. अशा प्रकारे उमाजीस सैन्यांची जमवाजमव करण्यासाठी जवळ-जवळ पाच ते सहा महिने लागले.

इ.स. १८१७ ते १८१८ च्या दरम्यान उमाजी साकुर्डीचे रामोशी आणि सासवडचे रामोशी यांच्या समवेत दरोडे घालीत असे. हे दरोडे म्हणजे स्वार्थासाठी नव्हते तर इंग्रजांच्या आणि जुलूम करणाऱ्या स्वकियांच्या तावडीतून जनतेला सोडवण्यासाठी फुंकलेले रणशिंग होते. हे लक्षात घेतले पाहिजे.

उमाजी नाईकांचे सुरुवातीचे दरोडे व शिक्षा

इ.स. १८१७ ते १८१८ मधील पहिला मोठा दरोडा म्हणजे एक पाळत ठेऊन केलेली वाटमारी होती. ही उमाजीने सतू नावाच्या तरबेज नायकाबरोबर केलेली पहिली धाडसी लूट होती. मे. १८१८ मध्ये चानजी मानिया या पुण्यातील सावकाराचा काही माल मुंबईस जात असताना तो माल मिळवण्यासाठी सतू नाईक व उमाजी नाईक यांनी काही निवडक सैन्य घेऊन बोरघाट उतरून पनवेलपासून नऊ कोसांवर खालापूर या गावी वाट पाहू लागले. तो माल त्यांनी खालापूरला लुटला. उमाजीची ही पहिलीच मोहीम होती. परंतु ही लुट उमाजीला पचली नाही. माल लुटल्याची खबर पुण्याच्या कलेक्टर साहेबांस कळाली आणि या कलेक्टरने माल पळवणाऱ्यांना पकडण्याचा हुकुम काढला. यामध्ये उमाजी व त्याचे तीन सहकारी पकडले गेले. त्यांना कोर्टात दोषी ठरवून एक वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली.[३] अशा प्रकारे उमाजीने सावकाराने कमविलेला हरामचा माल गरिबांच्या कष्टाचा पैसा परत देऊन गोर गरिबांकरिता अन्यायाविरुध्द लढा दिला. अशी ही पहिली मोहीम सुरू केली होती आणि त्याचा भोगही सुरू झाला होता.

उमाजी शिक्षा भोगून आल्यावर उमाजी विषयी लोकांमध्ये आदर व प्रेम निर्माण झाले. उमाजीने अन्यायाविरुध्द कंपनी सरकारला सामना देऊन कंपनी सरकारला नमविण्याचा घाट घातला, तेव्हा उमाजी नाईक कंपनी सरकाला जड वाटू लागला. उमाजी गरिबांचा वाली झाला. उमाजीस गरीब लोकांकडून कंपनी सरकारला हालचालीच्या बातम्या मिळू लागल्या.

काही दिवसांनी भोर जवळील विंग येथील कुलकर्ण्याचे घर काही रामोशांनी लुटले.[४] ही बातमी उमाजीस समजली व त्यांनी लुटारू रामोशांना समजावले. परत अशा प्रकारचे वर्तन करू नका आपल्याच लोकांची लुट करू नका अशी ताकीद दिली. या चोरीच्या प्रकरणात उमाजी नव्हता. तरी सुध्दा त्यास विनाकारण चोरीचे प्रकरणात गोवल्या गेले. कारण खऱ्या लुटारूंचा पत्ता लागल्यानंतर सर्व रामोशी पकडल्या गेल्यावर त्यांनी उमाजी ही त्यांच्या बरोबर होता म्हणून सांगितले. थोडक्यात ज्यांनी चोरी केली त्यांच्याकडून उमाजी पकडला गेला परंतु चौकशीच्या वेळी उमाजीने आपल्या निरपराधीपणा बद्दल अशा रितीने जबाब दिला की त्याच्या संबंधाने जास्त बळकट दुसरा पुरावा मिळाल्या शिवाय अधिकाऱ्यांना उमाजीस शिक्षा देता आली नाही.[५] म्हणेजच यासंबंधी खटला चालू असताना आपल्या बचावाचे काम स्वत:च केले आणि निरपराध असल्याचे न्यायालयाच्या नजरेस आणून दिले. परंतु केवळ संशयावरून उमाजीस एक वर्षाची शिक्षा झाली. उमाजीस परत तुरूंगात रहावे लागले.

याच सुमारास उमाजीचा धाकटा भाऊ कृष्णाजी यास चोरीच्या आरोपावरून सात वर्षाची शिक्षा झाली होती. परंतु तो अत्यंत धाडसी चपळ असल्याने तुरूंगाच्या तटावरून उडी मारून पळून गेला. जेव्हा कृष्णाला हे माहीत झाले की उमाजीस कंपनी सरकारने पकडले आहे. तेव्हा कृष्णाजी नाराज होऊन त्याने उमाजीस सोडण्याचा प्रयत्न केला परंतु हे प्रयत्न करीत असतानाच कृष्णाजी स्वत:च पकडला गेला. कृष्णाजी आणि उमाजी यांना एकत्र अटकेत ठेवण्यात आले.

उमाजी वाचण्यास व लिहिण्यास शिकतो.

शिक्षा भोगत असताना तुरुंगातील मिळालेला तो वेळ उमाजीने सत्कारणी लावला. वाचने व लिहिणे शिकण्यासाठी उमाजीने तुरुंग अधिकाऱ्याकडे इच्छा व्यक्त केली होती. त्या नुसार तुरुंगाच्या अधिकाऱ्याने ती सोय केल्याने तो वाचण्यास शिकला असे त्यास पकडणारा व त्याचे चरित्र लिहिणारा कॅप्टन मॅकिन्टॉश या इंग्रज अधिकाऱ्याने

नमुद केले आहे. परंतु उमाजी नुसताच वाचण्यास शिकला असे नाही तर तो अल्प प्रमाणात का होईना लिहावयास शिकला होता. कारण त्यांच्या काही पत्रांच्यावर शिरोभागी, मध्यभागी खंडोबा प्रसन्न अशी वेडया वाकडया वळणाची अक्षरे दिसतात.[६] ती बहुदा उमाजीच्या हातचीच असावीत. कैदेत असताना लिहिण्या वाचण्यास शिकणारा त्या काळातील हे दुर्मिळ उदाहरण आहे. यावरूण विद्येचे महत्व त्यांना किती वाटत होते हे दिसून येते. एवढया मोठया वयात साक्षरतेचे महत्व पटून ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करणारे त्याकाळी पुढारलेल्या वर्गात सुध्दा सापडणे कठीण होते. पण विद्येचे महत्व, जबरदस्त महत्वाकांक्षा आणि ध्येयवादी तळमळ यामुळेच हे सर्व घडून आले.

सतूची टोळीत उमाजी (सतू हा आबाजी नाईक सासवडकर याचा मुलगा)

इ.स. १८२१ मध्ये उमाजी हा सतूचा विश्वासू सहकारी अगदी निकटचा व बरोबरीचा म्हणून वावरू लागला होता. सतू हा मुळचा सासवड गावचा. त्याने अनेक रामोशी एकत्र करून मोठी टोळी तयार केली होती. स्वत: नायकाने जंगलात लपून रहायचे. लहान लहान गट करून अनेक ठिकाणी दरोडे घालायचे, वाटमाऱ्या करायच्या पुन्हा एकत्र यायचे व पुन्हा फुटून वेगवेगळया दिशांनी जायचे, ही त्याची कार्य पध्दती उमाजीने आत्मसात केली होती. यामध्ये शिपायांना चकवून पसार होण्याचे त्याचे कौशल्य विलक्षण होते.[७]

सतूची अटक व सुटका

२१ डिसे. १८२१ रोजी उमाजीचा जिवलग मित्र सतू नाईक हा धाडसी होता . त्याने उमाजीची स्वातंत्र्याची इच्छा पूर्ण करण्याकरिता सैन्यांची जमवाजमव सुरू केली होती. भोजना करिता लागणारे धान्य खरेदी करून एका बिगाऱ्याजवळ धान्याचे गाठोडे देऊन तो सासवडला येत होता. मध्यंतर पुणे -पुरंदर रस्त्यावर पुरंदर जवळील पोखरी या गावी बिगारी बदली करतांना सतूने एका धेडणीला (मागास जातीची स्त्री) ओझे वाहण्यास फर्माविले पण तिने नकार दिला म्हणून त्याने तिला जोडयाने मारले. जोडा वर्मी लागल्याने

ती धेडीन पटकन धरणीवर पडून मरण पावली.[८] आता आपणास त्रास होईल ही शंका मनात येताच सतूने धान्याचे गाठोडे तेथेच टाकून डोंगरात पळून गेला. धेडणीच्या नवऱ्यास ही बातमी कळताच तोही सतूला पकडण्यासाठी डोंगरात गेला. शेवटी त्याने सतूला पकडून सासवडला आणले आणि सासवडच्या पोलीस पाटलाकडून त्याच संध्याकाळी त्याची रवानगी बंदोबस्तामध्ये पुण्याकडे केली. उशिरा निघाल्यामुळे सतुस घेऊन जाणाऱ्या लोकांनी संध्याकाळी वाटेत दिवे गावात मुक्काम केला. ही सर्व वार्ता उमाजीस कळली. त्याने लगेच साकुर्डी व गराडे येथील रामोशी लोकांना जमवून दिवे गावावर हल्ला केला आणि सतू नाईकाची सुटका केली[९] आणि उमाजी स्वत:ही निसटले. त्यानंतर एक दीड वर्षे दोघांनी ही लपून छपून दिवस काढले.

उमाजी डोंगराच्या आसपासच्या खेडयांमध्ये आप्तेष्टांच्या घरी लपून छपून राहून दिवस काढीत होता. त्यामुळे त्याने संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे मोठी लुटमार केली नाही. त्यास पकडण्याचे अंमलदारांचे बरेच प्रयत्न व्यर्थ गेले.

जेजुरीची घटना

याच दरम्यान उमाजीचा भाऊ कृष्णाजी पुरंदरच्या इलाख्यात दरोडे घालीत होता. नंतर तोही येऊन उमाजीस मिळाला. इ.स.१८२३ मध्ये एप्रिल महिन्यात जेजुरीची यात्रा होती. त्या जत्रेला उमाजी आपले दोघे बंधू कृष्णाजी व अमृता आणखी दोन तीन स्नेही घेऊन जेजुरीला गेला. जत्रेच्या गर्दीत त्यांना लुटमार करायची होतीच. याच जत्रेमध्ये भाऊ अमृताने पागोटे चोरले. त्यामुळे त्यास जेजुरीच्या यात्रेचा पोलीस अंमलदार अण्णाजी नाईकाने पकडले. उमाजीने व अमृताने त्यांना सोडून दयावे म्हणून हात जोडून अण्णाजी नाईकास विनवणी केली. परंतु अण्णाजी अजिबात ऐकेना. नंतर मात्र उमाजीने होणाऱ्या परिणामांची पर्वा न करता तलवार उपसून एखाद्या चित्याप्रमाणे अण्णाजीच्या अंगावर धावून गेला. दोन चार वार अण्णाजीवर केले आणि त्यास यमसदनास पाठवले. अण्णाजीची शेवटची किंकाळी ऐकून दुसरा एक रामोशी नाईक मध्ये आला त्याला ही

उमाजीने जखमी केले. त्याच प्रसंगी अण्णाजी नाईकाची एक रखेली त्याच्या बरोबरच होती. अण्णाजीस मारताना ती बाई अण्णाजीच्या अंगावर पडली परंतु उमाजीने तिच्यावर वार केला नाही.[१०] उमाजीस त्या बाईचे साहस, धैर्य व त्या नाईकावरील परमप्रेम व स्वत:च्या प्राणांची बेपर्वाई पाहून आश्चर्य वाटले. त्या स्त्रीचे दु:ख व शोक पाहुन उमाजी गहिवरला, शोकाकुल झाला. थोडक्यात उमाजीचे अंत:करण जितके कठोर होते तितकेच ते मृदुही होते हे सिध्द होते.[११] उमाजीस यावेळी दु:ख झाले खरे पण ती वेळ तेथे स्तंभित होऊन राहण्याची नव्हती. त्याने लगेचच आपल्या भावाची सुटका करून त्याला आणि आपल्या साथीदारांना घेऊन तेथून त्या क्षणी पळ काढला.

जेजुरीच्या घटने नंतर प्रथम उमाजी व त्याचे साथीदार भिवडी या जन्मगावी गेले. तेथे त्याने व त्याच्या भावांनी सतूस उघडपणे मिळून एकत्रीत पणे काम करण्याचे ठरवले. सतुलाही उमाजी व त्याच्या भावांचा फार भरवसा वाटू लागला होता. सर्वजन एक झाले. पुर्वीप्रमाणे सर्वांनी निरनिराळया भागात दऱ्याखोऱ्यात बस्ताने बसवायची आणि जमतील ती कामे गटागटाने आणि आवश्यकता वाटल्यास एकत्रपणे करण्याची योजना पक्की झाली.

इंग्रजांसारख्या बलाढय शत्रुंशी मुकाबला करायचा म्हणजे मोठे मनुष्यबळ असायला हवे. मनुष्यबळ म्हणजेच सैन्य पदरी बाळगायचे, म्हणजे खर्च हा सुध्दा प्रचंड आला. तो कुठून व कसा मिळवायचा? पण ज्यांचे उद्देश महान असतात ते साधनां अभावी थांबत नाहीत. शिवाय उमाजी राजांना छत्रपती शिवरायांपासून विचारांचा, युध्दनीतीचा आणि कृतीचा वारसा मिळालेला होता. ते नेहमी शिवरायांनाच आदर्श मानायचे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कृतीत शिवनिर्मिती होती. स्वातंत्र्यलढयासाठी खजिना जमा करण्यास उमाजी राजांनी तीच नीती अवलंबली.

१) ब्रिटिश सरकारच्या भांबुर्डा येथील खजिन्याची लुट

जेजुरीवरून अण्णाजी नाईकास ठार करून उमाजी व त्यांचे बंधू भिवडीस आले परंतु नंतर त्यांना त्या साहसाच्या कृत्यांबद्दल पश्चाताप झाला. उमाजीस कळून चुकले की आता आपणास त्या कृत्यांबद्दल कंपनी सरकार पकडण्याचा निश्चित प्रयत्न करणार पण रामोशांना डोंगराळा भागात राहून ब्रिटिश सरकारशी दोन हात करण्याच्या सवयी होत्याच. तरीपण अशा भयग्रस्त आणि द्विधा स्थितीत राहण्यापेक्षा उघडपणे बंडखोर होणे बरे असे उमाजीस वाटून तो त्याच्या भावांसह सासवडच्या सतू नाईकाला जाऊन मिळाला. अण्णाजी नाईकास ठार मारण्याच्या आरोपावरून उमाजीस पकडण्याकरिता कंपनी सरकारने पोलिसांची एक तुकडी सासवडला पाठविली. ही बातमी उमाजी व सतू नाईकास समजताच त्यातुकडीला फसवत, चकवत सहयाद्री पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून हिंडत राहिले. भिवडी गाव सोडून दऱ्या खोऱ्या, मोठमोठी जंगले हीच त्यांच्या वस्तिची ठाणी झाली.

इ.स. १८२३ च्या सुमारास त्यांच्या बरोबर जिवाचे रान करणारे नऊ दहा रामोशी लोक होते. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी लहान सहान चोऱ्या करणे हे उमाजीस आवडले नाही. दरम्यानचा काळात उमाजीने त्याच्या सैन्यांचा पसारा वाढवला. उमाजीच्या सैन्यात बरेच लोक सामिल झाले. त्यांना उमाजीने निरनिराळी कामे वाटून दिली. हे लोक सरकारच्या हालचालीवर बारीक नजर ठेऊन बातमी देत असत. इ.स १८२४ च्या फेब्रुवारीतील भांबुडर्याच्या सरकारी खजिन्याची लुट हे हया टोळीचे फार मोठे यश होते. [१२] या धाडीच्या आगोदर काही रामोशी लोक सिंहगडच्या डोंगरावर जमाव करून राहिले होते. त्याच वेळी काही हेरांनी उमाजीस एक बातमी दिली ती म्हणजे पुण्यामध्ये भांबुर्डा (शिवाजीनगर) या ठिकाणी ब्रिटिश सरकारचा फारमोठा खजिना आहे. आणि लगेचच उमाजीने हा खजिना लुटण्याचे ठरविले. लगेचच ते सर्व जन डोंगर उतरून खाली आले. या लुटीचे नेतृत्व

स्वत: उमाजीच करीत होता आणि त्याबरोबर इतर तीस रामोशी होते. २४ फेब्रुवारी १८२४ च्या रात्री हया टोळीने खजिन्याला गराडा घातला.[१३]

हा खजिना कडेकोट बंदोबस्तात होता. बंदीस्त जागेत होता. खजिन्याचे ठिकाण म्हणजे एक चौकोनीवाडा होता. त्यापुढे अंगणाचा मोठा चौक. त्या सभोवार भिंतीचे कंपाऊंड त्याची उंची १४ फुट होती. त्याला मुख्य दरवाजा होता. खजिन्यावर शिबंदीचा कडेकोट बंदोबस्त होता.[१४]

रात्री उमाजी पोहचण्याच्या पुर्वीच मुख्य दरवाजा बंद झालेला होता. तरीसुध्दा उमाजीचा भाऊ कृष्णाजी आणि विठू पुढे सरसावले, आणि हाहा म्हणत भिंतीवर चढून गेले आणि आत खाली चौकात उडया ठोकल्या, दरवाज्यापासी पहारा करीत असलेल्या शिबंदीच्या शिपायाला जागच्या जागी तोडून टाकले आणि मुख्य दरवाजा उघडून सर्वांना आत घेतले. इतर कोठडयांत झोपलेल्या शिपायांना बाहेरून कडया घालून त्यांना कोंडून टाकले. इतर दोन चार शिपाई अंगणात होते त्यांची आणि रामोशांची तेथे लहानशी झटापट झाली. या झटापटीत दोन शिपाई जखमी होऊन घायाळ झाले. एकजण ठार झाला. याच झटापटीत उमाजीच्या टोळीतील एक व येसू नाईकाच्या टोळीतील दोन असे एकूण तिघेजण जखमी झाले यामध्ये उमाजीचीच सरशी झाली. त्यांनी सर्व सरकारी खजिना लुटला. या लुटीत त्यांना त्यावेळी ६२०० रुपयांची रोख रक्कम मिळाली. [१५]

या लुटी पैकी बराचसा मोठा हिस्सा उमाजी, कृष्णाजी आणि त्याचे साथीदार यांच्या वाटयास आला. त्यातील बराचसा भाग कऱ्हेपठाराच्या खंडोबाला आणि काही भाग सिंहगडजवळया कोंडणपूरच्या भवानी देवीला त्याच्याकडून अर्पण करण्यात आला.[१६]

सरकारने भांबुडर्याच्या लुटीबद्दल त्वरीत कारवाई करून ज्यांनी या लुटीत भाग घेतला होता, अशा १२ जणांना पकडलं व त्यांना कोर्टात उभे करून शिक्षा दिली. ते १२ आरोपी पुढील प्रमाणे-

१) सरवाजी बीन सुलतानजी

२) येसाजी बीन पिलाजी भांडवलकर

३) नाना बीन पिलाजी भांडवलकर

४) भैरु बीन राघोजी

५) गोदाजी बीन राघोजी

६) काळु बीन धर्माजी

७) गुणाजी बीन महादजी

८) संतू बीन रखमाजी

९) येसु बीन सुभानजी

१०) राज महंमद

११) शिवा वळबाड भवानी

१२) राम केनु मंडले[१७]

रामोशांच्या हालचालींना व कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी पुण्याचे मॅजिस्ट्रेट कॅ.एच.डी. रॉबर्टसन यांनी के मॅन्सफिल्ड लियोनटं याची नेमणूक केली परंतु रामोशांना पकडण्याचे कंपनी सरकारचे प्रयत्न वाया गेले.[१८] नंतरच्या काळात सतू रामोशाच्या टोळीत सुमारे ७० लोक होते. त्याच्या जवळ दोन तोडयाच्या बंदुका होत्या त्या मार्फत ब्रिटिश शिपायांबरोबर गोळीबार ही केला होता. नंतर तो त्याच्या टोळीसह डोंगरामध्ये नाहिसा झाला.

भांबुर्डा (भांबुर्डा हापुण्यातील शिवाजीनगर मंगल टॉकिजच्या मागचा भाग येथे जुना तोफखाना होता.)

भांबुर्डयाच्या लुटीच्या यशाने सतू व उमाजीच्या टोळीतील लोकांचे मनोधैर्य खुपच वाढले परंतु ते शेफारून गेले नाहीत. आपल्याकडे मनुष्यबळ व शस्त्रास्त्र बळ फारच तोकडे होते याची त्यांना जाणीव होती. इंग्रज अधिकारी व शिपाई कसुन माग काढणार हे

त्यांना चांगलेच माहीत होते. अशा परिस्थितीत कोणीही व्यवहारी व धूर्त लष्करी नेता जे करील तेच उमाजीने केले. त्याने आपल्या टोळीतील लोकांना आपापल्या सोयीप्रमाणे फरारी होण्यास सांगितले. थोडक्यात सांगायचे झाले तर सर्वचजण भुमिगत झाले.

उमाजी भुमिगत झाला तरी तो गप्प बसणे शक्य नव्हते. इंग्रजांचा ससेमिरा चुकवावा व त्यांचा उदयोगही चालू रहावा, यासाठी त्याने डाव टाकून राजकारण केले. या करिता इंग्रजांचे पोलीस खात्यातील पुण्यातील एक अधिकारी राजे मोहम्मद सुभेदार यास उमाजीने आतून सामील करून घेतले.[१९]

त्यामुळे त्यास पुणे व परिसरात सातआठ दरोडे व पाच सहा वाटमाऱ्या करता आल्या. या सर्वांचा मतितार्थ असा की उमाजी धाडशी व शूर होता. तसा तो धुर्तही होता तसेच डावपेच व राजकारण जानणाराही होता हे स्पष्ट होते.[२०]

सतू नाईकाचा मृत्यु

२८ एप्रिल १८२५ च्या रात्री उमाजी व त्याचे निवडक सहकारी एका मित्राच्या घरी (सासवड) जेवत असताना पुरंदरच्या जहागीरदाराचे काही स्वार व काही शिबंदीचे लोक आणि सरकारी दहाबारा पोलीस या सर्वांनी मिळून उमाजीवर अचानक छापा टाकला. त्याच बरोबरचे सर्व रामोशी सावध होऊन त्यांनी त्या शिपायांशी दोन हात केले. याच झटापटीत भोजाजी नाईकाचा भाऊ पांडू हा ठार झाला. उमाजीच्या पाठीवर तलवारीचा घाव बसला होता. उमाजीचा भाऊ कृष्णाजी सुध्दा जखमी झाला. अशा सर्व बाजुंनी संकटात सापडलेल्या टोळीने त्यांच्याशी शौर्याने लढून व हातावर तुरी देऊन ते वळणावळणाने डोंगरी जंगलात निघून गेले. पळता पळता शिपायांवर गोळीबार करण्यात भोजाजी नाईक पटाईत होता. पळतापळता इंग्रजांस फितूर झालेल्यांची व जहागीरदारांची घरे रामोशांनी लुटली व काहीमाल मध्येच टाकून दिला. त्यामुळे शिबंदीचे लोक माल जमा करण्यातच गुंतले व त्याच कालावधीत रामोशी डोंगरात पसार झाले. एवढे सगळे होत

असताना जी चकमक झाली होती त्या लहानशा चकमकीत पुरंदरच्या जहागीरदाराच्या हातून दोन रामोशी जखमी झाले होते. [२१]

या जीवावर बेतलेल्या प्रसंगातून सुटल्यावर सतू व उमाजी जेव्हा परत भेट झाली तेव्हा सतू नाईकाने उमाजीस सांगीतले की सरकारने आपल्यावर बारकाईने लक्ष ठेवले आहे. म्हणजेच एकंदरीत सतूने उमाजीस सावधगिरीचा इशाराच दिला होता . याच वेळेस कॉलरा, महामारीची साथ सुरू होती. शेवटी ह्यातच सतू नाईक निरा नदीच्या दक्षिणेस असलेल्या एका लहान खेडयात २७ ऑगस्ट १८२५ रोजी मरण पावला. सतू नाईक सासवडकर यांच्या सैन्याचा मुख्य समजत असत, पण सतू नाईक वारल्याने त्या टोळीच्या सैन्याचे प्रमुखपद व अधिपत्य उमाजी कडे आले. तो या सर्व सैन्यांच्या टोळीचा मालक झाला. टोळीचा मुख्य नाईक झाला. त्या दिवसापासून त्यासच सर्व सैन्यातील लोक उमाजी नाईक किंवा नुसतेच नाईक म्हणू लागले. [२२]

उमाजीचा स्वतंत्र उद्योग

इ.स. १८२५ मध्ये ऑगस्टच्या शेवटी सतूला कॉलरा झाला आणि त्यातच त्याचा अंत झाला. ओघानेच उमाजीकडे टोळीचे नेतृत्व आले. थोडयाच दिवसात टोळीची सर्व सुत्रे त्याने त्याच्या हातात घेतली. उमाजी पूर्ण आत्मविश्वासाने व उमेदीने पुढील वाटचाल करू लागला. अगदी रूळलेल्या रस्त्याने त्याने वाटचाल सुरू केली.

सतूच्या मृत्यूनंतर एका महिनाभराच्या आतच सप्टेंबर १८२५ मध्ये मिरज-पुणे रस्त्यावर पटवर्धनाचे वऱ्हाड चालले होते. त्यावर उमाजीने धाड टाकली. यामध्ये वऱ्हाडाबरोबरच्या कारकुनाने शहाणपण व प्रसंगावधान दाखवून स्वत:हूनच दोन हजार रुपयांची रक्कम रामोशांच्या स्वाधीन करून टाकली. त्याच प्रमाणे एप्रिल १८२६ मध्ये पंढरपूर-पुणे रस्त्यावर एका सावकारास लुटून उमाजीने बराच पैसा मिळवला. पुढे जुलै १८२६ मध्ये फलटणचे जहागीरदार बजाजी नाईक पुण्याकडे जात असताना त्यांनाही दौंड जेजुरी परिसरात गाठून उमाजीने आठ हजार रुपये काढले. [२३]

उमाजीचा बंदोबस्त करण्याचे इंग्रजांचे प्रयास

उमाजीचा उपद्रव व धुमाकुळ सतत दिवसेंदिवस वाढतच चालला होता. वर्षाकाठी सात-आठ दरोडे आणि तेवढयाच वाटमाऱ्या करीतच होता. मिरजेचे पटवर्धन, फलटनचे जहागीरदार यांना लुटले. त्याच प्रमाणे २६ जुलै १८२६ रोजी किकवीचा पोलीस अंमलदार जव्हारसिंग याच्यावर उमाजीने अचानक छापा टाकला. त्याचे कारण होते की जव्हारसिंग आणि त्याचा मुलगा रामसिंग यांनी उमाजीचा सारखा पाठलाग केला होता. म्हणून त्यांच्या घरादाराची राख-रोंगोळी केली. रामसिंगाला पकडून डोंगरात नेले, आणि शेवटी रामसिंगाकडून मी यापुढे केव्हाही पून्हा तुमच्या वाटेस येणार नाही, तुम्हाला बिलकूल त्रास देणार नाही, तुमच्या कामात ढवळाढवळ करणार नाही अशी शपथ घेऊन त्यास सोडून दिले. उमाजीने जशास तसे धोरण ठेऊन त्याचा पाठलाग करणाऱ्या जव्हारसिंगाची फजिती केली.[२४]

उमाजीचा उपद्रव व धुमाकुळ सारखा वाढतच होता उमाजीने पटवर्धन, निंबाळकरसारख्या प्रतिष्ठीत सरदारांनाही सोडले नाही. त्यामुळे सरकार काळजीत पडले. उमाजीच्या बंदोबस्तासाठी पुणे येथे २८ ऑक्टोबर १८२६ रोजी इंग्रज अधिकाऱ्यांनी उमाजीस पकडण्याचे अधिकार कॅप्टन रॉबर्टसन यांना दिले. अगोदरचे घोडदळ, पोलीस यंत्रणा फार तोकडी असल्याने इंग्रजांनी शंभर, शंभराच्या पायदळाच्या व घोडदळाच्या दोन तुकडया तैनात केल्या. सासवड, पुरंदर, किकवी , जेजुरी, परिंचे येथे सैन्यबळ वाढवले. येथील उमाजीचा वावर असलेल्या विस्मृत प्रदेशात स्थानिक लोकांनाही कामे वाटून दिली. त्यांना लहानमोठी पदे व अधिकार ही दिले. त्याच बरोबर या सर्व यंत्रणेवर कॅप्टन मॅन्सफिल्ड सारख्या इंग्रजाचे नियंत्रण राहील याचीही कंपनी सरकारने काळजी घेतली.

इंग्रजांचा पहीला जाहिरनामा

उमाजीच्या बंदोबस्तासाठी सरकारने बंदोबस्त वाढवला होता. या वाढीव यंत्रणेलाही उमाजी दाद देत नाही, हे इंग्रजांच्या केव्हाच लक्षात आले होते परंतु हताश होऊन चालणार

नव्हते. त्यासाठी त्यांनी साम, दाम, दंड, भेद या नितींचा आधार घेण्याचे ठरवले, भारतीय माणूस प्रलोभनाला बळी पडतो याचा अनुभव त्यांनी कित्येक वेळा घेतला होता. म्हणूनच प्रलोभनाचे हत्यार इंग्रजांनी उपसले.

इ.स. १८२६ च्या २८ ऑक्टोबरमध्ये इंग्रज सरकारने दोन जाहीरनामे जाहीर केले. पैकी पहिल्या जाहीरनाम्याचा आशय असा होता की उमाजी व भुजाजी या दोघांना पकडून देणाऱ्यांना, दर आसामीस म्हणजे प्रत्येक व्यक्तीकरिता शंभर रुपये बक्षीस मिळणार होते. बंडवाले कोणत्या ठिकाणी आहेत, याची सविस्तर माहिती देणाऱ्यास ती माहिती पडताळून पाहूनच खरी आहे असे वाटल्यास योग्य बक्षीस मिळणार होते. तसेच उमाजीच्या बंडात सामील असलेला कोणता ही माणूस धरून दिल्यास प्रत्येक माणसामागे पन्नास रुपये बक्षीस मिळणार होते. दुसऱ्या एका जाहिरनाम्यात इंग्रजांनी जनतेला एक प्रकारे दम भरलेला होता. ते म्हणतात की बंडवाल्याविरुध्दच्या मोहिमेत रयतेने संपूर्णपणे इंग्रजास सहकार्य करावे तसे न केल्यास किंवा नाकारल्यास तुम्हाला बंडवाल्यांचेच साथीदार म्हणून ठार मारले जाईल.[२५] हे जाहीरनामे गावोगावी दवंडी देऊन वाचून दाखविले जात होते.

तथापि या जाहीरनाम्याचा फारसा उपयोग झाला नाही. कारण इंग्रज हे परकीय आहेत त्यांनी आपले राज्य हिरावले आहे. त्यामुळे त्यांचे विषयी कोणासच सहानुभूती नव्हती. उलट उमाजीचा धाक व त्याच्या बद्दल असलेली सामान्य जनतेची सहानुभूतीमुळे या जाहीरनाम्याचा काहीच उपयोग झाला नाही. उमाजी व भुजाजी यांना पकडण्यासाठी पुढे प्रत्येकी दहा हजारां पर्यन्त इनाम वाढत गेले तरीही त्याचा उपयोग झाला नाही.

वरील प्रमाणे दोन्ही उपायांचा उपयोग होत नाही हे जाणून इंग्रजांनी उमाजीस पकडण्यासाठी तिसरा मार्ग वापरला, तो म्हणजे उमाजीच्या टोळीतले काही सहकारी कैदेत होते. त्यापैकी काही लोक शिक्षा माफ करण्याच्या व बक्षीसांच्या अमिषाने, इंग्रजांना तसे शब्द देऊन इंग्रजांच्या बाजुने काम करीत असत. अशा लोकांपासूनच उमाजीस जास्त

धोका होता. कारण त्यांना उमाजीचे सर्व डावपेच, युध्दनिती, रस्ते, मार्ग व रहिवास माहिती होता.

जेजुरीची चकमक

कंपनीच्या शिपायांना उमाजी आपल्या धवपळीच्या आणि लपण्या छपण्याच्या तंत्रांनी बेजार करीत होता. इ.स. १८२५ च्या ऑक्टोबर मध्ये जेजुरीच्या डोंगरात असाच एक प्रसंग आला तेव्हा उमाजीने कंपनीचे बरेंच शिपाई मारले व इतर शिपायांना पळवून लावले. त्यांच्या बंदुका तलवारी घेऊन ती टोळी पुन्हा रानात शिरली.

रामोशांच्या दरोडेखोरीने व दंगलीने १८२५ व १८२६ मध्ये अति उच्च शिखर गाठले होते. ही दरोडेखोरी प्रामुख्याने पुणे जिल्हयातील पुरंदरच्या सिमेवरती व पंतसचिवांच्या प्रांतात जास्त प्रमाणात घडून येत होती. पोलिसांचे सर्व प्रयत्न रामोशांकडून हाणून पाडण्यात आले होते. म्हणून रामोशांना काबुत आणण्यासाठी सातारा प्रांतातील नेटिव्ह फौजेची मागणी करण्यात आली.[२६]

पुण्याचे कलेक्टर व मॅजिस्ट्रेट रॉबर्टसन यांनी ३१ ऑक्टोबर १८२६ मध्ये खालील २५ लोकांना पुणे जिल्हायात धुमाकुळ घातल्यास कडक शिक्षा ठोठावण्यात येईल अशा स्वरूपाचा जाहिरनामा काढला.

नाव	गाव
१) पांडू रामोशी	दिवे
२) अमृता रामोशी	दिवे
३) विठू रामोशी	दिवे
४) येसु रामोशी	राटवाडी
५) दाजी रामोशी	राटवाडी
६) मेंगू रामोशी	कोंढणपूर
७) म्हस्कू रामोशी	कोंढणपूर

८) गोदाजी रामोशी	राटवाडी
९) उमा रामोशी	देसरी
१०) कृष्णा रामोशी	देसरी
११) गुंगा रामोशी	देसरी
१२) केरू रामोशी	देसरी
१३) भैरू रामोशी	खाटमुरी
१४) गोदाजी	खाटमुरी
१५) गौतम रामोशी	कोरटी
१६) सगू रामोशी	कोरटी
१७) कैरी रामोशीन	भिवडी
१८) राणू रामोशी	कसबा सासवड
१९) कैरू रामोशी	भिवडी
२०) कृष्णा रामोशी	भिवडी
२१) उमाजी रामोशी	पुरंदर किल्ला
२२) विठू रामोशी	मांधूर
२३) पांडू रामोशी	पुरंदर किल्ला
२४) पिंगू रामोशी	पुरंदर किल्ला
२५) भुजाजी रामोशी	पुरंदर किल्ला [२७]

रामोशांच्या योजना व त्यांच्या कृती लक्षात आल्यावर सरकारने या रामोशांच्या बंडाचा बिमोड करण्यासाठी 'पुना हॉर्स' या तुकडीचे कमांडर कॅ. स्लीपर यांच्यावर जबाबदारी सोपवली. रामोशांच्या हालचालींवर देखरेख ठेवण्यासाठी व त्याच्या कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी आणि जनता, प्रवाशांना लुटमारीपासून संरक्षण देण्यासाठी

पोलिसांच्या लहान लहान तुकडया दुर्गम प्रदेशात ठेवण्यात आल्या होत्या. उमाजीने जेजुरीच्या पोलीस चौकीवर यावेळी रामोशांसह अचानक हल्ला केला. या हल्यात तीन पोलीस जखमी होऊन ठार झाले. त्यांच्या तलवारी ढाली व इतर हत्यारे उमाजीने नेऊन आपल्या सहका-यांना दिल्या. या घटनेमुळे सरकारने 'पुना हॉर्स' व पुणे जिल्हयाचे पोलीस यांना प्रत्येकी १०० जादा लोकांचा (सैनिकांचा) पुरवठा करून उमाजीला व त्याच्या साथीदारांना जाळयात पकडण्याचे प्रयत्न केले. [२८]

शिवनाक याचे प्रकरण

साकुर्डी येथील शिवनाक नावाचा एक महार स्वत:स बहादूर समजत असे. त्यावेळचे पुण्याचे कलेक्टर रॉबर्टसन यांना शिवनाक जाऊन भेटला व आपणास कंपनी सरकारने संरक्षण दिल्यास आपण उमाजीस धरून देऊ. मला उमाजीच्या सर्व लपण्याच्या जागा माहीत आहेत. उमाजीस पकडण्याची जबाबदारी आपल्यावर सोपवावी[२९] असे सांगितले. हा शिवनाक इ.स.१८२४ मध्ये पुण्यास पंत सचिवाच्या वाडया जवळ राहत होता. तो कंपनीच्या चाकरीत होता आणि सचिवाच्याही चाकरीत होता.[३०] रॉबर्टसनने शिवनाक महार व त्यांची दहा माणसे यांना नोकरीत घेऊन त्यांच्यावर उमाजीला पकडण्याची जबाबदारी दिली.

शिवनाकाने नोव्हेबर १८२५ मध्ये खंबाटकी घाटाजवळील सोळसे या गावी अचानक भुजाजीवर हल्ला केला. त्याच्याकडे थोडीच माणसे असल्याने तो पळाला पण त्याची बायका पोरे शिवनाकच्या हाती सापडली. या गोष्टीमुळे उमाजी व भोजाजी भयंकर चिडले. व त्यांना २२ नोव्हेंबर १८२५ रोजी परिंचे या गावी शिवनाकवर अचानक हल्ला केला. या हल्यात शिवनाकाचा एक सहकारी उदाजी महार ठार झाला. [३१] व नऊ जन जखमी झाले.

याच प्रसंगी मोका साधून शिवनाकच्या गुढघ्याला गोळी झाडून जखमी केले. तो विव्हळत पडलेला असतानाच उमाजीचा भाऊ कृष्णाजीने तलवारीने शिवनाकचे नाक

कापले व पायांवरही जखमा केल्या.[३२] थोडक्यात उमाजी नाईकास धरून देण्याचे चांगले बक्षीस मिळवण्याच्या फंदात पडलेला शिवनाकास उमाजी नाईकाने चांगलेच बक्षीस दिले.

बंडखोर उमाजीच्या सहयाद्रिच्या कुशीतील हालचाली

मार्च १८२७ मध्ये नीरेच्या दक्षिणेस बंडखोर उमाजीने एका धनाढ्य ब्राम्हण प्रवाशावर झडप घालून लुटले. त्यात त्यांना तीन हजारांचा माल मिळाला.[३३] ही शिकार साधल्यावर उमाजीची स्वारी त्याच्या टोळीसह पुणे जिल्हयातून निघून सहयाद्री पर्वताच्या पश्चिम घाटातील एका डोंगराच्या भयंकर दरीमध्ये जाऊन दडी देऊन बसली. या वेळेस उमाजीजवळ साठ जवान होते. त्या दरीत त्यांनी दोन महीने मजेत काढले. नंतर मे महिन्यात कोकणात उतरून बोरघाटाच्या पायथ्याशी मुंबई-पुणे रस्त्यावर येऊन राहिले. याच सुमारास काही व्यापारी लोक रेशमांचे कपडे रेशमी साडया व विणलेली कपडे घेऊन पुण्याकडे जात असताना त्यांना घाटात गाठून उमाजीने त्या कापडांचे गठ्ठे हस्तगत केले. त्यामुळे टोळीतील प्रत्येकजणाची बऱ्याच दिवसांची कपडयांची हौस झाली होती. गरज भागली होती.

पुन्हा याच प्रदेशात १० जून १८२७ रोजी पुण्याच्या पेढीवाल्यांचे लोक काही रक्कम घेऊन जात असताना त्यांना थांबवून त्यांच्याकडूनही ३१०० रुपये घेतले. वरील मिळकतींची तजविज लावायची असल्याने आणि बायका-मुलांनाही भेटायचे असल्याने मोहीम पुरी करून पुरंदरच्या डोंगरात येऊन दाखल झाले. [३४]

पुरंदरला परत आल्यावर उमाजीस असे दिसले की पुरंदरचे कोळी लोक कंपनी सरकाच्या नोकरीतही दाखल झाले होते. तेच कोळी लोक उमाजीस पकडून देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. याचा सुड घेण्यासाठी जून १८२७ रोजी त्यांच्या गावी हल्ला करून या चकमकीत कोळयांचा एकजण ठार झाला. व चार जण जखमी झाले होते. ही घटना चिव्हेवाडीस घडली. या नंतर मात्र उमाजी व त्याचे साथीदार कुटुबांच्या पालन पोषणसाठी व धान्याची सोय करण्यासाठी चार सहा जनांच्या टोळया करून निघून गेले. पुरंदर

परिसरातील काही लोक हे सतत उमाजीच्या पाळतीवर असल्याने, उमाजीस एका ठिकाणी जास्त दिवस राहता आले नाही. परिंचे गावी सरकारने उमाजीच्या बंदोबस्तासाठी व पकडण्यासाठी काही घोडेस्वार ठेवले होते. १ जुलै १८२७ रोजी उमाजी परिंचे गावाशेजारी तेरा आसामींसह राहिला असता सरकारचे घोडस्वारांनी त्यास पकडण्याचा प्रयत्न केला. उमाजीने प्रतिहल्ला व गोळी बार करून गावकऱ्यांपैकी एकास ठार केले. या प्रसंगी परिसरातील जे लोक उमाजी विरूद्ध होते, सरकारी लोकांना मदत करीत होते, त्यांचा शोध घेऊन उमाजीने त्यांची घरे जाळून टाकली.

किल्ले पुरंदर व आसपासच्या प्रदेशात उमाजीने धुमाकुळ घातला होता. पुरंदर तालुक्यातील गराडे गावी रामोशांनी जबरदस्तीने गावकऱ्यांकडून जेवन घेतले होते. ही बातमी जागोजी जगदाळे पाटलाने इंग्रज शिपायांना कळाल्यावर शिपायांनी उमाजीच्या टोळीवर हल्ला केला. यामध्ये कंपनीच्या माणसांपैकी एक ठार झाला. शिक्षा म्हणून जाता जाता उमाजीने जागोजी पाटलाच्या वाडयास आग लावली त्यात त्याची सुन व गुरे ढोरे यांसह सर्व वाडा भस्मसात झाला होता.[३५]

इंग्रजांना बातमी पुरवणाऱ्या किंवा प्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांना रामोशांनी ताकीदी दिल्या की इंग्रजांना कोणत्याही प्रकारची मदत करण्याऱ्याची गय केली जाणार नाही. त्यांची घरे ही राहणार नाहीत. सरकारच्या फौजेत नोकरीस असलेल्या भैरू रामोशाला साकुर्डी येथे २ जुलै १८२७ रोजी गावकऱ्यांसमोर उमाजीने ठार केले. या घटनेचा स्पष्ट अर्थ म्हणजे गावकऱ्यांनी व जातभाईनी तटस्थ रहावे, सरकारशी हात मिळवणी करु नये. अशा प्रकारची ती एक गर्भित धमकीच होती.[३६]

उमाजीचे प्रतीसरकार स्थापण्याचे प्रयत्न

गावाचा वसुल (शेतसारा) असेल तेवढी खंडणी त्या गावचे पाटील कुलकर्णी यांनी उमाजीकडे त्यांच्या माणसांमार्फत पोहचवली पाहिजे. गावचा वसूल आम्हाला न देता इंग्रजांना दिल्यास ते खपवून घेतले जाणार नाही. तसेच रामोशांना जेव्हा गरज असेल तेव्हा

अन्न, पाणी गावकऱ्यांनी पुरवावे. ही वसुली उमाजी बरोबर भुजाजी, पांडुजी व कृष्णाजी यांच्या नावेही होत होती. पुरंदर महालात (तालुक्यात) साडेसहा हजारांचे वसुली रोखे केले गेले. त्यापैकी पावने पाच हजार त्यांनी वसुली केली. प्रत्येक गावी वसुलीची पावतीही ते करून देत असत. जास्तीची पावती देऊन कमी वसूल घेणे तोही विनासायास व इंग्रजांच्या हाती सारा पडू न देणे हे धोरण इ. स. १८२७ पासून सुरू झाले. पाटील कुलकर्णी याच पावत्या इंग्रज अधिकाऱ्यांना दाखवून गयावया करुन शेतसारा माफ करुन घेत असे.

शेतसारा वसुल करणे हा फक्त सरकारचाच अधिकार असतो उमाजी हा सारा खंडणी स्वरूपात वसूल करू लागला ही इंग्रजांच्या दृष्टीने फार गंभीर अशी बाब होती. म्हणजेच उमाजी हा प्रति सरकार प्रमाणे जनतेवर अधिकार गाजवित होता. प्रारंभीच्या काळात उमाजीने वेगवेगळे जे दरोडे टाकले होते त्यामुळे इंग्रज त्यांना दरोडेखोर संबोधत होते, परंतु उमाजीने टाकलेले दरोडे हे पुढील क्रांतिकार्याची नांदी होती. तो एक प्रकारे क्रांतिकारकाचे प्रशिक्षणच घेत होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. म्हणूनच पुढे तो राजरोसपणे इंग्रजांच्या विरोधात खंडण्या वसूल करू लागला. या दृष्टीने तो एक बंडखोर क्रांतिकारक होता.

उमाजीची एवढी मजल जाईल, हे ब्रिटिशांनी स्वप्नातही बघीतले नव्हते. म्हणूनच इंग्रज सरकार खडबडून जागे झाले व उमाजीस पकडण्याचे व त्याचा बंदोबस्त करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

इंग्रजांचे उमाजीस पकडण्याचे प्रयत्न

इंग्रजांचे नियंत्रण केंद्र पुणे येथेच होते. तेथील कलेक्टर व त्याच्या हाताखालील घोडदळ, पायदळाच्या तुकडया, त्यांचे लष्करी अधिकारी यांच्यावर उमाजीस पकडण्याची फार मोठी जबाबदारी होती. परंतु तेवढयाने भागत नसल्यामुळे सर्व स्थानिक अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले. कित्येक अधिकारी हे कुचकामी ठरले होते. त्याच प्रमाणे ते आतून इंग्रजांशी संधान साधून होते. अशाच प्रकरणी पुरंदरच्या जवाहरसिंग या अधिकाऱ्यास

बडतर्फ केले.[३७] नंतर सप्टेंबर १८२७ मध्ये बळवंतराव कोळी याची नेमणूक झाली. त्यास हवी तेवढी माणसे हाताखाली घेण्याचा अधिकार दिला. त्यांचे पगार व खर्च कंपनी सरकार करीत होते. त्याला सुध्दा महिना दीड महिना काहीच करता आले नाही तेव्हा त्याचे अधिकार पुरंदरच्या मामलेदाराने घ्यावेत असे स्पष्ट सांगण्यात आले.

१६ ऑक्टोबर १८२७ मध्ये सरकारने तमाम जनता व रयतेस ताकिद दिली की बळवंतराव कोळी यास बंडाचे बंदोबस्ताकरिता पाठवित आहोत. त्यास जो कोणी आपले खुशीने हत्यार घेऊन मदतीस जाऊन लढाईच्या वेळेस मदत करीन त्यास एक महिन्याचा पगार रुपये६ व बंडवाल्यांची जी लुट मिळेल ती दिली जाईल. जखमी झाला किंवा ठार झाला तरी (घरातील) लोकांना बक्षीस मिळेल.[३८]

त्याच प्रमाणे पुरंदरच्या परिसरात सैन्य बल वाढविले त्यानुसार गावे व चौक्यांची संख्या पुढीलप्रमाणे

१) जेजूरी	२८
२) कीकवी	२८
३) सासवड	३६
४) भीवरी	२४
५) परींचे	३६
एकुण	१५२

१५२ चौक्या बंडाचे बंदोबस्तासाठी ठेवल्या.[३९] त्याचप्रमाणे बावडे, इंदापूर, भिमथडी, दौंड-बारामती, खेड (राजगुरूनगर) मावळ, पाबळ, शिवनेरी, कोकण, सोलापूर, मोहळ याही प्रदेशात चौक्या वसविल्या. एवढा मोठा बंदोबस्त वाढविला होता की उमाजीस या प्रदेशात हालचाल करणे कठीण झाले होते.

नोव्हेंबर १८२७ मध्ये कॅप्टन डेव्हिस यांची पुरंदरची बंडाळी मोडण्याच्या कामी सर्वाधिकारी म्हणून नेमणूक झाली. तसेच विभागवार एक एक अधिकारी नेमला

होता.बंडाचा कोणत्याही प्रकारे बंदोबस्त करणे त्यांना अत्यंत गरजेचे वाटू लागले. सर्व सामान्य जनता बंडाच्या बाजुने झुकू नये, व बंडाच्या ठिणगीचा वणवा होऊ नये, यासाठी इंग्रजांचे अथक प्रयत्न चालू होते. कंपनी सरकारने त्यांना पकडून देण्याबद्दल खालील इनामे लावून सर्व भांगात जाहीरनामा प्रसिध्द केला.

दुसरा जाहीरनामा : (ता. ८ ऑगस्ट १८२७)

या जाहीरनाम्यात उमाजीसह सहा रामोशी नेत्यांची नावे व बक्षिक्षे ठेवलेली होती.

	रामोशी नेत्याची नावे	बक्षिसे
१	उमाजी नाईक	१२०० रुपये
२	कृष्णाजी नाईक	१००० रुपये
३	पांडोजी नाईक	८०० रुपये
४	पदोजी नाईक	५०० रुपये
५	भवानी नाईक	२०० रुपये
६	भूजाजी नाईक	२०० रुपये

हा जाहिरनामा पुण्याचे कलेक्टर व मॅजिस्ट्रेट यांनी तयार केला होता.हया जाहीरनाम्याच्या प्रति दक्षिण कोकणातील मॅजिस्ट्रेटना व सातारा येथील रेसिडेंन्टना पाठवण्यात आला. वरील व्यक्तिंना पकडून दिल्यास ती बक्षिसाची रक्कम त्वरीत दिली जाईल असे ही घोषित केले. [४०]

सप्टेबर १८२७ मध्ये उमाजीने कृष्णाजीस कोल्हापूरला छत्रपती संभाजी यांचेकडे पाठविले. छत्रपतींच्या सहाय्याने एकदम सर्व ठिकाणी दंगा उसळून दयावा त्यामुळे कंपनी सरकार त्रासून जाऊन आपणास (रामोशांना) चांगल्या सवलती देतील. या संदर्भात त्याने महाराजांशी चर्चा केली. महाराजांनी त्यांना शेला पागोटे देऊन त्यांचा सत्कार केला. परंतु सर्व प्रांतात दंगा उसळून दयायची योजना बारगळली. परंतु उमाजीने स्वतःच्या हिमतीने सरकार विरूध्द लढण्याचे धोरण या वेळी ठेवले.[४१] युरोपियन लोकांमध्ये सुध्दा रामोशांवर

अन्याय झालेला आहे म्हणूनच ते भडकून उठले आहेत असा समज प्रचलित होऊ लागला होता. आणि हे भाकीत काही अंशी पुढे खरे सुध्दा ठरले. उमाजीने स्वत:च्या नेत्रृत्वाखाली राजा प्रमाणे खंडचिठया पाठविण्यास सुरूवात केली.[४२]

खंडचिठ्या

उमाजी व भोजाजी नाईकांनी नंतर खंडचिठ्ठया पाठविण्याचे नविनच तंत्र आत्मसात केले होते. निरनिराळया गावांना खंडचिठ्ठया पाठवून ते पैसा गोळा करू लागले. प्रत्येक गावच्या पाटलांकडे खंडचिठया पाठवून त्यांच्याकडून गावांच्या तर्फेने जबरदस्तीने खंडणी वसुल करून लोकांना त्रास देण्याची त्याने नविनच पध्दत अंमलात आणली. खंड न दिला तर डोक्यावर व पाठीवर मोठमोठे दगड देऊन उन्हात उभे रहावे लागेल. घरांची लुट होईल, त्यांना आगी लावून देण्यात येतील, जो कोणी याबाबत गावात बोभाटा करील, त्यास ठार मारण्यात येईल. जो कोणी आपखुशीने खंड देणार नाही त्याच्याकडुन तो जबरदस्तीने, आणि त्याचे वाटेल तितके हालहाल करून घेतला जाईल. त्या संबंधात कोणत्याही प्रकारची दया, माया, दाखविता येणार नाही हे पक्के लक्षात ठेवावे.[४३] अशा तऱ्हेची धमकी किंवा हुकुम खंडचिठ्ठया गावकऱ्यांना दिला होता.

सासवड हे त्यावेळी त्या प्रदेशाचे मुख्य ठाणे होते. उमाजीने या सासवडच्या पाटलास सुध्दा तीन वेळा खंडचिठ्ठया पाठविल्या होत्या. त्या खंड चिठ्ठीचा नमुना असा होता.

मेहरबान उमाजी नाईक आणि भोजाजी नाईक रा.किल्ले पुरंदर यांच्या छावणीतून सासवडचे मुख्य आंमलदार परगणे सासवड यांस सुरूसन १२३६ फसली जाहिर व्हावे ऐसाजे.

आपल्या सासवड गावावर सहा हजार रु. खंड ठरविण्यात आला आहे. तो खंड चिठठी देखत जलदान गोळा करून अनामत ठेवावा, सुभ्याला किंवा मामलेदाराला तुम्ही वसुल मुळी सुध्दा देऊ नये. सदर्हु पैकी जर एक पैसा तुम्ही कंपनीच्या अंमलदारास दिलात

तर तुम्हा गावकऱ्यांना फार कडक शासन आमच्याकडून करण्यात येईल. तेथील घरे राखरांगोळी करून टाकू. आपला गाव बेचीराख केल्याशिवाय आम्ही राहणार नाही. याची खूप याद ठेवावी. या करिता खंडाचा पैसा ताबडतोब गोळा करून तयार ठेवावा हे सर्वांस जाहीर व्हावे.[४४] मेहरबान स्वारी राजेश्री भोजाजी नाईक किल्ले पुरंदर यांचे कडून :खालील गावांनी ताबडतोब खंडणी गोळा करून आमच्याकडे भरावी.

१) मौजे कोंढवा - ५० रु.

२) मौजे मोस्टी - ५० रु.

३) मौजे जोगेवाडी - १० रु

४) मौजे जगताप भोवडी - ५० रु.

५) मोजे दालेवाडी - २० रु.

६) मौजे कोटी - ५० रु

७) मौजे आंबेबुवरी - २५रु

८) मौजे आंबे खुर्द - ५० रु.

९) मौजे पांडेश्वर - ५० रु.

१०) मोजे जवळाजुन - २५रु.

११) मौजे नागिरी बुजुरी - ५० रु (सुपे परगाना).

१२) मौजे सुपा खुर्द - ५०रु.

एकुण ४८० रुपये

एकूण १२ गावे व त्यांनी ४८० रुपये लवकरात लवकर दिले पाहिजेत. जर पैसे लवकर दिले नाहीत, तर गावची राखरांगोळी करण्यात येईल.[४५] अशी सक्त ताकीद देण्यात आली. या पध्दतीने दडपशाही दाखवून उमाजी व भोजाजी नाईकांनी पुणे जिल्हयाच्या दक्षिण भागातील गावांकडून १३७८४ रुपयांची मागणी केली. परंतु त्यांना ५००० रुपयांपेक्षा जास्त खंडणी मिळाली नाही.

२२ नोव्हेबर १८२७ रोजी खेडेबरे परगण्यातील शिवरी गावच्या पाटलांनी कॅ. रॉबर्टसन यांना कळविले की आमच्याकडे उमाजी नाईकाने २५० रुपयांच्या खंडणीची मागणी केली होती. जर खंडणी दिली नाहीतर तुमच्या गावावरून गाढवाचा नांगर फिरवला जाईल अशी धमकी दिली. त्यामुळे आम्ही भिती पोटी त्यास १२५ रुपये दिले आहेत. तरी आपण (सरकार) महसुलातून १२५ रू. कमी करावेत अशी मी आपणास विनंती करतो.[४६]

उमाजी नाईकांप्रमाणे त्याचा सिंहगड येथील सहकारी, येसाजी नाईक निकारी यांनी सिंहगड परिसरातील ८ गावांमधून ५६, मावळ सुभ्यातील गावांतून व ४ खोडबेरे परगण्यातील गावाकडून खंडणी वसुल केली. [४७]

रामोशांच्या कारवाईने उच्चांक गाठला म्हणून कंपनी सरकार चिंताग्रस्त होते. पुण्याचे मॅजिस्ट्रेटला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, रामोशांच्या बंडातील कृती व त्यांचे परिणाम यामुळे शासनाची प्रतिष्ठा व प्रसिद्धी यावर वाईट परिणाम होतील.[४८] पुरेशे संरक्षण देण्यासाठी सरकारने जय्यत तयारी आखली ही होती पुना हॉर्स व जिल्हा पोलिस ईन्फट्रीच्या प्रत्येकी १०० सैनिकांच्या तुकडयाही पाठवण्यात आल्या. परंतु रामोशांच्या हालचालीवर किंचितही परिणाम होत नाही, रामोशांचा हालचालीचे वर्णन करतांना मि. मिलिट म्हणतात. रामोशांची टोळी समुद्रातील लाटाप्रमाणे हल्ला करते. [४९]

२२ नोव्हेबर १८२७ रोजी कॅप्टन रॉबर्टसन ने १० कलमी जाहिरनामा प्रसिध्द केला. त्यानुसार जे रामोशी बंडाबद्दल प्रत्यक्ष मदत किंवा माहिती सरकारला पुरवित असतील त्यांना सरकार सैनिकांच्या तुकडीची मदत देईल. जर स्वत:चीच बंडाळी मोडून काढण्याची तयारी असेल तर त्या व्यक्तिला किंवा त्या समुहाला चार चाहुर जमीन इनाम दिली जाईल. त्याचे स्वरूप अनुदानासारखे असल्याने कंपनी सरकार त्याबद्दल कोणताही मोबदला घेणार नाही. बंडाळी मोडून काढण्याबद्दल त्यांना काही रकमाही देण्यात येईल. त्याप्रमाणे कॅप्टन डेव्हिस यांच्याकडे काही बक्षिसांची योजना दिली व त्याव्दारे बंडाची माहिती पुरवण्याचे जनतेला आवाहन केले.[५०]

बंडातील रामोशांच्या नाईकांकडे कंपनी सरकारने योजना मांडली की त्यांचे जे प्रमुख नेते आहेत त्यांनी पूर्णपणे बंडाळी पासून परावृत्त व्हावे, सरकार त्यांचे शत्रू नसून त्यांनी दऱ्या खोऱ्यांत वास्तव्य न करता खेडयांमध्ये येऊन वास्तव्य करावे. सरकार त्यांच्या पुनर्वसनासाठी मदत देण्यास तयार आहे. परंतु कॅ. रॉबर्टसनला असे आढळून आले की रामोशांना त्यांच्या बायका व त्यांचे भाऊ यांचेकडून सरकारच्या हालचाली विषयी विशेष अशा सूचना मिळतात. तसेच त्यांच्या नातेवाईकांकडून अन्न धान्य सुध्दा रामोशांना पुरविले जाते. समाजातील काही कुणबी सुध्दा रामोशांच्या गरजेसाठी धान्याचा पुरवठा करतात. तेव्हा जे लोक रामोशांना अप्रत्यक्ष मदत करीत असतील त्यांना शिक्षा करण्याचे ठरविले.[५१]

पुरंदर येथील रामोशांचे बंड जनतेच्या मतानुसार एक राजकीय प्रवाह असून तो भारतातील कंपनी सरकारच्या विरूध्द म्हणजेच इंग्लंडच्या राजाविरूध्द आहे. यात काही लोक सतत कार्यमग्न असून ते कंपनी सरकारचे गुप्त शत्रूच आहेत. ते पुणे व वाई याच परिसरात राहतात. त्यांची जनतेवर पूर्ण पकड आहे. तसेच पुरंदर बंडाचे आगळे वैशिष्टे म्हणजे कोल्हापूरच्या राजाकडून सहकार्य मिळते. तो ब्राम्हणांना दक्षिणा व निधी देऊन सरकारच्या विरोधात फळी निर्माण करतो. विशेषत: वाई येथील ब्राम्हणांची या कामात मदत होते. आणि म्हणूनच या बंडाला राजकीय दृष्ट्या अतिशय महत्वाचे स्थान आहे. असे मत रॉबर्टसनने व्यक्त केले होते.[५२]

उमाजीला पकडण्यासाठी जशी माणसे टपलेली होती तशी त्याच्या जीवाला जीव देणारी माणसेही होती. एवढेच नव्हे तर गावोगावचे पाटील, कुलकर्णी ही अनेक बाबतीत त्याच्याशी हातमिळवणी करीत होते. उमाजीचा धाक, दडपशाही तसेच त्याच्या इंग्रजांविरोधी धोरणाचाही प्रभाव पडत होता. इंग्रजांचे लोक मागावर असताना जवळच कंपनीच्या शिपायांचा तळ असतांनाही उमाजी खंडण्या वसूल करीत होता असे असतानाही कोणत्याही इसमाने कंपनीच्या तळावर बातमी पोहचवली असती, तर, उमाजी पकडला

गेला असता. आणि तो इसम बक्षिसास पात्र ठरला असता. परंतु असे कोठेही घडले नाही याचाच अर्थ उमाजी इंग्रजांच्या विरोधात जनतेच्या जवळ येत चालला होता.

उमाजी राजांचा दरबार

उमाजी नाईक स्वत:स स्वयं घोषित राजाच म्हणू लागला. लोक त्यांना राजाप्रमाणे मान देत ही बाब कॅ. डेव्हिसने ता. २७ नोव्हेंबर सन १८२७ ला कॅ. रॉबर्टसन यास लिलिलेल्या पत्रामधून स्पष्ट होते. त्याच्या माहितीप्रमाणे पांगरी पासून एका मैलावरच्या एका ठिकाणी रामोशी लोक एकत्र जमत आणि तेथे उमाजी राजा म्हणून बसायचा ती एक डोंगर कपार होती. रामोशांनी त्या ठिकाणी शक्य तेवढा राजदरबारी थाट आणलेला असायचा, त्यावेळी उमाजी बरोबर सुमारे ऐंशी माणसे असुन त्यांत रामोशांप्रमाणे मुसलमान, परदेशी व कुणबीही होते. कॅ. डेव्हिसला ज्या दिवसाच्या दरबाराची माहिती मिळाली होती त्या दिवशी तेथील खेडूतांनी रामोशांना अन्न आणून दिले होते. त्यात विष प्रयोगाचा काही दगा फटका नाही ना ह्याची उमाजीने खात्री करून घेतली होती. त्या दरबारातच इंग्रजांना कोणीही महसुल दयायचा नाही, आम्हालाच दयायचा असा उमाजीने राजा या अधिकारात सक्त हुकुमही सोडला होता.[५३]

उमाजीच्या स्वयं घोषित राजे या पदाचा अर्थ असा की उमाजीने गावोगावी खंडण्या वसूल करण्याच्या निमिताने प्रतिसरकारच स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता. त्याला इंग्रजांची सत्ता उखडून आपली स्वत:ची सत्ता आणायची होती. खऱ्या अर्थाने इथे एक धाडशी क्रांतिकारकाचा जबरदस्त आत्मविश्वास दिसतो.

झुमखळ

उमाजीचा झुमखळ हाच दरबार होता. त्यांच्या माहितीप्रमाणे पांगारे गावापासून एक मैलाच्या भातमळवाडी येथील डोंगरातील दरीमध्ये कपार आहे. तेथे बारमाही झरा असून उंच टेकडयांवर चारही बाजूस पहारेकरी ठेवलेले असत. या दरीस झुमखळ म्हणत. त्यामध्ये असलेल्या मोठया दगड सिंहासन म्हणूनच त्यावर ते बसत. भोजाजी हा प्रधान

होता, कुसाजी सेनापती. त्यांचे निशान म्हणजे शिवाजी महाराजांचे जरीपटका हे होते. तेथे सर्व रामोशी एकत्र जमत. तेथे थोडया उंच दगडावर उमाजी राजा म्हणून बसायचा. रामोशांनी त्या ठिकाणी शक्य तेवढा दरबारी थाट आणलेला असायचा. उमाजीस नजराने व भेटवस्तू दिल्या जात तर उमाजी राजाच्या थाटात आज्ञा व हुकूम सोडत असे. ब्रिटिश सरकार विरूध्द कशी पावले उचलावीत यासंबंधी तेथे निर्णय घेतले जात. या वेळी एका व्यक्तिस ब्रिटिश धार्जीना म्हणून ठार मारण्यात आले होते.

पुण्याचे कलेक्टर मैजिस्ट्रेर कॅ. रॉबर्टसन म्हणतात रामोशी बंडाचे विशेष वैशिष्टये असे की, त्यांनी गावकऱ्यांना विनाकारण वाईट वागणूक दिली नाही. परंतु क्वचित प्रसंगी इंग्रजांकडे झुकलेल्या लोकांना शिक्षा केल्या. इंग्रजांचा प्रभाव कमी करणे या बाबतीत उमाजीची योजना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विजापूर व मोगल यांच्या संबंधाशी मिळत्या जुळत्या होत्या.[५४] इंग्रजांशी राजनिष्ठा दाखविण्याऱ्या लोकांना हे बंडखोर रामोशी कडक शासन करीत . परंतु ते इतरांना चांगले वागवीत होते. उमाजी व त्याचे सहकारी हीन (कनिष्ट) जमातीतील असले तरी त्यांनी कधीही स्त्रियांवर हात टाकला नाही.[५५]

उमाजीने अनेक लहान लहान टोळया केल्या होत्या. सर्व टोळयांची कार्य पध्दती साधारणत: सारखीच होती. त्यांचे कार्यक्षेत्र कायमस्वरूपी तेच नव्हते. प्रमुख नाईकांचे कार्यक्षेत्र पुढील प्रमाणे होते. एकमेकांशी संपर्क, दळणवळण, इंग्रजांच्या बातम्या इत्यादी कामासाठी त्यांनी हेर खातेही निर्माण केले होते. त्यातील प्रमुख हेर व त्यांचे विभाग पुढीलप्रमाणे

	नायक	प्रमुख कामे व विभाग
१	उमाजी राजे	रणनिती ठरवणे, न्यायदान करणे
२	कृष्णाजी	इतर राजांशी संबंध व पत्र व्यवहार
३	येसाजी (निखारी)	जेजुरीच्या तुकडीचा प्रमुख
४	पांडोजी	भोरच्या तुकडीचा प्रमुख

५	विठोजी	पुण्याच्या तुकडीचा प्रमुख
६	भोजाजी	सिंहगडच्या तुकडीचा प्रमुख
७	पदोजी (छोटा पांडु)	शिवनेरीच्या तुकडीचा प्रमुख
८	बापू सोळसकर	महाबळेश्वर तुकडीचा प्रमुख
९	शामराव काळे (कोळी)	कुलाबा (रायगड)च्या तुकडीचा प्रमुख
१०	आबजी नाईक	कल्याणच्या तुकडीचा प्रमुख
११	काळुजी चव्हाण	सासुर -सासवडच्या तुकडीचा प्रमुख
१२	सगनभाऊ हेरकरी	पनवेल
१३	पिराजी जाधव	शिराळा (सांगली)
१४	नागोजी माने	वाळवा (सांगली)
१५	लक्ष्मणजी नाईक सिंदुर	जत (सांगली)

प्रमुख गुप्तहेरांच्या नेमणूका केल्या होत्या ते गुप्तहेर व त्यांचे विभाग

क्र.	हेर	विभाग
१	रामजी कावजी पाटील	पनवेल (मुळगांव उमरज, ता-बार्शी , जि-सोलापूर
२	हणमंता गुणाजी मराठा	कासापूर
३	शिवनाक महार	सासवड पुणे, (पकडल्यावर कैदेत असताना तो इंग्रजांना मिळाला.)
४	सुभेदार महंमद	पुणे
५	तिसमारे वाघ्या	जेजुरी
६	गुमानसिंग	चिंचवली
७	धरमाजी	गुणोली बालेघाट

८	गोविंदा	कांबाळी बोलघाट
९	महादेव धनगर	माणदेश
१०	नरसोजी नाईक	जत

वरील प्रमाणे होते [५६]

फलटणच्या दक्षिणेकडील आजचे दहिवडी वगैरे भागास पूर्वी माणदेश म्हणत. या भागात म्हासुर्णे गावच्या ब्राम्हण इनामदाराच्या वाडयावर बजाजीने छापा टाकून बरेच सोने व रोकड इ. मालमत्ता मिळवली तर जतचा क्रांतिकारक लक्ष्मण नाईक (सिंदूर लक्ष्मण) याने बिळूर येथील मनोहर कुलकर्णी यांच्यावर छापा टाकून तेथील धान्याची पोती गोर गरिबांना वाटली. अशा कामांमुळै उमाजी व त्याचे सहकारी जनतेत प्रिय झाले होते. लक्ष्मण यास वतनदार व्यंकप्या नाईक याने बंदूक बक्षीस दिली होती. लक्ष्मणला पकडण्यास आलेल्या इंग्रज अधिकाऱ्याचे शिर कापून त्याने गावच्या वेशिवर टांगले होते. त्यामुळे इंग्रज सरकार चिडले व त्यांनी लक्ष्मणास पकडण्यासाठी मोठे ईनाम जाहीर केले होते.

अशा प्रकारे उमाजीच्या नेत्रृत्वाखाली पिवळया झेंडयाखाली पुणे, सातारा, सोलापूर, ठाणे, रायगड, (कुलाबा) नगर, विजापूर एवढया मोठया प्रदेशात त्यांच्या गट प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली धुमाकुळ घातला होता. वेगवेगळया प्रांतातले हेर अचुक बातम्या आणत होते. या काळात उमाजी रामोशांमध्ये व जनतेमध्ये लोकप्रिय झाला होता. अनेक संस्थानिक त्यांच्याकडे आशेने पाहात होते.

इंग्रजांच्या वाढत्या चिंता व प्रयत्नांची वेगळी दिशा

एवढया मोठया बंदोबस्ताचा व जाहीरनाम्यांचा फारसा उपयोग होत नाही हे पाहिल्यावर इंग्रजांनी एक नवीनच मार्ग आंमलात आणला. तो म्हणजे रामोशांविरुध्द रामोशांचाच उपयोग करायचा. कंपनीच्या नोकरीत बरेच रामोशी लोक होते परंतु त्यांच्यावर कधी कोणती कामगिरी सोपवली नाही. किंवा कोणते अधिकार दिले नाहीत.

आता या निराळया मार्गासाठी प्रथम यवतच्या राणोजी फिरंगोजी नाईक या रामोशावर २२ नोव्हेबर १८२७ ला उमाजी व त्यांच्या सहकाऱ्यांना पकडण्याची जबाबदारी टाकण्यात आली.[५७] व जबाबदारी पार पाडल्यावर त्यास चार चाहुर जमीन इनाम व इतर जाहीर झालेली बक्षिसे मिळणार होती . भोर तालुक्यातील रोहिडयाच्या आप्पा नाईक या रामोशावर कामगिरी सोपविली पण त्याचे हातून काहीही झाले नाही. त्यानंतर हवेली तालुक्याचा मामलेदार विष्णू रामचंद्र हा एक चांगला कार्यक्षम व कर्तबगार अधिकारी होता. तेव्हा त्याची या कामी नेमणूक झाली. त्याने दुटप्पीपणा व हलगर्जीरपणा केला नाही. परंतु कंपनी सरकारला त्याचा कोणताही भरीव उपयोग झाला नाही.[५८]

उमाजी स्वतंत्र सत्ताधिशासारखाच वागत होता आणि काही लोकही त्याकडे त्या दृष्टीने पाहू लागले होते. तो दक्षिणा व दान देत होता. आणि भट भिक्षुक देवांचे पुजारी आणि गोर गरीब लोक ती स्विकारीत होते. तो एखाद्या सार्वभौम सत्ताधिशाच्या थाटातच जाहीरनामे काढून हुकूम फर्मावित होता आणि कित्येकांना त्याचे कौतूक वाटत होते. इस्ट इंडिया कंपनीने पेशवे, शिंदे, होळकरांसारख्या बडयांना लोळविले असेल. पण डोंगर दऱ्यातून हिंडणाऱ्या आणि चारी दिशांनी इंग्रजांना सतावणाऱ्या रामोशांचा बंदोबस्त त्या कंपनी सरकारला करता येणार नाही. यामध्ये रामोशी जिंकणार आणि त्यांच्यापासुन स्फुर्ती घेऊन इतरही ब्रिटिशांविरोधात पेटून उठणार, व परिणामी कंपनीची सत्ता संपणार असे सर्रास बोलले जाऊ लागले होते.[५९]

कंपनी सकरकारच्या राज्याचा हा प्रारंभ काळा होता व या प्रारंभ काळीच जनतेत असुरक्षिततेची भावना प्रबळ होती. राज्याच्या स्थैर्याच्या दृष्टीने धोक्याचे होते एवढेच नाही तर रामोशांचा पुंडावा फारच बोकाळला तर इंग्रजांच्या हातात आलेली सत्ता हिराऊन घेतली जाण्याचे शक्यता नाकारता येत नव्हती. तेव्हा रामोशांचा बंदोबस्त करणे इंग्रजांना भागच होते . पहिल्यांदा जे अधिकारी नेमले होते त्यांच्याकडुन रामोशांचा बंदोस्त पूर्ण होऊ शकला नाही. याचे कारण एक तर मणुष्यबळाचा तुटवडा व दुसरे म्हणजे रामोशांना

असलेला लोकाश्रय, लष्कराच्या हालचालीची बातमी रामोशांना आगोदरच मिळत असे. इतकेच काय तर रामोशांच्या भाकरीचा पुरवठा व वेळ पडल्यास घरादारांचा आश्रय सर्रास मिळत असे. याच गोष्टींना पायबंद घालण्यासाठी २६ नोव्हेंबर १८२७ रोजी पुरंदर परगण्यातील व हवेली तालुक्याच्या काही भागातील गावच्या पाटील, कुलकर्णी तसेच ज्या गावांवर बंडाचा परिणाम झाला आहे. त्या सर्वांना गराडे गावात हजर राहण्यास कॅ. रॉबट्र्सनने सांगितले.[६०]

तुम्ही बंडाला दिलेल्या या सहकार्यामुळेच बंडाची तिव्रता वाढणे शक्य झाले असे रॉबर्टसन ने पाटील, कुलकर्णी यांना पहिल्यांदाच सांगितले. 'तुम्ही बंडाला पाठिंबा देणार की बंड दडपून टाकण्यासाठी सरकाला मदत करणार? तसेच रॉबर्टसनने पुढील प्रश्न विचारले.

''हे आता स्पष्टझाले आहे की तुम्ही पाटील, कुलकर्णी व इतर रामोशी बंडवाल्यांना अन्न,निवारा, पैसे व माहिती पुरविता, त्यांचे हुकुम मानता व त्यांचा प्रसार गावोगावी पत्रके वाटून करता, आणि सरकारी अधिकाऱ्यांना बंडा विषयी माहिती देत नाही. जेव्हा सरकारी अधिकारी शोधासाठी येतात तेव्हा तुम्ही चुकीची माहिती पुरविता व पर्यायाने बंडास अप्रत्यक्ष मदत करता याचा परिणाम असाकी बंड डोईजड होत चालले आहे. म्हणून या पुढे आम्हाला कोणतातरी एक पर्याय निवडावा लागणार आहे.''

''तुम्ही बंडखोरांना माहिती, अन्न पुरविणार आहात की, सरकाला त्यांच्या हालचालीचीं माहिती पुरविणार आहात?'' अन्यथा तुमचे वतनी हक्क काढून घेतले जातील तुम्हास कैद करून शिक्षा ठोठावली जाईल, तेव्हा तुम्ही सर्व गावातील पाटील, कुलकर्णी व इतर रामोशी यांनी दरोडयाची व बंडवाल्यांची माहिती सरकारला त्वरीत कळवावी. प्रत्येक गावाने या बंडखोरांच्या टोळया विरुध्द स्वत:ची शक्ती वापरली पाहिजे. यासाठी सरकार सदैव तुमच्या सहाय्यास धाऊन येईल.[६१]

रॉबर्टसनच्या प्रश्नांना उत्तर देतांना २८/११/१८२७ रोजी पाटील, कुलकर्णी लेखी म्हणतात "आम्ही ब्रिटिश शासनाशी आज्ञाधारक आहोत. सरकारच्या इच्छे विरूध्द वागण्याची आमची इच्छा नाही. बंडखोरांना आम्ही अन्न,निवारा, पैसा आणि आजुबाजुंच्या खेडयातील सरकारी सैन्याची माहीती पुरविणार नाही. आम्ही सरकारी सैन्यास मदत करू परंतु बंडखोरांच्या टोळीपासून आम्हाला कोणताही त्रास होणार नाही. याची सरकारने ग्वाही दयावी .[६२]

तसेच पाटील, कुलकर्णी व रामोशी रखवालदार आणि इनामी व संरजामी गांवकऱ्यांनी आपल्या चार मागण्या कंपनी सरकारकडे (रॉबर्टसनकडे) मागितल्या.

१) आम्ही बंडाला पैसे , अन्न वगैरे सरकारच्या इच्छे विरूध्द काहीच देणार नाही. परंतु जर आमची घरे जाळली, हानमार केली किंवा ठार मारले तर आम्हाला संरक्षण व नुकसान भरपाई देण्याचे सरकारने कबुल करावे.

२) आम्ही सरकारला विनंती करतो की १००० सैनिक या भागातील वेग वेगळया ठिकाणी मदतीस ठेवावे. म्हणजे येथील जनतेत बंडाची माहिती पुरविण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होईल. त्यामुळे बंडखोर भितीपोटी शांत राहतील.

३) आम्ही बंडाची माहिती शेजारील सैनिकांना वेळोवेळी कळवूच परंतु सैनिकांच्या टोळया येईपर्यत जर बंडखोर पळून गेले तर त्याचा दोष आमच्यावर नसावा.

४) आम्ही सरकारशी आज्ञाधारक राहुन आम्ही आमच्या कामापासून विचलीत होणार नाही.[६३]

यावर रॉबर्टसनने तीन तोंडी अस्वासने दिली ती त्याच्या कारकुनाने लिहिलेली आहेत.

१) जो कोणी सरकारी सेवा करीत असताना जखमी झाला. किंवा मरण पावला तर त्याच्या विधवा पत्निला सरकार निवृत्ती वेतन किंवा इनाम जमीन देईल.

२) सर्व काही मदत सरकारच्या अधिकाराने दिली जाईल याचे उदाहरण बळवंराव (कोळी प्रमुख) यांस घोडा गाडी व अनेक माणसे दिली. बंडाचा बिमोड करण्यासाठी सरकारने दिली आहेत.

३) सरकारी सेवेंतील कोणत्याही व्यक्तिला चुकीची माहिती दिली या संशयावरून त्रास दिला जाणार नाही.

पाटील कुलकर्णी यांच्या विनंतीनुसार पुरंदर परगण्याची शांततेची व्यवस्था ठेवण्यासाठी व जनतेला बंडापासून त्रास होऊ नये म्हणून विष्णु रामचंद्र या अधिकाऱ्यास कॅप्टन रॉबर्टसनने नियुक्त केले.[६४] रॉबर्टसननने याच पध्दतीच्या दोन योजनांचा अवलंब सातारा येथील पाटील, कुलकर्णी व रामोशी, रखवालदार याने करावा म्हणून सातारा येथील रेसिडेंटला कळविण्यात आले. ही योजना सातारचा राजा व पंत सचिव यांच्या मार्फत व त्यांच्या सहकार्याने करावी असे ही नमूद करण्यात आले.[६५] सरकारची सर्व व्यवस्था कुचकामी ठरत असतानाच उमाजी व भोजाजी नाईकांनी कॅ.रॉबर्टसन यांना जे पत्र पाठवले ते असे.

उमाजी व भोजाजी नाईकाचे कॅ.रॉबर्ससनला पत्र

आम्ही अमृता बंडा व विनोबा ब्राम्हण यांना आपल्याकडे बोलणी करण्या करिता पाठवित आहोत. तरी सातारचा राजा पेशवा यांनी आम्हास नेमणूका दिल्या होत्या व त्याप्रमाणे आमचे हक्क आतापर्यंत चालू आहेत, व तेच जर आमच्याकडे पुर्ववत चालू राहतील तरच आमची कलमे (हक्क) आमच्याकडे पाठवावीत. ती जर नाही पाठवली तर आजचे बंड एकाच ठिकाणीदिसते आहे अशी हजार बंडे उभी राहतील व सातपुडयापासून परशुरामापर्यन्त त्यांचा फैलाव होईल आणि सारा देश उजाड होईल.[६६](परशुराम दक्षिण कोकणातले एक तीर्थाचे गाव, सातपुडाते परशुराम म्हणजे पुर्ण महाराष्ट्र) असे उमाजी ठणकाऊन सांगतो.

म्हणजेच इतर लहान मोठ्या वतनदारांची व सत्ताधिशांनी आपापली गेलेली वैभवे परत मिळविणेसाठी बंडे करून उठावे अशीच हयात उमाजीची इच्छा दिसते. वरील पत्र दि. ३०/११/१८२७ चे आहे. हे पत्र त्याने परिंचाहून रॉबर्टसनला दिलेला एक निर्वाणीची इशाराच होता.

इंग्रजांचे धोरण व प्रयत्न

कंपनीचे आधिकारी व सैनिक शिपाई यांना थोडेही बेसावध राहून चालणार नव्हते. इंग्रजांच्या धोरणात थोडा बदल झाला. त्यात जनतेची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न दिसून येतो. सापडलेल्या संशयीतांना शिक्षा करताना जराशी सबुरी दाखवली जाऊ लागली.

१) बंडवाल्यांना भाकरी पुरवणाऱ्या काहींना दीड ते दोन वर्षाची कैदेची शिक्षा झाली होती. परंतु सोनापूरकरांनी (सिंहगड भागात) भाकरी, पुरवल्या असतांनाही त्यांना गुन्हा माफ केला होता.कारण त्यांनी बंडवाल्यांच्या बातम्या बरोबर दिल्या होत्या.

२) परिंचे येथील वामन कुलकर्णी खोटे बोलला होता परंतु त्यास गुन्हा माफ करून वरती दहा रुपये बक्षिसही दिले . कोणत्याही प्रकारे उमाजी विरूद्ध जनतेचे सहकार्य मिळवणे हाच त्यांचा हेतू होता व लोकांच्या सहकार्याशिवाय आपण आपले अधिकारी, सैनिक सिपाई हे फारसे काही करू शकत नाही याची जाणीव त्यांना झाली होती.[६७]

कॅप्टन रॉबर्टसन हे पुण्याचे कलेक्टर रामोशांच्या उठावाबद्दल म्हणतात, सर्व जानता कोणत्यातरी राजकीय बदलाची वाट पाहत आहे. युरोपियनांविषयी असंतोष, तिरस्कार उत्पन्न करणे व नंतर त्यांना देशातून हाकलून देण्यास मदत करणे असा लोकांचा मानस दिसतो. पुण्याचे लोक तर महाकारस्थानी व अफवा उठविणारे ते उघड बोलतात. आहे कुठे इंग्रजांचे राज्य? समरांगणावर ते लढतील पण रामोशांपुढे त्यांचा निभाव लागणार नाही. कुणी सांगाव उदया हा उम्याच (उमाजी नाईक) शिवाजीसारखा बंडखोर होऊन पुन्हा मराठी राज्य चालू करणार नाही कशावरून? देवाच्या मनात असेल तर काय होणार नाही.[६८]

नोव्हेबर १८२७ रोजी रामोशांची टोळी साकुर्डे व जेजुरीच्या परिसरातून सिंहगडाकडे स्थलांतरीत झाली. नंतर ते सोनापूरला परत आले त्यावेळी उमाजीच्या टोळीत ८० लोक होते. माणसांचा जादा पुरवठा करण्यासाठी उमाजीने भोजाजीला फलटण कडे पाठवून दिले. ३ डिसेंबर १८२७ रोजी २५ शिपायांची पायदळाची तुकडी व २५ घोडस्वारांच्या सैन्याने सोनापूर येथे उमाजीच्या टोळीवर हल्ला केला या हल्यात दोन रामोशी ठार झाले. ते दोघेही शूर व धाडशी होते. त्यामुळेच त्यांच्या मृत्यूने उमाजीच्या टोळीतील प्रत्येकास खूप दु:ख झाले. याच प्रसंगी बहादुरखान नावाचा एक घोडस्वार उमाजीच्या अगदी जवळ येऊन ठेपला असताना उमाजीने त्या घोडेस्वाराच्या कपाळाचा नेम धरून एक धोंडा (दगड) भिरकावला त्या सरशी बहादुरखान हा घोडस्वार खाली पडून ठार झाला. तो स्वार ठार झाल्यावर शिपायांनी रामोशांचा पाठलाग करण्याचे त्याचवेळी सोडून दिले. आणि रामोशी डोंगरात पळून गेले. अगोदर ठार केलेल्या दोन रामोशांची प्रेते शिपायांना नेता येईना म्हणून त्यांनी त्यांच्या मुख्य अधिकाऱ्याला आपल्या पराक्रमाची व विजयाची चिन्हे दाखवण्याकरिता परत जाताना त्यांची डोकी कापून नेली.[६९] त्यामुळे रामोशांच्या दु:खाला परिसिमा राहिली नाही. त्यांच्यात जबरदस्त सुडाने पेट घेतला.

या नंतर उमाजीने मावळ प्रांतातील सर्व खेडयामधून खंडणी गोळा करण्यास ब्रिटिशांची व पंतसचिवांची परवानगी न घेता सुरूवात केली, भोजाजीने फलटन प्रांतात निरनिराळया जाती जमातीची ६० माणसे गोळा करून उमाजीच्या टोळीत सामील केली. दरम्यानच्या समयी भोजाजी काही माणसे घेऊन उमाजीकडे जात असल्याची बातमी बळवंतराव कोळयास लागली. ब्रिटिशांनी बळवंतरावाच्या मदतीला पायदळ फलटणीपैकी एका हावालदाराची तुकडी आणखी दिल्याने बळवंतरावाचा जोर चढलाच होता. नवलाईच्या कुरणापर्यन्त व तेथून पुढे कऱ्हेपठारापर्यन्त बळवंतराव नाईकाने त्याचा (भोजाजीचा) पाठलाग केला. पुरंदरच्या डोंगरात दक्षिणेच्या बाजुने वळसा घालून भोजाजी नाईक पुढे चालला. किकवी येथे एक्स्ट्रा बटालियनचे शिपाई व भोजाजीची टोळी यांनी

एकमेकांवर गोळीबार केला. ज्या दिवशी उमाजीच्या टोळीची सोनापूरची चकमक झाली त्याच दिवशी इकडे किकवी येथे भोजाजी नाईकाच्या टोळीशी एक्स्ट्रा बटालियनच्या लोकांशी चकमक झाली होती.[७०]

भोजाजीने फलटण बारामती प्रांतातून ६० माणसे आणून उमाजीचा टोळीत सामील केल्यानंतर हे सर्व जन वायव्य कडील कुवारी नावाच्या डोंगरी किल्याकडे निघून गेले. जोपर्यन्त उमाजी पुरंदरच्या आसपास (परिसरात) होता तोपर्यन्त आसपासच्या गावच्या लोकांकडून कंपनी सरकारच्या फौजेच्या हालचालींची खडान्खडा बातमी उमाजीस मिळत होती. उत्तरेकडे उमाजी आपल्या टोळीसह चालला असता त्याच्या हेराने कॅप्टन डेव्हिस पुर्वेकडून उमाजीचा शोधा करिता येत असल्याची बातमी दिली. ही बातमी ऐकुण उमाजीने मध्येच मुक्काम केला व डेव्हिस साहेबाला जवळ येऊ दिले स्वतःच्या हालचाली संबंधात रामोशी लोक मोठया शिताफीने व चतुराईने ज्या खोटया नाट्या अफवा साहेब बहादुराला चकविण्याकरिता चहुकडे पसरून देत असत.

रामोशांच्या टोळीत आता माणसांची संख्या जवळ जवळ १६० झाली होती. रामोशांची टोळी सारखी फिरत होती. १० डिसेंबर १८२७ रोजी १५० सशक्त लोकांनी मुरबाड येथील सरकारी खजिन्यावर अचानक हल्ला केला. अल्पावधीतच त्यांनी बंदुकधारी सरकारी शिबंदीच्या सैन्यास शरण आणले व तिजोरीतून १२-१३ हजार रुपये लुटून नेले. ही घटना जवळच्या १२ मैल अंतरावर असलेल्या युरोपियन अधिकाऱ्यास कळविण्यात आली. लगेचच सैनिकांची तुकडी त्यांचा शोध घेऊ लागले पण सर्वच व्यर्थ गेले. त्यांना यश आले नाही. या व अशा अनेक घटनांना उद्देशून उत्तर कोकणचे मॅजिस्ट्रेट जे. बी सिमसन म्हणतात.

"दरोडे खोरी करणे हा एक बंडाचाच भाग आहे. आणि या मागे पुरंदर डोंगरावरील उमाजी नाईकाचा हात असावा."[७१]म्हणून ते दि. १५ डिसेंबर १८२७ च्या पत्रात म्हणतात. "रामोशांचा विरोध मोडून काढण्यासाठी मिलीटरीचा (लष्कराचा) जास्त वापर करावा."[७२]

पंढरपुरच्या एजंटने सातारा येथील रेसिडेंटना कळविले की ५०० घोडस्वार असलेली रामोशांची टोळी इकडे फिरत असून त्यांनी पंढरपूरच्या उत्तरेस करकंब या ठिकाणी अनेक चोऱ्या केल्या. त्यानंतर त्यांनी अक्कलकोट परगण्याकडे पलायन केले आहे.

कोल्हापुरचाराजा उमाजीस मदत करीत आहे. आणि त्या मदतीच्या जोरावर उमाजी ही स्वत:ला राजा समजून कार्य करीत आहे असे सरकारला वाटत होते.[७३] रामोशांचे बंड मोडून काढण्यासाठी व अधिक प्रभावी उपायांचा अवलंब करण्यासाठी मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जॉन मालकम् पुण्यात आले. पुणे, सातारा व इतर ठिकाणच्या रामोशांच्या बंडाचा बिमोड करण्यासाठी कॅ. स्पिलरच्या नेतृत्वाखाली 'ऑक्झेलरी हॉर्स' देण्यात आले[७४]

कंपनी सरकारचा तिसरा जाहीरनामा (१५ डिसेंबर १८२७)

कंपनीने थेट मुंबई ईलाख्याचे गव्हर्नर मालकम यांच्या नावे १५ डिसेंबर १८२७ रोजी एक नवा जाहीरनामा काढला तो पुढील प्रमाणे-

१) दक्षिणेकडील चार परगण्यात रामोशी रयतेस उपद्रव करून लुटतात त्यांचा बंदोबस्त करायचा आहे.

२) कुणातरी मोठयांची नावे पुढे करून हे रामोशी इंग्रजांचे व छत्रपतींचे मुलखात दंगा करीत आहेत. मोठयांच्या नावांच्या भुलथापामुळे कित्येक लोक त्यास सामील होत आहेत. रयतेने हे लक्षात घेऊन सावध असावे.

३) बंडात सामील झालेल्यांपैकी कुणालाही २० दिवसांचे आत तो हजर होऊन त्याने कबुली जबाब दिल्यास रीतसर चौकशी होऊन माफी देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जाईल.

४) उमाजी, भुजाजी, पांडू, वयेसाजी हे चार बंडाचे नेते आहेत. त्यांना पकडून देणारास प्रत्येकामागे रुपये पाच हजार एवढे बक्षिस मिळेल.

५) हया बंडवाल्यांशी ज्यांचे येणेजाणे व बोलणेचालणे वगैरे असेल ते बंडात नसले तरीही ती बंडात सामील आहेत असे समजले जाईल व त्याबद्दल शिक्षा ही होईल.

६) बंडवाल्याविषयी व बंडास मदत करणाऱ्यांविषयीजोकोणीबातमी देईल, व ती खरी असल्याचे पुरावे देईल, त्यास मैजिस्ट्रेट मार्फत बक्षिस मिळेल.[७५]

उमाजीच्या बंडामुळे इंग्रजांची किती दमछाक झाली होती याचे प्रत्यंतर या जाहीरनाम्यात दिसते. उमाजीस पकडण्यासाठी बक्षिसांची रक्कम शंभर रुपयांपासुन वाढवत वाढवत पाच हजार रुपयांपर्यंत नेली होती. जनतेस अनेक प्रलोभने दाखविली होती. तसेच दमदाटी ही भरपूर केलेली होती.तरीही उमाजी हाती लागत नव्हता.

सरकारी आदेशाप्रमाणे कॅ.स्लिपर १७ डिसेंबर १८२७ रोजी सासवड येथे आला त्याने त्याच्या मुख्य फौजेतील अधिकाऱ्यांना सूचना दिल्या प्रत्येक अधिकाऱ्याने शत्रुच्या हल्ल्यास तोंड देण्यासाठी तयार व सावधान असावे. त्याने फौजेत उच्च व कनिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांची आणि नेटीव्ह तुकडींना बुध्दीमान माणसांचा पुरवठा केला. त्यांना शेजारच्या प्रदेशावर पाठवण्यात आले. ताबोडतोब बंडाच्या ठिकाणी पोहचता यावे म्हणून घोडेस्वार सुध्दा प्रत्यके ठिकाणी बिखरून ठेवले. ता.१७ डिसेंबर १८२७ हवेलीच्या मामलेदारास हुकूम दिला की निबुडीतकर काकडे व गुळुंजकर नीगडे हे घोडेस्वार असतील. या कामी जी घोडी माणसे असतील त्याचा खर्च जेवढा असेल तेवढा सरकारातून मिळेल.[७६] तारीख १८ डिसेंबर १८२७ मावळचे मामलेदार यांनासुध्दा हुकुम दिला होता, की बंडवाल्यांची खबर लागल्या लागल्या, त्याच वेळी ती खबर सरकारी लष्करात पोहचवीत जावी, व ज्या गाववाल्यांनी बंडवाल्यांच्या भितीने सरकारला वसुल देण्यास अडथळा केला आहे त्या गावच्या पाटलास कैद करून पाठवावे. त्यांनाही बंडवाल्यांच्यात सामील होते असे समजून कठोर सजा दिली जाईल. व बंड वाल्यांकडून तुमची घरे जाळली जाणार नाहीत अशी संपूर्ण गावात ताकीद द्यावी.[७७]

२० डिसेंबरच्या सुमारास उमाजीची टोळी जेव्हा तिचा तळ घाटाखाली तळकोकणात जांभुळ पाडयापासून, सुमारे तीन कोसांवार वासुंदे गावी आली, त्यावेळी या टोळीत १४० लोक होते. याच वेळी उमाजीचा तपास करणारे १ हवालदार व शिपाई उमाजीच्या लोकांनी पकडले. सोनापुरच्या लढाईचा (३ डिसेंबर १८२७) बदला घेण्यासाठी ही एक चांगली संधी चालून आली होती. त्यांनी मांगांकडून त्यापैकी तीन शिपायांना ठार मारले. या वेळी उमाजीच्या टोळीत कृष्णाजी नाईक, भोजाजी नाईक, पांडू, विठू, येसु,निकारी (सिंहगडकर) व छोटा पांडू इत्यादी लहान लहान टोळीचे अधिकारी होते.[७८]

२० डिसेंबर १८२७ रोजी या टोळीने त्या दिवशी तेथेच (वासुंदे) मुक्काम केला, व गावातील एका ब्राम्हणाला बोलाऊन आणून उमाजीने त्याच्याकडून गव्हर्नर साहेबाला एक पत्र पाठवले. हे पत्र म्हणजे एक प्रचंड दणका होता. त्या पत्रासोबत जे काही पाठवण्यात आले होते. त्यानंतर सगळेच कॅप्टन लेफ्टनंट वगैरे रागाने लालबुंद झाले. पत्रातील मजकुराचा आशय असा होता. "कंपनी सरकारच्या काही शिपायांची आणि आमची गाठ पडून लढाई झाली. जे शिपाई लोक मारले गेली त्यांची डोकी कापून आम्ही तुमच्या कडे पाठविली आहेत. त्यांचा आपणाकडून स्वीकार होईल असे समजून आम्ही आणखीही काही पाठविण्याच्या विचारात आहोत."[७९] या पत्रात ताजा कलम घालून त्याने आपल्या या दिवसाच्या मुक्कापासून सासवडपर्यन्त मध्ये जी खेडी व गावे होती त्या सर्व गावांच्या लोकांना आमच्या चिठ्ठया कोणीही आडवू नयेत, मध्येच अडवून ठेऊ नयेत. त्या चिठ्ठया त्या-त्या गावी पोहचत्या झाल्या पाहिजेत. ज्या गावचे लोक असे न करतील त्यांना कडक शासन केले जाईल. आसा हुकूम फर्माविला होता.

वरील पत्र आणि डोकी ठेवलेली टोपली दि. २४ डिसेंबर १८२७ रोजी कॅ. डेव्हिसच्या हाती मिळाली. त्यावेळी डॉ. डेव्हिस बोरघाट परिसरात होता. यानंतर तीन मुंडकी चौथ्या रेजिमेंटच्या सुभेदाराकडून जाळण्यात आली.

हया प्रसंगी रामोशी लोकांच्या हातून शिपायांना क्रुरपणे मारण्याचे कारण तसेच गंभीर होते. ते म्हणजे आगोदर सोनापुरच्या लढाईत ब्रिटिश शिपायांनी सुध्दा हाच प्रकार केला होता. त्यांनी दोन रामोशांची मुंडकी कापून नेली होती. याच प्रकाराने रामोशांच्या मनात उत्पन्न झालेल्या त्वेशामुळे त्यांच्या मनात सुड भावना उत्पन्न झाली. वरील कृत्य हे जशास तसे उत्तर होते किंवा यामध्ये बदला घेण्याची प्रवृत्ती दिसते. आणखी एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे रामोशांनी ब्रिटिशांचा सुड, अशा रितीने पण मांगांकडून उगवून घेतला. एरवी त्यांच्याकडून असले भ्याड मारेकऱ्याचे काम झाले नव्हते. उमाजीच्या बंडात उमाजी प्रमाणेच भोजाजी, कृष्णाजी, विठोजी, भवानी आणि महादु वगैरे वजनदार, तापट आणि खुनशी लोक होते. यापैकी कोणा एकाच्या मनात किंवा प्रत्यक्षात उमाजीच्या मनात जर असे घोर कृत्य करण्याचे आले असते तर ते त्यांनी केव्हाही होऊदिले नसते. या वेळी सर्वच नाईक मंडळीच्या मनात, व रामोशांच्या मनात त्या शिपायांना ठार मारून टाकण्याचे जे आले ते केवळ सुड उगवण्याच्या इच्छेमुळेच आले.

उमाजीचे आद्य चरित्रकार कॅ. मॅकिन्टॉश म्हणतात. "खून करण्याचे काम बंडवाल्यांकडून क्वचितच होत होते . रामोशी जरी दरोडेखोर होते तरी ते रक्त पिपासू नव्हते. आपल्या ध्येयापासून विचलीत न होता विरोध करीत राहणे, या बाबत ते पटाईत होते. उमाजी प्रमाणे दृढ निश्चयी माणसे त्यांच्या टोळीत होती . त्यांची नावे भोजाजी, कृष्णाजी,विठोजी, भवानी व महादेव नाईक ही अत्यंत धीट वृत्तीची माणसे बंडाशी एक निष्ठ होती. परंतु पुढे ते सर्व लोक सुडाचे बळी ठरले."[८०]

उमाजी व त्याचे सहकारी यांना पकडण्यासाठी सरकारने जाहीरनामा काढून बक्षिसे जाहीर केली.

सर जॉन मालकमचा २० डिसेंबर १८२७ चा जाहीरनामा

उमाजीला पकडण्यासाठी त्याच प्रमाणे त्याच्या सहकाऱ्यांना पकडण्यासाठी मुंबईचे गव्हर्नर सर जॉन मालकम, यांनी २० डिसेंबर १८२७ रोजी एक जाहीरनामा काढला. व बक्षिसेही ठेवली होती ती पुढील प्रमाणे-

१) भोजाजी ५००० रु.

२) पांडू ५००० रु.

३) उमाजी ५००० रु.

४) येसाजी ५००० रु.

जाहिरनाम्यात मुंबईचे गव्हर्नर सर जॉन मालकम म्हणतात. "बंडात सामील असणाऱ्या रामोशांना क्षमा करण्यात येईल व जे आपल्या बंडाच्या कारवाया सोडून देतील आणि मॅजिस्ट्रेटला मदत करतील, आणि भविष्यात चांगली वर्तणुक ठेवतील, त्यांना त्यांचे हक्क ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडून दिले जातील. परंतु या गोष्टीचा फायदान घेता कंपनीच्या परस्पर पुर्वीच्या कारवाया त्यांनी चालू ठेवल्या, तर कायदयाप्रमाणे जास्तीत जास्त कडक शिक्षा देण्यात येईल. परंतु सर्वांनाच अशी शिक्षा देण्यात येणार नाही. शिक्षा करण्यापूर्वी दरोडेखोरांना शोधून काढले जाईल, व कमी कारवाया असणाऱ्या लोकांना वगळण्यात येईल. परंतु त्यांचे मुख्य नेते यांना मात्र कायदयाप्रमाणे शिक्षा होईल, तसेच जी व्यक्ती बंडात अप्रत्यक्षरित्या सामील आहे, अशा व्यक्तिंना कायदयाप्रमाणे शिक्षा ठोठावली जाईल. [८१]

उमाजी नाईकाचा २५ डिसेंबर १८२७ चा जाहीरनामा

डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवडयात उमाजी त्याच्या रामोशी सहकाऱ्यांसोबत कोकणात, सध्याच्या रायगड जिल्हयात उतरला होता. हया बाजुला इंग्रजांचा पुरेसा बंदोबस्त झाला नव्हता. तेव्हा उमाजी नाईकाने खेडयातील नागरिकांना २५ डिसेंबर १८२७ ला जाहीरनामा पाठविला व अंमलदारांना चांगलेच भडकाविले. त्याचा हा जाहीरनामा सर्व

रयत, पाटील, महार, सुभा दक्षिण विभाग, रत्नागिरी आणि सुभाठाणे, उत्तर कोकण या दोन्ही सुभ्यातील लोकांनी इंग्रजांच्या मागे जाऊ नये तसेच त्यांना महसुल, कर, देऊ नये. जर दिला तर त्यांच्या गावांची राखरांगोळी केली जाईल. या भागातील पाटील मामलेदार यांनीही इंग्रजांच्या अधिकाऱ्यांकडे महसुल भरू नयेत. ते आम्ही घेणार आहोत. आम्ही केव्हाही येऊ. पैसे तयार असले पाहिजेत, नसल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतील." असे त्यात स्पष्ट केले होते. जाहीरनाम्याची एक प्रत पाटील आणि गावकऱ्यांनी लगेच ती दुसऱ्या गावामध्ये कळवावी. जर पाठविण्यास काही अडथळे आणले तर ते खेडे जाळून भस्मसात केले जाईल. त्याचा सरळ अर्थ असा की हयापुढे राज्य इंग्रजांचे नाही, तर उमाजीचे व त्यांच्या रामोशांचे आहे असे उमाजीला ठणकावून सांगायचे होते. अशा पध्दतीचा हुकूमनामा (जाहीरनामा) तेरा गावांत फिरवला. गावांची नावे आणि प्रत्यके गावाकडुन यावयाच्या वसुलाची सुमारे २० रु. ते १०० रुपयापर्यंतची वेगवेगळी रक्कमेचा उमाजीकडून हुकूम सुटत होता. पुढील गावांना त्याने ताकीद चिठ्ठी दिली होती.

	गावे	**वसुलीची रक्कम**
१	वांगरूळ	७५ रुपये
२	धामणी	३५ रुपये
३	कुरमूर्ले	२५ रुपये
४	मंगळुर	१०० रुपये
५	तळवली	२५ रुपये
६	पिंपळगाव	३५ रुपये
७	हतोना	३० रुपये
८	तावणी	२५ रुपये
९	नानगांव	३० रुपये
१०	पानेर	४५ रुपये

११	कावरली	१०० रुपये
१२	ताबोळी	३० रुपये
१३	अश्वीनी	५० रुपये

वरील रक्कम त्वरीत जमा करावी व पाठवून द्यावी, नाहीतर हया पैशास पाटील व महार सहमत नाहीत, असे समजून त्यांची गावे जाळली जातील आणि त्यांची नाके कापली जातील.[८२] या सर्व गोष्टीवरून उमाजी हा राज्यकर्ता असून तो लहान सहान गोष्टीतही जातीने लक्ष घालीत होता. त्यामुळे इतरांनी यामध्ये लुडबुड करू नये. लोकांच्या मनावर राज्यकर्ता म्हणून स्वत:ला बिंबवायचे होतेच. पण जनताही त्याला तितकीच साथ देत होती हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे इंग्रज अंमलदार व अधिकारी चांगलेच भडकले होते.

कॅ. रॉबर्टसन म्हणतात. "रामोशी जरी त्यांच्या हक्कांसाठी भांडत होते तरी त्यांनी काही गोष्टी अति केल्या होत्या उमाजी हा पैसा व बुध्दिमत्ता असणाऱ्या लोकांच्या हातचे बाहुले बनला आहे. अत्यंत बुध्दिमान लोक त्याला मार्गदर्शन करीत आहेत. कारण उमाजी हा अत्यंत जिज्ञासुपणे व मुक्तपणे कार्य करीत होता. आणि जेव्हा जेव्हा तो ब्राम्हणांना भेटत असे, तेव्हा ब्राम्हणांनी आपला विश्वास जपून ठेवावा असे उमाजी सांगत असे. म्हणजेच उमाजी ब्राम्हणांना आदरपुर्वक वागणुक देत असे. एवढेच नव्हे तर उमाजीने जाणून बुजून त्यांना वाईट वागणूक दिली नाही. या उलट जर ब्राम्हण गरीब असतील तर त्यांना आर्थिक मदतही उमाजी करीत होता.[८३]

उमाजी त्यांच्या वतनाचे हक्क मिळावेत म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्या बरोबर झगडत होता. त्याने अनेक वेळा पुण्याच्या कलेक्टरांना वतनासंबंधी लिहिले होते. आपले हक्क मागण्यासाठी अमृता बंडा व विनोबा ब्राम्हण यांना कलेक्टर रॉबर्टसनकडे पाठवीत होता.[८४] ब्रिटिश सरकारला उमाजीने वतनासाठी खूप त्रास दिला होता. उमाजीच्या दंग्यामुळे कंपनी

सरकारला यश न येता अपयश येवून सरकारचा खर्च अतोनात वाढला होता. म्हणूनच रामोशांचे हक्क, जे उमाजी मागत होते ते देण्याकडे इंग्रजांची मनोवृत्ती झुकू लागली. याच गोष्टीमुळे उमाजी व त्यांचे सहकारी समाधानी होते. तहाच्या साधनाव्दारे आपले हक्क मिळण्याची योग्य वेळ आहे, म्हणून उमाजीने सरकार बरोबर तहाची बोलणी सुरू करण्यासाठी, कृष्णाजी नाईक, विठोजी नाईक यांना पाठवले. याच वेळी उमाजींच्या टोळीत अनेक अनोळखी व्यक्ति सामील झाल्यामुळे त्यांचा स्वभाव कसा आहेयाची उमाजीस कल्पना नव्हती. तसेच टोळी अवजड झाली होती, म्हणून उमाजीने सरकार बरोबर तडजोडीचे धोरण अवलंबिले.[८५]

२८ डिसेंबर १८२७ रोजी रामोशी घाट चढून वर जात असताना त्यांचा शोध घेण्यासाठी वेगवेगळया सैनिकांच्या तुकडया त्यांचा शोध घेत होत्या. नंतर उमाजी "हिरडस" मावळात निघून गेला. परंतु माहुर या गावी त्यांचा मुक्काम असताना छत्रपतींच्या (सातारच्या) सैनिकांची व त्याची झटापट झाली. हया सुमारास म्हणजे १८२७ च्या अखेरीस व १८२८ च्या प्रांरभी उमाजी काही संस्थानिकांशी संघाने बांधण्याचाही प्रयत्न करीत होता. कोल्हापुरचे छत्रपती, कुलाब्याचे अंग्रे यांच्याशी त्यांचा पत्रव्यवहार चालू होता. याची माहिती इंग्रजांना होती. या दृष्टीने काही ना काही खटाटोप बरेच आधीपासून होत होते. पण त्यातून फारसे काही निश्पन्न होत नव्हते. भोरचा पंतसचिव उमाजीला सामील होता असा इंग्रजांचा आरोप होता. पण पंताला तो मुळीच मान्य नव्हता. भोर संस्थानातील कित्येक गावाच्या वसुलीच्या हक्कांबाबत पुरंदरचे रामोशी आणि पंतसचिव यांच्यात दीर्घ काळ वाद चाललेला होता. त्या तक्रारी कंपनीकडे गेल्या होत्या.

उमाजीने जानेवारी १८२८ हा महिना पुरंदर परिसरात घालविला. त्यानंतर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात तो आंळदीच्या डोंगराकडे गेला. या कालखंडात त्याच्या पुण्यास गेलेल्या मित्रांच्याकडून सरकारच्या बोलण्यासंदर्भात बातम्या येत होत्या. त्यानंतर याने आळंदी व पुरंदर परिसर सोडला. तो निरेच्या काठाने पूर्वेकडे जात असताना सोनगाव

शेजारच्या कुरणात, छत्रपतींच्या सैन्याच्या हातात पडण्याची वेळ आली होती, परंतू त्यातून तो यशस्वी बचावला. छत्रपतीच्या लोकांची व रामोशांची मसुर मुक्कामी काही वेळ लहानशी लढाई झाली त्यातही उमाजीस यश मिळाले.[८६]

इ.स. १८२८ च्या जानेवारी व फेब्रुवारी महिण्यात रामोशांची एक तुकडी कोकणात असली तरी कित्येक रामोशी पुरंदर, पुणे, आळंदी, इ. भागात संचार करीत होतेच. खुदद उमाजी हया काळात सतत कोकणातच राहिला असे नाही, तर रामोशांचे एक ठाणे पनवेलच्या पुर्वेस सोळा सतरा किलोमीटर अंतरावर होते. ते म्हणजे प्रबलगड (माथेरानच्या पुढे) हया घनदाट जंगलाने व्यापलेल्या टेकाडावर सुमारे तीनशे रामोशांचे बस्तान होते. हया ठिकाणी उमाजी कायम नव्हेतर अधुनमधून मुक्कामी असायचा. हया ठिकाणाहून रामोशांनी पनवेलच्या मामलेदाराकडे आपले नेहमीचे जाहीरनामे पाठविले. त्या कागदांबरोबर कोळसेही पाठवून आमचे हुकूम न माणल्यास काय होईल हे सूचित केले. हया वेळी पनवेलच्या खजिन्यावर हल्ला होईल, अशी भिती इंग्रजांना वाटत होती.[८७]

उमाजी नाईकांच्या बंडाळीलाही स्वत:चा नाश केल्याशिवाय किंवा आणखी इतर टोळया एकत्र आल्याशिवाय ब्रिटिश सरकारचा फौजेकडून संपूर्ण देशाचा ताबा घेणे अशक्य होते. परंतु या बंडाला आळा घातल्याची लक्षणे दिसत होती. बंड तात्पुरते का होईना शांत झाल्यामुळे कॅ. स्पिलरने बंड चिरडून टाकण्यासाठी जे सैन्य ठेवले होते ते संपूर्ण प्रदेशातून काढून घेण्यात यावे असे सरकारला कळविले.[८८]

२० डिसेंबर १८२७ च्या जाहिरनाम्याला रामोशांकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही. या वेळी पुण्याचे कलेक्टर मॅजिस्ट्रेट कॅ. रॉबर्टसन हे प्रकृती सुधारण्यासाठी रजेवर गेले, व त्यांच्या जागी प्रभारी कलेक्टर म्हणून रिचर्ड मिल्सने सुत्रे हाती घेतली. या कालखंडात उमाजीच्या कॅ. स्पिलर बरोबर तहाच्या संदर्भात देवान घेवान चालूच होती. उमाजीने आपल्या दुतामार्फत निरोप दिले होते की, जर कॅ. स्पिलरने आमच्या दोन व्यक्ती मार्फत लेखी आश्वासन १२ दिवसांच्या आत दिले तर आम्ही ज्यांनी दरोडेखोरी केली आहे,

अशा ९-१० लोकांना सरकारच्या स्वाधीन करू आणि बंडाच्या संदर्भात मी आपणाकडे चर्चा करण्याकरिता येईल. उमाजीने आपले दुत भोगोलीकर नाईक व इतरांना वारंवार कॅ. स्पिलरकडे पाठविले व कॅ. स्पिलरला विचारले "मी शरण आल्यास आपण कोणती कृती कराल" मी उमाजीस अटक करेल नंतर उमाजीने कॅ. स्लिपर कडे आम्ही मागणी केली की "मला कोर्टात जाण्याची संधी मिळावी." कॅ. स्लिपरने ती तात्काळ मान्य केली.[८९]

यानंतर कॅ. स्पिलरने २२ फेब्रुवारी १८२८ रोजी कृष्णाजी नाईक भिवडीकर (उमाजीचा भाऊ) व विठू नाईक भांडवलकर यांचे जवळ खालील अश्वासन दिले.

"तुम्ही लेखी विनंती अर्ज करू शकता, जर आपल्याजवळ सरकारचे पत्र (मी दिलेले) किंवा चिठ्ठी असेल तर आपण येऊ शकता, म्हणून हे पत्र मी पाठवत आहे. जर तुम्ही सासवडला येणार असाल व लेखी विनंती अर्ज सादर केला, तर आपणास (रामोशांना) कोणीही त्रास देणार नाही. आपणास घाबरण्याचे काहीही कारण नाही. आपल्यातील संबंध चांगले राहण्यासाठी या पत्राव्दारे आपणास २२ दिवसांची मुदत देत आहे या कालखंडात आपण मला भेटावे.[९०]

कॅ. स्पिलरने दिलेल्या अश्वासनात बंडाच्या सुरूवातीपासूनचा संक्षिप्त आढावा घेतला होता. अश्वासन दिल्यानंतर कॅ. स्पिलरने व लेफटनंट हर्के (मराठा इनफंट्री) यांनी संबंधीत रामोशी व्यक्तिंची चौकशी करण्यास सुरूवात केली व ती सरकारकडे पाठवून दिली.[९१] या चौकशीत प्रांतीय अधिकारी पुण्याच्या कलेक्टरची लढाऊ तुकडी, व तिचा हल्ला वगैरेचे बंड दडपून टाकण्याचे प्रयत्न या संबंधीची चर्चा झाली. या चौकशीत खालील प्रांतीय अधिकारी होते.

१) धोंडोपंत पटवर्धन :- नायब दफेदार (पुण्याचे पुर्वीचे फौजदार)

२) बाळकोबा भाऊ

३) बापू काळे :- कारकून (फौजदार कचेरी)

४) मल्हारपंत :- पुणे शहर फौजदार

५) राणु यवतकर व त्याचा चिरंजीव टोप्या [९२]

या सर्वांनी पाठवून दिलेल्या चौकशीच्या अहवालानुसार गव्हर्नर सर जॉन मालकम म्हणतात. "जर आपण उमाजीस जीवन व स्वातंत्र दिल्यास त्याची शरण येण्याची इच्छा आहे. म्हणून त्याने उमाजीस व त्याच्या साथीदारांना क्षमा करण्यास सांगितले. परंतु २० डिसेंबर १८२७ रोजी उमाजीने शिपायांची मुडकी कॅप्टन डेव्हीस कडे पाठविली होती. त्या गुन्हयात मात्र क्षमा केली जाणार नव्हती. मात्र उमाजीने हा आपल्यावरील आरोप फेटाळून लावला. तो म्हणतो "जर सरकारने मी खरोखरच आरोपी आहे असे सिध्द करून दाखविल्यास सरकार देईल ती शिक्षा मी मान्य करण्यास तयार आहे.[९३] यानंतर सरकारने उमाजीस खलिता पाठवला जर उमाजी आठवडयाच्या आत शरण आला नाही तर सरकार तो व त्याचे बंड यांच्याशी वाटाघाटी करणार नाही. उलट सैन्यांमार्फत उमाजीचा बिमोड केला जाईल" असे जाहीर केले.

रामजी बिन कावजी

रामजीने उमाजीच्या टोळीसाठी काम केले होते. त्याला कंपनीच्या लोकांनी ता. २८ फेब्रुवारी सन १८२८ ला कोकणात शाहपूर भागात पकडले. त्याच्याकडून जबाब घेण्यात आले. ते काही उलट सुलट असले तरी बरीचशी वास्तवादी माहिती मिळते. रामजी हा मुळचा सोलापूर जिल्हायाती बार्शी जवळील उमरज गावचा मराठा. त्याने रामोशांचे निरोप चिठ्ठया पोहचवण्याचेकाम व जासुदीचे काम स्वत:हून स्विकारले असावे किंवा त्यास त्यांनी पकडून जीवे मारण्याच्या धमकीने लावले असेल. तो रामोशांमध्ये चार महिने होता. पण तो जासुदीचे काम करीत होता हे खरे आहे.[९४]

मार्च महिण्याच्या प्रारंभी उमाजीची बायको(गंगाबाई) दोन मुले तुकाराम व महांकाळा एक मुलगी कुशी तसेच त्याच्या कृष्णाजी व अंदू या दोघा भावांची बायका पोरे ही सर्व इंग्रजांच्या केंदेत पडली होती. स्वत:उमाजी व भुजाजी व याचे जिवलग साथीदार

मोकळे होते. फेब्रुवारीच्या अखेरीस उमाजी कोकणात आला असे दिसते. दि. ३ मार्च १८२८ मध्ये रामजी बीन कावजी हयाची कंपनीच्या लोकांनी घेतलेली एक जबानी आहे.[९५] त्या साक्षीमध्ये उमाजी कल्याणपासून तीन कोसांवरचा (सुमारे ९-१० की.मी) सुळक्याच्या डोंगरावर होता असे हा रामजी सांगतो, पण पुढे १० मार्च १८२८ च्या दुसऱ्या जबानीत मी उमाजीस पाहिले नाही असेही तो म्हणतो.

उमाजीकडे तीन तुकडया असून त्यातील एक खोपोलीजवळ आहे. फेब्रुवारीपासून खोपोली ते कल्याण हया भागातून किंवा अधिक ठाण्यावरून उमाजी त्याचे कार्य करीत होता. तो हे जे कार्य करीत होता, त्याचे उद्देश वेगळे होते, आणि ते इंग्रजांस कळावेत असा त्याचा अट्टाहास होता.

प्रतिसरकार

रामजी बिन कावजीच्या वर उल्लेखलेल्या दोन जबान्या अतिशय महत्वाच्या ठरतात. डोंगर दऱ्यांमध्ये तळ ठोकून उमाजीला काय करायचे होते. काय साधण्यासाठी तो एवढे धोके पत्करून जीवाचे रान करीत होता, हयाची पुरेपुर कल्पना रामजी पाटलाच्या हकिकती वरून येते. दुसऱ्या जबानीत स्वत:विषयीचे तपशील थोडे बदलून सांगतो. उमाजीला मी प्रत्यक्ष पाहिले नाही, असे म्हणतो पण त्याच्या तळावर जाऊन त्याने नव्हे तर दुसऱ्या कोना रामोशांच्या नेत्याने सोपवलेली कामगिरी घेऊनच आपण शहापुरास आलो होतो. हे पहिल्या जबानीतल्याप्रमाणे मान्य करतो. तसेच उमाजीकडे पाच हजार माणसे आहेत असे पहिल्या जबानीत त्याने सांगितले होते. ते दुसऱ्या कबुलीत तो बदलतो. त्याच्याकडे फारतर शंभर माणसे असतील म्हणतो, आणि आपण रामोशांनी आपला शारीरिक छळ केल्यामुळेच त्यांनी सांगितल्याप्रमाणे पहिल्या जबानीत मोठा आकडा सांगितला असे ही सांगतो. तथापि उमाजी स्वत: असेल किंवा नसेल पण त्याला उमाजीचे म्हणून जे हुकूम मिळाले ते सर्व पहिल्या जबानीत आले आहेत. आणि त्यापैकी कोणताही

महत्वाचा भाग तो बदलत नाही. तेव्हा रामोशांच्या कार्यपध्दती आणि ध्येय धोरणे याची स्वच्छ कल्पना देणारा, रामजीच्या पहिल्या जबानीतला सर्व मजकूर पुर्ण खरा धरता येतो.

रामजी २६,२७ फेब्रुवारी १८२८ च्या रात्री पनवेलहून पुण्यास जात असता त्यास बोरघाटात रामोशांनी पकडले व अर्ध्याकोसावर रानात नेले. व त्यास कापून टाकण्याचा धाक दाखवून जासुदाचे काम पत्करण्यास भाग पाडले. थोडा वेळ हा भाग खरा असो की खोटा तो मुद्दा गौन आहे. पण एवढे मात्र निश्चित की रामजी बिन कावजी हा रामोशांमध्येच होता. आणि त्यांच्या चिठ्ठया घेऊन जासुद म्हणूनच शाहापुरास आला होता. शहापूर बरोबरच रामजीकडे जवळच्या सालआबा व कणेरी या दोन गावांसाठी आणखी दोन चिठ्ठया होत्या.शहापुरासाठी त्याला जी चिठ्ठी दिली होती त्यातील मजकूर समस्त दाहीजण मौजे शहापूर यासी उमाजी राजे मुक्काम डोंगर लिहावयाशी कारणकी आम्हास ऐवज रुपये शंभर पाठवून देणे दिक्कत केल्यास कार्यास पडणार नाही. ऐवज पावता करणे आणि पावती घेणे... असा मजकुर होता.[९६] विशेष बाब असी की हयामध्ये उमाजीने स्वत:चा उल्लेख राजे असा केलेला आहे. जरी हे पत्र दुसऱ्या कोण्या एका रामोशाने लिहिले असले, तरी राजे या शब्दाचा वापर उमाजीच्या सांगण्यावरूनच केला असावा. आपण डोंगरावर आहोत हे सुध्दा उमाजी किंवा त्याच्या वतीने आणखी कोणी स्पष्ट केलेले आहे. जवळपासच्या दुसऱ्या दोन गावांसंबंधी हयाच मजकुराच्या चिठ्ठया उमाजीकडे दिल्या होत्या.

रामजीला अनेक प्रश्न विचारण्यात आले. त्याच्या उत्तरातून खुपच काही उघड होते ते म्हणजे उमाजीला राजा मानले जाऊ लागले होते. त्याच्या नावे गावोगाव रोखे होत होते. गावोगावी खंडणी वसुल करणे हा राजा म्हणून उमाजीचा अधिकारच होता. हे त्याच्या कृतीतून दिसून येते. उमाजीने गोळा केलेल्या अनुयायांमध्ये फक्त रामोशीच होते असेही नाही. रामोशांशिवाय मांग, बेरड, मराठे, व मुसलमानही होते. उमाजीने लोकांच्या तुकडया केलेल्या असून प्रत्येक तुकडीकडे एकएक मुलुख सोपवलेला असत.उमाजी स्वत:

कोणत्याही एकाच तुकडीत राहत नसत. तो सतत फिरता असे. त्यांच्या लोकांकडे तीरकामठे, ढाल तलवारी, आणि बंदुका असत लुट वाटून घेण्याचा प्रकार बंद करून उमाजीने शिपाई जासुद वगैरे सर्वांना रोख ठराविक मासिक वेतन देण्याची पध्दत चालू केली होती. हया सर्व गोष्टींचा सरळ अर्थ असा की उमाजीला आता लुटारूंचा नाईक म्हणून रहायचे नव्हते, एक राज्यकर्ता, राजा म्हणून सत्ता हाती घ्यायची होती.

रामजी बिन कावजीच्या पहिल्या जबानीतील शेवटचा भाग अतिशय महत्वपूर्ण आहे. सर्व काही विचारून झाल्यावर "तुला आणखी काही बोलायचे आहे? असा प्रश्न त्याला टाकण्यात आला. त्यावर रामजी म्हणतो की " मी रोखे घेऊन येऊ लागलो तेव्हा मजला उमाजी राजे यांनी सांगितले की जर तुला कोणी सरकारात धरून नेले तर तू साहेबास सांगावे की आमच्या राजाने बंड केले आहे म्हणून आम्ही असे करितो, चोरी करणे, रस्ते मारणे असे काम करीत नाही. असे बोलावे, असे सांगितले ते जाहीर केले आहे." सरकार चोऱ्या व वाटमाऱ्यां करीत नसते पण गावोगावचा वसुल घेते. तो सरकारचाच असतो आणि सरळ मिळाला नाही तर बळाचा वापर करूनही सरकार तो मिळवून घेत असते.

इंग्रजांच्या जागी आता मीच सरकार आहे, आणि कोणत्याही सरकारने करू नयेत अशी चोऱ्या दरोडया सारखी कामे मी ही करणार नाही. आणि कुठल्याही सरकारने केलाच पाहिजे तो उद्योग म्हणजे महसुल जमा करण्याचा तो मी करणारच, असाच उमाजीच्या हया निरोपाचा आशय, मतलब होता.

उमाजी राजा होता. या संदर्भातील काही पत्रे आहेत. उदा. सिद्दी नवाबचे पत्र. या पत्रामध्ये खुद्द किल्ले जंजीरा राजपुरीचा संस्थानिक सिद्दी उमाजी राजांकडे मदतीची याचना करतो. यावरून उमाजी राजे किती ताकतवान होते, याचा अंदाज येतो. कारण बलवान माणसाकडेच कमजोर माणूस मदत मागतो. याचा अर्थ उमाजी राजांचे सैन्य व ताकद किती बलवान होती याची प्रचिती येते.[९७]

उमाजीची माघार व तडजोड (तह)

नंतरच्या काळात मात्र उमाजीला मनुष्यबळाची कमतरता भासू लागली. उमाजीकडे पाच हजार माणसे व हजारो लढवय्ये आहेत असे सांगणाऱ्या रावजी बिन कावजीच्या म्हणण्यात तथ्य फारसे दिसत नाही. परंतु एक नक्की की उमाजीकडे एक हजाराच्या आसपास सैनिक होते तेच त्याने ठिकठिकाणी संरक्षण व गनिमी कावा करण्यासाठी वेगळया ठिकाणी ठेवले होते. कंपनीच्या माणसांशी मारा-माऱ्या करून ते छोटया छोटया तुकडयांना हैरान करु शकत होते पण त्याहून अधिक शेवटी काही साधण्यासारखे नव्हते हा संघर्ष असाच चालू ठेवणे निरर्थक आहे अशी पक्की भावना उमाजीची एप्रिल १८२८ मध्ये झाली. त्याने चार पावले मागे सरायचे ठरवले. माघार घेण्यासाठी उमाजीने भुजाजी मार्फत बोलणी लावली. उमाजी व त्याचे सहकारी कॅ. स्पिलर यांचेशी बोलणी करण्यास तयार झाले. त्यांच्यातील तहाच्या वाटाघाटीचा दिवस २३ मे १८२८ हा ठरविण्यात आला. उमाजीने सर्व तयारीनिशी बरोबर जमीनदार पाटील, गावातील इतर अधिकारी यांना बरोबर घेतले. या शिवाय १५० रामोशीव काही कुणबीही घेतले.

कऱ्हेपठार येथील खंडोबाच्या देवळातील आबदागिरी त्याने आपल्यावर धरण्यासाठी मिळवल्या. शिंगे, कर्णे, तुताऱ्या इ. वादये जमविली. शिंगे, तुताऱ्या, कर्णे आदी वाद्यांच्या गजरात बरोबर दिडशे लोकांच्या ताफ्यात आबदागिरीखाली व चौऱ्या ढाळीत एखाद्या लहानशा राजाच्या स्वारीप्रमाणे वाजत गाजत स्वारी कमांडिंग ऑफिसाला भेटण्याकरिता सासवडपासून एक कोसावर असलेल्या एका टेकडीच्या माथ्यावर येऊन थांबला. ता. २१ मे रोजी फौजेचा अधिकारी (कमांडिंग अफिसर) बरोबर आपला रिसालदार आणि दोन घोडेस्वार घेऊन उमाजीला भेटण्याकरिता त्या टेकडीकडे गेला. फौजेचा मुख्य अंमलदार अधिकारी (कॅ. स्पिलर)अशा रितीने आपणास भेटण्यास येत आहे असे पाहून उमाजीही त्याचा सर्व लावाजमा घेऊन त्याच्या भेटीकरिता टेकडी उतरला.

टेकडीच्या खाली त्या उभयतांची थाटाने भेट झाली. शिष्टाचारा प्रमाणे उमाजीने स्पिलरचे स्वागत केले. कॅ.स्पिलरने उमाजीला सरकारचा माफीया हुकूम वाचून दाखविला. उमाजीने व त्याच्या मित्राने स्वस्थपणे ऐकून घेतला व आपल्या सहकाऱ्यांबरोबर टेकडीवर चर्चा केली. या नंतर तो चारपाच दिवसांनी त्याच्या नातलगासह साकुर्डे येथे स्थायिक झाला.[९८]

इंग्रजांनाही चांगल्या सुराज्याचे जनतेस दिलेले आश्वासन पाळण्यासाठी एनकेन प्रकारे ही बंडाची कीड नाहीशी करावयाची होती. त्या साठी ही संधी चालून आली होती. उमाजीस ठार मारले तर त्याच्या नावे फार मोठे बंड होण्याची शक्यता होती . कारण तो फार लोकप्रिय झाला होता.

तहातील आशय

१) उमाजी व भुजाजी व त्यांच्या सर्व रामोशांनी बंड थांबवावे.

२) उमाजी व भुजाजीने कपनीची नोकरी करायची. त्यांनी करायचे काम म्हणजे कंपनीच्या, भोरच्या सचिवांच्या व सातारचे छत्रपतींच्या मुलखात चोऱ्या, दरोडे, वाटमाऱ्या याचा त्यांच्या हाताखालील माणसांकरवी बंदोबस्त करून शांतता प्रस्तापित करणे. (पोलीसाचे काम)

३) मे १८२८ च्या सरकारी म्हणण्यावर संमती देऊन समोरासमोर बोलणी होऊन कागदपत्रांवर सहया व निशानी झाल्या.

४) यानंतर कंपनीने हे उमाजीसाठी ठेवलेली सर्व बक्षिसे एका जाहिरनाम्याने रद्द करण्यात आले.

५) उमाजीच्या चोऱ्या, दरोडयांचे व जाळपोळीचे वगैरे सर्व गुन्हे माफ करण्यात आले.

६) मात्र त्यांचा एक गुन्हा इंग्रजांच्या जिव्हारी लागला होता . तो म्हणजे त्यांच्या लोकांची डोकी (शिरे) कापून त्यांच्याकडे भेट पाठविण्याचा. त्याचीच फक्त पुढे रितसर चौकशी होईल असे उमाजीस बजावण्यात आले.[९९]

७) तसेच या रामोशांना उदरनिर्वाहासाठी सुपिक जमिनी सरकार मार्फत देण्यात आल्या.[१००]

अशा प्रकारे १८२१ पासून कंपनी सरकारच्या सैन्याला सळो की पळो करून सोडणारा उमाजी नाईक हा सरकारचा सेवक बनला. त्याने ज्यासाठी सरकारविरूध्द शस्त्र उचलले होते ते मात्र अजूनही साध्य झाले नव्हते. उमाजीने मात्र एक तडजोड या दृष्टीने सरकारशी मैत्री केली होती. मात्र खऱ्या अर्थाने तो सरकारवर खूप जळत होता. द्वेष करीत होता. कंपनी सरकारने त्याने केलेल्या सर्व गुन्हयांना माफी का दिली? हे न उलगडणारे कोडे आहे.ज्यांनी सर्व हिंदुस्तान पादाक्रांत केला त्या ब्रिटिश सरकारने एखादया लहानशा व्यक्तिपुढे नतमस्तक व्हावे त्यातच उमाजीचा धाडशीपणा मुत्सद्दीपणा व मोठेपणा दिसून येतो.

सरकारने त्याच्याशी स्नेहाचे संबंध जोडून त्याला जबाबदारीचे अधिकार देण्यास सुरूवात केली पण उमाजी काय चाकरी करणार?

उमाजी नाईक इंग्रजांच्या नोकरीत (१८२८-३०)

उमाजी नाईक आपल्या कुटुंबियांसोबत व सहाकाऱ्यां बरोबर साकुर्डे येथेसरकारी नोकरीत सहभागी झाला. उमाजीला कंपनी सरकारने पोलीस खाते देऊन पुरंदर परिसरातील लोकांच्या जिविताचे व वित्ताचे संरक्षण करणे अणि परिसरात शांतता प्रस्थापित करण्याचे अधिकार दिले होते. अ.ना.भागवत म्हणतात. "कंपनी सरकारने उमाजीने केलेल्या शिपायांच्या वधाची अट उमाजीस ना पसंत असल्याने काढून टाकली आणि उमाजीस आगदी आपलासा करून टाकला."[१०१]

रिचर्ड मिलसने इतर रामोशांना गावातील रखवालदार म्हणून नेमले आणि त्यांच्या चरितार्थासाठी त्यांना जमिनी दिल्या.[१०२] म्हणजेच उमाजीने कंपनी सरकारच्या विरोधात बंड करू नये, म्हणून उमाजीस काही जमीन इनाम दिली होती. पण उमाजीला माहीत होते की आपला खेळ हा तलवारीच्या धारेवरील नाच कामासारखा आहे म्हणून त्याने सरकाशी समझोता केला. इ.स. १८२९ मध्ये सरकारने त्यास १२० बिघे जमीन साकुर्डी येथे इनाम दिली.[१०३] म्हणजेच उमाजी व रामोशांना नोकरी, जमिनी देण्यामागचा हेतू एवढाच होता की

त्यांना दिलेले काम चोखपणे बजवावे. या मध्ये एक मेख अशी की काटयानेच काटा काढायचा. या चोर दरोडेखोरांकडून इतर चोर व दरोडेखोरांचा बंदोबस्त करायचा. कारण चोरांच्या वाटा चोरांनाच माहीत असतात. ही इंग्रजांची नीती होती.

रामोशांनी चोऱ्या व दरोडयांचा बंदोबस्त करायचा होता. त्यासाठी त्यांनी पुरंदरवर राहून पुणे, सातारा, व भोरच्या मुलखात आवश्यक वाटेल तेथे रामोशी वगैरे पाठवून जरूर ते उपाय करायचे होते; परंतु भोरच्या पंतसचिवाला इंग्रजांनी उमाजीची हया कामी नेमणूक करावी हे फारशे आवडलेले नव्हते. मात्र इंग्रजांनी उमाजीवर विश्वास टाकला आहे तेव्हा आपणही टाकला पाहिजे अशीच बहुतेक प्रतिष्ठितांची धारणा होती. रामोशांनी जे बंड उभारले होते ते त्यांनी स्वत:च उभारले नसून त्यास पुण्यातील काही बडया बडयांचे आतून संधान होते अशा अफवाही त्या काळी उठल्या होत्या. त्याच वेळी पुण्याचे मॅजिस्ट्रेट व कलेक्टर यांच्या कचेरीतील मुख्य कारकून धोंडोपंत यांच्यावर अशाच कारणांवरून खटला झाला होता.[१०४]

याचे कारण त्यांच्या मते असे की तो रामोशी लोकांना आतून सामील असून ते जे दरोडे घालीत त्या दरोडयांच्या मिळकतीत त्याचा हिस्सा होता. म्हणून तोच त्यांना उत्तेजन देत आहे असे त्याच्यावर आरोप होते. बरेच दिवस त्याची चौकशी पुण्याच्या सेशन पुढे होऊन जज्जने त्याला या आरोपाबद्दल फाशीची शिक्षा ठोठावल. नंतर अपिलाअंती सरकारने त्याची फाशी रद्द करून जन्मठेपेची शिक्षा दिली. ती शिक्षा भोगीत असता धोंडोपंत १८३१ मध्ये कैदेतच मरण पावला.

खरोखरच उमाजी स्वत: आपले रामोशी लोक घेऊन दरोडे, छापे घालून लुटमाऱ्या करीत असे. परंतु तो आता दुसऱ्यांच्या चोऱ्या व लुटी यांचा तपास लावण्याच्या कामात गर्क होऊन त्यात बहादुरी, इनाम व नाव मिळविण्याच्या खटपटीस लागला. इ.स. १८२८ साली मावळात काही चोऱ्या झाल्या होत्या तेव्हा त्या शोधून काढण्यासाठी उमाजीने विठोजी व कृष्णाजी नाईक या दोघांना काही रामोशी लोक देऊन काही चोर पकडले. याच

बरोबर पुण्याचे कलेक्टरच्या जागी काम करीत असलेले मि. मिल्ससाहेबांनी उमाजी नाईक, कृष्णाजी नाईक आणि त्यांचे काही रामोशी लोक यांच्या नोकऱ्या पक्या केल्या. ता. १७ जाने १८२९ पासून पगारही सुरू केला. तो पुढील प्रमाणे.

१) उमाजी नाईक - ३० रुपये

२) भोजाजी नाईक - २५ रुपये

३) इतर पाच नाईकांना प्रत्येकी - १२ रुपये

४) एक कारकून - १० रुपये

५) ७२ रामोशी लोकांस प्रत्येकी ५ रुपये असा.

पगार देण्यात येऊ लागला.[१०५] उमाजीस दिलेली जमीन व तिचे उत्पन्न नोकरीत येणाऱ्या खर्चापोटी धरवयाचे होते . इ.स. १८२८ पासून उमाजीकडे वसुलीचे आणि मर्यादीत प्रसंगी न्यायनिवाडयाचेही अधिकार देण्यात आले होते. त्यांच्या नोंदी ठेवणे व इतर कामासाठी त्याचे हाताखाली एक पुर्ण वेळ काम करणारा श्रीमंत मोरेश्वर नावाचा कारकुनही देण्यात आला.

ज्या गोष्टीची जबाबदारी उमाजीवर सरकारणे टाकली होती त्या गोष्टी उमाजी हाताळू लागला. लोकांच्या तक्रारी मग त्या घरगुती असोत किंवा लहान लहान भांडणे असोत उमाजी या सर्व गोष्टी सोडवू लागला. त्यांना निकाल (न्याय) देऊ लागला. उमाजी आपल्या तक्रारीस योग्य न्याय देतो म्हणून त्याच्या या न्यायसभेत कुणबी, महार, मांग, रामोशी व इतर जातीचे लोक उमाजीकडे तक्रारी घेऊन येऊ लागले. वादीने उमाजीकडे तक्रार केल्यानंतर जर प्रतिवादी जबाब देण्यासाठी हजर झाला नाही तर उमाजी प्रतीवादीस सक्तीचे बोलावणे पाठवित असे. मग प्रतिवादी मुकाटयाने उमाजीच्या न्यायसभेस हजर रहात असे. चौकशी संपल्यावर उमाजी प्रतीवादीला त्याच्या कुवतीप्रमाणे १ ते २ रुपये दंड करीत असे. कधी कधी दंडाची रक्कम ५ ते १० रुपयां पर्यंत ही होती.

यानंतर दोन्ही पक्षांना (वादी-प्रतिवादी) हुकूमनामा (निकालपत्र) मिळत असे. हा हुकूमनामा दोघांनीही स्विकारण्यापुर्वी या न्यायसभेत जो न्याय मिळाला तो आम्हाला मान्य आहे. आमचे त्यात समाधान आहे. या निकाला विरूध्द कोणत्याही ठिकाणी पुन्हा तक्रार करणार नाही असा करारनामा लिहून घेतला जात असे. जर कोणी या निकाला विरूध्द सरकारकडे तक्रार केली तर, त्याचा परिणाम भोगण्यास अथवा भयंकर शिक्षा भोगण्यास तयार असावे अशीही दोन्ही पक्षाला तोंडी समज दिली जात असे. ही समज खरी होणारी असल्याने कोणीही त्याच्या (उमाजीच्या) विरूध्द जात नसे. जो कोणी त्याच्या निकाला विरूध्द तक्रार करीत असे अशा लोकांना बेलाशकपणे अटकेत ठेवण्याची उमाजीची पध्दत होती. अशा लोकांना ८-१५-२० दिवस अटकेत रहावे लागत असे. या प्रमाणे जेजुरीच्या आसपासच्या प्रदेशातील व इंदापूर परगण्यातील मॅजिस्ट्रेटचे सर्व अधिकार उमाजी स्वत:च बळकाऊन बसला होता.

उमाजीच्या या न्याय पध्दतीला कॅप्टन मॅकिटॉश म्हणतात "उमाजी ब्रिटिशांच्या कायदयाचे अनुकरण करत नव्हता तर प्रघातांच्या चाली-रीती-रिवाज व रुढी परंपरांचा तो अवलंब करीत होता"[१०६] ब्रिटिशांची नोकरी करून कारभार करण्याचे एक प्रकारचे प्रशिक्षणच उमाजी घेत असावा. यावरून असे वाटते की उमाजीचा हा डाव होता तो ध्येयापासुन विचलित झाला नव्हता. आपले ध्येय तडीस नेण्यासाठी त्याने शेवटपर्यन्त प्रयत्न केल्याचे दिसते. उमाजीला व काही साथीदारांना पगार मिळाला पाहिजे म्हणजे त्याच्याकडे असणाऱ्या हजारभर सैनिकांना जगवायचं कसं? माणसं तर फुटता कामानये आणि इंग्रजांपासून जराशी शांततही लाभेल. त्याच प्रमाणे आपली माणसंही जगली पाहिजेत या सर्वच गोष्टी उमाजीने एकाच वेळी साधलेल्या दिसतात.

या संदर्भात पुरावा जरी सापडत नसला, इतर लेखकाला कदाचित ते सुचले नसेल किंवा त्याने त्या दृष्टीने लिहिले नसेल. परंतु सर्वच घटनांच्या आधारे मी काढलेला निष्कर्ष योग्य वाटतो.

सातारच्या छत्रपतींकडून उमाजीचा गौरव

इ.स. १८२९ चा फेब्रुवारीचा पहिला पंधरवडा उलटून गोल्यावर सातारचे छत्रपती श्री प्रतापसिंह ऊर्फ बुवासाहेब महाराज यांची स्वारी सिंहगडास गेली. तेथून परत येताना त्यांचा मुक्काम श्रीमंत पंतसचिव यांच्या इलाख्यापैकी नसरापूर या गावी झाला. नसरापूर हे पुरंदरपासून थोडयाच मैलांवर आहे ही बातमी उमाजीस कळल्याबरोबर तो तेथे महाराजांच्या भेटी करिता गेला. महाराजांनी मोठया आनंदाने त्याची भेट घेतली. त्यावेळी पुरंदरच्या वतनासंबंधी जे उमाजी जवळ दाखले, ताम्रपट, इनाम पत्रे, वगैरे होती ती त्याने महाराजांस दाखवली. ती पाहून सातारा इलाख्यात जर काही तुझे हक्क इनाम वगैरे असतील तर त्याची चौकशी करण्यात येईल व जर ते कागदपत्राच्या आधाराने तू सिध्द करून दिलेस तर ते हक्क तुला देण्यात येतील, असे महाराजांनी त्या भेटीमध्ये उमाजीस पूर्ण अभिवचन दिले. त्याच भेटीत महाराजांच्या एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे उमाजीच्या डोक्यावर पागोटे नसून रूमाल बांधलेला होता. याचे कारण महाराजांनी विचारले असता उमाजीने आपल्या चुलत भावाच्या (राघुजी)भांडणा विषयीचा प्रसंग सांगितला व तेव्हापासून पागोटे न बांधण्याचा निर्णय घेतला होता हे सांगितले. ही हकीकत ऐकूण महाराजांस आनंद व आश्चर्यही वाटले. त्याच प्रसंगी महाराजांनी उमाजीस त्यांच्या तर्फे पागोटे बांधले. यामध्ये मोठी धन्यता माणून यावेळेपासून उमाजी पुन्हा एकदा रूमाल सोडून छत्रपतींनी गौरवाने दिलेले पागोटेच बांधू लागला.[१०७]

उमाजी व कैकाडी संबध

उमाजीच्या कारभारातील हे प्रकरण फार बोलके आहे. २ एप्रिल १८२९ रोजी पुण्याच्या उत्तरेस २० मैलांच्या अंतरावर असलेल्या शिक्रापूर येथे कैकडयांनी तांबटाचे घर लुटले. तेव्हा त्या कैकाडयांना उमाजीचा भाऊ कृष्णाजी याने पकडले, आणि साकुर्डे गावी उमाजीकडे पाठवून दिले. उमाजीने त्यांचे विरोधात तपशीलवार आरोपपत्र तयार करून पुण्यास मॅजिस्ट्रेटकडे पाठवण्याच्या बहाण्याने त्याच्या जवळच ठेऊन घेतले. त्यांनी

चोरलेला माल जवळच ठेऊन घेतला. त्यांचे कडून ४०० रुपये दंड वसूल केला. त्याच प्रमाणे या कैकाडयांना साकुर्डे येथे आणून त्यांना विविध ठिकाणी लुटीच्या मोहिमेवर उमाजी पाठवू लागला. [१०८]

जून १८२९ मध्ये या पैकी काही कैकाडी लोकांनी पिंगोरी गावी लुटालुट केली, तर जुलै मध्ये काहींनी मोरगावात उच्छाद केला. त्यामुळे मोरगावच्या पुजाऱ्याने भोरच्या कुलकर्ण्यास पत्र लिहिले की "उमाजीच्या भयाने व्यापारी मोरगावी येत नाहीत, पाले टाकीत नाहीत, त्यामुळे गणेश चतुर्थीची यात्रा भरत नाही"[१०९] तसेच ऑगष्टमध्ये त्याच्यापैकी काहींनी बेलसर गावी चोऱ्या केल्या. अशा प्रकारे ते वेळो वेळी धुमाकुळ घालत होते.

ऑगष्टच्या शेवटच्या आठवडयात पुण्याच्या कलेक्टरने बोलावल्यावरून उमाजी त्याच्या पुढे हजर झाला. त्यावेळी त्यास जाब विचारला गेला असे दिसत नाही तर त्याचा पगार १०रु. ने वाढवून बहुमान करण्यात आला. त्यांच्या गुन्हयांकडे दुर्लक्ष करून त्यास आपलेसे करण्याचा कंपनीने प्रयत्न केला. यावरून हेच स्पष्ट होते की रामोशांनी दि.८ ऑगष्ट १८२९ पर्यन्त जे खाने व भेट बंकरे घेतले व इतर गुन्हे केले ते सर्व माफ करण्यात आले होते.

इ.स. १८३० च्या सुरूवातीपासून उमाजी व त्याच्या लोकांनी दांडगाई सुरू केली होती. वाटमाऱ्या व दरोडे यांचे प्रमाण वाढले होते. रामोशांची दांडगाई इतकी वाढली की ते 'आम्ही उमाजीची माणसे' असे सरळ सरळ सांगू लागले. या काळात जे दरोडे पडले, त्यापैकी सप्टेंबर मध्ये कोणत्या तरी दोन दरोडयांचे काम त्याने स्वत: हजर राहून आपल्या देखरेखी खाली केले. उमाजीचा आद्यचरित्रकार व माहिती लिहिणारा मॅकिंन्टॉश याच्या म्हणण्याप्रमाणे नोकरी काळात त्याने समक्ष घातलेले एवढे दोनच दरोडे होते. वसुलीचे काम कित्येक वेळा उमाजी स्वत:च हाती घेत असे. त्यावेळी तो हवी तशी जबरदस्ती करायचा. तो आता कंपनीचा नोकर असल्याने त्यास विरोध करायचा की नाही हा प्रश्न

पडे, उमाजी व कंपनी सरकार यांच्यात सुरूवाती पासूनच मतभेद होते. परंतु जेव्हा चोऱ्या दरोडे, वाटमाऱ्या करून "आम्ही उमाजीची माणसे" असे सांगू लागली तेव्हा अशा प्रकारच्या नोकरांचे व मालकांचे संबंध पूर्णपणे बिघडत गेले.

- थोडक्यात २८ जून १८२९ रोजी उमाजीने पिंगोरी येथील दोन ब्राम्हणांची घरे लुटण्यास कैकाडयांना पाठवले व तेथून १७०० रुपये माल मिळवला.
- उमाजीने पडद्याआडची सूत्रधारकाची भूमिका बजावली. त्याचप्रमाणे कैकाडी व हेटकाऱ्यांमार्फत लुटमाऱ्या केल्या त्या अशा- १४ जुलै १८२९ रोजी पुण्याहून कर्नाटककडे जाणाऱ्या व्यापाऱ्याचे व रामोशी व हेटकऱ्यांना पाठवून लोणंद जवळ ३००० रुपये लुटले.
- ३१ जुलै १८२९ कौकाडयाकरवीमोरगांव येथीलदोनब्राम्हणांच्याघरावर दरोडा टाकून ११४६ रु लुटले.
- ४ ऑगस्ट १८२९ रोजी बेलसर येथील व्यापाऱ्यांवर कैकाडयांनी दरोडा टाकून ३४६ रू. मालआणला.[११०]

उमाजीच्या वतनासंबंधी

उमाजीने व रामोशांनी जो वतनाचा परंपरागत हक्क होता तो सरकारने दयावा असा जो आग्रही मुद्दा होता त्याची कलेक्टरने शहानिशा करून स्पष्ट केले की, ते वतन नसून तैनात होती. (काम करण्याचेअधिकार व त्याचा मोबदला) मागील कोणत्याही सरकारने त्यांना वतन दिले नव्हते. त्यामुळे कंपनी सरकार वतने मंजूर करू शकत नव्हती.[१११]

भोर संस्थान, उमाजी व इंग्रज

भोर संस्थानमधील खेरवाडी वगैरे तेरा गावांचे वसुली हक्क आपणास आहेत असे उमाजी व रामोशांचे म्हणने होते. त्याकरिता पुराव्या दाखल त्यांनी कागदपत्रे सनदा मिळून २४ कागद पुण्याचे कलेक्टर जिब्रान साहेब यांना सादर केली. त्यांनी त्याचे भाषांतर करून

अभ्यास केला. त्यास भोर संस्थानचा विरोध होता. इंग्रज सरकारने त्याची कसोसीने चौकशी केली. पूर्वीच्या कोणत्याच सरकारने त्यांना तसे हक्क दिलेले नव्हते. ते कागद म्हणजे राजे, सुभेदार, कामविसदार, यांनी त्यांना वेळोवेळी केलेल्या कामाबद्दल दिलेल्या देणग्या (तैनात) मेहनतांना होता. तसेच इ.स.१८२८ पूर्वी शंभर वर्षे मागे गेले तरी कोणतेच पुरावे मिळत नव्हते. त्याना ती तैनात म्हणजे काही काळ केलेली तात्पुरती तरतुद होती. ते वंश परंपरागत हक्क नव्हते व तसा हुकूम ता. ६ जून १८२९ ला उमाजी व रामोशांना दिला होता . तरीही हा हुकूम डावलून उमाजीने भोर संस्थानचे सहा गावी माणसे पाठवून जप्ती बसविली. (सक्तीची वसुली) या बाबत भोर संस्थानाने इंग्रजांकडे तक्रार करताच पुण्याचे कलेक्टर यांचेकडून उमाजीस ता ६ जून १८२९ चे हुकुमा ची आठवण करून देऊन जप्ती उठवण्यासंबंधी खरमरीत पत्र आले, तेव्हा उमाजीने एक पाऊल मागे घेऊन जप्ती उठवली. परंतु थोडी शांतता होताच उमाजीने नवीन शक्कल लढवून भोर संस्थानमधील रामोशी पुरंदरला बोलावले व त्यांचे करवी भोर संस्थानमधील गावेच्या गावे लुटली. या बाबतही इंग्रजांनी उमाजीवर ठपका ठेवला तेव्हा उमाजीने कांगावा केला की आपण तसे काही केलेले नाही. आपला व सचिवांचा तंटा असल्याने सचिवांकडुन मुद्दाम तसे उठविले जाते.[११२] इ. सबबी त्याने सांगितल्या होत्या.

भोरच्या पंतसचिवांनी इंग्रजांना अनेक पत्रे पाठवून सांगितले की "आम्ही स्वत: जातीने आमच्या मुलखात बंदोबस्त ठेवतो पण कंपनी सरकारने आमच्या मुलखाच्या बंदोबस्ताची जबाबदारी उमाजी वर सोपवणे योग्य नाही, इतकेच नव्हे तर रामोशांचा समूह उच्छेद (नाश) केल्या शिवाय मुलखात शांतता नांदणार नाही"

उमाजी नाईकासंबंधी शिवाजीराव एक्के यांच्या ग्रंथात एक नोंद सापडते ती म्हणजे उमाजीने दि. १८ मे १८२९ रोजी पुण्याच्या कलेक्टर जॉर्ज जिब्रान यांना उमाजी राजे पत्र पाठवून कळवितात की भोरचे व इतर गावचे ब्राम्हण, जहागिरदार, वतनदार, काही गरीब लोकांडून दरोडे घालतात. चोऱ्या करतात व त्या मीच केल्या अशा उलट आपल्याकडे

बोंबा मारतात व मला बदनाम करतात. सबब पकडलेल्या लोकांस कोणतीही सजा दिल्यास माझी काही हरकत नाही."[११३]

उमाजी व भोर संस्थानच्या भांडणात उमाजीने इंग्रजांची नोकरी सोडण्याची धमकीही दिली होती. तसेच सातारच्या छत्रपतीकडे अशा स्वरूपाची नोकरी मागितली होती. या सर्व प्रकरणात उमाजीवर आणखी थोडीशी मेहरनजर करून पंतसचिव यांचेकडून जर त्यास खेरवाडी वगैरे १३ गावांचे हक्क देवविले तर तो पुन्हा काही कुरापती उपस्थित करून आणखी काही हक्क मागेल तसेच त्यांच्या सारखे इतर काही लोक इतरत्र हक्क मागतील असे समजून कंपनी सरकारने सर्व प्रकरण फेटाळून लावले.[११४] आणि उमाजीस आपला पूर्व आयुष्यक्रम स्वीकारण्यास सरकारनेच संधी दिली असे म्हणावे लागेल.

या नंतर उमाजीने पंत सचिवांच्या प्रांतातील आपल्या वतनाची यादी कॅ. रॉबर्ससनकडे सादर केली. ती पुढीलप्रमाणे-

१) १३ गावे खोडेबेंरे परगणा : ही गावे रामोशांना बक्षीस म्हणून दिली आहेत. तशी बादशाही सनद त्याचे जवळ होती.

२) हिरडस मावळ येथील हक्क

३) राजगड व तोरणा किल्यावरील सरनाईकाचा हक्क

४) गुंजण मावळातील हक्क

५) पंतसचिवांच्या प्रांतातील इनाम

६) भेट बकरा

तसेच केंदुर व पाबळ ही दोन गावे रामोशांना बक्षीस दिली होती. त्यांचे इनाम चांबळीला सुध्दा होते. या शिवाय पुरंदर किल्ला व परिसर त्यांच्याच ताब्यात होता. कॅ. रॉबर्टसन सरकारला पाठवलेल्या पत्रात म्हणतात. केंदुर व पाबळ हया गावांचे उत्पन्न

१०५९१ रुपये आहे. तसेच तेथील वृध्द माणसे उमाजीचा हक्क कबूल करण्यास तयार नाहीत.[११५]

२ जुलै १८२९ रोजी उमाजी व कॅ. रॉबर्टसन यांची चर्चा झाली. यावेळी कॅ. रॉबर्टसनने उमाजीस सांगितले की सातारच्या राजदरबारीचे व पंतसचिवांचे तुमच्यावरील सर्व दावे काढुन घेण्यात येतील. सरकार त्या बाबतीत हस्तक्षेप करणार नाही. परंतु तू जर रामोशांना प्रोत्साहन देऊन सार्वजनिक शांतता धोक्यात आणली तर या कृत्यां विरुध्द ब्रिटिश सरकार तुझ्यावर नाराज होईल.[११६] उमाजीने यावेळी कॅ. रॉबर्टसनला सांगितले की मी व माझे सहकारी नाईक सर्वजन समान आहोत व त्यांना सरकारकडून देण्यात येणाऱ्या बक्षिसांबद्दल मी सरकाची परवानगी काढतो. तसेच आपण अशा बक्षिसांना मंजुरी दयावी. कारण या बक्षिसांमुळे परगण्यातील लोकांचे होणारे खून थांबून दरोडेखोरीला आळा बसेल. तसेच माझ्या व माझ्या साथीदारांच्या वेतनात वाढ करावी आणि माझ्या हाताखालील नाईकांची व शिबंदीची संख्या वाढवावी. टोळीतील कैदयांची सुटका करावी व मला एक लाख रुपये पूर्व काळापासून दयावेत. परंतु कॅ. रॉबर्ससनने उमाजीला सूचना केली की तू फक्त पुरंदरच्या भागातच नोकरी करावयाची. जर इतर नाईक हस्तक्षेप करीत असतील तर त्यांच्यावर नियंत्रण ठेवायचे तसेच तुमच्या लोकांना दरोडेखोरीपासून परावृत करण्याची काळजी द्यावी. आणि सरकार जनतेच्या जिवित व मालमत्तेची रक्षण करीत आहे हे जनतेस पटवून द्यावे.

या प्रसंगी उमाजीने खेडयातून व भेटीच्यावेळी काही रुपये व भेट बकरा मिळावा असा हक्क कॅ. रॉबर्टसन कडे मागितला त्यावेळी रॉबर्टसन म्हणतात, रामोशी नाईकांना भेटीच्या प्रसंगी पैसे व बकरे देणे हे कायदयाच्या अखत्यारीत येत नाहीत, परंतु जर तू तुझा हक्क सिध्द केल्यास व जनतेनेही मान्य केला, तर पैशाच्या स्वरूपात काही मोबदला देण्यात येईल.[११७]

जून १८२९ मध्ये इंदापूर येथील सरकारी तिजोरीवर पडलेल्या दरोडयाची चौकशी करण्याची कामगिरी सरकारने उमाजीवर सोपवली. उमाजीने त्याचा भाऊ अंदोजी यास १२ जुलै १८२९ मध्ये दरोडेखोरांच्या चौकशीसाठी इंदापूरला पाठविले. या वेळी अंदोजीने वासुदेव शिवराम मुन्शिफाकडून २०० रुपये सक्तीने वसूल केले. त्या मुन्शीफाने त्या बद्दलची तक्रार सरकारकडे नोंदवली. उमाजीच्या व त्याच्या साथीदारांच्या अशा प्रकारच्या कारवायांवर सरकारला पाठवलेल्या २४ जुलै १८२९ च्या पत्रात कॅ. रॉबर्टसन म्हणतात.

"सहन करण्यास मर्यादा असावी. विशेषत: दुर्लक्षिलेल्या लोकांचे बाबतीत तरी जो कधीही सळईला वाकवू शकत नाही ते लोखंड नव्हे रामोशांना दाखविलेल्या सौम्य व सहिष्णू धोरणाबद्दल कॅ. रॉबर्टसन म्हणतो "ज्याची पात्रता किंवा क्षमता नाही त्याची किंमत वाढविली. रामोशांबाबतीत सौम्य व उदार धोरण ठेऊन त्यांच्यावर विश्वास ठेवण्यापेक्षा इतर कोणत्याही परिस्थितीला तोंड देणे, आणि काही वेळा अनागोंदी कारभार किंवा अडथळा आणणाऱ्या प्रवृत्तीला तोंड देणे, हे केव्हाही अधिक चांगलं. जेव्हा दुसरी व्यक्ती जखमी असते, तेव्हा त्याला नुकसान भरपाई संदर्भात न्याय मिळवून देणे हा प्रश्नच उद्‌भवत नाही. या क्षुद्र मनाच्या किंवा अविचारी अपमानापेक्षाही इतर अपमान आपले शासन सहन करू शकते परंतु लोकांच्या डोळयामध्ये आपली स्वत:ची उच्च अधिकार पदाची प्रतिमा सांभाळणे किंवा निर्माण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. परंतु अशा (रामोशांच्या) शुल्लक व क्षुद्र मनाचा अपमान सहन करण्यामुळे आपली उच्च पदाची प्रतिमा कमी कमी होत आहे. हा अनुभव आहे. [११८]

उमाजीस वेतनवाढ व पोषाख बक्षीस

उमाजी नाईक ब्रिटिश राजवटीत ब्रिटिशांची धोरणे कोणालाही कळू न देता चातुर्याने हाणून पाडीत असे. त्याच्या धैर्यशिल चातुर्याने तो सर्वांनाच खूष करी. उमाजीस त्याच्या भागात खूप मान होता. उमाजीचे मन कोणीही मोडत नसत. कंपनी सरकारला जे

लोक सामील होऊन लोकांना फसवून पैसे लुबाडायचे काम करीत असत, त्याच लोकांना उमाजीचे लोक लुटत असत.

२२ ऑगस्ट १८२९ रोजी पुण्याचे कलेक्टर कॅप्टन रॉबर्टसन यांनी उमाजीस भेटीसाठी बोलावले. हुकूमाप्रमाणे उमाजी पुण्यास गेल्यावर त्याचा पगार ३१ ऑगस्ट १८२९ पासून वाढला आहे असे उमाजीस समजले. त्याच प्रमाणे त्यांच्या टोळीची संख्याही वाढविल्याचे दिसते.

नवीन पगार (दरमहा)

उमाजी नाईक - ४० रुपये

भोजाजी नाईक - ३० रुपये

दुसरे दहा नाईक - २० रुपये

कारकुन - ६ रुपये

शिवाय या वेळी सरकारने उमाजीस व त्याच्या हाताखालच्या १० नाईकांना २०० रुपये पोषाखासाठी दिले.[११९]

पुण्याच्या अग्नेय दिशेस दोन कोसांवर उंडी या लहानशा खेडेगावी आवजी नाईक नावाचा एक रामोशी राहात होता. कल्याणच्या एका श्रीमंत सावकाराच्या घरी रोकड ऐवज खूप असल्याची बातमी लागल्यावर २७ ऑक्टोबर १८२९ रोजी आवजीने त्याच्या घरावर दरोडा घालून २९१५४ रुपये नेले. काही दिवसांनी आवजीने साकुर्डीस जाऊन उमाजीस वाटा म्हणून २००० रुपये दिले. याच दरोडयात आवजी पकडला जाऊन त्याची चौकशी झाली व तो निर्दोषही सुटला.[१२०] याच दरम्यान पुण्याचा एक सावकार त्याच्या मुंबईच्या मुनिमास खुप रक्कम पाठविणार असल्याची बातमी रामोशांनी उमाजीस दिली. त्या रामोशांना ही बातमी एका ब्राम्हणाकडून समजली होती. उमाजीने ही रक्कम लुटण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी त्याने सगनभाऊ हेटकरी याची बारा माणसे आणि रामोशांची एक टोळी साकुर्डीहुन पाठविली. उंडीहून १० आणि दुसऱ्या गावातून १० अशी आणखी २०

माणसे त्यांना मिळाली. ही सर्व लोक बोरघाट मार्गे कर्जत व पनवेलच्या मधील चौक नावाच्या गावात लपून बसले. त्याच रस्त्याने ऐवज वाहून नेणारी तरटे लावलेली गाडी मुंबईकडे चालली होती. या टोळीजवळ गाडी येताच २९ नोव्हेबर १८२९ रात्री ९ वाजता त्यांच्यावर छापा टाकून त्यातील काही जणांना ठार करून ऐवज ताब्यात घेतला. आणि शेजारच्या डोंगरातील दरीत जाऊन बसले. परंतु हा सर्व प्रकार दरीपासून थोडयाच अंतरावर राहात असलेल्या एका गवळ्याने पाहिला.

चौक गावांत १७ रेजिमेंटचा एक सुभेदार काही शिपायांसह सरकारने रस्त्याच्या बंदोबस्तासाठी ठेवला होता. त्याच सुभेदाराला गवळ्याने सर्व प्रकार सांगितला व त्याच दरीत सर्व रामोशी ऐवज वाटून घेत असतानाच सुभेदाराने त्यांच्यावर छापा टाकला. बंदुकीच्या फैरी ही झाडल्या. परंतु बरेचजण काही थैल्यांमधून रोकड घेऊन पसार झाले परंतू त्यांच्याकडून दरीत टाकलेला ऐवज ४७०० रुपयांचा होता, तो त्या सुभेदाराच्या हाती लागला.

ती टोळी साकुर्डीत वर आल्यानंतर त्यांनी मोठया लुटीचे ६००० रुपये उमाजी पुढे ठेवले. टोळी जी लुट उमाजीस आणून देत होती. तिची वाटणी उमाजी लगेच सर्वाना ती वाटून देत असे. त्यामध्ये एक तोडा व २००-२०० रुपये दिले होते.[१२१]

भाईचंद भिमजी गुजर प्रकरण

२० मार्च १८३० रोजी उमाजीच्या लोकांनी फलटण येथील भाईचंद भिमजी गुजर या सावकाराला बारामतीस जात असतांना लुटले. या सावकारा जवळ, खुप पैसे होते. (ते त्रिंबकजी डेंगळे याने सावकाराकडे ठेवण्यास दिले होते.) त्रिंबकजी डेंगळे ठाणा तुरूंगातून १८१६ मध्ये सुटून महादेवाच्या डोंगरात लपून बसला होता.

१८१७-१८१८ मराठा ब्रिटिश्यांचे युध्द संपल्यावर दुसऱ्या बाजीराव पेशव्यास ब्रम्हवर्ता या ठिकाणी इंग्रजांनी पाठवले व त्रिंबकजी डेंगळेस (चुनारगड) बंगाल या ठिकाणी पाठविले. त्रिंबकजी डेंगळेची ठेव सावकाराजवळच आहे ही घटना पुण्याच्या दोन मोठया

जहागीरदारांना माहिती होती. तीच गोष्ट जहागीरदारांनी उमाजीस सांगितली. तेव्हा उमाजीने भाईचंद भिमाजी गुजर या सावकारास पकडून साकुर्डी येथे आणले व त्यांच्या कडून ९०० रुपये घेतले.[१२२]

या सावकाराच्या संदर्भात उमाजीस सरकार कडून स्पष्टीकरण विचारले. [१२३] तेव्हा उमाजीने उत्तर दिले की त्रिंबकजी डेंगळे याच्या पैशांच्या संदर्भातील लफडे मिटवण्यासाठी सावकाराने स्वत:हुन दिले होते आणि त्याने जबरदस्ती करून त्याच्याकडून पैसे मागितले नाहीत.[१२४]

ही घटना सावकरांच्या फलटणच्या आप्तेष्टांना कळाल्यावर त्यांनी मामलेदारांमार्फत सातारच्या छत्रपतींना कळवली आणि नंतर छत्रपतींनी रेसिडेटना कळवून ९०० रुपये उमाजीच्या पगारातून कापून घेऊन त्या सावकारास परत दिले. [१२५]

फलटणच्या पूर्वेस साकुर्डी गावापासून २५ कोसांवर धरमपूरी नावाचे एक गाव आहे. त्या गावचा पाटील श्रीमंत असल्याचे समजताच, उमाजीने त्याच्या घरावर दरोडयाचा बेत आखून एक टोळी पाठविली. त्या टोळीने २१ एप्रिल १८३० रोजी दरोडा घालून सोने चांदी व मौल्यवान कपडे असे एकंदरीत २००० रुपयांचा माल लुटून आणला. त्यापैकी उमाजीस ७०० रुपयांचे दागीने व ५०० रुपयांचे कापड या टोळीने नजर केले. शिवाय याच टोळीचा जो रामोशी नाईक होता, त्याचा घोडा ही उमाजीने घेतला.

शिवाय त्याच दिवशी जेजुरीच्या इशान्येस पाच मैलांवर असलेल्या आंबेगावच्या वाण्याच्या घरावर उमाजीने कैकाड्यांमार्फत दरोडा टाकून २३० रुपयांचा माल लांबविला.[१२६]

उमाजी नाईकांची नवीन खेळी

इतर टोळयांकडून दरोडे घालणे, व त्यातील हिस्सा घेणे, आणि हेरांकडून बडया सावकारांच्या बातम्या घेणे. अशी नवीन खेळी उमाजीने सुरू केली.

साकुर्डीच्या आसपासच्या गावी लग्नकार्य, मुंजी, इत्यादीची अगदी कसुन उमाजी बातमी काढीत असे. याच्यासाठी उमाजी त्याच्या हेरांकडून अशा बातम्या अचुक काढीत असे. साकुर्डीच्या उत्तरेस दोन कोसांवर (४ मैलांवर) येरवतपूरच्या कुलकर्ण्याच्या घरी त्याच्या मुलीच्या लग्नाची जय्यत तयारी केली होती. हीच वेळ साधुन १ मे रोजी कैकाडी व महार यांनी अचानक जाऊन कुलकर्ण्याच्या घरावर छापा घातला आणि लग्नाच्या वस्तुंची लुट केली. या लुटीत १४५० रुपयांचा माल आणला. हा परिसर उमाजीच्याच देखरेखीखाली असल्याने, गावकऱ्यांनी उमाजीवरच संशय व्यक्त करून, तसा तक्रार अर्ज कुलकर्ण्यांनी मामलेदारांकडे केला. म्हणजेच साकुर्डे आणि परिसरात होणाऱ्या चोऱ्यांमध्ये उमाजीचाच हात होता, ही लोकांची कल्पना खरी होती. परंतु लोक त्याचे नाव उघडपणे घेण्यास घाबरत असत. हे प्रकरण जास्तच डोकं वर काढतयं हे समजताच उमाजीने एक महार व एक वृद्ध कैकाडी यांना दरोडेखोरांपैकी म्हणून पुण्याच्या मॅजिस्ट्रेटकडे पाठवून दिले. त्याच प्रमाणे उमाजीचा निरोप आल्यावर तो कुलकर्णी उमाजीस भेटण्यासाठी साकुर्डीस गेला तेव्हा त्यास ७०० रुपयांचे कापड देऊन सर्वच ऐवज मिळाण्याची पावती त्याच्याकडून लिहून घेतली.[१२७]

याच वेळी साकुर्डीहून रामोशांच्या दोन टोळया दरोडे घालण्यासाठी निघाल्या, एक वाई प्रांताकडे व दुसरी भीमथडी कडे. भीमथडीच्या टोळीचे नेतृत्व करणारे सासवडचेच सुरिवया व रावजी हे दोन रामोशी होते. या टोळीने भीमथडी तालुक्यात वडगावला जाऊन १९ मे १८३० रोजी ब्राम्हणाच्या घरावर दरोडा टाकून ३००० रुपयांचा माल लांबवला. त्यातील ६०० रूपयांचा माल उमाजीस मिळाला.

- त्यानंतर १५ जून १८३० रोजी कैकाडी व रामोशांनी पारगावच्या कुलकर्ण्याच्या घरावर दरोडा घालून जवळ जवळ ६२४ रुपयांचा माल हडप केला. त्यामध्ये सोने, कपडे, आणि तांब्याची भांडी होती.

- १० ऑगस्ट रोजी बारामती नजिकच्या डोरलेवाडीची दोन घरे लुटली. त्यातून त्यांनी ३६२ रुपये मिळवले.
- २३ ऑगष्ट १८३० रोजी पुरंदरच्या एका रामोशी टोळीने किकवी जवळ, आळंदीच्या देशपांडयाच्या घरी दरोडा घातला. त्यात त्यांनी १७९५ रुपयांचा माल हाडप केला व ते साकुर्डीस आले. त्यामध्ये सोने मोत्यांचे दागीने मिळाले.शिवाय सप्टेंबर महिन्यात दोन तीन दरोडे घातले.

  या खेरीज पुढे साकुर्डीस असे पर्यंत दुसऱ्या कोणत्याही दरोडयात अगर चोरीत उमाजी नव्हता.

उमाजीचे पुण्यास स्थलांतर

कंपनी सरकारच्या नोकरीत असून सुध्दा उमाजी नाईकांनी साकुर्डी येथे राहून आसपासच्या प्रदेशात कैकाडी, रामोशी, मांग, महार यांच्या करवी उमाजीने लोकांच्या घरांवर अनेक दरोडा टाकून, पैसा मिळवला. ब्रिटिशांनी उमाजीची ज्या कामासाठी नियुक्ती केली होती, ती म्हणजे त्या प्रांतात शांतता व राखण्याचे. परंतु त्याच प्रांतात उमाजीने दंडुकेशाही व हुकूमशाही चालवली होती. ही त्याची पध्दती फार दिवस चालू देणे कंपनी सरकारच्या कोणत्याच दृष्टीने इष्ट नव्हते. कंपनी सरकारने या कामाकरिता त्यास नोकरीत ठेवले नव्हते. म्हणून कंपनी सरकारने उमाजीस साकुर्डीहुन उचलुन खुद्द पुण्यास कलेक्टर साहेबांच्या नजरे खाली आणून ठेवायचे ठरविले. त्याचे कारण म्हणजे राणु व हनुमंता प्रकरण.

राणु व हणुमंता प्रकरण

दिनांक २५ सप्टेंबर १८२९ रोजी पुण्याच्या खजिन्याच्या विहिरीजवळ असलेल्या मंगलदास शास्त्रीच्या घरावर पुरंदरजवळील सोनेरी गावचा हणुमंता रामोशाने दरोडा टाकून १००० रुपयांचा माल लुटून नेला. ही चोरी उमाजीच्या संमतीशिवाय झाल्यामुळे उमाजीने धमकी देऊन हणुमंताकडुन ५०० रुपये रोख घेतले आणि १०० रुपयांची एक चिठ्ठी

दंडादाखल घेतली. एवढे करूनही आपला अधिकार केवढा आहे हे जाहीर व्हावे म्हणून उमाजीने हणुमंताच्या धाकटया भावास व त्याच्या टोळीतील काही लोकांना पकडून पुण्याच्या मॅजिस्ट्रेटसमोर उभे केले. रितिप्रमाणे चौकशी होऊन त्यांना सक्त मजुरीची शिक्षा झाली.

यानंतर उमाजीचा भाऊ (आमृता) याने काही दिवसांनी सोनेरीस जाऊन हणुमंता व त्याच्या घरच्यांना त्रास दिला. याच त्रासाचा सुड उगवण्यासाठी हणुमंताने १९ मे १८३० च्या वडगांवच्या दरोडयाची संपूर्ण माहिती राणु रामोशास दिली. हा राणू रामोशी यवतचा असून तो एल्फीस्टनच्या कालावधीत सरकारला सहाय्य करण्यास प्रसिध्द होता.[१२८] सन १८३० च्या मे महिन्यात वडगाव येथे पडलेल्या दरोडयातील एक ब्राम्हण ठार झाला होता. हा दरोडा उमाजीच्या हस्तकांनी टाकला होता. हणुमंताने दिलेल्या माहितीमुळे दरोडयातील बरेच लोक ११ व्या पलटनीच्या तुकडीने पकडले. ते सर्व रामोशीच होते. परंतु याच दरोडयातील आणखी दोन रामोशी उमाजीच्या आश्रयाखाली आहेत अशी माहिती हणुमंताने दिली. ही माहिती मिळताच त्याच तुकडीच्या अंमलदाराने ते दोन रामोशी ताबडतोब पाठवून देण्याच्या ताकिदीचे पत्र दिले, परंतु या पत्राचे उत्तर उमाजीने दिले नाही, हे पाहुन त्या अंमलदाराने आपली फौजेची तुकडी व राणु रामोशाला घेऊन साकुर्डीस गेला. (१२ ऑक्टोबर १८३०) परंतु या वेळी उमाजीच्या लोकांनी राणुवर बेदम हल्ला केला. उमाजीचे लोक पुष्कळ असल्याने अंमलदाराचेही काहीच चालले नाही. उलट त्यालाही उमाजीच्या लोकांनी जिवाची जर तुला पर्वा असेल तर इथून ताबडतोब निघून जा." नाही तर राणुप्रमाणे तुझी पण अवस्था होईल असे खडसाऊन सांगितले. राणु हा यवतचा असून त्याने आमच्या हद्दीत येऊन हस्तक्षेप, ढवळा-ढवळ करण्याचे काहीच कारण नाही असेच उमाजीचे मत होते. कारण त्या प्रांताचे बंदोबस्ताचे काम हे इंग्रजांकडुन उमाजीसच मिळाले होते हे सुध्दा उमाजीने अंमलदारास ठणकाऊन सांगितले आणि उमाजीने राणू रामोशास पकडून ठेवले. [१२९]

तुकडी अंमलदार सासवडास गेल्यावर काही घोडेस्वार साकुर्डीस पाठवून राणुला सोडण्याचा निरोप दिला. तोही हुकूम उमाजीने जुमानला नाही. उमाजीच्या या धाडशी कृत्याचा परिणाम चांगला होणार नाही, हे स्वतः उमाजी जाणून होता. आणि तरी सुध्दा उमाजीने प्रती उत्तर दिले की राणुच्या हाता खालील हणुमंता रामोशी यास साकुर्डीस पाठवा, कारण त्याचाही या पुष्कळ चोऱ्यांमध्ये सहभाग आहे."

सरकारला पाठविलेल्या पत्रात (१३ ऑक्टोबर १८३०) म्हणतात. "यापुढे उमाजी व त्याच्या साथीदारांवर लक्ष ठेवले जाईल." व राणुची सुटका करण्यासाठी उमाजीचा भाऊ (कृष्णास) पाठवले जाईल" परंतु उमाजीच्या वाईट वागण्यामुळे दुसऱ्याचा दिवशी राणुस सोडणे बाबत कलेक्टर साहेबांचा हुकूम उमाजीस आला. त्या हुकुमाप्रमाणे उमाजीने राणुस बंधमुक्त केले. बंधमुक्त होताच राणु पुण्यास दाखल झाला. राणु पुण्यास निघून गेल्यावर उमाजीने त्याच दिवशी आपल्या साथीदारांसह साकुर्डीस कायमचा राम राम केला आणि शेजारच्या डोंगरात जाऊन राहिला. या वर्तनाबद्दल सरकारकडून क्षमा होणे अगदी अशक्य होते. याच कृत्यामुळे सरकारने त्याला पुरंदरच्या पोलीस खात्यातील जागेवरून हटवण्याचे ठरवले.

उमाजीच्या वाईट वागण्यामुळे त्याचा पाठलाग करण्यास नगरचे कमांडर कॅ. मॅकिंन्टॉश यांच्या नेत्रृत्वाखाली लष्कर पाठवले.[१३०] उमाजी डोंगरात राहून पुन्हा गोंधळ उडवून देईल, असे होऊ नये म्हणून उमाजीस पायबंद घालण्यासाठी ५०० लोकांची तुकडी कॅ. मॅकिंन्टॉशच्या नियंत्रणखाली पाठविण्यात आली.[१३१] दरम्यान पुण्याचे कलेक्टर गिबर्न यांनी १६ ऑक्टोबरला उमाजीस खालील सूचना दिली.

"जर तु (उमाजी) पुण्यात येण्याचे निमंत्रण अमान्य केले तर तुझे वर्तन बेकायदेशिर ठरवून तुला योग्य ती शिक्षा ठोठावण्यात येईल" त्याचप्रमाणे उमाजीच्या साकुर्डीच्या पलायणाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी दाजीबा घोरपडे यांना महाबळेश्वर येथे गव्हर्नर कडे पाठवले. दरम्यान महाबळेश्वर येथे असे ठरले की उमाजीस[१३२] यापुढे

साकुर्डीस ठेवायचा नाही. त्याने पुण्यासच राहिले पाहिजे. त्याचा पगार त्यास पुण्यासच मिळणार होता. त्याचप्रमाणे साकुर्डी व त्याच्या आसपासच्या प्रदेशांच्या बंदोबस्ताचे काम उमाजीचा भाऊ कृष्णाजी याचकडे सोपवले जावे. उमाजीने आठ दिवसांच्या आत पुण्यास येऊन रहावे हा हुकूम उमाजीने मोडल्यास त्याच्याशी कशी लढाई करायची याची रणनिती ठरविण्यासाठीच गव्हर्नर साहेबांनी मॅकिंन्टॉशला महाबळेश्वरी समक्ष भेटीसाठी बोलावले होते.

याप्रसंगी पुढे माल्कम् साहेब म्हणतात की उमाजीचे हे वर्तन ठीक नाही. १८२८ च्या कबुली जबाबाच्या विरूध्द उमाजी वागत आहे म्हणून त्याच्या कुटुंबियांना संरक्षण देऊ नये. त्याचप्रमाणे मालकमसाहेब असेही म्हणतात की उमाजीस क्षमा करावी. तसेच भुतकाळातील चुकांबद्दल कबूल करून घ्यावे. उमाजीचे सहकारीव भाऊ हे जर उमाजीप्रमाणे वाईट कृत्य करायचे थांबले नाहीत तर त्यांची वतने काढून घ्यावीत व त्यांना कडक शिक्षा करावी. [१३३]

परंतु उमाजीने प्रसंगावधान ओळखून सर्व मुदत संपण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ५ नोव्हेबर १८३० रोजी तो आपल्या कुटुंबासह साकुर्डीहून पुण्यास मॅजिस्ट्रेट पुढे हजर झाला.

या सर्व बाबी करिता जामीन म्हणून कसबा पेठेतील नायकोजी रामोशी (नाईक) याने मजकूर लिहून दिला तो असा "आज पासून उमाजी नाईक नोकरीचे किंवा वतनासंबंधीचे कोणत्याही कामा करिता जाणार नाही. तो जर अशा प्रकारच्या कामाबद्दल पुण्या बाहेर परवानगीशिवाय गेला, असे झाले तर आम्ही आपले वतन सोडून देऊ, व दंड रुपये ५०० पर्यन्त भरू. दंड न दिल्यास तीन वर्षांपर्यन्त कैदेत राहू. इथून पुढे पुण्याच्या मॅजिस्ट्रेटच्या परवानगीशिवाय आपण पुणे सोडून कोठेही जाणार नाही, अशी हमी सरकारने पुरंदर प्रदेशातील पाचगावांच्या पाटलांकडून त्याच प्रमाणे उमाजी कडून घेतली. हे सर्व रितसर झाल्यावर शेवटी सरकारने उमाजीस घर बांधण्यासाठी आगाऊ २०० रुपये

दिले. यानंतर मात्र तो स्वस्थपणे काही एक न करता मिंधा होऊन स्वस्थ पडून राहील असे सरकारला वाटले.

कॅ. मॅक्किंटॉश म्हणतात "ज्याला उमाजीच्या स्वभावाची खरी माहिती होती त्याला असे कधीच वाटणार नाही."[१३४]

थोडक्यात उमाजीचे स्थलांतर सरकारने पुण्यास केले. त्यामुळे त्यांच्यात स्थित्यंतरही घडून आले. उमाजीचे पुर्वीचे उपदव्याप सर्व बंद पडले. पुण्यास त्यास कोण विचारीनासे झाले. अगोदर वाघाप्रमाणे डरकाळ्या फोडणारा उमाजी पुण्यात आल्यावर गायी प्रमाणे नरम झाला होता. हा फरक उमाजी सारख्या चाणाक्ष व फार दिवस अनियंत्रित सत्ता, अधिकार गाजविलेल्या उमाजीच्या लक्ष्यात येण्यास फार वेळ लागला नाही. स्वस्थ बसून सरकारी अन्न खाणे त्यास आवडले नाही. काहीतरी खटापटी करून तेथून बाहेर पडण्याचा मार्ग तो शोधू लागला.

संदर्भ सुची

१) दिक्षित. म.श्री.- पिचलेली मनगटे, प्रकाशक -सौ.सुमित्रा ग. क्षीरसागर, अतूल प्रकाशन, पुणे, प्र.क्र. ५३.

२) पाटोळे शिवाजी- माझे स्वप्न साकार झाले. प्रकाशक- प्रमोद भोंगटे, मायबोली प्रकाशन - मुंबई, प्र.क्र.१३

३) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकमाला नं-२३, भारतभुषण, सदाशिव पेठ-पुणे. १९१०, पृ.क्र.३३

४) पाटोळे शिवाजी-पृ.क्र. १३,१४

५) भागवत अ.ना.- पृ.३४

६) आठवले सदाशिव- उमाजी राजे मुक्काम डोंगर, प्रकाशक- अ.अ.कुलकर्णी, कॉल्टिनेंटल प्रकाशन, पुणे-३०, पृ.क्र.२३.

७) सातारा रेसिडेन्सी मराठी दप्तर रुमाल नं. ४७, पत्र क्र १६४.

८) एकके शिवाजीराव-आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक, प्रकाशक- श्री. गजानन शिवाजीराव, प्र.क्र.१२.

9) Macktsh p.129

१०) भागवत अ.ना.- पृ.क्र. ३९

११) आठवले सदाशिव- पृ.क्र. २५

१२) भागवत अ.ना.- पृ.क्र. ४०

१३) कित्ता- पृ.क्र. ४०

१४) खोबरेकर वि.जो.- महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८-१८८४), प्रकाशक - सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ - मुंबई, पृ.क्र. ४२

15) Mackintosh- P.P- 132, 133

16) Mackintosh- P.P- 133

17) A Letter from oriminal jails poona to david Greenhill secretary to government of Bombay, Dated : 5-7-1825, J.D. Vol. 8A/89 of 1825, p.n. 625

१८) भागवत अ.ना.- पृ.क्र. ४२

१९) सा.रे.म दप्तर- रुमाल नं ४७, पत्र - १६६

२०) पाटोळे शिवाजी- पृ.१८

21) Mackintosh- P.P- 135

२२) भागवत अ.ना- पृ. क्र. ४७

23) Mackintosh- P.P- 135

24) Mackintosh- P.P- 135

२५) सातारा महाराज रेसीडेन्सी मराठी दप्तर, रुमाल नं ४७ क्र.१७०

२६) शिवाजीराव एक्के- आद्यक्रांतीवीर उमाजी नाईक, पृ.क्र. १९.

27) H.D .Robertson collector & masistrate of poona Dated - 31-03-1826, j.p.vol- 17/118 of 1826 p. 845

28) Mackintosh- P.P- 136

२९) पाटोळे शिवाजी- माझे स्वरन साकार झाले, प्रकाशक-प्रमोद भोगटे, मायबोली प्रकाशन मुंबई, पृ.क्र.२०

३०) आठवले सदाशिव- पृ.क्र.२८

३१) सा. म.रे. म. दप्तर- क्र. १६५

३२) भागवत अ.ना.- पृ.क्र. ५२

33) Mackintosh- P.P- 138

३४) भागवत अ.ना.- पृ.क्र. ५५

३५) सा.म.रे.म दप्तर- क्रमांक ४७

36) A Letter from capt.spiller to H.D Roberson, Dated 4-7-1827, j.p.vol. 14/140 lf 1827 p. 143

३७) सा.म.रे.म दप्तर- क्र. ४७, पृ.क्र. १७३

३८) सा.म.रे.म दप्तर- क्र. ४७, पृ.क्र. १७९

३९) सा.म.रे.म दप्तर- क्र. ४७, पृ.क्र.१८१

40) Mackmtosh- p.p 139-140, A letter from H.D Robatsoon collector & magistrate of poona to charle norries secretary to govemmat of Bombay, Dated 3-9-1827, j.d.vol.14/140 lf 1827 p.p 519-520.

४१) भागवत अ.ना.-पृ.क्र. ५८, & mackmtosh, p.143

४२) खोबरे कर वि.गो.- इंग्रजी सत्ते विरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव, १८१८-१८६०, पृ.क्र. २८

४३) भागवत अ.ना.-पृ.क्र. ६३

44) Mackhtosh- p.142

45) True translafion by H.D. Robertson J.D.Vol. 14/140 of 1827 p.p. 765/766 A letter from patil of turf kauraoo barra to capt.robertson, date 23-11-18279.

46) (true translation h.d.Robertson) Dated 15-11-1827 , J.D.Vol. 14/140 of 1827 p.916

47) Government to Magistrate of poona, dated 20-10-1827, J.D.Vol. 14/140 of 1827 p.685

49) Mr.milet to capt. Robertson 18-11-1827, J.D.Vol. 14/140 of 1827 p.7

५०) सा.म.रे.म दप्तर- रुमाल क्रमाक ४७, पत्र १८७

51) Captan Robertson to Charles Noris secretary to government of Bombay, Dated 19-11-1827 p.p.vol. 15/270 of 1827, p.p 23 -25

52) Capt Robertson to Charles Norris secretory to govermeant of Bombay, Dated 24-11-1827 P.D.vol. 15/270 of 1827, P.P. 1517.

53) A Private Latter from Capt. Deviss in Pingori to capt. Robertson, Dated 27/11/1827, P.D.vol. 15/270 of 1827 P.P.117-118

54) Capt. Robertson to charlles Norries Secretary of gov.of Bombay, dated 19-11-1827, P.D.vol. 15/270 of 182, p.p. 41-42

55) Ibid- P.p 43-44

५६) एक्के शिवाजीराव- आदय क्रांतिवीर उमाजी नाईक, प्रकाशक - गजानन शिवाजीराव एक्के, पृ.क्र. २९,३०

५७) सातारा महाराज रेसिडेंन्सी मराठी दप्तर रुमाल नं ४७, प.१८६

५८) सा.म.रे.म दप्तर- रुमाल क्रमाक ४७, पत्र १९०

59) P.D.Vol- 15/270 / 1827, p.p. 16,71

६०) सा.म.रे.म दप्तर- रुमाल क्रमाक ४७, क्र.१९२

61) A question put by cape Robentson to the village officers Dated 26-11-1827 P.D.vol, 15/1827, p.p45-46

62)Translation by H.D. Robertson , Dated 28-11-1827 Ansuer by the whole of the patils after mafure deliberation ihbd p-47

63) Villages officer four kullms to H.D Robertson, Dated 28-11-1827 ibid, p.p 48,49

64) A letter from capt Robertson to Vishnu Ramchandra Dated 28-11-1827 ibid, p.p 51,52

65) Capt. Robertsonto Resident at satara, Dated 28-11-1827 ibid, p.p 53,54

66) A letter from Umaji & bhajaji naik to capt robortson , Dated 28-11-1827 ibid, p.p 61,62

६७) सा.म.रे.म.दप्तर- रुमाल क्रमाक नं ४७/१९९

६८) कुलकर्णी अ.रा.- कंपनी सरकार (ईस्ट इंडिया कंपनी), प्रकाशक दिलीप माजगावकर, राजहंस प्रकाशन पुणे, पृ.क्र. १३९-१४०

६९) भागवत अ.ना.-उमाजी नाईक यांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकमाला नं २३, भारतभुषण, पुणे-१९१०, पृ.क्र.७२,७३

७०) किता- पृ.क्र. ७५,७६

71) Collector and magistreitse of noreth konkan J.B.Simsan to capt Robertson, Dated 11-12-1827 J.D.vol 13/39 of 1827, p.p. 729-732

72) Ibid-P.P. 801-802

73) J.D. Vol- 14/140 of 1827 P.711

74) Sir John malcom governer of Brobay to cap Robortson Dated 15-12- 1827, J.D. vol. 15/270 of 1827 p.p 94,95

७५) सा. म.रे.म.दप्तर- क्रमांक २०३-२०६, प्र.क्र.२०३-२०६

७६) सा. म.रे.म.दप्तर- क्रमांक ४७, पृ.क्र. २०७

७७) कित्ता- क्रमांक २०८

७८) भागवत अ.ना- पृ.क्र. ७६,७७

79) Mackintosh- p. 151Or P.D.vol.13/304 of 1827 Dated 20/12/1827, p.p 279-280

80) Mackmtosh- p. 152

81) A proclamation by government to colleation & magistrate of poona. H.D Robertson dated - 20/12/1827, p.d vol 15/270 of 1827 P.P. 91-92

82) P.D.vol. 13/304 of 1827 Dated 31-12-1827, p.p. 42,43

83) Capt. Robertson to Charles Norries, searetary to govt. of Bombay Dated 19-12-1827, P.D.vol. 13/304 of 1827 P.D 205,207

84) P.D.vol.- 15/270 of 1827 p.p 61,62

85) Mackintosh- p.p. 153,154

८६) भागवत अ. ना.- पृ.क्र. ८७

८७) आठवले सदाशिव- उमाजी राजे मुक्काम डोंगर, कॉनिटनेटल प्रकाशन -पुणे, पृ.क्र. ४६ (१४७)

८८) Capt spiller to Charles norrles secretory to govt.of Bombay. P.D. vol 13/304 of 1828, p.p 150-151

89) Capt spiller to R-mills acting collecter of msgistrate of pune. Dated 28/2/1828, P.D.vol 13/304 of 1828. 3, p.p. 380,382

90) Ibid- p. 383

91) Ibid- p. 451,457

92) Ibid- p. 442

93) Sir John Malcom governer of Bombay to R. mills (acting collector and magistrate of poona) Dated -8/5/1828, P.D.vol. 13/304 of 1828 . p.p. 546-548

९४) एकके शिवाजीराव- आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक, पृ.क्र. ३८

९५) सा.म.रे.म. दप्तर- रुमाल नं ४७, ७८ ते ९९

९६) सा. म.रे. म. दप्तर- रुमाल क्र. ४७, ३ मार्च १८२८ चे पत्र

९७) रे.सा.म- ४७/४४, सिदधी नवाबचे पत्र

९८) Mackmtosh- p. 157 आणि भागवत अ.ना. , पृ.क्र. ९२,९३

९९) एक्के शिवाजीराव- पृ.क्र. ४१

१००) Poona Gazzeteer- Vol.II p. 307

१०१) भागवत अ.ना.- उमाजी नाईकांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकमाला नं. २३, भारतभुषण-सदाशिव पेठ, पुणे १९१० पृ.क्र. ९३

१०२) J.D.vol.- 9/156 of 1828 p. 326

१०३) खोबरेकर वि.गो.- इंग्रजी सत्तेविरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव पॉलयुलर बु.क. डेपो मुंबई- ७, पृ.क्र.३० आणि भा.इ.सं.मं पत्र ले.क्र. २० परिशिष्टात आहे.

104) Mackmtosh- p. 158

105) Ibid- p.159

१०६) भागवत अ.ना.- पृ.क्र. ९७-९९ Or Mackmtosh- p.p. 159-161

१०७) भागवत अ.ना.- पृ.क्र. १००

१०८) एक्के शिवाजीराज- आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक, प्र.४४ कैकाडयांचे प्रकरण सा.म.रे. म.दप्तर ४७/४४

१०९) रे. सा.म. ४७ (४४), २४ ऑगस्टचे पत्र. १८२९

110)Mackmtosh- p.p. 162-164

१११) ऐतिहासिक संकिर्ण साहित्यखंड-५ (भा.इ.सं.मंडळ-पुणे), संपादक कै. पा.न. पटवर्धन, ले.क्र. २० परिशिष्टात

११२) सा.म.रे. म दप्तर- रु.नं. ४७ (४४) Or J.D. Vol. 10/203 /1830 P.P. 113-124

११३) एक्के शिवाजीराव- पृ. ४६

११४) सा.म.रे. म दप्तर- रु.नं. ४७ (४४) १७६

115) Capt.Robertson to government- dated 12-6-1829 J.D.vol 14/186 of 1829 p.p. 99-101

116) Capt.Robertson to govt - dated 3-7-1829, Ibid P.p. 140-142

११७) सा.म.रे.म. दप्तर- रु.नं. ४७ (४४) १७५

118) Capt Robertson to govt- dated 24-7-1829, J.D. vol, 14/186 of 1829, p.p. 160,163

119) Mackintosh- p. 164

१२०) पाटोळे शिवाजी- माझे स्वप्न साकार झाले, प्रकाशक प्रमोद भोगटे मायबोली प्रकाशन, जुलै १९९६ पृ.क्र.४८

121) Mackintosh- p. 165

१२२) आठवले सदाशिव- उमाजी राजे, मुक्काम डोंगर, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे. पृ.क्र. ६०-६२

123) Order to Umaji dated16-5-1830, J.D.vol 11/204/of 1830, p-170

124) Ibid- 171

१२५) आठवले सदाशिव- पृ.क्र. ६२

१२६) पाटोळे शिवाजी- माझे स्वप्न साकार झाले. पृ.क्र. ५३-५४

127) Mackintosh- p.p. 173-174

१२८) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकमाला नं.२३,भारतभुषण-पुणे १९१,पृ.क्र.१२६-१२७

129) Mackintosh - p.178

130) George giberne to govt.Dated 13-10-1830, J.D.vol. 3/196 of 1830, p.260

131) George Giberne to govt. Dated 13-10-1830, J.D.vol 3/196 of 1830 p.p 268-269

132) Giberne to Gov.- Dated 16-10-1830, Ibid p.p.162-163

133) Governar Sir John Malcoms dated 22/11/1830
Ibid P.P. 270-274

134) Makintosh- p.p. 179-180

प्रकरण पाचवे

आद्यक्रांतिकारक उमाजी नाईक

नजरकैदेतून सुटका व ब्रिटिशांशी कडवा संघर्ष (इ.स.१८३० जे १८३१)

कंपनी सरकारचा पगार आणि तिथे बांधून दिलेल्या घरात स्वस्थपणे पडून राहणे ही कल्पनाच उमाजीस पसंत नव्हती. उमाजीने कित्येक वर्षे स्वायत्ततेत आणि शेकडो लोकांवर हुकुमत गाजविण्यात काढली असल्याने, असले कंटाळवाणे जीवन त्यास मुळीच आवडले नाही. पुणे शहरात मॅजिस्ट्रेटच्या नजर कैदेत नेहमी राहण्याचा चार पाच आठवड्यातच कंटाळा आला. उमाजीचा स्वभाव चळवळ्या उपद्व्यापी आणि धाडशी असल्याने, आपला पुर्वीचा अधिकार आपणास पुन्हा कधी मिळेल याच विचारांमध्ये त्याने पुणे येथे दिवस काढले. पुर्वीच्या आपल्या धाडसा बद्दलचे विचार मानात येताच, हा रानातील वाघ, डोंगरातील सिंह आपले हे बंधन तोडून टाकण्यास तात्काळ तयार झाला. उमाजी बंधनातून मुक्त होण्यास तयार झाला.

उमाजी राहत्या घरी ३५ दिवस नजर कैदेत होता. त्याचवेळी मुंबईचे त्यावेळचे गव्हर्नर सर जॉन माल्कमसाहेब यांनी त्यांच्या कामाचा राजीनामा देऊन मुंबईहून विलायतेत गेल्याची बातमी उमाजीस समजली.[१] आणि अमाजीने याच परिस्थितीचा फायदा घेऊन पुर्वीच्या साथीदारांशी संधान साधले. उमाजीच्या जुन्या साथीदारांना निरोप मिळताच, तेही निरोपाप्रमाणे वेषांतर करून घराभोवती बैरागी, साधू, भिकारी बणून फिरत होते. एकमेकांना इशारा (संकेत) होताच पहारेकऱ्यांच्या बंदुका हिसकाऊन घेऊन घोड्यावरून रामोशी गेट मार्गाने पसार झाले. तो दिवस होता १६ डिसेंबर १८३०.

स्वातंत्र्याच्या इर्षेपोटी उमाजीने पुन्हा एकदा आपला पुर्वी सारखा क्रम सुरू करून आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्याकरिता कंपनी सरकारच्या चैनीच्या नोकरीला आणि त्याचबरोबर पुण्यालाही कायमचा रामराम ठोकला. आणि पुर्वीचा क्रम चालविण्यासाठी डोंगराचा रस्ता धरला. डोंगर व जंगलामधील मित्रांच्या सहवासात राहून त्यांनी योजना

आखल्या.उमाजीने त्याच्या साथीदार मंडळीसह श्रीमंत पंत सचिव यांच्या भोर इलाख्याकडे मोर्चा वळविला आणि तेथूनच त्यांच्या पहिल्या मोहिमेस आरंभ झाला.

स्वातंत्र्याची आस : उमाजी नजर कैदेतून निसटला तो सुख स्वाथ्यासाठी नव्हे. त्याची कैद काही वाईट नव्हती. पेन्शन चालू होती. मुलाबाळांची काळजीही ब्रिटिशांनी मिटवली होती. नजर कैदेत असताना कोणतेही कष्ट करण्यास सांगितले जात नव्हते. पूर्णपणे आराम होता. तरी सुध्दा उमाजी पळाला. कारण कंपनीचा नोकर होण्यापूर्वी त्याने जो आटापिटा केला, जे आव्हान स्वीकारले होते, यावरून ही बाब निश्चितपणे लक्षात येते की स्वातंत्र्यासाठी त्याला पुन्हा आंदोलन उभे करायचे होते.

उमाजीने स्वत:स राजा म्हणून घोषीत केले होते. त्याचे राज्य निर्माण करण्यासाठीच त्याने ब्रिटिशांची नोकरी पत्करली होती, ती याच साठी की अधिक माणसे व द्रव्य जमा करण्यासाठी आणि योग्य वेळी संधी मिळताच त्याने ब्रिटिशांविरोधात बंडाचा पवित्रा घेतला.

२७ डिसेंबर १८३० रोजी पुण्यातील कलेक्टर व मॅजिस्ट्रेट गिबर्न यांनी सरकारला कळविले की, उमाजीने सरकारची कोणतीही पूर्व परवानगी न घेता पुण्याहून पलायन केले.[२]

नंतरच्या कालावधीत पुष्कळ वेळा नाईक (रामोशी) पुण्यास जात असत. तेंव्हा तेंव्हा ब्रिटिश अधिकारी उमाजी बद्दल चौकशी करीत. तेव्हा उमाजीचे गुप्त ठिकाण अद्याप सापडत नाही. तो कोठे दडी देऊन बसला आहे हे कळाले नाही असे ते सांगत. पुढे असे ही सांगत की, ज्याअर्थी तो सापडत नाही त्या अर्थी तो या प्रांतात नसून दुसऱ्या एखाद्या राज्याच्या प्रांतात निघून गेला असावा.[३]

त्यावेळचे पुण्याचे कलेक्टर मि. गिबर्न होते. त्यांनी इतर दुसरे जे रामोशी सरकारी नोकरीत होते त्यांनी कंपनी सरकारशी इमानाने वागल्याबद्दल व आपले कर्तव्य योग्य रितीने बजावल्याबद्दल वदवून घेतले होते. डिसेंबरच्या अखेरीस साकुर्डी येथे आणखी दुसरे

रामोशी नाईक आणि रामोशी लोक होते, ते सर्वजण गाव सोडून निघून गेल्याच्या बातम्या येऊ लागल्या. उमाजी व त्यांच्या साथीदाराने हा जो बंड उभारण्याच्या घाट घतला होता त्यांचे केंद्रस्थान साकुर्डी होते.

पुरंदर प्रदेशातील रामोशांनी जर सरकारची सत्ता झुगारून दिली तर त्यांना दाबात ठेवण्यासाठी व उमाजीचा पाडाव करण्यासाठी त्याचप्रमाणे त्याचे बंड दडपून टाकण्यासाठी सरकारने जोराचे प्रयत्न चालवले होते, आणि त्या प्रांतात शांतता राखण्याकरिता तिकडे १३ व्या रेजिमेंटची एक तुकडी ताबडतोब रवाना करण्याचे ठरवले. त्या तुकडीवर कॅप्टन अलेक्झांडर मॅकिन्टॉश यांची नेमणूक करण्यात आली होती.[४]

मॅजिस्ट्रेट गिबर्न यांनी सरकारी सेवेत असणाऱ्या रामोशी नाईकांना सरकारी कर्तव्याशी प्रामाणिक राहण्याची आज्ञा केली.त्यांचा उमाजीचा भाऊ कृष्णाजी यावर विश्वास नव्हता. तो सरकारी सेवेत असला तरी त्याची (कृष्णाजीची) उमाजीला आतून मदत होत असल्याचा संशय होता.[५]

११ जानेवारी १८३१ रोजी उमाजी नाईक व त्याचे १२ साथीदार व सरकारी पैसा घेणारे त्यांचे अनुयायी यांना अनुलक्षून पुण्याचे मॅजिस्ट्रेट गिबर्न यांनी हुकूम दिला होता की, उमाजी नाईक व त्याचे १२ साथीदार व सरकारी पैसा घेणारे त्यांचे अनुयायी या सर्वांनी साकुर्डी पासून सहा मैलांवर असलेल्या सासुरगावी शुक्रवार दिनांक १४ जानेवारी १८३१ रोजी हजर व्हावे, व सरकारी फौजेला तुकडीवरील अधिकाऱ्यांस आपण आल्याचे कळवावे आणि तो जे हुकूम देईल ते निमुटपणे पाळावेत. हुकूम मोडल्यास हे लोक बंडखोर आहेत असे समजून त्यांचे पारिपत्य करण्यात येईल. या सरकारी हुकूमाच्या काही प्रती पुण्यात आलेल्या तिघा रामोशी नाईकास दिल्या गेल्या व सरकारच्या विरोधी असणाऱ्या रामोशी नाईकांना हा आदेश समजाऊन सांगण्यास त्या तिघा नाईकांना बजावले होते.[६]

तरी सुध्दा दि. ८ जानेवारीच्या रात्री पुणे घोडेस्वारांपैकी दोन घोडेस्वार पुणे येथील तुकडीस मिळण्यास जात आसतांना रस्त्यात वर्की येथे मुक्कामी असताना त्यांच्यावर काही हत्यारबंद लोकांनी हल्ला केला. त्यांना जखमी करून त्यांच्याकडील रोख ५०० रुपये लुटून नेले. यानंतर दोनच दिवसांत पुण्याच्या दिक्षिणेस कित्येक लोकांना भरदिवसाच लुटण्यात आले. त्याचप्रमाणे पुरंदरच्या किल्यावर असलेल्या शिपायांचा पगार घेऊन जाणाऱ्या लोकांस पकडण्याचा प्रयत्नही करण्यात आला होता.[७]

ब्रिटिशांच्या दृष्टीने उमाजीची ही डोके दुखी होती. परंतु इ.स. १८२७ पासून उमाजी विषयी समाजाच्या निरनिराळ्या थरातील माणसांची दृष्टी हळूहळू बदलत होती. त्यांच्या कडे केवळ एक चोर, दरोडेखोर, लुटारू म्हणून पाहून त्याला झिडकारणे किंवा त्यास पकडून इंग्रजांच्या स्वाधीन करणे, हे बरोबर होणार नाही असे अनेकांना वाटू लागले होते. अगदी गोरगरिबांपासून ते राजेरजवाडे या सर्व घटकांमधून त्यास पाठिंबा मिळत गेला.सामान्य जनतेला त्यांचा अभिमान वाटू लागला होता.

उमाजीच्या दृष्टीने पैसा मिळविण्यासाठी दरोडे आणि वाटमाऱ्या तर अपरिहार्यच होत्या ते सर्व पूर्व क्रमाप्रमाणे चालू राहणारच होते. दरोडे आणि इंग्रजांशी चकमकी या दोन्ही गोष्टी एकाच वेळी चालणार होत्या.

ब्रिटिशांच्या विरूध्द उमाजीची योजना

१) रामोशांच्या व इतरांच्या अगदी लहान लहान टोळ्या कराव्यात व ब्रिटिशांना शंकाही येऊ नये असा लहान गट आणि तोही शक्य तेवढा पसरून राहील असा ठेवायचा. त्यामुळे एकाच वेळी बऱ्याच मोठ्या क्षेत्रात दंगली करणे शक्य होणार होते. त्यामुळे ब्रिटिशांना गोंधळात टाकून त्यांना चुकवून पसार होणे सोपे होणार होते.

२) इंग्रजांच्या लोकांशी उघड मैदानात लढाया करायच्या नाहीत. संधी सापडेल तेंव्हा किंवा संधी शोधून शत्रूवर हल्ला करून पळ काढायचा कारण उमाजीकडच्या तोकड्या सैन्याची ताकद पाहता हाच मार्ग युध्द नितीच्या बाबतीत महत्वाचा होता.

३) लढणाऱ्या सैनिकांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर असतो, पण तोही उमाजीने सोडवला. टोळी वाल्यांनी कोणत्याही गावात मुक्काम करावा आणि गावकऱ्यांकडून खायला मागून घ्यावे. मात्र त्यामुळे गावकरी व जनतेला त्रास देऊ नये याची खबरदारी घ्यावी.

दि. ६/०२/१८३१ रोजी उमाजीने आपल्या सर्व नायकांना उद्देशून जे परिपत्रक काढले त्यात स्पष्ट शब्द आहेत की, "गावगन्ना रयतेस लोकांना उपद्रव देऊ नये, फक्त पोटास सरंजाम घेत जावा."[८]

यावरून उमाजीचा व्यावहारिक शाहणपणा एवढा मोठा होता की, एखाद्या मुत्सदी सेनानायकाला शोभेल असाच होता.

मांढरदेवीच्या डोंगरावरील चकमक (वाई)

उमाजीच्या नियोजनाप्रमाणे नजर कैदेतून सुटून आल्यावर पहिली चकमक झाली ती मांढरदेवीच्या डोंगरावर. २१ डिसेंबर सन १८३० रोजी रामोशांनी मोरवे गावी रखमाजी माळी यांच्या घरावर मोठा दरोडा टाकून गावोगाव वसुली व रोखे जमा करीत ते दिनांक २४ डिसेंबरला मांढरदेवीच्या डोंगरात जमावानिशी आहेत, अशी बातमी इंग्रजांना लागली.[९] त्याप्रमाणे आणखी रामोशांची एक टोळी भोर संस्थानातून लुटालुट करून मांढरदेवीच्या डोंगराकडे पळाली व डोंगरमाथ्यावर जाऊन बसली. अपेक्षेप्रमाणे इंग्रज शिपाई व सैनिक डोंगराच्या पायथ्याशी आले व डोंगर चढू लागले. ते जवळ येताच उमाजीच्या लोकांनी दगड गोटे व बंदुकांतून इतका मारा केला की सैनिकांना वर येणे अशक्य झाले. यामध्ये काही सैनिक जखमी झाले. काही मृत पावले. त्यामुळे ब्रिटिशांना

येथून माघार घ्यावी लागली. नंतर मात्र उमाजी पांडवगडाच्या डोंगरात गेला, (पांडवगड छोटा किल्ला वाईच्या डोंगरावर आहे.) आणि पुन्हा पुरंदरच्या डोंगरात आश्रय घेतला.

अंदोरी गावच्या सावकारास लुटले

१० जानेवारी १८३१ पर्यंत आपली आप्त मंडळी व दुसरी रामोशी नाईक मंडळी यांच्या शिवाय उमाजी कोणालाही भेटला नव्हता. वाल्हे गावच्या दक्षिणेस दोन कोसावर अंदोरी नावाचे एक खेडे गाव आहे. तिथल्या सावकाराला लुटण्यासाठी उमाजीने २० हेटकरी व १५ रामोशी यांची एक टोळी करून १० जानेवारी १८३१ रोजी रात्री अंदोरी गावी पाठवली. या टोळीचे सर्व अधिकार व नियोजन उमाजीचा चुलत भाऊ (मावसभाऊ) बापू सोलसेकर (सोलसकर) आणि धोंडी पिसा यांच्याकडे सोपविले. धोंडी पिसा हा भोर येथून पळून येऊन उमाजीच्या आश्रयास राहिला होता.

अंदोरीकर सावकाराचा गहाणाचा व्यापार होता. त्यामुळे त्यांच्याकडे पुष्कळ प्रमाणात सोन्या चांदीचे दागिने गहाण होते. ही सर्व माहिती बापू सोळसकरने उमाजीस दिली. त्यामुळे उमाजीने हा सावकार लुटण्याच्या मोहिमेची संपूर्ण जबाबदारी सोलसेकर कडे टाकली होती. या दरोड्यात त्यांना १३१४ रुपयांचा माल सापडला.[१३]

कंपनी सरकारची सज्जता (उपाययोजना)

उमाजीचा उपद्रव थांबविण्यासाठी सरकारने ११ जानेवारी १८३१ रोजी एक जाहीरनामा काढला तो देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी यांना उद्देशून काढला होता. त्याचा आशय असा की-

उमाजी बिन दादाजी नाईक खोमणे किल्ले पुरंदर यांस ज्याअर्थी त्याच्या या पुर्वीच्या सरकारी प्रांतातील सर्व गुन्हयांना क्षमा केली होती व वाटाघाटी केल्या, त्याच्या मर्जीप्रमाणे निर्णय घेतले, त्याच्या म्हणण्या प्रमाणे त्यास हक्क मिळवून दिले, त्याला वारंवार शांत राहण्याच्या सूचना केल्या, सरकारला समाधान होईल अशी नोकरी करण्यास सांगितले, परंतु या सर्व गोष्टींवर उमाजीने पाणी सोडले व लोकांना खूप त्रास दिला. सरकारी नोकरी

सरकारच्या अपेक्षेप्रमाणे केली नाही. हे दि. २३ आक्टोंबर १८३० च्या पत्राद्वारेही सरकारला कळविले होते. त्यानंतर सरकारचे हुकूम उमाजीला व्यक्तिश: दाखविले व स्पष्ट केले होते. त्यानुसार त्याने हुकुमाशिवाय व मान्यतेशिवाय पुणे सोडुन न जाण्याचे मान्य केले होते. त्याचप्रमाणे कोठेही अशांतता निर्माण करणार नाही, हे सुध्दा त्याने मान्य केले होते. तशी लेखी कबुली त्याने दि.९ डिसेंबर १८३० रोजी दिली होती. सुरूवातीस त्याच्या सर्व गुन्ह्यांना लेखी क्षमा सुध्दा कंपनी सरकारने केली होती.असे असतांना त्याने कराराचा व सरकारी हुकुमाचा भंग केला. अचानकपणे १६ डिसेंबर १८३० रोजी तो फरारी झाला. म्हणून तो सरकारच्या विरुध्द बंडखोर होऊन देशांत उठाव करीत आहे.

यापुढे कोणीही त्यास किंवा त्याच्या साथीदारांना कोणत्याही प्रकारची मदत करू नये. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात त्यास माहिती पुरवून किंवा अन्न पुरवठा करून जर त्यास कोणी मदत केली, तर त्यास पण उमाजीला जी शिक्षा होईल तीच शिक्षा करण्यात येईल, त्यांचे वतन जप्त करण्यात येईल. उमाजीस पकडण्यासाठी जे सरकारी लोक येतील त्यांना तुम्ही सर्व प्रकारची मदत केली पाहिजे. त्याचप्रमाणे जो कोणी या बंडखोर टोळीला मदत करीन त्यास कोणत्याही प्रकारे क्षमा केली जाणार नाही. जो कोणी सरकारची या कामी प्रामाणिक पणे सेवा, मदत करेल अशा सर्व लोकांना सरकार योग्य बक्षीस देईल.[११]

या जाहिरनाम्याच्या अनेक प्रती गावोगाव वाटण्यात आल्या. तसेच कॅप्टन मॅकिग्टॉशच्या सहाय्याने कॅ. बॉईड यांना उमाजीच्या करावायांविरोधी बंदोबस्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे मांढरदेवीच्या डोंगरावरील जी चकमक झाली त्यात कॅ. बॉईडला उमाजीस पकडण्यात अपयश आले. त्यामुळे गिबर्न यांने असमाधान व्यक्त केले. या घटनेनंतर कॅ. मॅकिन्टॅशने ताबडतोब सासवडला येऊन उमाजीचा पाडाव करण्यासाठी चपळाईने हालचाली सुरू केल्या. त्याचप्रमाणे गावचे पाटील व इतर व्यक्ती उमाजीस मदत करतात आणि सरकारला मदत करीत नाहीत असा आरोप गिबर्न यांनी

केला, व उमाजीचे बंड क्षमविण्यासाठी सरकारकडून जादा रकमेची व आणखी सैनिकांची मागणी केली.[१२]

बॅरन यांनी उमाजीच्या बंडाला संपुष्टात आणण्यासाठी प्रमुख कमांडिंग ऑफीसर म्हणून कॅ. मॅकिन्टॉशला १२ जानेवारी १८३१ रोजी सुत्रे दिली. आणि त्या दिवसापासून कॅप्टन मॅकिन्टॉशने आपल्या सैनिकांच्या जलद हालचाली सुरू केल्या.[१३]

यानंतर कॅ. मॅकिन्टॉशने सैनिकांच्या जलद हालचाली सुरू केल्या आणि पुरंदर प्रांतात ४०० सैनिकांच्या तुकडीसह प्रवेश केला. त्या सैनिकांच्या तुकड्या करून प्रत्येक मोक्याच्या ठिकाणी गस्त घालण्यासाठी ठेवण्यात आल्या. याच वेळी निरा नदीच्या दक्षिणेकडे सुध्दा ४० सैनिकांची एक तुकडी ठेवण्यात आली आणि ७५ सैनिक सोलापूर येथील कमांडिंग ऑफिसरला मदत करण्यासाठी पाठवण्यात आले.

याच पध्दतीने लेफ्टनंट लाईड व त्याची ११ वी रेजीमेंटची तुकडी भिवडीच्या डोंगरी परिसरात ठेवण्यात आली. या सर्व तुकड्यांनी उमाजीच्या हालचाली संबंधी चपळाईने माहिती एकमेकांना पुरवण्यात आली. याच पध्दतीने पुण्याहून लष्करी तुकड्या पश्चिमेकडील डोंगरात पाठविण्यात आल्या. त्याचप्रमाणे पुणे मुंबई रस्त्यावर संरक्षणाची उत्तम व्यवस्था ठेवण्यात आली.[१४]

दरम्यान याच वेळी उमाजीच्या टोळीतील येसाजी नाईक (निकारी) सिंहगडकर यांनी मौजे उरूळीच्या गावकऱ्यांना पैशाची मागणी करणारे एक पत्र पाठवले होते. त्याचा आशय असा मौजे ऊरुळीच्या मुकादमाने गावकऱ्यांकडून वर्गणी करून १००० रुपये घेऊन तयार रहावे. तसेच वाण्याकडून ५०१ रुपये म्हणजे एकूण १५०१ रुपये तो मागेल तेंव्हा मिळाले पाहिजेत असा आहे. त्याचप्रमाणे एक मण पीठ, ६ पायल्या तांदुळ, ८ शेर तूप, हे सर्व मुकादमाने जमा करून देण्याचे टाळले तर मुकादमास सिंहगडाला पकडून नेण्यात येणार होते व तिसऱ्याच दिवशी संपूर्ण गाव जाळण्याची धमकी दिली होती.[१५]

ब्रिटिशांनी उमाजीस पकडण्यासाठी नव नवीन क्लुप्त्या सुरू केल्या. ब्रिटिश फौजेतील लोकांच्या ४०-४० लोकांच्या अशा अनेक तुकड्या नेमल्या व त्या प्रत्येक तुकड्यांवर एक युरोपियन किंवा नेटीव्ह अंमलदार नेमण्यात आले. ज्या जंगलात, डोंगरात आणि दऱ्या खोऱ्यात रामोशी लोक नेहमी जात येत असतील, त्या ठिकाणी त्या तुकड्यांनी मुक्काम करावा. त्या प्रत्येक तुकडीने आपले ठाणे कोठे कायम केले आहे आणि कोणता प्रदेश व्यापला आहे, या बद्दलची माहिती, गरज पडल्यास सर्वास सहज रितीने समजावी, म्हणून परस्परांशी दळणवळण चालू राहील अशी तजवीज ठेवावी असे ठरले. रामोशी लोकांकडून रात्रीचे आक्रमण टाळण्यासाठी रात्रभर पहारा ठेवावा. त्याचप्रमाणे आपापल्या ठाण्यांपासून ठराविक अंतरापर्यन्तच्या भागातील सर्व जंगले डोंगर आणि दऱ्या खोऱ्या नेहमी धुंडाळीत रहाव्यात. त्या त्या भागांतील रहिवाशी लोकांस सौजन्याने आपलेशे करून घ्यावे. एकमेकांनी परस्परांवर पूर्ण विश्वास ठेवावा, परंतु कोणत्याही गावच्या रखवालदारावर काडीमात्र विश्वास ठेऊ नये. जर रामोशांची टोळी समोर आलीच तर त्यांच्याशी कसे वागावे याबाबात सरकारकडून सूचना मिळाल्या होत्या. रामोशांसाठी अशी जय्यत तयारी सरकारने केली होती. उमाजी पुरंदरच्या डोंगरातून निघाला म्हणजे तो कदाचीत भोरकडे वळेल, अशा समजुतीने कॅ. बॉईड याने आपले ठाणे भोरजवळ ठेवावे असा त्यास हुकूम झाला.

त्याचप्रमाणे कॅ. ब्युकन १६ जानेवारी १८३१ च्या सरकारी सुचनेनूसार ८० लोकांची तुकडी घेऊन जेजुरीकडे, दुसरी फौज ४० लोकांची किकवीकडे, १७ जानेवारी १८३१ रोजी १७ व्या रेजिमेंटचे लेप्टनंट नीपसाहेब परींचे गावाकडे, तसेच लेफ्टनंट मॅकन शिवरीकडे, ४०-४० लोकांच्या तुकड्या घेऊन रामोशांचा पाठलाग करू लागले.[१६]

उमाजीने सुध्दा रामोशी लोकांना अशाच प्रकारे सरकारशी कशा पध्दतीने तोंड दयायचे हे सर्वानुमते ठरविण्यासाठी, चर्चा करण्यासाठी कऱ्हेपठार येथील खंडोबाच्या देवळात काही रामोशांना बोलावून चर्चा केली होती. यावेळी मात्र ऊमाजी तेथे जमलेल्या

त्याच्या सर्व सहकारी व अनुयायांना मित्रमंडळींना मोठ्या प्रेमाणे भेटला. खंडोबाच्या देवळात देवासमोर उमाजी, इतर नाईकांनी व जमलेल्या सर्व रामोशी लोकांनी एकजुटीने आणि इमानाने वागण्याबद्दल बेलभंडार उचलून शपथ घेतली. उमाजीने याच वेळी सर्व मित्रमंडळींना एकजुटीचे महत्व पटवून दिले. पंत सचिवांच्या मुलुखात त्यांचे हक्क होतेव त्या हक्कांकरिताच ते आज पर्यंत झगडत होते. त्याच पंत सचिवाच्या मुलखावर पहिल्यांदा मोहीम काढावी, असे सर्वानुमते त्याच बैठकीत ठरले. या कडेपठारावरील खंडोबाच्या देवळात भरलेल्या बैठकीस सुमारे ३५० लोक हजर होते. यांमध्ये काही कोळी काही मांग व एक मुसलमानही होता.

याशिवाय जुन्नर आणि नाशिक येथील डोंगरात २०० कोळी लोक व सोलापूर जिल्ह्याच्या व निजामशाहीच्या सरहद्दीवरील खेड्यांतील तितकेच मांग लोक या बंडाच्या कामी तयार करून ठेवण्याची उमाजीची योजना होती.[१७]

उमाजीचे युध्द कौशल्य उत्कृष्ट होते. कारण कंपनी सरकारच्या फौजेबरोबर समोरासमोर मैदानावर लढाई करण्याचे साहस करून, त्याच्या लढाऊ रामोशांचे प्राण उगीच धोक्यात घलण्याइतका उमाजी अविचारी नव्हता. या उलट कंपनी सरकारच्या फौजेला त्रास देऊन तिच्यावर वारंवार छापे घालून, त्यांच्या तळाजवळील भाग जाळून, पोळून व उध्वस्त करून टाकायचे, अशा गनिमी काव्याच्या लढाईने आगदी जर्जर करून सोडायचे, अशी त्याची युध्दनीती होती. एकंदरीत उमाजी त्याच्या गणिमी काव्याच्या लढाईचे बेत ठरवित होता. १२५ जे १५० वर्षांच्या पुर्वीच्या चांगल्या सेनापतीच्या अंगी यापेक्षा विशेष गुण काय वेगळे थोडेच होते.

नियोजितपणे यांनतर उमाजीने त्याच्या २५० साथीदारांसह कऱ्हे पठाराहून पंत सचिवांच्या प्रांताकडे मोर्चा वळविला. यामध्ये १७ जानेवारी १८३१ रोजी बाजारवाडी या पंत सचिवाच्या गावावर दरोडा टाकून १०००रुपये मिळविले. याच वेळी तेथील दोन ब्राम्हणांना मांढरदेवी डोंगरावर नेले व त्यांच्याकडून पंत सचिवाला मोकासा हक्काबद्दल

पत्र लिहले. या घटनेची माहिती कॅ. बॉईलला समजताच त्यांनी सातारा येथून त्यांच्या फौजेसह चपळाईने हालचाल करून मांढरदेव गाठले. त्यावेळी त्यांना पंतसचिवाच्या लोकांनी मदत केली, परंतु मांढरदेव डोंगरावर थोडी चकमक होऊन काही सरकारी शिपाई उमाजीच्या प्रतिहाल्याने जखमी झाले. मात्र यावेळी उमाजी नाईकाच्या टोळीतील रावजी बारामतीकर व लिंबाजी या दोघांना पकडण्यात आले.[१८]

यानंतर उमाजीने टोळीचे दोन भाग केले. उमाजीने स्वत:बरोबर ५० लोक घेतले. भोजाजी नाईकासह ५० लोक घेऊन तो दक्षिणेला गेला. येथू निखारी, कृष्णाजी नाईक, व विठु नाईक हे पुरंदरच्या डोंगरात आणखी लोकांची जमवाजमव करीत होते. परंतु त्यांना यामध्ये फारशे यश आले नाही. कारण ब्रिटिशांच्या अनेक लहान लहान तुकड्या पुरंदरच्या परिसरामध्ये होत्या. म्हणूनच उमाजी नाईक त्याची टोळी घेऊन पुर्वेला चौंडेश्वराच्या डोंगराकडे आणि भोजाजी नाईक महाबळेश्वराच्या उत्तरेकडील डोंगरात निघून गेले.

भोजाजी नाईक महाबळेश्वराच्या डोंगरी भागात जवळ जवळ एक आठवडा होता. त्यावेळी डोंगरमाथ्यावर राहणाऱ्या लोकांकडून आणि धनगर लोकांकडून त्याला अन्न पुरवठा झाला होता. उमाजीचा मात्र सर्वच प्रांतात दरारा बसला होता. यावेळी पुण्याहून आणखी जादा सैन्य उमाजीच्या बंडाचा बिमोड करण्यासाठी पाठविण्यात आले. त्याच सुमारास ९ व्या रेजिमेंटचा लेफ्टनंट शॉ हा सोलापूरहून ७० सैनिकांची तुकडी घेऊन आला आणि फलटणच्या अग्नेय दिशेस महादेवाच्या डोंगरात गस्त घालू लागला. त्याचप्रमाणे दक्षिणेतून कोकणात उतरण्याकरिता जे घाट आहेत, त्या घाटांमध्ये १३ व्या रेजिमेंटच्या लेफ्टनंट फॉरबस आणि ११ व्या रेजिमेंटचा लेफ्टनंट ख्रिस्तोफर यांनी घाटांची नाकेबंदी केली होती.[१९]

दि. २४ जानेवारी १८३१ ला रात्री सासवड पासून दक्षिणेस डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या, पांगरी (खेडेगाव) या गावी उमाजी अन्न सामग्री घेण्याकरिता येणार होता. ही बातमी पांगरीच्या लोकांनी कंपनी सरकारास दिली. त्यानुसार तसा सापळा रचून उमाजीस

पकडण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु तो असफल झाला. कारण बंडवाल्यांनाही सर्व घटना कळाली होती.

उमाजीची अन्न सामुग्री

अन्न सामुग्री मिळविण्यासाठी रामोशी बंडवाले संध्याकाळच्यावेळी त्यांच्या ठिकाणापासून बाहेर पडून जवळच्या खेडेगावात जात. तेथे गेल्यावर टोळीकरिता जेवढे अन्न लागेल, तेवढयाची वर्दी गावाच्या पाटलाकडे देत. त्याचप्रमाणे त्या गावावर सरकारचा छापा पडणार नाही हे समजल्यावर मात्र सर्वच बंडवाले रामोशी त्या गावात जात. भाकरी आणि झुणका हेच त्यांचे अन्न असे. जर एखादया गावाविषयी संशय आला तर गावाच्या पाटलास निरोप देऊन सर्वांना पुरतील एवढ्या भाकरी, झुणका किंवा आमटी बंडवाले सांगतील त्या ठिकाणी ओढ्याकाठी किंवा विहिरीजवळ पाटलास नेऊन द्यावी लागत असे.

एखाद्या वेळी बंडवाल्यांचा ज्या ठिकाणी तळ पडला असेल आणि त्या बाजुने धनगरांचा मेंढरांचा कळप जात असेल तर बंडवाले रामोशी एखादे बकरेही घेऊन जात. त्या दिवशी मात्र त्यांची मोठी मेजवाणी होत असे.

एखाद्या गावी ओळख नसलीच आणि त्या गावातून त्यांना सामग्री घेण्याची आवश्यकता पडली, तर त्या गावातील एखाद्या गावकऱ्याला गाठून, त्यांच्याकडून हे काम करून घेत असत. कित्येक वेळा आपली अन्न सामग्रीबद्दल कोणास काही कळू नये म्हणून ते त्या सामग्रीबद्दल पैसेही देऊन टाकीत. परंतु अशा वेळी कोणी गावकऱ्यांनी फितुरी केली तर मात्र त्यांचा सुड घेतल्याशिवाय रामोशी राहत नसे. याच त्यांच्या धाकामुळे कोणीही त्यांच्याशी फारशी बेईमानी करीत नसत.[२०]

सासवड आणि जेजुरीच्या मध्ये दक्षिणेस एक मोठा डोंगर आहे त्यास पांगरीचा डोंगर म्हणतात. पांगरी गावापासून एक मैलावर असलेले एक ठिकाण म्हणजे एक डोंगर कडे आहे तेथे रामोशांचे गुप्तपणे वास्तव्य आहे त्या ठिकाणास झुमखळ असे म्हणत. या झुमखळीत एक मोठा दगड आहे तो म्हणजे सिंहासन त्या सिंहासनावर उमाजी राजा म्हणून

बसायचा. पूर्ण राजेशाही थाटाने हुकूम सोडायचा व मानपान आणि मुजरे स्विकारायचा. त्यांच्या दोन बाजुंना कुसाजी (सेनापती) व भोजाजी (प्रधान) म्हणून बसायचे. समोर दोन झेंडे लावलेले असायचे म्हणजे शिवाजी महाराजांचे जरी पटक्याचे ते निशाण होते. त्या झेंड्यापुढे पाच रुपये टाकल्यावर व शेजारी उभा असलेल्या हरकऱ्याकडे दोन रुपये दिल्यानंतरच उमाजीला सलाम केला जातो.

उमाजीचा हा दरबार ज्या ठिकाणी भरत त्या ठिकाणास (Bal Durah) असे म्हटले जात असे. त्या ठिकाणी ५०-६० रामोशी काही मुसलमान परदेशी आणि कुणबी मिळून सुमारे ८० माणसे होती.[२१]

यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, उमाजीस फक्त लुटारुंचा नायक व्हायचे नव्हते तर राज्यकर्ता म्हणून सत्ता हाती घ्यायची होती. पण एवढ्या मोठ्या ध्येयासाठी त्याचे बळ इंग्रजांच्या मनाने फार तोकडे होते.

झुमखळीत वास्तव्यास असताना खेडुतांनी एकदा त्यांना जेवन आणून दिले. परंतु विष प्रयोगाच्या शंकेने त्या अन्नातील काही भाग त्यांनी खेडुतांना खायला दिला.

गिबर्न यांनी २१ जानेवारी १८३१ ला सरकारला कळविले होते की, उमाजीला गावकऱ्यांकडून असेल तेथे अन्न पुरवठा होतो. तसेच त्याला सरकारी फौजेच्या बातम्या समजत असल्याने तो यशस्वी होत चालला आहे.[२२]

गव्हर्नर कौंसिलच्या मिटिंगमध्ये विल्यम न्युनहॅम यांनी २५ जानेवारी १८३१ च्या त्यांच्या अहवालात मार्शल लॉ (लष्करी कायदा) जारी केल्याचे समर्थन केले. त्याचप्रमाणे उमाजीस जिवंत किंवा मृत कसेही पकडण्याच्या निमंत्रणाचेही स्वागत केले. न्यून हॅमच्या मते या दोन गोष्टींमुळेच उमाजीच्या कारवायांना आळा बसेल,[२३] परंतु गव्हर्नर जॉन समोर (पूर्वीच्या कौन्सिल सदस्य) व १७ जानेवारी १८३१ ते २० मार्च १८३१ पर्यंतचे मुबईचे गव्हर्नर यांनी न्युहॅमच्या लष्करी कायद्याबद्दल समाधान व्यक्त केले. परंतु उमाजी जिवंत वा मृत पकडण्याचा कायद्याला (धोरणाला) विरोध केला. तसेच त्यांनी उमाजीच्या

पाडावासाठी त्यांच्या कारवायांना आळा बसविण्यासाठी, ज्यादा मदत देण्याचे गिबर्न यांनी मान्य केले. न्यूनहॅमने केवळ कामकाजात सुसुत्रता (एकसंघता) यावी म्हणून रोमरचा हा सल्ला मान्य केला. लष्करी कायदा जारी करणे किंवा उमाजी नाईकाला पकडण्यासाठी दिलेल्या बक्षीसात बदल करणे या गोष्टी न्यूनहॅमने मान्य केल्या नाहीत. [२४]

मॅजिस्ट्रेट गिर्बन यांनी लष्करी कायदा जारी करण्यासाठी सरकारकडे पाठविलेल्या पत्रात ते म्हणतात, लष्करी कायदा जारी नाही केला तर आपणास मोठ्या सैनिकांची गरज दिर्घ काळ लागेल. 'लोकांना सरकारच्या रागापेक्षा रामोशी टोळ्यांच्या प्रतिहल्याची जास्त भिती वाटते. जर लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे कृती करण्यास सांगितले तर ते निश्चित पणे रामोशांच्या बाजुने जातील. या बंडाचे प्रचंड स्वरूप लूटारूंचा व तेथील रहिवाशांचा स्वभाव यांचे खास वैशिष्टे आहे.'

म्हणून सरकारने दीर्घ काळ केलेला रामोशांचा पाठलाग, नाईकांना पकडण्यासाठी सरकारने केलेले निष्फळ प्रयत्न या सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे. तसेच काही निश्चित स्वरूपाची गंभीर पाऊले उचलली पाहिजेत. नागरी जीवनासाठी आपले कायदे परिपूर्ण असतील परंतु सध्याच्या रामोशी टोळीने माजविलेला हाहाकार, त्यांच्या नेत्याने कायद्याची केलेली धुळधाण, या गोष्टींच्या उपाययोजना आपल्याला कायद्याच्या तरतुदीत दिसून येत नाहीत.[२५] म्हणून सरकारने मान्यता दिल्यानंतर जॉर्ज गिबर्न (पुण्याचे कलेक्टर व मॅजिस्ट्रेट) यांनी उमाजी व इतर नाईकांना पकडण्यासाठी २६ जानेवारी १८३१ रोजी जाहीरनामा काढला तो पुढीलप्रमाणे.

२६ जानेवारी १८३१ चा कंपनी सरकारचा जाहीरनामा

१. उमाजी बिन दादाजी नाईक रामोशी ५००० रुपये व २०० बिघे इनाम जमीन.

२. भोजाजी नाईक रामोशी ५००० रूपये व २०० बिघे जमीन.

३. येसाजी नाईक निकारी सिंहगडकर ५००० रुपये व २०० बिघे जमीन.

४. कृष्णाजी दादाजी नाईक रामोशी ५००० रुपये व २०० बिघे इनाम जमीन एवढे बक्षीस जाहीर करण्यात आले.

त्याचप्रमाणे जो कोणी वरील नाईकांना पकडण्याची दिशा दाखवतील त्यांनाही २५०० रुपये व १०० बिघे इनाम जमीन दिली जाईल. सरकारच्या लोकांना बरोबर बातमी देणाऱ्यास वरील चौघांपैकी कोणी सापडला तर प्रत्येका मागे अधिक बक्षिसे मिळणार होती.

प्रत्यक्ष बंडात असलेल्या कोणीही वरील महत्वाच्या ४ लोकांना धरून दिल्यास त्यास बंडाचा गुन्हा माफ होणार होता. एवढेच नव्हे तर सरकाराची त्यावर विशेष मेहरबानी होणार होती [२६] म्हणजेच तमाम रयतेला बंड मोडण्याच्या कामी सामील करून घेण्याचा हा एक निकराचा प्रयत्न होता. प्रलोभने सुध्दा फार मोठी होती आणि ब्रिटिशांचे हे आव्हान उमाजीच्या दृष्टीने फारच भयावह होते. त्या जाहीरनाम्याच्या १५०० प्रती छापून २०० प्रती सातारा येथील प्रेसिडेंटला देण्यात आल्या, त्या साताऱ्याच्या राजामार्फत वाटण्यात आल्या. १०० प्रती कोकणातील मॅजिस्ट्रेटला देण्यात आल्या. त्याचप्रमाणे इतर काही प्रती सोलापूर,धारवाड, अहमदनगर, खानदेश या भागांमध्ये रामोशी नाईक त्यांच्या साथीदारां विरुध्द जास्त प्रचार करता येईल तितका करण्यासाठी पाठविण्यात आल्या.[२७]

मात्र ह्या वेळी बंडवाल्यांपैकी कोणीही फुटल्याचे, फितुर झाल्याचे दिसत नाही. काही कारणाने किंवा नाईलाजाने प्रसंग पाहून काही जण सरकारकडे गेले. परंतु ते पुन्हा उमाजीकडे वळत होते. उमाजीच्या जागी सरकारने नेमलेला त्याचा भाऊ कृष्णाजी हा सुध्दा उमाजीला मिळाला होता. तेंव्हा हा वरील जाहीरनामा काढल्यावर ताबडतोब तरी इंग्रजांना आपण फेकीत असलेल्या तुकड्यांकडे कुणी ढुंकुणही पाहत नाहीत, असाच अनुभव आला. त्यामुळेच मॅकिंटॉस सुध्दा थक्क झाला. थोडक्यात उमाजीची सर्व सामान्यांवर काही वेगळीच मोहिनी पडू लागली होती.

उमाजी व रामोशांच्या बंडाला आकळण्यासाठी कंपनीकडून तमाम रयतेसाठी जाहीरनामे निघत होतेच. कंपनीचे अधिकारी घोडदळ व पायदळाच्या लहान लहान तुकड्या घेऊन पुणे, सातारा भागातील, सह्याद्रीच्या अगदी दुर्गम अशा दऱ्या खोऱ्याने, कडे कपाऱ्या धुंडाळीत होते. सरकारचे मांडलिक झालेले सातारकर छत्रपतींनी सुध्दा उमाजीच्या विरोधी मोहिमेत सक्रिय सहभागी व्हावे म्हणून ते पुन्हा पुन्हा पत्र व्यवहार करीत होते. सातारा व पुणे जिल्ह्यातील पंत प्रतिनिधी आणि पंत सचिव यांच्या अंमलाखाली येणाऱ्या मुलखातही उमाजीचे दंगे चालूच होते. उमाजी विरूध्द स्वार, शिबंदी पाठविणे, व इतर काही उपाययोजना करणे, ह्या संबंधी इंग्रज कलेक्टर गव्हर्नर यांचे कडून प्रतिनिधी आणि सचिवाला सरळ तडक हुकूम होत होते. शिवाय छत्रपतींनी त्यांना आपल्या छत्रपती पदाच्या अधिकारात तशा आज्ञा कराव्यात अशा सूचना वारंवार इंग्रजांकडून होत होत्या.[२८]

त्यानंतर सरकारने जिल्हा पोलीस म्हणून पुष्कळ लोंकांची शिबंदीसाठी भरती करण्याचे ठरविले. परंतु उमाजीच्या भितीमुळे एकही स्थानिक रहिवासी शिबंदीत भरती झाला नाही. नंतरच्या काळात अहमदनगर येथील पोलीस तुकडीचा 'रामसिंग' यास पाच शिबंदीवर नेमला, त्याने २ फेब्रुवारी १८३१ मध्ये जेजुरी जवळील गुळुंचे येथे उमाजीस पकडण्याचा प्रयत्न केला, परंतु उमाजी खोल दरीत असल्याने उमाजीचा पाठलाग करणे त्यास शक्य झाले नाही.

सातारा प्रांतामध्ये रामोशांनी जलद हालचाली सुरू केल्या म्हणून कॅ. ल्युकन यांनी सालपे घाटापर्यंत त्याचा पाठलाग केला. त्यावेळी उमाजी नाईक, भोजाजी व कृष्णाजी यास सालपे घाटात येऊन मिळाला. त्या तिघांनी ४ फेब्रुवारी १८३१ रोजी सातारा विभागातील रामोशी लोकांना उद्देशून जाहीरनामा काढला. त्यात त्याने म्हटले होते की,

तुम्ही रामोशांनी पुरंदर किल्याजवळ येऊन भेटावे. आपण सर्व जण एकाच दिलाचे आहोत. आपण एकमताने काम करू. जर तुम्हाला तुमच्या हक्काची व मिळकतीची गरज असेल तरच भेटावे. परंतु उमाजीच्या या जाहिरनाम्यास रामोशांनी प्रतिसाद दिल्याचे दिसत

नाही.[२९] दिनांक ६ फेब्रुवारी १८३१ रोजी उमाजी त्यांच्या साथीदारांसह वाल्हे गावाजवळ आले, आणि तेथील एका वाण्याचे घर लुटले. वाल्ह्यापासून एक कोस अंतरावर १७ व्या रेजिमेंटच्या भिमा जमादाराकडील एक टोळी होतीच. जमादाराची टोळी व रामोशी यांच्यात चकमक होऊन त्यात उमाजीचा पुतण्या रावजी ठार झाला. या घटनेमुळे रामोशांचे संख्याबळ रोडावले.

१२ फेब्रुवारी १८३१ रोजी सरकारने अहमदनगर येथील ८ व्या रेजिमेंटचा कॅप्टन लिव्हिंगस्टन यास २०० सैनिकांसह पाठवून दिले. पुणे जिल्ह्याच्या मामलेदाराशी नियमित दळणवळण असावे. म्हणून त्यास जेजुरीच्या उत्तर व पूर्व भागात नेमण्यात आले होते.[३०] त्याने त्यांच्या कर्तृत्वाने जेजुरी परिसरात उमाजीची नाकेबंदी केली होती.

पुरंदर परिसरातील सरकारची नाकेबंदी पाहून रामोशी टोळी भिमानदी काठाने पूर्वे कडे गेली. त्यावेळेस उमाजीने बाभुळसर या गावामधून दिनांक १६ फेब्रुवारी १८३१ रोजी एक जाहीरनामा काढला.

उमाजीच्या नव्या सरकारचा जाहीरनामा (१६ फेब्रुवारी १८३१)

सन १८३१ च्या सुरूवातीस उमाजी एक नवीन कार्यक्रम घेऊन मोठ्या धाडसाने आत्मविश्वासाने इंग्रजांना सामोरे जाण्यास सिध्द झाला होता. उमाजीने स्वःतच्या व भोजाजीच्या नावाने तारीख १६ फेब्रुवारी १८३१ रोजी एक जाहीरनामा घोषित केला. तो कोणी एक मामोली माणूस म्हणून नव्हे तर स्वतंत्र सरकारचा प्रमुख म्हणून जाहीर केला होता. इंग्रजांचे दिवस आता भरले आहेत आणि रामोशांच्या नेतृत्वाखाली जी नवी व्यवस्था होत आहे त्यात सर्वांनी सामील व्हावे अशी उमाजीची सर्वांना हाक होती.

जाहिरनाम्यातील कलमे

१) युरोपियन दिसले की, त्यांना ठार मारावे मग ते शिपाई आसोत किंवा नसोत ही कामगिरी मोठ्या प्रमाणावर व चांगल्या रितीने करणारास नवीन सरकारकडून जहागिरी इनामे व रोख पैशांची बक्षिसे मिळतील.

२) ज्यांची वंशपरंपरागत वतने, तनखे इत्यादी कंपनी सरकारमुळे गेली असतील ती सर्व त्यांनी नव्या सरकारला पाठिंबा दिल्यास त्यांची त्यांना परत केली जातील.

३) कंपनी सरकारच्या सेवेतील पायदळ आणि घोडदळातील शिपायांनी कंपनीची हुकुमत झुगारावी आणि युरोपियन आधिकाऱ्यांना पकडावे. हे मानायचे नसेल तर नव्या सरकारच्या शिक्षा भोगायला तयार रहावे.

४) हिंदुस्थानच्या सर्व रयतेने एकदम एकाच वेळी जनआंदोलन करून देशात गोंधळ आणि अराजकता माजेल असे करावे.

५) युरोपियनांच्या मालमत्ता कोणीही लुटाव्यात किंवा नष्ट कराव्यात. कोणाकडूनही त्यांना मिळालेल्या लुटीचा हिशेब मागण्यात येणार नाही. इंग्रज सरकारचे सर्व खजिने लुटावेत, ह्या लुटीचेही हिशेब घेतले जाणार नाहीत.

६) कोणत्याही गावाने इंग्रजांना महसूल द्यायचा नाही, तसे केल्यास त्या गावांचा विध्वंस केला जाईल.

७) जी जात अथवा मुसलमान या जाहीरनाम्या विरूध्द वागतील ते आपण होऊन आपल्यावर मोठे संकट व दैवी आपत्ती ओढवून घेतील.

८) शास्त्रातच असे सांगितले आहे की, इंग्रजांचे राज्य नष्ट होणार आहे, आणि ते लोकं लवकरच जाऊन नव्या न्यायधिष्टित राज्याची स्थापना होईल.[३१]

जाहीरनाम्याची वैशिष्टे

ह्या जाहीरनाम्याचे पहिले वैशिष्टे असे की, उमाजीने संपूर्ण हिंदुस्थानच्या रहिवाशांना उद्देशून काढलेला आहे. त्यात सर्व जाती धर्माच्या लोकांचा इंग्रजांना हाकलण्याच्या कार्यासाठी आव्हान करतो. मराठी सत्तेच्या काळात 'हिंदुस्थान' ही संज्ञा बहुदा उत्तर हिंदुस्थानातील प्रदेशापुरतीच उपयोजली जायची, आणि ब्रिटिश काळात सन १८३१ पर्यंत त्या संज्ञेचा अर्थ व्यापक झाला होता. पण पुढे संपूर्ण भारतीय उपखंडाचा एक देश किंवा कदाचित अंधुक स्वरूपात एक राष्ट्र म्हणून काही एक संकल्पना स्वच्छपणे अवतरलेली दिसते. त्या संकल्पनेचा महाराष्ट्रात किंवा भारतात अशा प्रकारे झालेला पहिला वहिला. उच्चार दिसतो. हे उमाजींचे ऐतिहासिक कार्य आहे म्हणूनच तो आद्य क्रांतिकारक ठरतो.

जाहीरनाम्याचे दुसरे वैशिष्टे असे की, जाहीरनामा सर्वसमावेशक आहे. राजे सरदार जमीनदार, वतनदार आणि सर्वसामान्य रयत ह्या सर्वांनी त्याचा आदर करायचा होता. त्याचप्रमाणे हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांनीही त्याचा भाव समजावून घ्यावा, असा त्याचा आग्रह होता. जाहीरनाम्याच्या विरोधी वर्तन करणाऱ्यास गंभीर परिणाम भोगण्याचा खणखणीत इशाराही जाहीरनाम्यात दिसतो. इंग्रजांविरुध्द उभे न राहण्यासाठी धर्माची सबब उमाजीचे नवे सरकार ऐकून घेणार नव्हते. इंग्रजाचे हे राज्य संपणार आणि त्याच्या जागी नवीन न्यायाधिष्ठीत राज्य येणार असेही सांगतो. हाच त्याचा विचार महत्वाचा वाटतो. कारण उमाजीस स्वकीयांचे राज्य हवे होते.

भारतातील फुटीमुळेच इंग्रजांना इथे सत्ता मिळविता आली, आणि त्या फुटीरतेमुळे ती त्यांना टिकवून धरता आली. हेही उमाजीस चांगले उमगले होते. त्यामुळेच तो त्यांच्या जाहीरनाम्यात सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन करीत होता. त्याहून आणखीन एक महत्वाची बाब दिसते, ती म्हणजे सर्वांनी एकाच वेळी उठाव करायचा हे ही तो सांगतो. त्याला योजनाबद्ध रितीने इंग्रजांशी सामना करून त्यांचे नामोनिशान नष्ट करायचे होते.

उमाजीने अशा प्रकारचा जाहीरनामा पहिल्यांदाच काढलेला नव्हता. या पूर्वीसुध्दा त्याने असेच पत्रके काढली होती. हा जाहीरनामा जरी लहान असला तरी त्याचा आशय खूप महत्वाचा वाटतो. हिंदुस्थानातील सर्व वर्गातील जाती धर्मातील राजापासून रंकांपर्यंत सर्वांना उद्देशून काढलेला हा जाहीरनामा बरेच काही सांगतो. यावरून एक गोष्ट जाणवते, ती म्हणजे उमाजीची दृष्टी रूंदावली होती.

एकंदरीत त्यावेळची परिस्थिती पाहिली तर असे दिसते की, बहुतेकांना इंग्रज नकोसे होते. पण त्यांच्या विरोधी उघड उभे राहण्याची हिंमत कोणाकडे दिसत नव्हती, हे सर्व उमाजी जाणीत होता. त्याला ही लढाई आपल्या हिंमतीवर लढायची होती. त्यास तो तयार ही होता. शिवरायांनी थोड्याच सवंगड्यांनीशी स्वत:च्या हिंमतीवर स्वराज्याचा लढा डोंगरदऱ्यांच्या आश्रयाने सुरू केला होता. हाच आदर्श उमाजी समोर होता.

उमाजी आणि त्याचे लोक बाभुळसरहून परांड्याकडे जाणार होते. परंतु तिकडे ही सरकारी तुकड्या आहेत, हे समजल्यावर परांड्याचा बेत रद्द करून टाकला. आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे उमाजीचा भाऊ आमृताला परांड्याजवळ पकडल्याची बातमी लागली होती. त्याचप्रमाणे येसू नाईकालाही बारामतीजवळ पकडल्याची बातमी मिळाली होती. वरील दोघेही (अमृता, येसू) हे टोळीचे पुढारीच होते. त्यांच्या पकडण्याने उमाजीस मोठा धक्का बसला होता. या सर्व कारणांमुळे उमाजी परांड्याकडे जाण्याचा मार्ग बदलून फलटणच्या अग्नेय दिशेकडील डोंगराकडे वळले. या प्रदेशात जाताना उमाजीने एक वाटाड्या बरोबर घेतला व त्याच्याकडे जाहीरनामा गावच्या पाटलास देण्याकरिता दिला. पुढे तो जाहीरनामा पाटलाने इंदापूरच्या कमाविसदाराकडे आणि नंतर डाकमार्गे सासवडकडून पुण्यास अधिकाऱ्याकडे पाठवून दिला.

उमाजीची थाप, सरकारची दिशाभूल

उमाजी धोरणात्मक निर्णय घेताना नेहमी सावध असे. फलटण प्रदेशातून दक्षिणेकडे जात असताना आपणास विशाळगड आणि सावंतवाडीकडे जायचे आहे अशी खोटी थाप मारली. तीच खोटी खबर थेट कंपनी सरकारच्या फौजेच्या आधिकाऱ्यांकडे गेली. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांनीही त्यांचा मोर्चा (सैनिक) दक्षिणेकडे वळवला. हाच मोर्चा पाहून बंडवाले लोक भिमा शंकरच्या आणि जुन्नरच्या डोंगरात निघून गेले. तेथून ते पुढे कोकणात उतरले. तेथील कोळी लोकांची मदत घेऊन लुटालुटी करण्याचा त्यांचा डाव होता. परंतु रामोशांना खाली कोकणात उतरू न देण्यासाठी सरकारने मुंबईहून एक फौजेची तुकडी रवाना केली. आणि येसू व उमाजी नायकाला पकडून देण्याबद्दल जाहीरनामाही प्रसिध्द केला होता. पकडून देणारास ५००० रुपयांचे बक्षीसही ठेवले होते.[३२]

येसाजीला ज्यांनी पकडले होते त्यांना ते बक्षीस मिळाले होते. त्याबद्दल सरकार विरूध्द उमाजीस पकडण्यात लोकांमध्ये बरीच शंका निर्माण झाली होती. काही लोकांचे असे म्हणणे होते की, उमाजीस पकडून देण्यास आम्ही मदत करू पण त्यास पकडून दिल्यावर त्यास मोकळे सोडले जाणार नाही, त्याला शिक्षा होईल व कबूल केलेले बक्षीस मिळेल, असे सरकारकडून लेखी वचने मागू लागले. कारण नंतर उमाजी त्यांच्यावर सूड उगवेल अशी त्यांना भिती होती.[३३]

उमाजीला पकडून देण्यासाठी किंवा त्यास पकडण्यासाठी नेमकी खरी बातमी देण्याकरिता सरकारने जे बक्षीस ठेवले होते, ते त्या कामगिरीच्या तोलामोलाचे नव्हते. त्यामुळे जीव धोक्यात घालण्याइतपत मोठे बक्षीस मिळावे असे काहींचे मत होते. कामाचे महत्व व त्यातील जोखीम आणि त्याबद्दल मनाला वाटणारी चूटपूट ही सर्व समतोल झाली पाहिजे. यापेक्षाही कामगिरीपेक्षा बक्षीसाचे पारडे खालीच बसेल एवढे ते वजनदार असले पाहिजे, असे त्यांचे मत होते. २२ मार्च १८३१ रोजी उमाजीची टोळी पिंगोरी व साकुर्डीच्या मध्ये होती सैनिकांनी दौंडपर्यंत त्यांचा पाठलाग केला. परंतु रामोशांच्या टोळीने उंच

टेकडीवर उभे राहून सैनिकांना अडविण्यासाठी दगडांचा व बंदुर्कीचा वापर केला. या वेळी आसपासच्या गावकऱ्यांनी लष्करी टोळीला मदत केली होती. त्यांनी त्यानंतर तेथून हरगुडे गावाकडे पलायन केले, परंतु जाताना रामोशांनी ज्या गावकऱ्यानी सरकारला मदत केली होती त्यांना जखमी केले. त्यांची घरे जाळली. नंतर त्यांनी ताबडतोब हरगुडे येथून निरा नदीकडे मोर्चा वळविला.[३४]

जोपर्यंत कोणत्याही गोष्टी कमी पडत नाहीत किंवा काही ओलावा असतो तो पर्यंत सर्व जण चिकटून राहतात. तो ओलावा नाहिसा झाल्यावर पूर्वी प्रमाणे एकनिष्ठ राहणारे हरीचे लाल फारच थोडे असतात. अगदी तसाच प्रकार उमाजीच्या अनुयायांच्या बाबतीत दिसतो. जोपर्यंत गावच्या लोकांकडून उमाजीच्या टोळीतील लोकांना ऐती अन्न सामग्री मिळत होती, आणि लुटीचा ऐवजही सारखाच मिळत होता तोपर्यंत त्या टोळीत शेकडो माणसे सरकारी नोकरी सोडून देऊन मोठ्या खुशीने सामील झाले होते. पण जेव्हा कंपनी सरकारच्या फौजा पिच्छा करू लागल्या, तेंव्हा त्यांना उमाजीबरोबर रानोमाळ रात्रंदिवस लपून छपून पळून दिवस काढावे लागले. तेंव्हा भराभर बरेच जण उमाजीला सोडून गेले.

सन १८३१ च्या फेब्रुवारीच्या अखेरीस महादेवाच्या डोंगरात गेल्यावर उमाजीबरोबर जे बारा हेटकरी होते, त्यांनी आपले खूप हाल होत असून खूप त्रास पडतो, हे हाल व त्रास आता सोसवत नाही या करिता आपणाला घरी जाण्याची परवानगी द्यावी, अशी कुरकुर सुरू केली. तेव्हा त्यांना उमाजीने सहा रुपयांऐवजी बारा रुपये पगार देण्याचे कबूल केले.

थोडक्यात सांगायचे झाले तर इ.सन १८३१ पासून पुढे सात आठ महिने उमाजी व त्याच्या माणसांनी इंग्रजांना अगदी जेरीस आणले होते. कारण पुणे, सातारा,सांगली या जिल्ह्यांचे प्रदेश तसेच कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, रायगड, अहमदनगर या जिल्ह्यांचे व मराठवाड्यांचा काही भाग यांच्या मर्यादीत क्षेत्रात एकाच वेळी त्यांची माणसे अनेक ठिकाणी धुमाकूळ उडवून देत. त्यामुळे उमाजीची माणसे किती आहेत व कोठे कोठे आहेत याचा थांगपत्ता लागत नव्हता.

स्थानिक अधिकारी, कामगार, पाटील, कुलकर्णी यांना उमाजीचा ठावठिकाणा माहीत असूनही कोणीही फितूर झाले नाही. खुद्द मॅकिंन्टॉशला सुध्दा इंग्रज अधिकारी व स्थानिक अधिकारी यांना कोठे कोठे पाठवावे, व काय हूकूम काढावेत यांबाबात संभ्रम पडे. सरकारची जमेची बाजू एवढीच की त्यांना आमृता व येसाजी या दोन रामोशांच्या पुढाऱ्यांना पकडण्यात यश आले होते. परंतु बंडाचे मुख्य म्होरके (प्रमुख) उमाजी व भुजाजी यांच्या विषयी मात्र जंग जंग पछाडले तरीही ते हाती लागत नव्हते. उमाजी व भुजाजी यांना पकडल्याशिवाय त्यांनी उभारेलेले हे बंड क्षमणार नाही याची जाणीव इंग्रजांना होती. त्यामुळेच इंग्रज अधिकारी कॅप्टन बॉईड, कॅ. लिव्हिंगस्टन, कॅ. ल्युकॉन इ. अधिकारी कॅ. मॅकिंन्टॉशच्या सूचनांवर काम करून उमाजीचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत होते. स्थानिक लोकांनी आपणहून उमाजीच्या बद्दल खबर (बातम्या) द्याव्यात. त्याबदल्यात मदत केल्याबद्दल इनाम व बक्षिसे मिळतील व त्याच प्रमाणे बंडवाल्यांना मदत व सहाय्य केल्यास शिक्षा होईल अशा आशयाची पत्रके वारंवार निघत होती.[३५]

शिबंदीच्या अनेक टोळ्या गावच्या पाटलांच्या व प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आल्या. तसेच एक हवलदार व त्यांच्याबरोबर शिपायांची तुकडीही पाठविण्यात आली. या सर्व तुकड्यांनी सर्व परिसर धुंडाळून काढला. परंतु त्यांनाही उमाजीचे निश्चित ठिकाण सापडले नाही. हरगुडे गावच्या ज्या लोकांना उमाजीने मारहाण केली होती, त्यांनीही रामोशांच्या बंडाबद्दल माहिती देण्यास नकार दिला होता. उलट त्यांनी रामोशांनी केलेल्या गोंधळाबद्दल पुण्याच्या अधिकाऱ्यांनाच दोष दिला. नंतरच्या काळात मात्र काही रामोशी नाईकांना सरकारने नोकरीस ठेवले होते, आणि त्यांच्याकडूनही उमाजीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.[३६]

पावसाळ्यात उमाजी विरूध्द सरकारने जेजुरीच्या परिसरात २०० सैनिकांची तुकडी पाठविली. त्याचप्रमाणे उमाजीच्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी यावेळी सातारच्या यंत्रणेने सुध्दा ब्रिटिश सरकारच्या मदतीसाठी अधिक घोडदळ व पायदळ

पाठवले होते. परंतु रामोशी तो परिसर सोडून गेल्यामुळे सरकारच्या सैनिकांचा काहीच उपयोग झाला नाही.[३७]

उमाजी नाईकाने पुरंदरची पोलिसांची नोकरी सोडल्यावर पलायान करून परिसरामध्ये एक जबरदस्त हादरा निर्माण केला होता. म्हणूनच पुण्याच्या मॅजिस्ट्रेटने रामोशी जमातीच्या कोणत्याही नाईकाला पोलीसांमध्ये घेण्यास नकार दिला होता. ही सूचना त्यांनी कॅप्टन मॅकिन्टॉशला कळविली होती. त्याने पुढे असेही म्हटले होते की, जर रामोशांना नोकरीत घेतले तर त्यांना लहान लहान गावात चौकीदार म्हणून नेमावेत. अशा ३० ते ४० चौकीदारांवर दोन हुशार दफेदार नेमावेत. जर त्या दफेदारांना ती चांगली कामगिरी केली तर त्यांना दरमहा ५ रुपये पगारावंर कायम करावे व पुढे त्यांना नोकरीच्या शेवटी जमादार पदाची बढती देण्यात यावी. म्हणजेच उमाजी सरकारी नोकरीत असताना त्यास जो पगार होता तोच पगार, अशा प्रकारे उमाजी विरूध्द सरकार खर्च करू लागले.[३८]

इ.स.१८३१ च्या ऑगष्ट मध्ये कंपनी सरकारने उमाजी विरूध्द ही मोहीम अधिक नेटाने चालवायचे ठरविले. त्यामुळे ह्या मोहिमेत लोकांचा अधिक अधिक सहभाग मिळविण्यासाठी दि.८ ऑगष्ट १८३१ रोजी एक जाहीरनामा काढला. रामोशांचे बंड मोडण्यासाठी बंडाचे प्रमुख उमाजी व भोजाजी हाती लागल्याखेरीज बंड क्षमणार नाही हे लक्षात घेऊन सर्व लक्ष उमाजीवर केंद्रीत करण्यात आले. या वेळी मात्र उमाजी साठीचे बक्षीस फारच मोठे झाले होते.

इंग्रजांचा शेवटचा जाहीरनामा (८ ऑगष्ट १८३१)

१) उमाजी बिन दादाजी नाईक रामोशी पुरंदर यास जो सरकारात धरून देईल त्यास रोख रू. १०००० (दहा हजार रुपये) व इनाम जमीन बिघे ४०० (चारशे) दिली जाईल.

२) भुजाजी नाईक रामोशी यास धरून देईल त्यास रुपये ५००० (पाच हजार) व इनाम जमीन बिघे २०० (दोनशे) दिली जाईल.

३) जो कोणी दोघा नाईकांची बातमी सरकारला समजावीन, आणि त्याच्या बातमीने नाईक लोक धरले गेल्यास, ती बातमी देणाऱ्यास सदरी लिहिल्याप्रमाणे निम्मे बक्षीस व इनाम जमीन निमे मुकरर दिली जाईल.

४) हल्ली रामोशी व हेटकरी वगैरे लोक नाईक यांजबरोबर बंडात आहेत त्यांनी या दोन नाईकांस धरून सरकारात हवाली करतील तर त्यास बंडाचा गुन्हा माफ करून व इनामी सदरी लिहिल्याप्रमाणे त्या लोकास मुकरर दिले जाईल.[३९]

कोणत्याही परिस्थितीत उमाजीस पकडण्यासाठीचा हा सरकारचा प्रयत्न होता आणि तो उमाजीच्या दृष्टीने फार भयावह व घातक होता. रामोशांच्या बंडामध्ये नंतरच्या काळात हेटकरी नावाची कोकणातील एक चिवट व कष्टाळू आणि फार विश्वासू समजली जाणारी जमात रामोशांना मिळाली होती.

सरकारची इथे फोडा व झोडा ही निती स्पष्ट दिसते ती म्हणजे सरकाराने बंडातील सामील असलेल्या सर्व हेटकऱ्यांना व रामोशांना मिळून आवाहन केले होते की, ते बंडातून बाहेर पडले तर त्यांना पूर्वीचे केलेले सर्व गुन्हे माफ होणार होते आणि शिवाय त्यांनी उमाजी व भोजाजीस सरकारच्या स्वाधीन केल्यास इतर इनामेही मिळणार होती. शिवाय ह्या कामी कुणाकडून काही थोड्या प्रमाणात जरी मदत झाली तरी त्याची दखल सरकार घेणार होते.

ब्रिटिशांनी लावलेला सापळा व उमाजी नाईकाचा अंत (इ.स.१८३१ ते १८३२)

रामोशांचे बंड फार मोठ्या प्रमाणावर व मोठ्या प्रदेशावर पसरत नाही, याची खात्री इंग्रजांना होऊ लागली होती. परंतु उमाजी एकटा पडत चालला तरी अशा ताकदीचा माणूस बाहेर राहू देणे त्यांना परवडणारे नव्हते. उमाजीस ही माणसे टिकविणे अवघड झाले होते. त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. उमाजी त्याच्या माणसांना नियमित पगार देऊ शकत नव्हता. याऊलट इंग्रजांना सामील होऊन नोकरी केल्यास त्यांना तेथे नियमित

पगार मिळणार होता. परंतु उमाजीस मिळालेले काही ध्येयवादी लोक होते. तेच त्याच्या जवळ शेवटपर्यंत टिकून राहिले होते.

आपण फार मोठे सैन्य जमवू, लोकांचा सहभाग व संस्थानिकांचा सहभाग याद्वारे इंग्रजांवर मात करू शकू हा त्याचा आत्मविश्वास नाहिसा होत चालला होता. तरीही उमाजी बद्दल जनतेत आदर होता. आदरयुक्त भिती होती. कारण तो इंग्रजांविरूध्द काही तरी खटाटोप करतो याचे जनतेला कौतुक वाटे. म्हणून इंग्रजांचा डोळा चुकवून गावोगावचे लोक उमाजीच्या लोकांना जेवण पुरवत. परंतु कोणीही त्यांच्या बंडात उतरले नाहीत. तरी सुध्दा बक्षिसांच्या आशेने कोणी इंग्रजांकडे जाऊन उमाजीचा ठावठिकाणा सांगितला नाही.

उमाजीस पकडण्यासाठीचे इंग्रजांचे डावपेच

उमाजीला पकडण्याचे ब्रिटिशांचे उद्दिष्ट काही साध्य होत नव्हते. रयतेस दमदाटी करून आणि मोठमोठ्या बक्षिसांची प्रलोभने दाखऊनही काहीच साधत नव्हते. म्हणून मुरब्बी राजकारणी इंग्रजांनी काही युक्त्या प्रयुक्त्या केल्या. शेवटी त्यांनी कट कारस्थाने व फंद फितुरीचा आश्रय घेतला.

उमाजीस पुढे इतर पुष्कळ जमातीतील लोक मिळाले असले तरी प्रथमपासून अखेरपर्यंत त्यांचे पाठीराखे रामोशीच होते. आणि उमाजीच्या बंदोबस्तासाठी ब्रिटिशांना रामोशीच उपलब्ध झाले होते.

कारस्थानांची सुरूवात

अहमदनगर जिल्ह्यातील पारगावचा बापूसिंग परदेशी नावाचा एक मोठा चलाख व खटपटी माणूस होता. त्याने यापूर्वी रामोशी लोकांना मदत केली होती. म्हणून सरकारने त्यास काही दिवस ताब्यात घेतले होते. ब्रिटिशांनी बापूसिंगाची मदत घेण्याचे निश्चित केले. त्याच्याशी काही गुप्त बोलणी केली, आणि त्यास सोडून दिले. त्याच बरोबर बापूसिंगाच्या विनंतीवरून त्याच्याबरोबर आणखी दोन रामोशी कैद्यांना सोडले. त्याच

प्रमाणे सरकारने त्यांना बापूसिंगाबरोबर राहण्याचे सांगितले. याच दोन रामोशांचा एक चुलत भाऊ काळू नावाचा होता. आणि हा काळू सुध्दा एके काळी उमाजीच्या टोळीतच होता. उमाजीच्या टोळीत पुन्हा ही सर्व मंडळी जाऊन मिळाली, तर उमाजीस पकडण्यास फार अवधी लागणार नव्हता हे इंग्रज अधिकाऱ्यांनी ओळखले होते. (या काळुने १८ जाने १८३१ रोजी मांढरदेवी येथे उमाजीशी तक्रार करून बंडाची संगत सोडली होती.) सरकाराचे लष्करी प्रयत्न वाया गेल्यामुळे अविश्वासाने उमाजीस पकडण्याचा चक्रव्युह बापूसिंगामार्फत रचण्यास सुरूवात केली.[४०]

नाना चव्हाण हा सुध्दा अगोदर उमाजीच्या टोळीतील प्रमुख घटक होता. उमाजीजवळ नानाचे चांगले वजन व मानाचे स्थान होते. भुजाजी नंतर दोन नंबरचा नाना हाच अत्यंत विश्वासू अशी उमाजीच्या टोळीतील व्यक्ती. याच नानाला ब्रिटिशांनी हेरले. काळूने व त्याच्या सहकाऱ्यांनी नानाशी चर्चा करून पुन्हा बंडात सामील होण्याचे व उमाजीस सहकार्य करण्याचे वचन दिले. बापुसिंगला आपल्या विरूध्द सरकारने कारस्थान करण्यास पाठवले आहे हे उमाजीला समजले. या घटनेमुळे बापूसिंग व त्याचा मित्र आपणास अडचणीत आणतील म्हणून नानाने सुध्दा ही योजना सोडून दिली.[४१] दि. २० ऑगस्ट १८३१ ला रामोशाच्या टोळीची गिरीम येथील गावकऱ्यांशी चकमक झाली. हे समजताच लष्करी तुकडीने गिरीम कडे धाव घेतली. कॅ. मॅकिन्टॉशच्या मते लष्करी तुकडीला उमाजी सज्जड दम देत होता. तो म्हणजे आपले प्राण गमवू नका असे सांगतो. या प्रसंगी एक तलवार बहाद्दर शिपाई उमाजीला म्हणतो आम्ही तुझे डोके कापून नेण्याकरिता आलो आहोत. त्यावर चिडलेल्या रामोशांनी या चकमकीत गणेशशिंग हवलदार बंदुकीने ठार केला. त्यामुळे तुकडीला नेता नसल्यामुळे सहकारी सैन्यात गोंधळ माजला. जेजुरीहून त्या सैन्यास मदत करण्यासाठी एक लष्करी तुकडी आली आणि यामुळेच उमाजीने त्या ठिकाणाहून पलायन केले. तो पिंपरे येथील गुप्त ठिकाणाकडे रवाना झाला.[४२]

काळू उमाजीला कावेबाजीने खूष करून पुन्हा बंडात सामील झाला. त्याचवेळी इतर दोन रामोशीही (सरकारने सोडलेले) फलटण भागात उमाजीच्या टोळीत सामील झाले. काळुला बंडात सामील करून घेण्यासाठी बापूसिंग व नानाने मदत केली. काळू व त्याचे दोन सहकारी यांच्या बायकांनी सरकारशी संदेशवहन ठेवले.

बापू परदेशीला मात्र उमाजीकडे जायचे नव्हते. काळु, नाना, व दोन रामोशी यांच्याशी संधान राखीत त्याने कंपनीची माणसे घेऊन, सोयीस्कर वेळ पाहून, आणि योग्य जागा हेरून, उमाजीच्या लोकांवर हल्ले चढवायचे होते. म्हणजेच आतून काळू व नानाने पोखरायचे आणि बापूसिंगाने बाहेरून हल्ले करायचे, अशा पध्दतीने तिघांनी मिळून उमाजीचे बस्तान पुर्णपणे उध्वस्त करून टाकायचे, अशीच त्यांची कारस्थानाची योजना होती.

इ.स. ऑक्टोंबर १८३१ मध्ये उमाजी बोरघाट उतरून कोकणात आला व जांभुळपाड्याच्या आसपास काही दिवस काढले. याच ठिकाणी कोकणातील हेटकरी लोक आपल्या घरी जाण्यास उतावीळ होऊन उमाजीकडे तशी परवानगी मागू लागले. नोव्हेंबर मध्ये उमाजीचा मुक्काम जांभुळपाड्यात असताना हेटकरी फारच एकेरीवर आले व त्यांनी पैशांची मागणी केली. त्या हेटकऱ्यांना नानानेच चिथावले होते. परंतु पुन्हा साळसुदपणे तोच त्यांची समजूत घालू लागला. पुन्हा वरती देशाकडे जाऊन कुठूणतरी पैसे मिळवू आणि तुम्हाला देवू असे सांगून हेटकऱ्यांची मने वळवून त्याने त्यांना सांभाळून थोपवून ठेवण्याचे एक उत्कृष्ट नाटक केले. यामुळे उमाजीची नानाविषयी आपुलकी आणखीनच वाढली.[४३]

पुढे असे अनेक प्रसंग येत गेले. त्यामध्ये नानाने उमाजीस कोठून तरी काही तरी करून पैसे आणू. शिवाय जाईल तेथे दगा फटका होणर नाही हे दाखवून देण्यासाठी त्याचबरोबर उमाजीबरोबर स्वत: जाण्याची तयारी दाखवत होता. म्हणजे त्याचा उमाजी व भुजाजीवर किती विश्वास आहे. हे दाखविण्याचा त्याचा तो कपटी प्रयत्न करीत होता.

नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी उमाजीने कोकण सोडले आणि दि. २७ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी मुळशी गावापासून अडीच कोसांवर असलेल्या औळस गावी त्याच्या टोळीसह पोहचला. औळसला गेल्यावर तेथील पाटलास आणि एका ब्राम्हण जोशीला पकडून त्याचेकडून ५०० रुपये दंड घेण्याचा प्रयत्न केला. जेवन देण्याविषयी सांगितले. तोपर्यंत उमाजीने एक आतताईपणा केला त्या जोशाकडून (ब्राम्हणाकडून) आपण सांगतो तसा मजकून लिहून दे म्हणून सांगितले. ही पत्रे त्याने त्यावेळचे पुण्याचे कलेक्टर व गव्हर्नरला उद्देशून लिहिली होती. पत्राची भाषा उद्दामपणाची आणि भयंकर दमदाटीची होती.

बंडवाली मंडळी ब्राम्हणाच्या घरी जेवणासाठी गुंतली आणि त्याचाच फायदा घेऊन त्या जोशाने एक जासुद औळसपासून दोन कोसांवर एका खेडेगावी एक जमादार शिबंदीचे काही लोकांसह ठाणे देऊन राहिला होता. त्यास ही बातमी देण्यासाठी पाठविले. जमादार शिबंदीचे लोक घेऊन आला. परंतु उमाजीच्या पहारेकऱ्यांनी हा सर्व प्रकार उमाजीच्या लक्षात आणून दिला. त्याचबरोबर उमाजी व त्याचे लोक उठून शेजारच्या डोंगरात त्या जोशासह गेले. शिपायांची तुकडी आली तेव्हा त्यांना रामोशी दिसले नाहीत. परंतु ते परत येतील या धोरणाने शिपाई ब्राम्हणाच्या घरात दबा धरून लपून बसले. काही वेळाने रामोशी पुन्हा गावात आले तेव्हा मात्र कंपनीचे शिपाई बाहेर पडले. यावेळी रामोशी व शिबंदीच्या लोकांमध्ये एक चकमक झाली.

गावकऱ्यांनी असा विश्वासघात केल्याबद्दल जाता जाता रामोशांनी काही जणांच्या घरांना आणि धान्याला आगी लावून दिल्या[४४]आणि तेथुनही पुढे गेले. यानंतर मात्र उमाजीचे दिवस भरत आलेले होते. त्याचा व सरकारचा संघर्ष वेगाने घडून येत होता. त्याला चक्रव्युहात पकडण्यासाठी नाना व काळू सतत संधीची वाटच पाहत होते. १३ डिसेंबर १८३१ रोजी बापूसिंगाचा भाऊ चिमणासिंग याच्याशी काळू व नाना यांची उमाजीला पकडण्याविषयी चर्चा झाली (चिमणसिंग इंग्रजांच्या चाकरीत होता)

दुसऱ्या दिवशी उमाजीच्या टोळीतील हेटकऱ्यांना पगाराची बाकी मागण्यासाठी चिथावणी दिली. उमाजीने हेटकऱ्यांची समजूत काढून थोड्याच दिवसांत पगार दिला जाईल असे सांगितले. यानंतर उमाजीची टोळी भोर जवळच्या डोंगरात पंत सचिवांच्या प्रांतात गेली. यानंतर कोठे जावे हा प्रश्न नानाने सोडवला तो म्हणजे त्याने उत्रोळीस (भोरजवळील एक खेडेगाव) जाण्याचा सल्ला दिला. हेटकाऱ्यांचा तगादा मिटवण्यासाठी उमाजीस पैशांची जरूरत होती. उत्रोळीस उमाजीला तो पैसा मिळवायचा होता. तो जगु शिंदे आणि त्याचा जावई भैरू कोंडले यांचेकडून. (भैरू कोंडले हा सासवडचा असून उमाजीच्या पुर्वीच्या बंडात होता.) उमाजीने दरोड्यात मिळवलेले दागीने सोन्या चांदीच्या वस्तू इत्यादी तो जगू आणि भैरू यांना देई आणि हे दागिने मोडून त्याचे पैसे उमाजीस दयायचे. अशाच एका व्यवहारातील १५० ते २०० रुपये जगू व भैरू यांचेकडून उमाजीस यायचे बाकी होते. त्याच दिवशी रात्री उत्रोळी गावी जाण्याचे ठरवले परंतु उत्रोळीस जाण्याचा त्यांचा अंतस्थ कावा अगदी वेगळाच होता. हा दिवस होता दि. १५ डिसेंबर १८३१[४५]

बेत ठरल्याप्रमाणे उमाजीस त्याचा जुना विश्वासू मित्र बापू सोळस्कर, काळु, नाना, लाडू (लाडू हा काळूचा भाऊ होता) आणि दुसरे सहा रामोशी बरोबर घेऊन उत्रोळीस जाण्याकरिता निघाला. गावाजवळ आल्यावर उमाजीने नाना व काळू यांना जगू शिंदयाच्या घरी जाऊन भैरू कोंडल्याला बोलावून आणण्यास सांगितले. याच संधीचा फायदा घेऊन काळू व नाना प्रथम जगू शिंदयाच्या घरी न जाता गावातील धेडवाड्यात गेले. आणि दोन धेंडांच्या मार्फत शिरवळ येथे थांबलेल्या चिमणसिंगाला निरोप दिला, आणि त्याप्रमाणे चिमणसिंगाला जगू शिंदयाच्या घरी यायला सांगितले. त्याचप्रमाणे याच वेळी काळू व नानाने उत्रोळीच्या गवकऱ्यांना विश्वासात घेतले व उमाजीला पकडण्याचा हेतू त्यांच्या जवळ स्पष्ट केला. वरील प्रमाणे सर्व नियोजनबध्द योजना आखल्यानंतर काळू व नानाने उमाजी व बापू सोळसकर यांना उत्रोळी गावतील जगू शिंदेच्या घराकडे नेले (दरम्यान जगू

व भैरू) उमाजीस पकडण्यास घाबरले होते. त्यामुळे त्यांनी हे काम नाकारले होते (तरीही नानाने युक्ती शोधली आणि एक जगुचा मुलगा व दुसरा गावचा कुलकर्णी त्रिंबक शिवजी चंद्रस हे धोतराने तोंड झाकून जगुचा मुलगा जगु म्हणून व कुलकणी भैरू म्हणून बसवले) जगू शिंदेच्या घराकडे जातांना उमाजी बरोबर फक्त बापू सोलसकर होता उमाजी त्यांच्या जवळ पोहचताच त्यांनी उभे राहून मुजरा केला.

उमाजी व बापू खाली बासतात न बसतात तोच काळुने डोळ्याचे पाते लवते न लवते तोच बापुवर एकदम झडप घालून त्यास आपल्या कवेत धरले, आणि त्याच क्षणी नानाने उमाजीला पकडले. त्याच बरोबर तोतया जगू व भैरू धावून येऊन त्यांनी ताबडतोब उमाजीस व बापुला दोरखंडाने करकचून आवळून टाकले. त्यानंतर त्यांना भोर येथील शिबंदीच्या ताब्यात देण्यात आले.[४६]

ही घटना रामोशी टोळीला समजताच त्यांनी पळ काढला, परंतु याच टोळीतील खुशा (कुशा) रामोशाला नानाने पकडले. अशा प्रकारे शिबंदीने उमाजी नाईक, बापू सोळसकर व कुशा रामोशी यांना भोर येथे कैद करून आणले व १६ डिसेंबर १८३१ रोजी निरनिराळ्या ठिकाणच्या ५ सरकारी तुकड्या येउन त्यांनी त्या तिघांना भोरहून सासवडला मॅजिस्ट्रेट गिबर्न यांच्या समोर उभे केले.[४७]

त्यानंतर त्या तिघा कैद्यांना पुण्यास नेण्यात आले. उमाजीच्या अटकेच्या अहवालात गव्हर्नरने कॅप्टन मॅकिन्टॉशच्या सहकार्याबद्दल व कर्तुत्वाबद्दल समाधान व्यक्त केले.[४८]

अशा प्रकारे उमाजीने पोसलेल्या, वाढविलेल्या, आणि इनामाच्या लोभाने अंध झालेल्या चार मूर्तीमंत काट्यांनी (नाना, काळू, जगू, भैरू) मोठ्या विश्वासघाताने उमाजीस पकडून दिले. अरण्यात स्वैर संचार करणाऱ्या वाघाला रेड्या बकऱ्यांच्या मांसाचे अमिष दाखवून ज्याप्रमाणे गफलतीने पकडतात तसे उमाजीस जेरबंद केले.

कारण वाघासमोर समोर उभे राहून त्यांचा पाडाव करण्याची शक्ती क्वचितच विरांमध्ये असते. काळू व नाना या रामोशांनी दहा हजार रुपयांच्या इनामाच्या अमिषाने आपल्या वाघासारख्या शूर मित्राची या प्रमाणे शिकार करून त्याच्या गळयाला फास लावला आणि आपल्या मातेचा कुसवा धन्य केला.

उमाजीस फाशी

उमाजीस पकडल्यानंतर भोरवरून सासवड येथे नेण्यात आले. त्या दिवशी रात्री भोजाजी नाईकाबरोबर जे हेटकरी व रामोशी लोक होते. त्यांच्या संबंधाने पुष्कळ बारिक सारिक माहिती साहेबबहाद्दुराने उमाजीस विचारली. व ती त्याने मोठ्या मोकळ्या मनाने त्यांना सांगितली. तो म्हणतो की, "हेटकरी लोक अत्यंत विश्वासू आहेत त्यांच्या विश्वासाची आणि शब्दाची किंमत असामान्य आहे ते कधीही आपल्या पुढाऱ्यासंमंधी बेईमान व्हायचे नाहीत. परंतु रामोशी लोक मात्र तितके विश्वास पात्र नाहीत. साहेब जर नाना आणि काळू या दोन बदमाश आणि बेईमान फितुर आणि विश्वास घातकी माझ्या मित्रांनी माझ्याशी द्रोह करून कपटाने मला पकडून दिले नसते, तर आपण मला केंव्हा ही पकडू शकला नसता. " [४९]

उमाजीस सासवडहून पुण्यास नेण्यात आले. तेथे त्यास कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आले. तेंव्हा पुण्यातील शेकडो लोक पाहण्यासाठी येत असत. उमाजीस पाहणाऱ्या लोकांना सरकारने संमती दिली. यामध्ये लोकांचे कुतुहल समजण्यासारखे आहे. पण इंग्रजांनी लोकांना तशी परवानगी का दिली तर यामध्ये सरकारचे दोन हेतू होते.
१) गुन्हेगारांना (आमच्या विरूध्द वागणाऱ्यांना) आम्ही कसे पकडतो, आणि जेरबंद करतो हे लोकांनी प्रत्यक्ष पहावे व त्यातून योग्य तो धडा घ्यावा, आणि दुसरा हेतू म्हणजे कदाचित उमाजी नेहमी सारखा येथूनही पळाला तर त्यास ओळखणारे हजारो लोक उभे रहावेत, असे दोन हेतू होते.

१५ डिसेंबर १८३१ ला उमाजी पकडल्यापासून सुमारे दीड महिना तुरुंगात होता. याच कालावधीमध्ये त्यांच्यावर काही आरोपही ठेवले होते. ते असे- उमाजी नाईक, बापू चव्हाण सोळसेकर व कुशा रामोशी यांना १९ जानेवारी १८३२ रोजी ज्युडीशियल कमिशनर टि-बर्नांड यांच्या कोर्टात उभे करण्यात आले, व त्याच्यावर खालील आरोप ठेवण्यात आले. देशद्रोह करून, आपले सैन्य उभारून उमाजी या कैद्याने काही अधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला, व मुंबई सरकारच्या लष्करी सैन्याविरूध्द कारवाया केल्या त्या पुढील प्रमाणे-

१) ब्रिटिश सरकारच्या मांढरदेव येथील लष्करावर व पंत सचिवांचे लष्करावर उमाजीने हल्ला केला. पौष शुध्द ४ शके १७५२ म्हणजेच (१८ जानेवारी १८३१).

२) ब्रिटिश सरकारच्या साकुर्डे व पिंगोरी या पुरंदर परगण्यातील लष्करावर हल्ला केला व २२ मार्च १८३१ मध्ये ब्रिटिश सरकारच्या "गिरीम" भिमथडीत परगण्यातील लष्करावर हल्ला केला. दिनांक २१ ऑगष्ट १८३१ ला आण्णाजी रामोशी ठार झाला. चिमा व खंडू जखमी केले. यांच्या बरोबर १७ व्या रेजिमेंटचा हावलदार जखमी केला.

आवळस व पौड (पाबळ) खोऱ्यातील खेड्यातील गावाकऱ्यांवर हल्ला करून वर्गणी मागितली व सरकारी शिबंदीवर हल्ला केला. (२७ नोव्हेंबर १८३१)[५०]

याच वेळी नंतर उमाजीने स्वत:चे समर्थन करण्याचा, स्वत:ची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. उमाजीच्या मते सरकराने उमाजीचे काही अधिकार हिरावून घेतल्यामुळे त्याने बंड केले अशी साक्ष दिली.

बापू सोळसकरनेही त्याची बाजू मांडतांना सांगितले की, आमच्या जमातीचे अधिकार हक्क काढून घेतल्यामुळे आम्ही हा गुन्हा केला.

कुसाजीने सांगितले की मी सुध्दा उमाजीचाच शिष्य व सेवक आहे.

उमाजी व त्याच्या बंडाच्या विरोधात अनेक साक्षी व पुरावे घेण्यात आले, आणि उमाजी व त्याच्या दोन सहकाऱ्यांवरील खटला २० जाने १८३२ पर्यत चालला. उमाजी

नाईक, बापू सोळसेकर, व कुसाजी ह्या तीनही कैद्यांना देशद्रोही ठरविण्यात आले. आणि त्यांना १८२७ च्या रेग्यूलेशन १४ मधील पोटनियम १२, उपनियम २ प्रमाणे मृत्युदंडाची (फाशीची शिक्षा) सुनावण्यात आली. त्याचप्रमाणे त्यांची मालमत्ताही जप्त करण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.

यानंतर तीनही कैद्यांना तुरूंगात ठेऊन कोर्टाचा अहवाल बोर्ड ऑफ कौंसिल लॉ १८२७ रेग्यूलेशन १३, विभाग २६, प्रमाणे कळविण्यात आला.[५१]

गव्हर्नर सर बेकवीथ यांनी खटल्याचा अभ्यास करून ज्यूडिशियल कमिशनरला या कैद्यांना फाशीची शिक्षा देण्याचा आदेश दिला. परंतु त्यांच्या कुटुंबियांचा विचार करून त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यास मात्र सांगितले नाही. त्यानुसार उमाजी नाईक, बापू सोळसकर व कुशा रामोशी यांना ३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुणे येथे फाशी देण्यात आली.[५२]

१८३२ साली मि. जेम्स टेलर नावाचे पुणे व सोलापूर प्रांतावर फिरते सेशन्स जज्ज होते त्यांच्यापुढे चौकशी झाली होती.[५३]

उमाजी नाईकांना फाशी दिल्यानंतर त्यांचे मृत शरीर त्याच परिसरात म्हणजे (आजची खडकमाळ पोलीस चौकी पुणे येथे) एक पिंपळाचे झाड आहे त्या झाडाला लटकवून ठेवण्यात आले. (आज मितिला या पिंपळाच्या झाडाखाली सर्व सरकारी स्टॅम्प विक्रेते बसलेले असतात. तहसील कचेरी आहे) उमाजीचे मृत शरीर पिंपळाच्या झाडावर उघड्यावर लटकवून ठेवण्याचा इंग्रजांचा उद्देश असा होता की, आमच्या विरूध्द बंड करून उठणारा मग तो कोणीही असो आम्ही त्याची काय अवस्था करतो हेच दाखऊन देण्याचा उद्देश होता. त्याच बरोबर इथून पुढे अशी हरकती करणारे पुढे येऊ न देण्यासाठीच त्यांनी हे कृत्य केले.

दुसऱ्या दिवशी भिवडीहून एका बैलगाडीतून उमाजीची पत्नी गंगू व मुले तुका आणि म्हांकाळा हे पुणे येथे खडकमाळ कचेरीत आले होते. त्यांच्या बरोबर एक कृश शरीराचे पांढऱ्याशुभ्र दाढीतले उमाजीचे गुरू नाना हे सुध्दा आले होते. [५४]

तुका आणि म्हंकाळने हे उमाजीचे टांगून ठेवलेले मृत शरीर खाली उतरवून गाडीत घातले, आणि त्यांच्या मूळ गावी भिवडी येथे नेले व त्यांच्या मालकीच्या जमिनीत दफन केले. आज त्याच ठिकाणी उमाजी नाईकांचे एक लहानशे थडगे (मंदीर)आहे.

कंपनी सरकारने ८ ऑगष्ट १८३१ च्या जाहीरनाम्याप्रमाणे नाना चव्हाणला उमाजीस पकडून दिल्याबद्दल त्याचे बक्षीस रोख १०००० रुपये दिले.[५५]

परंतु दि.१६ जुलै १८३२ च्या पत्रात नाना नाईक रामोशी (बाजारवाडी) म्हणतो की उमाजी नाईकाला पकडून दिल्यापासून आमच्याशी सातारचे महाराज व पंत सचिव दुश्मनी करतात, उपेक्षा करतात, त्यामुळे त्यांचा बंदोबस्त करा. आपण जाहीर केलेले जमिनीचे बक्षिसही मिळाले नाही असे ब्रिटिश सरकारकडे मागणी करतो.[५६]

त्याच प्रमाणे उमाजी नाईकांना पकडण्यासाठी उत्रोळीचा ब्राम्हण त्रिंबक सिवाजीचंद्रस कुलकर्णी याने सुध्दा मदत केली होती. त्याच्या बक्षिसासाठी त्याने भोरच्या पंत सचिवांना पत्रव्यवहार करून २५ बिघे जमीन सरकारकडून मिळविण्यासाठी धडपड केली होती. जीवाची आस्था सोडून सरकारची चाकरी केली होती. त्याचप्रमाणे त्याने रामोशांची दुश्मनी ओढवून घेतली होती. (१ ऑक्टोबर १८३३) [५७]

उमाजींना फाशी दिल्यानंतर भोजाजी सालप्याचा डोंगर सोडून कोकणात निघून गेला. पुढे काही दिवसांनी रामसिंग नावाच्या एका अंमलदाराने त्याचा पाठलाग करून भोजाजीवर हल्ला केला परंतु यावेळी रामसिंगाबरोबर शिबंदीचे काही शिपाई आणि हिंदुस्तानी रिसाल्यांपैकी घोडेस्वार होते. भोजाजी जवळ या वेळी फक्त पाचच लोक होते. त्यांच्यावर हल्ला करण्यापूर्वी रामसिंगाने रामोशांना शस्त्रे खाली ठेऊन शरण येण्यास सांगितले. परंतु रामोशांनी (भोजाजीने) यास साफ नाकार दिला. त्यामुळेच घोडेस्वारांनी

त्यांच्यावर हल्ला केला. रामोशांनीही त्यांच्यावर गोळीबार केला. या हल्यामध्ये भोजाजीला सप्टेंबर १८३३ मध्ये खंबाटकी घाटात सरकारी शिबंदीने ठार केले.[५८]

पांडुनाईक (हा विठोजी नाईकाचा भाऊ) उमाजीच्या बंडात धाडसाबद्दल व शुरत्वाबद्दल ख्याती असणारा, व त्याच्या तापट स्वभावामुळे परिसरांमध्ये दरारा निर्माण करणारा, हा एक रामोशी उमाजीच्या अत्यंत जवळचा असा होता. अहमदनरच्या पोलीस कोअर मधील रामसिंगाने यास पकडण्याचे प्रयत्न केले आणि कॅ. मॅकिन्टॅशच्या ताब्यात दिले. याच पांडू नाईकाने २२ मार्च च्या मांढरदेवीच्या डोंगरातील चकमकीत उमाजीस साथ दिली होती. नंतर पुढे न्यायालयीन चौकशी होऊन बंडात सामील झाल्याबद्दल काळ्या पाण्यावर पाठवण्यात आले. अशा रितिने उमाजीच्या टोळी पैकी दुसऱ्या एका शूर नाईकाचा शेवट घडून आला.[५९]

उमाजीच्या टोळीतील दुसऱ्या लोकांनाही पकडले. व त्यांना देहदंडाची शिक्षा देण्यात आल्या.[६०] उमाजी नाईकांच्या टोळीतील राघू रामोशी व नायकू रामोशी यांना सुध्दा १८२७ व्या रेग्यूलेशन १४ मधील विभाग १२ नुसार शिक्षा देण्यात आली.[६१]उमाजीचा अत्यंत जवळचा नातेवाईक पिराजी महीपती खोमणे (रामोशी) याला सुध्दा १८२७ च्या रेग्यूलेश्यान १२ विभाग १० मधील कलम नंबर ५ नुसार गुन्हेगार समजून अटक केली. परंतु पुण्याचे मॅजिस्ट्रेट गिबर्नने त्याच्या चांगुलपणाबद्दल सरकारकडे काही सूचना केल्या व त्यास सोडून दिले.[६२]

उमाजी नाईकांच्या बंडातील पार्वती बीन येसू खोमणे रामोशी हा सुध्दा उमाजीचा नातेवाईक होता. त्यालाही सरकारणे कैद केले. पार्वती खोमणेने तो उमाजीच्या बंडात सामील असल्याचे कबूल केले होते. त्यामुळे त्याला सुध्दा अटक केली.

यानंतर मात्र सरकारने इतर कोणत्याच रामोशांना पकडले नाही. सरकारने पुण्याचे मॅजिस्ट्रेटला कळविले की, " इतर नाईकांना शांतपणे स्थिर होऊ दिले पाहिजे. जर असे केले नाही तर त्यांच्यामधील धुसफुस अस्वस्थता तशीच टिकून राहील. रामोशांमध्ये

सरकार विरूध्द तिढा कायम राहील त्याच प्रमाणे समाजामध्ये सुव्यवस्था टिकवता येणार नाही. सरकारबद्दल लोकांमध्ये आस्था व विश्वास राहणार नाही म्हणून या रामोशांना येथून पुढे या पुर्वीच्या कोणत्याही कृत्याबद्दल विचारले जाऊ नये.[६३]

अशा प्रकारे उमाजी नाईकांनी केलेले ब्रिटिशांविरुध्दचे बंड मोडून काढण्यात ब्रिटिश सरकार यशस्वी झाले. त्यांनी बंडाचा बिमोड केला.

या उमाजीच्या व रामोशांच्या बंडात त्यांना त्यांच्या जमिनी परत मिळवायच्या होत्या पण त्याच बरोबर हे अन्यायी परकीय सरकार घालवयाचे होते. त्यासाठी उमाजीने रामोशांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. सर्व संस्थानिक सरदार स्वत्व विसरून स्वार्थाच्या विषयोपभोगांच्या गर्तेत लोळत पडलेले असताना उम्या सारखा एक स्वातंत्र्य प्रेमी रामोशी त्याच्या तुटपुंज्या सामर्थ्यानिशी का होईना इंग्रजांविरूध्द दंड थोपटून उभा राहिला यातच महाराष्ट्र मुक्तीचे वेगळेपण आहे, आगळत्व आहे.[६४] उमाजी मर्दासारखा मेला, किर्ती करून गेला. उमाजीसारख्या चळवळ्या बंडखोरास त्याच्या गुणांना वाव मिळाला असता तर खात्रीने एखादा तानाजी, बाजीप्रभू सारखा बनला असता.[६५]

पुण्याचे कलेक्टर रॉबर्टसन रामोशांच्या उठावाबद्दल मुंबई सरकारला लिहितो. "सर्व जनता कोणत्या तरी बदलाची वाट पाहत आहे. युरोपियनांविषयी असंतोष, तिरस्कार उत्पन्न करणे व नंतर त्यांना देशातून घालवून देण्यास मदत करणे असाच लोकांचा मानस दिसतो. पुण्याचे लोक तर महाकारस्थानी व अफवा उठवणारे आहेत. ते उघड बोलतात" कुठे इंग्रजांचे राज्य? समरंगनावर ते लढतील पण रामोशांपुढे त्यांचा निभाव लागणार नाही. कोणी सांगाव उद्या हा उम्याच शिवाजी सारखा बंडखोर होऊन पुन्हा मराठी राज्य चालू नाही करणार कशावरून? देवाच्या मनात असेल तर काय होणार नाही.[६६] एक दृष्टीने उमाजी हे ब्रिटिश सत्तेला आव्हानच होते. मोठमोठी राज्ये भेद नीतिने व बुध्दी कौशल्याने धुळीस मिळवणारी ब्रिटिश सत्ता उमाजी पुढे हातबल झाली होती.

ब्रिटिश अधिकाऱ्यांना मात्र उमाजी क्रंतिकारक वाटत नव्हता. त्यांच्या दृष्टीने खंडण्या गोळा करणारा तो दरोडेखोर होता. त्यांना त्याची कृती ही मुळातच बंडाची वाटत नव्हती. म्हणूनच जनतेच्या मनात उमाजीबद्दलचा त्याच्या स्वातंत्र्यकल्पनेचा जो पगडा बसत होता, तो प्रथम दूर करणे आवश्यक होते. म्हणूनच त्या दृष्टीने ते जनमाणसांवर त्याची दरोडेखोरी वृत्तीच बिंबविण्याचा पध्दतशीर प्रयत्न करीत होते. परंतु आतून मात्र सर्व ब्रिटिश अधिकारी थरारून गेले होते, उमाजी ही त्यांची फार मोठी डोकेदुखी झाली होती.[६७] त्यातच एकदा कॅ. मॅकिन्टॉशला उमाजी म्हणाला होता की, आपण कलकत्ता, संपूर्ण हिंदुस्थानात व इंग्लडमध्ये सुध्दा माहीत झाले.[६८] यातूनच उमाजीचे श्रेष्ठत्व व सामर्थ दिसून येते.

उमाजी सरकारी सेवेत असताना ब्राम्हणांना उद्देशून बोलला होता, "तुम्ही चुकला आहात. तुम्ही माझी तुलना ब्राम्हणांशी करू नका, तुमच्या श्रीमंत बाजीरावापेक्षा मी वेगळा आहे. श्रीमंत बाजीरावासारखा मी वागणार नाही. बाजीरावाला इंग्रजांनी गादीवरून हाकलले पण ब्रिटिश मला पुरंदर मधून हाकलू शकणार नाहीत. या पूर्वी त्यांनी माझ्या विरूध्द कौशल्य, बळ पणाला लावले आहेच पण ते अपयशी ठरले आहेत. याची जाणीव त्यांनाही आहे की, "रामोशांच्या सर्व हालचाली मी व माझ्या शिष्यांमार्फत होत होत्या हळुहळु ते माझ्या मागण्या मान्य करतील व माझ्याशी भांडणे थांबवतील."[६९]उमाजीच्या शक्तीचा आवाका मोठा होता. खुद्द किल्ले जंजिरा राजपुरीचा संस्थानिक सिध्दी उमाजीकडे मदतीची याचना करतो. यावरून उमाजी राजे किती ताकतवान होते याचा अंदाज येतो. कारण बलवान माणसाकडेच कमजोर माणूस मदत मागतो. याचा अर्थ उमाजी राजांचे सैन्य (रामोशी) किती अफाट ताकदीचे होते हे दिसते.[७०]

थोडक्यात गुन्हेगार मानल्या गेलेल्या रामोशांच्या जमातीत जन्मलेल्या एका सामान्य माणसाने "आम्ही चोर नाही, बंडखोर आहोत" असा खणखणीत निरोप इंग्रजांना

पाठवावा आणि एका देशव्यापी क्रांतीचे स्वप्न पहावे, व त्यासाठी अमरण झटावे यातच असे दिसते की,उमाजीचे इतिहासातील स्थान खूप उंच आहे.

शिवाय या देशामध्ये जेवढे क्रांतिकारक होऊन गेले त्यांच्या क्रांतिकार्याचा कालावधी पाहता कित्तूरची राणी चन्नमा सोडली, तर उमाजी नाईकांचे क्रांतिकार्य हे सर्वाच्या अगोदरचे आहे म्हणूनच उमाजी नाईक हे आद्य क्रांतिकारक होते.

स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुध्द लढा देणारी हिंदुस्थानातील पहिली स्त्री म्हणून राणी चन्नमाचा मृत्यू कैदेत असताना झाला २ फेब्रुवारी १८२९ मध्ये, आणि त्यानंतर स्वातंत्र्यासाठी ब्रिटिंशांविरूध्द सशस्त्र लढा देऊन वाघासारखा जीवन जगलेला क्रांतिकारक फंदफितुरीने पकडून सरकारशी कसलीही (विनंती, माफी) तडजोड न करता ताठ माणेने फाशी गेला. एकंदरीत क्रांतिकारकांच्या कालक्रमानुसार उमाजी नाईक हेच 'आद्यक्रांतिकारक' ठरतात.

संदर्भ सुची

1) J.D.Vol. 3/196 of 1830, p.n.284

2) Collector & Magistrate of Pune to Govt. Dated 27/12/1830 , J.D.Vol. 3/196 of 1830, P.P.256. 257.

३) भागवत अ.ना. -उमाजी नाईक यांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकमाला न. २३, भारत भुषण, सदशिव पेठ, पुणे, पृ.क्र. १४३

4) J.D.Vol. 15/229 of 1831- Dated 03/01/1831P-1

5) Giberne to govt.- Dated 05/01/1831 J.D.Vol-13/229 of 1831 P.-5

६) पाटोळे शिवाजी- माझे स्वप्न साकार झाले, मायबोली प्रकाशन मुंबई. पृ.क्र. ६८.

७) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, पृ.क्र. १४५

८) सातारा महाराज रेसिडेन्सी मराठी दप्तर- रूमाल नं.-४७, पत क्र. ६३, सन - १८३१

९) सातारा महाराज रेसिडेन्सी मराठी दप्तर- रूमाल नं.-४७, पत्र क्र. २५१, सन १८३०

10) Mackintosh Capt. Alexander An Account of the origin & present Condition of Tribe of Ramoossies, Including The Life of The Chief oomiah Nike, P.N.- 188

11) A Dicleration (Proclomantion) Ftom govt. true copy by Scott. Assistant Collector of poona. Dated 11-01-1831, J.D.Vol.-15/229 of 1831, P.P.- 104-105

12) J.D.Vol.-15/229 of 1831 P.P.- 32-35

13) Baran to the master genral of the army of Bombay Dated 12-01-1831J.D. Vol 15-229 of 1831 P.18

14) J.D.Vol.-15/229 of 1831 Dated 21-01-1831, P.P.- 09-10

15) J.D.Vol.-15/229 of 1831 P.- 106

16) Mackintosh -P.P. 188-189

17) Ibid - P-191

18) Acting & Assistant Magistrate of poona dated 29-01-1831 J.D.Vol.-06/220 of 1831, P.P.- 160-162

19) Mackintosh- P.P. 194-195

20) Mackintosh- p.196

21) P.D.Vol.-15/270 of 1827 P.P.- 104-105, Dated 27-11 1827, आणि नऱ्हे शंकर उमाजी राजे प्रकाशक -अनिरुध्द अनिल कुलकर्णी कॅंन्टिनेंटल प्रकाशन पुणे, पृ. क्र .144

22) Giberne to govt.- dated 21/01/1831 J.D.Vol.-15/229 of 1831P.-35

23) William Nunhams- Dated - 25-01-1831 J.D.Vol.-15/229 of 1831 P.- 49

24) J.D.Vol.-15/229 of 1831P.- 52

25) J.D.Vol.-13/229 of 1831P.P.- 95.102

२६) सा.म.रे.म.द.- रूमाल नं.-४७, नंबर -१७१ सन १८३१ प. क्र- २२३

27) A proclamation Issued by George Giberne Collector & magistrate of Poona. Dated 26/01/1831 J.D.Vol.-15/229 of 1831P.P.- 147-148

२८) सा.म.रे.म.द.- रुमाल नं.-४७, सन -१८३१, पत्र क्र-११४

29) Mackintosh- P.P. 197-198

30) Ibid- P.P. 199. 200

31) Ibid- P.P. 201. 202

३२) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकमाला नं-२३, सदाशिव पेठ पुणे. १९९०, पृ. क्र. -१७५-१७६

33) J.D.Vol.-15/229 of 1831 P.P.- 203-204

३४) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, पृ. क्र. -१८०-१८१

३५) सा.म.रे.म.द.- रुमाल नं.-४७, सन २७/०२/१९८३१ पत्र क्र. २५४

36) Mackintosh - p.p 205-206

३७) भागवत.अ.ना- पृ.क्र-१८६

38) J.D.Vol.-18/232 of 1831Dated 03-03- 1931 P.P.- 94-96

३९) सा.म.रे.म.द.- रुमाल नं.-४७ (दि. ८ ऑगस्ट १८३१ चा इंग्रजांचा जाहिरनामा परिशिष्ठ क्र. ७)

४०) भागवत अ.ना.- पृ. क्रं. १८७

41) Mackintosh- P.-209

42) Ibid- p.p. 209-211

४३) भागवत अ.ना.- पृ.क्र-१९९

44)Mackintosh- P.-215

४५) आठवले सदाशिव- उमाजी राजे मुक्काम डोंगर, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे., प्रथमावृत्ती मे-१९९१, पृ.क्र- ९६-९७

46) Mackintosh- P.P. -218-219

47) Ibid- P. 222-

48) J.D.Vol.-18/226 of 1832 P.P.- 22-2 Govt to Mackintosh Dated -19-12-1831

४९) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, पृ.क्र-२२१

50) J.D.Vol.-13/206 of 1832, P.P.- 27-28

51) J.D.Vol.-13/206 of 1832, P.P.- 26-33**,** Dated -19-01-1832

52) Assistant Judge of Poona to acting senior assistant sension Judge incharge poona, Dated 09-02-1832, J.D.Vol 13/206 of 1832, P.113Or Mackintosh, P. 226.

५३) भागवत अ.ना.- उमाजी नाईक यांचे चरित्र, पृ.क्र-२२२

५४) नऱ्हे शंकर- उमाजी राजे, प्रकाशक-अनिरुध्द अनिल कुलकर्णी कॅन्टिनेंटल प्रकाशन पुणे,पृ.क्र 367

55) Poona Gazzeteer part II Page no -316

(A Ramoshes Named Nana Raghu Chavan Who About 1831, had Received R.S. 10.000 From Government for the arrest of the great Ramoshee named umaji naik .)

५६) परिशिष्टातील पत्र- स.नि.का.४४/८/१९८६५ परिशिष्ठ क्र.६, ११ जुलै १८३२चे पत्र.

५७) त्रिंबक चंद्रस कुलकर्णी यांचे पत्र-दि. ०१ ऑक्टोबर १८३३ चे पत्र परिशिष्ट क्र. ६.

58) J. D.Vol 15/280 of 1833 P.99

५९) भागवत अ.ना. - उमाजी नाईक यांचे चरित्र, पृ.क्र.२१८-२१९

60) J. D.Vol 15/280 of 1833, P.100

61) Asistant magistrate poona to H.D. Robortson Dated 08/07/1833, J. D.Vol 10/275 of 1833, P.256

62) J. D.Vol 10/275 of 1833 P.257 Dated 13/07/1833

63) Ibid- P.N. 263. Dated 26/07/1833

६४) खोबरेकर डॉ. वि. गो.- इंग्रजी सत्तेविरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव पॉप्युलर बुक डेपो मुंबई, प्रथम मुद्रण जुन १९५९, पृ. क्र. ३१

६५) दिक्षित म.श्री.- पिचलेली मनगटे, प्रकाशिका - सौ सुमित्रा ग. क्षीरसागर, अतुल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती १० एपिल १९८६, पृ. क्र. ५९

६६) खोबरेकर डॉ वि. गो.- महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८ ते १८८४) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती१९९४, पृ.क्र. ४३

६७) पोतदार डॉ माधवराव रा.- महाराष्ट्रातील लढे आणि लढवय्ये, प्रकाशक अ.अ.कुलकर्णी,अनुबंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर २००३, पृ.क्र. ३३

68) Mackintosh -P. 223

69) Ibid- P. 224

७०) रे. सा. म.द.- ४७ (४४) परिशिष्ठ क्र. ७.

प्रकरण क्र.६

उपसंहार

व्यक्ती, समाज, स्थल, आणि काल या चार आधार स्तंभावर इतिहास आधारलेला असतो. "मानवाने केलेल्या प्रगतीचा अथवा अधोगतीचा लेखाजोखा सांगणारी कहाणी म्हणजे इतिहास होय" म्हणजेच मानव हाच इतिहास लेखनाचा अभ्यास विषय असतो. इतिहास म्हणजे त्या-त्या कालखंडातील त्या-त्या लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक विचारांचे, आशा-आकांक्षाचे, घडामोडीचे आणि स्थितींचे प्रतिबिंब असते. वेगवेगळया कालखंडात वेगवेगळे महापुरूष निर्माण होत असतात. व त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा त्या-त्या कालखंडावर ठेऊन जात असतात. म्हणूनच तर कार्लाईल महापुरुषांच्या चरित्रांनाच इतिहास म्हणतो. तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन महापुरुष त्या-त्या काळात राजकीय परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न करीत असतात.

असाचा प्रयत्न क्रांतिकारक उमाजी नाईक यांनी महाराष्ट्रात केला. उमाजी नाईकांचे क्रांतिकार्य अल्पजिवी ठरले तरी त्यांचे बलीदान वाया गेले नाही. इ.स. १८५७ च्या बंडातील हजारो सैनिकांच्याद्वारे जे साध्य झाले नाही ते मुठभर रामोशी काय साध्य करणार? परंतु इंग्रजांना हाकलून लावण्याची उमाजीने शपथच घेतली होती. ब्रिटिशांविरूध्द शस्त्र हाती घेऊन प्रबळ अशा सत्तेशी लढा दिला आणि आपला देह देशासाठी अर्पण केला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांच्या रूपाने एक श्रीगणेशा झाला. उमाजी नाईक म्हणजे वादळापुर्वीची शांतता होती. कारण त्यांच्यानंतर ब्रिटिश विरोधी आंदोलनात उडया घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे व क्रांतिकारकांचे एक मोहोळच तयार झाले. आपल्या तुटपुंज्या सैन्यांच्या बळावर त्यांनी इंग्रजांविरूध्द असंतोष व्यक्त केला तो प्रत्यक्ष क्रांतिने, म्हणजेच परकियांची त्यांना नुसती चीड नव्हती तर त्यांना देशातून घालवण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवुन दिले.

उमाजी नाईक या नावाने अनेक गोष्टींचा एकाचवेळी बोध होतो. त्यातील पहिला पैलू किंवा गोष्ट म्हणजे देशातील महाराष्ट्रातील स्वातंत्र्यासाठी वनवास भोगणारा, प्रजेची सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करणारा पहिला कल्पक व देशासाठी शरण न जाता ताठ मानेने फासावर गेलेला, कळकळीचा हुतात्मा. ध्येयवादाने झपाटलेले व्यक्तिमत्व व आदयक्रांतिकारक असे या क्रांतिवीराचे व त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन करता येईल.

प्रस्तुत शोधप्रबंधात एकूण सहा प्रकरणे आहेत. त्यापैकी सुरूवातीस संशोधनाचा आढावा म्हणजेच ओळख आहे. यामध्ये संशोधन समस्या, संशोधनाचा उद्देश, उदिष्टे, गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन पध्दती, सिध्दांत कल्पना किंवा सैधानिक पार्श्वभूमी, प्रकरण रचना, निष्कर्ष, संशोधनाची साधने इत्यादी सहाय्यभूत माहिती मांडण्यात आलेली आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये ऐतिहासिक पार्श्वभूमी व सांस्कृतिक वारसा यांचा थोडया फार प्रमाणात आढावा घेण्यात आला आहे. म्हणजेच तत्कालीन महाराष्ट्राची ऐतिहासिक, परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती व शैक्षणिक परिस्थितींचा थोडक्यात आढावा घेतला आहे. याचे कारण असे की, एखादा माणूस ज्या राजकीय, ऐतिहासिक, सामाजिक परिस्थितीत घडतो त्या परिस्थितींचे कळत व नकळत का होईना त्या व्यक्तिवर परिणाम होत असतात. याच्यासाठीच थोडया फार प्रमाणावर आधारभूत परिस्थितींचा आढावा घेतला आहे. म्हणजेच पार्श्वभूमी लिहिली आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात उमाजी नाईकांच्या पूर्वीचे रामोशी समाजातील ज्यांचे स्वराज्य निर्मितीत सहकार्य लाभले, इतर क्रांतिकारकांनी तसेच स्वराज्य स्थापनेत छत्रपती शिवरायांनी ज्या ज्या रोमोशी नाईकांच्या प्रामाणिकपणाबद्दल उपयोग करून घेतला. त्यांच्यावर विश्वासाची कामे दिली, ती सर्व कामगिरी चोखपणे बजावणा-या काही रामोशांची ओळख करून देण्याचा प्रयत्न येथे केला आहे. काही रामोशांनी आपापल्या प्रदेशापुरता का होइना पण ब्रिटिशांशी संघर्ष केला. याचाही लेखाजोखा या प्रकरणामध्ये मांडला आहे. अगदी शिवकाळातील लष्करामधील

रामोशांची कामगिरी, किल्ले रक्षणाचे काम म्हणजेच गडक-यांच्या कामापासून रात्रीच्या पहारेक-यांच्या म्हणजे जागल्याच्या कामी त्यांच्या नेमणुका केल्या होत्या. म्हणजेच रामोशी निष्ठेसाठी व प्रमाणिकतेसाठी महाराष्ट्राच्या इतिहासात प्रसिध्द कसे होते, याचे विवेचन या प्रकरणात आहे. यामध्ये येसाजी नाईक, दौलती नाईक, हिरोजी फजल, छत्रपती शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील महत्वाच्या आशा हेर खात्याचा प्रमुख बर्हिजी नाईक यांची कामगिरी, गोव्यामधील शहीद १६ रामोशी नाईक, ज्यांनी परकियांचा विरोधात पहिल्या स्वातंत्र्य लढयांचे नियोजन केले ते रामोशी नाईक इ.स. (१५५३)

सातारा जिल्हयाच्या पूर्वेकडील बाज्या-बैजाचे बंड, त्याचप्रमाणे १८५७ च्या क्रांतियुध्दातील दक्षिण भारताचे सूत्रधार व सुरपूर संस्थानचे "वीर" राजे चिक्क व्यंकटाप्पा नाईक यांची कामगिरी, त्याचप्रमाणे उमाजीची दोन मुले तुकाराम व म्हकांळा हे सुध्दा महान क्रांतिकारक होते. त्यांच्या कार्याची ओझरती ओळख करून देण्यात आलेली आहे. तसेच भद्राप्पा नाईक, (इ.स. १८९० ते १९२०) या कालावधीत त्यांनी क्रांतीची बीजे पूर्व कर्नाटकात पेरली. उत्तर महाराष्ट्रात स्वातंत्र्यासाठी बलीदान करणारा शूरसेनानी सिंधूर संस्थानचे "सिंधुर लक्ष्मण" व १८५७ च्या स्वातंत्र्य लढयात ब्रिटिश सत्तेला हादरा देणारा थोर क्रांतिकारक हरी रामोशी याचे बंड मोडण्याकरिता ब्रिटिशांनी अटोकाट प्रयत्न केले. जेजुरी या ठिकाणी ब्रिटिशांनी सोमवती अमावस्येदिवशी "हरी रामोशी" याला फासावर लटकवले. खानदेश व धुळे येथील हंसाजी, पंताजी, खंडोजी बाळाजी नाईक, सतु बेरड अशा अनेक क्रांतिकाराकांनी स्वातंत्र्यासाठी आणि स्वराज्यासाठी त्यांचे प्राण गमावले आहेत. अशा सर्वच रामोशी नाईकांचे कार्य किती व कसे मोलाचे आहे. याचा थोडक्यात या प्रकरणात ऊहापोह केलाआहे.

दुस-या प्रकरणात उमाजीनाईकांचा पूर्व इतिहास त्यांचे आई-वडील, त्यांची शिकवण, यांविषयी माहिती आहे. त्याचप्रमाणे या प्रकणात सुरूवातीस रामोशी, नाम आणि उद्‌गम यांवर म्हणजेच रामोशी शब्दाच्या व्युत्पत्ती बद्‌दल माहिती दिली आहे.

रामोशी समाजाचे वैशिष्टयपूर्ण जीवन व त्यांची वैशिष्टये आहेत. यामध्ये रामोशांची भाषा, त्यांची नावे, जाती, पोटजाती, आडनावे, त्यांच्या चालिरीती (लोकजीवन) उदा. रामोशाची विवाहपध्दती, कुलदैवत, काडीमोड, पुनर्विवाह, धर्मविचार, त्यांच्या जात पंचायती, याबद्दल सविस्तर माहिती उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर रामोशांची शस्त्रास्त्रे, त्यांचा शपथविधी, त्यांचा अंत्यसंस्कार त्याचबरोबर मरणोत्तर विधी अशा मुदयांच्या आधारे या प्रकरणात सविस्तर आढावा घेतला आहे.

त्याचप्रमाणे उमाजी नाईकांचे जन्म स्थळ,आई वडील याच्या विषयी, उमार्जीच्या बालपणीचे संस्कार व नित्यक्रम यांचे वर्णन आहे. आई लक्ष्मीबाईंची शिकवण, उमार्जीच्या आवडी व उमाजीचे व्यक्तिमत्व मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. उमार्जीचे आदर्श, प्रेरणा, उमाजीचे गुण इ. चे वर्णन केले आहे. त्याचप्रमाणे उमाजी नाईकांनी ब्रिटिशांविरूध्द उठाव करण्याची नेमकी आणि महत्त्वाची कारणे या प्रकरणात नमूद केलीआहेत.

तिस-या प्रकरणामध्ये दुस-या बाजीराव पेशव्यांची थोडक्यात कामगिरी व त्याच्या काळातील राज्यकर्तेच प्रजेला कसे छळत होते याचे थोडक्यात वर्णन केले आहे. बाजीरावाची खराब कामगिरी, त्यास लोकांची कशी नाराजी होती, त्याचप्रमाणे तो इंग्रजांचा मांडलिक बणून पेशवेपदी विराजमान झाल्यावर अगदी शिवकाळापासून रामोशांकडे असलेल्या किल्ले रक्षणाची कामे काढून घेतली, त्यांची इनामे , वतने, जहांगि-या, सनदा वगैरे या बाजीरावाने इंग्रजांच्या सांगण्यावरून काढून घेतल्या होत्या. त्याचप्रमाणे इ.स. १८०३ च्या मे महिन्यात वेलस्लीने पुण्याच्या आसपासचे गडकोट घेण्याचे हुकूम दिले होते. नेमके पुरंदर किल्यावरच उमाजीचे कुटुंब अगदी पिढीजातपणे किल्याचे रखवालदार "गडकरी" म्हणून काम करीत होते आणि ब्रिटिश व बाजीरावांच्या धोरणामुळे उमार्जीचा उदरनिर्वाहाचा व पुरंदरच्या ठाण्याविषयीचा प्रश्न निर्माण झाला होता. म्हणून रामोशांनी बाजीरावास किल्ला सोडण्याचे नाकारले म्हणूनच बाजीरावाने चिडून जावून रामोशांच्या

जमिनी, इनामे, हक्क वतन, सनदा, नेमणुका जप्त केल्या. आणि याच कारणांमुळे उदरनिर्वाहाचे साधन संपल्याने रामोशांची कशी वाताहात झाली याचे वर्णन आहे.

पेशवे सरकार पासून व त्यांच्या अंमलदारांपासून पुन्हा त्रास होऊ नये म्हणून रामोशांचे (उमाजींचे) परांडयाकडे स्थलांतर व परांडयामध्ये मुस्लिम इनामदार बाईंचे प्रकरण या विषयी थोडक्यात आढावा या प्रकरणात आहे. याच प्रसंगी औरंगाबादच्या सुभेदाराशी रामोशांची जी चकमक झाली त्याचीही माहिती या प्रकरणामध्ये आहे. या चकमकीनंतरही रामोशांच्या हालअपेष्टा, त्यांच्यावरची संकटे, त्यावरचे उपाय, त्याचप्रमाणे तीन महिन्यांची कैद, ठाणे अंमलदाराला लाच देऊन सुटका कशी केली आणि त्यांची पुन्हा पुरंदरकडची ओढ, या सर्व कालक्रमाने गोष्टी कशाकशा घडल्या याचे विवेचन या प्रकरणात आहे. उमाजीचे एकपत्नित्व अत्यंत कडकडीत असून त्यांचे वर्तन सर्व स्त्रीयांशी व इतरांशी फार शुध्द होते. बंदफैलीपणा व इतर व्यसने याचा उमाजीस अत्यंत तिटकारा होता. परराज्यांवरून पुन्हा पुरंदरकडे आल्यानंतर नैराश्येचा व दु:संगतीमुळे काही दिवस उमाजीस मदयपानाचे अत्यंत दुष्ट व तिरस्करणीय व्यसन जडले होते. पण त्यामध्ये त्यास चांगलीच अद्दल घडल्यामुळे पूर्णपणे ते व्यसन सुटले होते. उमाजी हलक्या जातीतील व अक्षरशत्रू असूनही त्यांची नितिमत्ता व व्यसनापासूनची मुक्तता हे त्याच्या अंगचे थोर गुण एखादया उच्च वर्गातील सुशिक्षित व शुध्दाचरणी मनुष्यांच्या सद्‌गुणांप्रमाणेच आदरणीय होते.

इ.स. १८१६ व १८१७ मध्ये पुरंदरच्या मुक्कामी असतानाच दरोडेखोरी हाच त्याचा आयुष्यभराचा व्यवसाय निश्चित करून दरोडे खोरीची मार्ग उपजिविकेसाठी निवडला. या सर्व घडा मोडींचा आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे.

चौथ्या प्रकरणात उमाजीं नाईकांनी ब्रिटिशांविरूध्द कसे कसे लढे दिले यावर प्रकाश टाकला आहे. यामध्ये उमाजी नाईकांचे अगदी सुरूवातीपासूनचे दरोडे व त्यामुळे त्यांना झालेली शिक्षा याचे विवेचन आहे. इ.स.१८१७ ते १८२६ च्या दरम्यान उमाजी

कमी अधिक प्रमाणात चोऱ्या व दरोडे करू लागला याचे कारण फक्त असे धंदे करून पैसे मिळवायचे असतात, आणि त्यावर आपली उपजिविका करायची असते. अशीच उमार्जीची मानसिकता दिसते. इ.स.१७९५ नंतरच्या काळात पेशवे, शिंदे, होळकर, अशा सत्ताधाऱ्यांना किंवा त्यांच्या नावे फौजा बाळगून फिरणाऱ्या बडया मंडळींनी सुध्दा लुटमारीच्या उदयोगाला एक प्रकारची मान्यताच मिळवून दिल्यासारखेच होते. मग अशा स्थितीत धाडी, दरोडे, चोऱ्यामाऱ्या करणे हा ज्यांचा शेकडो वर्षाचा परंपरागत उदयोग होता. त्या रामोशांमधल्या एका उमाजीनेही तोच पाढा वाचल्याचे दिसते. इ.स. १८१७ ते १८१८ च्या दरम्यान उमाजीने साकुर्डीचे रामोशी व सासवडचे रोमोशी यांच्या समवेत काही दरोडे घातले. चानजी मनिया (सावकार), विंगचे कुलकर्णी यांच्या लुटीच्या शिक्षेपोटी उमाजीस कैद झाली. तुरूंगात असतानाच उमाजी थोडया फार प्रमाणात लिहिण्या वाचण्यास शिकला होता. म्हणजे उमार्जीची शिकण्याची तळमळ दिसते. यावरून विदयेचे महत्व उमाजी जाणीत होता हे स्पष्ट होते.

नंतरच्या काळात उमाजी सासवडच्या सतु नाईकाच्या टोळीत सामील होवून त्याने काही दरोडे घातले, त्याचाही कालाक्रमाने आढावा घेण्यात आला आहे. १८२३ च्या दरम्यान उमाजीचे काही जिवलग मित्र (सैन्य) येवून मिळाल्यानंतर त्यांच्या उपजीविकेसाठी लहान चोऱ्या माऱ्यांपेक्षा, ब्रिटिश सरकारच्या पुणे येथील भांबुडर्यांची लूट २४ फेब्रुवारी १८२४ मध्ये केली. यानंतर मात्र उमाजीचा वाढता उपद्रव थांबवण्यासाठी ब्रिटिश सरकारने त्यावर बंदोबस्त म्हणून काही पैशाची अमिषे दाखवून जाहीरनामे काढले व यामध्ये उमाजी व भुजाजी यांना पकडण्याचे आवाहन दिले होते. तरी सुध्दा उमाजीने खंडण्या वसूल केल्या. शेतसारा वसूल करणे हा फक्त सरकारचा अधिकार असतो. उमाजीने हा सारा खंडणीच्या स्वरूपात वसूल करून एक प्रकारचे प्रतिसरकार स्थापन केल्याचे दिसते. म्हणजेच उमाजी लुटमा-या, दरोडे घालीत होता. तेव्हा तो दरोडेखोर होता, आणि त्यानंतर प्रजेच्या हितासाठी गुलामगिरीच्या विरोधात ब्रिटिशांशी लढा म्हणजे उमाजी

बंडखोर क्रांतिकारक ठरतो असे म्हणता येईल. बंडाच्या बंदोबस्तासाठी बंडखोर उमाजीस पकडण्यासाठी सरकारने १५२ चौक्या स्थापन केल्या होत्या. खूप मोठया रकमांचे जाहीरनामे काढले होते, तरी सुध्दा आपण चोर नाहीत, सरकार आहोत, इंग्रजांची जागा घेणाऱ्या नव्या सरकारचे प्रमुख आहोत, अशीच भूमिका उमाजीने घेतली असल्याचे दिसते. आपल्या बंडासारखी महाराष्ट्रभर हजारो बंडे उभी राहतील, अशा शब्दांत उमाजी इंग्रजांना इशारे व धमक्या देऊ लागला. उमाजी इंग्रजांची सत्ता संपवायची आणि त्याच्या जागी आपण यायचे असे स्वप्न पाहू लागला. आणि खरेच केवळ स्वप्नांमध्ये स्वस्थ न बसता ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी बला बलाचा फारसा विचार न करता धडाक्याने ब्रिटिशांना आव्हान देत होता असे दिसते.

इ.स. १८२८ च्या उत्तरार्धापासून इ.स.१८३० मधील सप्टेंबर-ऑक्टोंबर महिन्यांपर्यंत उमाजीने एक निराळीच चाल केली. ती म्हणजे उमाजी दरोडेखोरी सोडून इंग्रजी सत्तेविरूध्द बंड पुकारून स्वातंत्र्यवीर झाला होता. तो इंग्रजांचा नोकर झाला. कंपनी सरकारतर्फे चोऱ्यामाऱ्याच्या बंदोबस्ताची नोकरी त्याने स्विकारली त्यासाठी कंपनी त्यास दरमहा पगारही देऊ लागली. हया घटनेचा अन्वयार्थ असा की उमाजीचे मतपरिवर्तन झाले असे दिसून येत नाही. यावेळी उमाजी थोडीफार माघार घेतो. कारण तो सरकारची नोकरी करण्याचे नाटक करीत होता. नोकरी करता करताच त्याला त्याचे मनुष्यबळ व द्रव्यबळ वाढवायचे होते. याच दरम्यान उमाजी नोकरीत राहून त्याच्या इतर टोळयांकडून दरोडे घालून घेत असत व त्यांचा हिस्सा घेत असत. त्याचप्रमाणे त्याच्या हेरांमार्फत बडयाबडया सावकारांच्या बातम्यांही तो काढीत असे.

प्रकरण क्रमांक पाच मध्ये उमाजी नाईक ब्रिटिशांनी पुणे येथे बांधून दिलेल्या घरातून म्हणजेच नजरकैदेतून कसे पळाले आणि नंतर मात्र त्यांनी ब्रिटिशांशी कसलीही तडजोड न करता कोणत्याही परिणामांची पर्वा न करता अतिशय कडवा असा संघर्ष केला. त्याचे कालक्रमानुसार वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. इ.स. १८३० ते

इ.स. १८३१ मधील हया घटना आहेत. दि. १६ डिसेंबर १८३० मध्ये योग्य वेळेचा फायदा घेऊन उमाजी पसार झाले आणि त्यांनी स्वातंत्र्याच्या इर्षेपोटी पुन्हा एकदा डोंगराचा रस्ता धरला. डोंगर जंगलात राहून मित्रांसमवेत ब्रिटिशांविरूध्दच्या योजना आखल्या. यामध्ये अगदी गोरगरीब रयतेकडून आणि राजेरजवाडे या सर्वच घटकांमधून उमाजीस पाठिंबा मिळत गेला. सामान्य जनतेला उमाजीचा अभिमान वाटू लागल्याने उमाजीस पकडून इंग्रजांच्या स्वाधीन करणे हे बरोबर नाही अशी सर्वांची मानसिकता झाली होती. त्याचप्रमाणे ब्रिटिशांविषयी उमाजीची धोरणे व योजना स्पष्ट केली आहे. ब्रिटिशांशी हा संघर्ष करतांना पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्याचा मार्ग ही उमाजीने सैनिकांना दिला होता. "शेतक-यांच्या भाजीच्या देठाचीही अपेक्षा ठेवू नका" ही छत्रपती शिवाजी महाराजांची सैनिकांना जी सूचना होती अगदी त्यास मिळती जुळती सूचना उमाजीनेही सैनिकांना दिलेली दिसते. ती म्हणजे दि.६-०२-१८३१ च्या परिपत्रकात उमाजी लिहितात की, " गावगन्ना लोकांस (रयतेस) उपद्रव देऊ नये फक्त पोटास सरंजाम घेत जावा" यावरून एक गोष्ट नक्कीच लक्षात येते की, उमाजीकडे व्यावहारिक शहाणपण एवढे होते की एखादया मुत्सद्दी सेनानायकाकडे असावे असेच होते.

त्याचप्रमाणे या प्रकरणात मांढरदेवीची चकमक, अंदोरीच्या सावकाराची लुट व त्यावरील कंपनी सरकारची उपाययोजना काय होत्या, हे स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे कॅप्टन मॅकिंन्टॉशचे उमाजीस पकडण्यासाठीचे प्रयत्न, मॅकिंन्टॉशच्या छुप्या योजना यांचे, व परत एकदा उमाजीचे संघटन कौशल्य, त्यांच्या टोळयांचे नियोजन कसे कसे होते हे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजे इंग्रजांच्या कैदेतून निसटल्यावर पुढे जवळ जवळ वर्षभर त्याने पुन्हा इंग्रजांना हैराण केले. इ.स. १८३० ते इ.स. १८३१ च्या काळात उमाजीने पुन्हा एकदा स्वातंत्र्याचा पुकारा केला होता. तो स्वत:च्या नावाने फर्माने काढीत असे. थोडक्यात सांगायचे झाले तर इ.स. १८२७ ते इ.स. १८२८ चा कार्यक्रम उमाजीने पुन्हा एकदा नेटाने सुरू केलेला दिसतो.

उमाजी, भोजाजी, येसाजी व कृष्णाजी यांना पकडण्यासाठी २६ जानेवारी १८३१ मध्ये जाहीरनामा काढून मोठमोठी बक्षीसे व इनाम जमिनीची लालसा सरकारने लोकांना दाखविली होती. त्याचप्रमाणे विशेष म्हणजे उमाजीनेही नव्या सरकारचा जाहीरनामा दि.१६ फेब्रुवारी १८३१ मध्ये काढून ब्रिटिशांना कडवे आव्हान दिलेले दिसते. या जाहीरनाम्याचे वैशिष्टये म्हणजे उमाजीने संपूर्ण हिंदुस्तानच्या रहिवाशांना व सर्व जाती धर्माच्या लोकांना उद्देशून हा जाहीरनामा काढलेला दिसतो. आणखी एक दूर दृष्टी उमाजीची दिसते. ती म्हणजे इंग्रजांना हाकलण्याचे काम अवघड असल्याने त्यासाठी संपूर्ण देशभर सर्वच जनतेने एकजुटीने आणि एकाच वेळी उठाव करावा असे ते सुचवतात. त्याचप्रमाणे उमाजी व त्यांचे सहकारी पकडण्यासाठी इंग्रजांचा शेवटचा जाहीरनामा (८ ऑगस्ट १८३१) व त्याची कलमे तपशीलवार देण्याचा प्रयत्न या प्रकरणामध्ये केला आहे. रामोशांचे बंड फार मोठया प्रमाणात नसले तरी उमाजीसारख्या मोठया ताकदीच्या माणसाला बाहेर राहू देणे इंग्रजांच्या दृष्टीने धोक्याचे होते. उमाजीबद्दल जनतेत आदरयुक्त भिती होती, कारण उमाजी इंग्रजाविरूध्द मोठया प्रमाणात खटाटोप करतो, याचे जनतेला कौतुक वाटे, म्हणूनच ब्रिटिशांचा डोळा चुकवून गावोगावचे लोक उमाजीच्या लोकांना जेवण पुरवित, अनेक आमिषे दाखवूनही उमाजीस पकडण्यासाठी पुढे कोणी येत नाही हे लक्षात आल्यावर उमाजीस पकडण्यासाठी इंग्रजांनी डावपेच टाकले. उमाजीस पकडण्याचे उद्दिष्टे ब्रिटिशांना सरळमार्गाने साध्य होईना म्हणून सरकारने मोठमोठया बक्षिसांची प्रलोभनेही दाखवली तरीही काहीच साध्य झाले नाही. म्हणून इंग्रजांनी कट कारस्थाने व फंद फितुरी या सारख्या मार्गांचा आश्रय घेतला. तो म्हणजे उमाजीच्या बंदोबस्तासाठी ब्रिटिशांनी रामोशांचाच उपयोग करून घेतल्याचे दिसते.

यामध्ये अहमदनगर जिल्हयातील बापुसिंग व काळू या दोघांनी पूर्वी उमाजीस मदत केली होती. त्यांना उमाजीचे सर्व डावपेच अवगत होते. सरकारचे लष्करामार्फत उमाजीस पकडण्याचे प्रयत्न वाया गेले होते. त्यामुळे अविश्वासाने उमाजीस पकडण्याचे चक्रव्यूह

बापुसिंगामार्फत रचले त्याचप्रमाणे उमाजींचा अगोदरचा प्रमुख घटक असलेला नाना चव्हाण याचा सुध्दा ब्रिटिशांनी या कारस्थानात सूत्रधार म्हणून उपयोग करून घेतला.

ऑक्टोबर १८३१ मध्ये उमाजींची महत्त्वाची माणसे (कोकणातील हेटकरी) त्यांच्या घरी जाण्यास उतावळे झाले होते. पुढे त्यांच्या पगाराचीही उमाजी कडून पुर्तता होत नव्हती. याच संधीचा फायदा घेऊन नानाने उमाजीस चुकीचा सल्ला दिला. उमाजीस फाशात अडकवण्याचा प्रयत्न केला. आणि अशाप्रकारे काळू व नाना यांच्याकरवी ब्रिटिशांनी उमाजीस भोर जवळील उत्रोळी या गावी पकडले. उमाजीनेच पोसलेल्या व वाढविलेल्यांनी पण बक्षिसांच्या प्रलोभनाने अंध झालेल्या चार मूर्तीमंत काटयांनी (नाना,काळू,जगू, भैरू) मोठया विश्वासघाताने उमाजीस पकडून दिले. १५ डिसेंबर १८३१ ला पकडल्यापासून दीड महिना पुणे येथे तुरुंगात ठेवून त्याच्यावर काही आरोप ठेऊन उमाजीस फाशीची शिक्षा देण्यात आली. ही फाशी ३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुणे येथील सध्याची खडकमाळ पोलीस चौकी आहे तेथे देण्यात आली. अशा रितीने स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुध्द लढा देऊन वाघा सारखा जीवन जगलेला शूर रामोशीवीर बेडर क्रांतिकारक फंद फितुरीने पकडल्याने सरकारला कसलीही विनंती व माफी न मागता, कसलीही तडजोड न करता, ताठ मानेने फाशी गेला. या प्रकरणात उमाजी आद्यक्रांतिकारक कसे हेही सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

थोडक्यात सांगायचे झाले तर दादोजी नाईक हे पुरंदर किल्याचे संरक्षण करणारे सरदार होते. यासाठी त्यांना पुरंदर किल्याजवळील भिवडी गावी जमीन इनाम मिळालेली होती. ३ जून १८१८ मध्ये पेशवे ब्रिटिशांशी वसईचा तह करून त्यांची तैनाती फौज स्विकारून पुणे येथे आले. त्यांनी रामोशांच्या ताब्यातील पुरंदर किल्याची मागणी केली. रामोशी पुरंदर वरील हक्क पेशव्यांना देण्यास तयार झाले नाहीत. तेव्हा ब्रिटिशांच्या मदतीने लढाई झाली. रामोशी हरले. रामोशांना किल्ला पेशव्यांच्या ताब्यात देणे भाग पडले. रामोशी लोक पुरंदरचा किल्ला घेताना आपल्याबरोबर लढले याचा राग येऊन रामोशांच्या

पुरंदर किल्याचा रक्षणाचा हक्क, वतने, ताम्रपट, सनदा, इनाम व जमिनीचे हक्क काढून घेतले. त्यामुळे रामोशांचे उदर निर्वाहाचे साधन नाहीसे झाले.

उमाजी नाईकांना हे सर्व कृत्य सहन न झाल्यानेच तो ब्रिटिशांचा कर्दनकाळ ठरतो. खरे तर विधायक म्हणा किंवा विघातक म्हणा पण उमाजीने जो काही क्रांती करण्याचा अल्पसा प्रयत्न केला, तो म्हणजे भारतातील महाराष्ट्राच्या तीन चार जिल्हयांपुरताच होता. अणि तो सात आठ वर्ष चालला. पण त्यांचे कार्य मात्र नंतरच्या पिढीला प्रेरणादायी ठरल्याचे दिसते. छत्रपती शिवाजी प्रमाणे नवीन राज्य स्थापन करण्याचे आपल्या स्वत:च्या कर्तबगारीवर, मनगटाच्या जोरावर आपल्या शौर्याच्या बळावर त्याने मोठी महत्वकांक्षा धरली यात त्याने कोणताही गुन्हा केलेला दिसत नाही. कर्तृत्ववान पुरूषाची इच्छा महत्वाकांक्षा आणि धैर्य ही नेहमी मोठीच असतात. मोठी इच्छा धरून जेव्हा एखादे कार्य हाती घ्यावे तेव्हा कुठेतरी लहानशे फळ मिळाले तर मिळते. धाडशी आणि साहसी पुरूषांना त्यांच्या साहस कार्यात यशप्राप्ती झाली म्हणजे ते उच्च पदाला पोहचतात. आणि त्यात त्यांना दुर्देवाने काळाच्या प्रतिकुलतेमुळे अपयश आले म्हणजे मग त्यांची अविवेकी, अविचारी, दरोडेखोर, आणि बंडखोरांच्यांत गणना होते. लुटालुट करणाराच यशस्वी झाला म्हणजे तो राजा बनतो.

एखादया प्रामाणिक लुटारू मनुष्याप्रमाणेच उमाजी प्रामाणिक आणि सद्ववर्तनी होता. बंडखोर होता. त्या लुटारूने राजाशी आपली तुलना करून दोघांच्या स्थितीतील साम्य त्यास दाखवून त्याची खात्री केली. आपले म्हणणे त्याला कबूल करायला लावले. तशीच उमाजीनेही त्याच्या अंगच्या गुणांबद्दल मॅकिन्टॉश साहेबांशी खात्री करून त्यास खरी ओळख पटवून दिली. बंडखोर आहेच परंतु पहिल्या प्रतीच्या उत्तम पुढा-यांच्या योग्यतेचे आपण आहोत. असेच त्याच्याकडून म्हणवून घेतले. समरांगणात दोन हात करून व उघडपणे लढून स्वत:चे जे होते ते मिळविण्यासाठी आणि त्या योगाने सर्वांबरोबर श्रीमंत होण्याची त्याने इच्छा धरली होती. नाना व काळू हे त्याचे दोन साथीदार रामोशीच होते.

त्यांच्याप्रमाणे आपल्या अन्नदात्याशी व मित्रांशी द्रोह करून आणि उलट पक्षात फितूर होऊन त्याने केलेल्या द्रोहामुळे मिळविलेल्या हजारो रुपयांच्या थैल्यांनी त्यांची घरे भरली नाहीत. किंवा एखादी जहागीरी मिळवून आपल्या पुढील तीन पिढयांचे कल्याणही करून ठेवले नाही.

अशा रितीने श्रीमंत बनलेली मंडळी महाराष्ट्रात काही कमी नाहीत. उमाजींचे "बंडखोर" म्हणून जसे नाव प्रसिध्द आहे तसेच नाना व काळू यांचीही नावे प्रसिध्द आहेत, पण त्यांना फितुरी म्हणुन जसे त्यांचे नाव निघाल्याबरोबर लोक तिरस्काराने नाके मुरडतात, तसे उमाजी नाईकांबद्दल कोणीही मुरडीत नाही. हाच त्यांचा विशेष गुण होता. उमाजीने जो मार्ग पत्करला, त्याच्या हातून जी दुष्कृत्ये त्याच्या धंदयामुळे घडली, त्यात काही गैर नाही. त्याने जे काही केले ते साहजिकच होते. उमाजी जसा धाडशी, निर्व्यसनी, साहसी, लुटालुटी करणारा बंडखोर होता, तसा तो निर्लोभी, एकवचनी, थोरमनाचा, सतशीलवान, धार्मिक, निष्कपटी, धोरणी आणि योग्य पुढारीही होता. त्याच्या याच गुणांमुळे ब्रिटिश व्यक्तिनेही (विरोधकाने) म्हणजे कॅप्टन मॅकिन्टॉशने उमाजीचे चरित्र लिहिले. त्यावरून एकच अर्थ निघतो की, उमाजी नुसता बंडखोर नसून एक क्रांतिकारक होता. ब्रिटिशांबरोबर लढताना फितुरीने पकडला गेल्याने त्यास दि. ३-२-१८३२ रोजी फाशी दिली. देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये क्रांतिकार्य करताना सर्वात प्रथम उमाजी नाईकांना फाशी दिली. म्हणूनच उमाजी नाईक हे "आद्यक्रांतिकारक" ठरतात.

संदर्भ साधन सुची (Bibliography)

English Sources

A) Unpublished Primary Sources

In Bombay Archives	**Judicial Department**
-Govt. of	J.D. Vol 8A/89 of 1825
Maharashtra	J.D. Vol 17/118 of 1826
	J.D. Vol 14/140 of 1827
	J.D. Vol 14/186 of 1829
	J.D. Vol 13/139 of 1827
	J.D. Vol 15/270 of 1827
	J.D. Vol 15/280 of 1833
	J.D. Vol 10/275 of 1833
	J.D. Vol 11/204 of 1830
	J.D. Vol 03/196 of 1830
	J.D. Vol 13/226 of 1832
	J.D. Vol 13/206 of 1832
Bombay Archives	P.D. Vol 15/270/1827
(B) Political	P.D. Vol 15/270/1827
Department	P.D. Vol 13/304/1827

B) Publised Primery Sources

1) Enthoven R.E.- The Tribes & Castes of Bombay - Vol-III Asian Educational Services New Delhi * Madras * 1990

2) Grant Duff- History of the Marathas Vol-II

1) Gune V.T.- The Judicial system of the Marathas by Dr. S. M. Katre for the Deccan College post Graduate & Resource Institute. Yerawada–Poona 1953

2) Mackintosh- Captain Alexander- An Account of the origin & present condition of the Tribe of Ramoossies,Including the life of The Chief oomiah Naik Of the Twenty seventh Regiment -Madras Army American mission Press. Bombay 1833

3) Singh K.S - (Genral Editor) People of India-Maharashtra Vol- xxx Part – Three, Anthropological Survey of India, Popular prakashan Pvt Ltd, Mumbai

4) Gazetteer- Gazetteer of the Bombay Presidency Vol- XVIII Part I, II, III Poona Under Government order Bombay Central Press 1885

मोडी कागदपत्रे- पेशवे दप्तर, पुणे.

अ १) मोडीतील वंशावळ

२) सा.रे.म.द. ४४/८/१९८४९ क्र (१०६) चे पत्र दि. ०१/१०/१८३३

३) सा.रे.म.द. ४४/८/१९८६५- ११ जुलै १८३२

४) सा.रे.म.द. १८ एप्रिल १८३० चे रॉबर्ट सनचे पत्र

५) सा.रे.म.द. १६ ऑक्टोबर १८२९ चे पत्र

ब) सातारा महाराज रेसिडेन्सी मराठी दप्तरातील रुमाल नं. ४७ व ४७ (४४) मधील लिप्यैंतरीत मजकुरांचे आशय

मराठी प्राथमिक अप्रकाशित

१) इंगळे योगीराज बाबुराव- उमाजीराव नाईक यांचे ऐतिहासिक कार्य एम् फील् साठीचा अप्रकाशित लघुशोध प्रबंध. सन २०१०, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ - नाशिक.

२) गोडसे महादेव विठोबा- उमाजी नाईक व त्याचे बंड (सन १८१८ ते १८३२) एम् फील् साठीचा अप्रकाशित लघुशोध प्रबंध. एप्रिल १९८६, पुणे विद्यापीठ.

३) पटवर्धन पा.न.- उमाजी नाईकांची काही पत्रे स्वीय ग्रंथमाला क्रमांक ६१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड -५ वा वर्ष २४ वे अंक- तिसरा, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, जानेवारी १९४४

प्राथमिक प्रकाशित

१) भागवत अ.ना. - उमाजी नाईक यांचे चरित्र ऐतिहासिक पुस्तकमाला नं.२३ भारत भुषण, सदाशिव पेठ, पुणे -१९९०

२) कुलकर्णी अ.रा. - कंपनी सरकार (इस्ट इंडिया कंपनी) राजहंस प्रकाशन, प्रकाशक- दिलीप माजगांवकर द्वितीय आवृत्ती - डिसें.२००४

३) राजवाडे वि.का- मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड-१५, प्रकाशक- शंकर श्रीकृष्ण देव, श्री आत्माराम छापखाना, धुळे, श्रावण शके- १८३४ (१९१२) लेखाक ३५२

४) केळकर- देशभक्त नरसिंहचिंतामन / तात्यासाहेब केळकर यांस त्यांच्या एकसष्टाव्या वाढदिवसानिमित्त पुणे केळकर वाढदिवस मंडळाच्या वतीने समारंभाने समर्पन केलेला ग्रंथ ''केळकर वाढदिवस मंडळ पुणे सन -१९३२'' प्रकाशक - भोपटकर लक्ष्मण बळवंत आर्यभुषण छापखाना भांबुर्डा पुणे, केसरी- ९ एप्रिल १९१०, दुसरी आवृत्ती -१९३२

५) गोगटे चिंतामण गंगाधर- महाराष्ट्र देशातील किल्ले, भाग- पहिला सन दुसरी आवृत्ती- १९०५, (हा ग्रंथ पुणे येथे " इंदिरा" छापखान्यात त्रिंबक हरी आवटे यांनी छापला व चिंतामण गंगाधर गोगटे यांनी प्रसिध्द केला)

६) जोशी श्री लक्ष्मण शास्त्री - मराठी विश्वकोश -खंड (१४) प्रकाशक - सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ, प्रथम प्रकाशन -१९८९

७) जोशी डॉ. पु.म. -चौहान देवीसिंग व्यं. भारतीय इतिहास आणि संस्कृती मुंबई मराठी ग्रंथालयाचे इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक वर्ष २१ डिसेंबर -१९८४

८) दिक्षित डॉ.दुर्गा- डायमंड महाराष्ट्र संस्कृती कोश, डायमंड प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती इ २००९

९) पुरंदरे दप्तर भाग २ रा -भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पुरस्कृत ग्रंथमाला क्र.१७ श्री मल्हारराव पुरंदरे यांचे दप्तरातील संग्रह मुद्रक व प्रकाशक - श्रीपाद रघुनाथ राजगुरु- पुणे. ३६

१०) सरदेसाई गोविंद सखाराम- मराठी रियासत, खंड- ८वा, संपादक- स.मां. गर्गे, प्रकाशक- रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, पहिली आवृत्ती- १९३२,

दुय्यम प्रकाशित साधने

१) अंदुरकर व्यं.गो.- क्रांतिच्या ठिणग्या, सोलापूर १९६८.

२) अंबिके पांडुरंग रघुनाथ -(पत्रकार व स्वातंत्र्य सैनिक) भारतीय स्वातंत्र्य रणसंग्राम प्रकाशन- पुणे विद्यार्थीगृह १७८६ सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती -१/०४/१९९५

३) अभिनव मराठी- मराठी शब्द कोश - भाग तिसरा, प्रकाशक- सदाशिव कृष्ण पाध्ये, व्हीनस प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती, डिसेंबर १९८३.

४) आठवले सदाशिव- उमाजीराजे मुक्काम डोंगर, कॅन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती मे -१९९१

५) आगलावे डॉ. प्रदिप- संशोधन पध्दती शास्त्र तंत्र, विद्या प्रकाशन, नागपुर, सन -२०००

६) एक्के शिवाजीराव- आदय कांतिकारक उमाजी नाईक, प्रकाशक - गजानन शिवाजीराव एक्के, शिवानी प्रिंटर्स, पुणे, द्वितीय आवृत्ती २०१२

७) कदम नागनाथ - महाराष्ट्रातील भटका समाज , संस्कृती व साहित्य, प्रकाशक - अरूण पारगावकर प्रतिमा प्रकाशन , पुणे प्रथमावृत्ती -१९९५

८) कुलकर्णी कृ.पा. - मराठी व्युत्पत्तीकोश, पुरवणी संपादन श्रीपाद जोशी, शुभदा सारस्वत प्रकाशन -पुणे.

९) कदम नागनाथ - महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती साहित्य

१०) काळे डी.डी. - स्वातंत्र्य संग्राम स्मृती, कोल्हापूर -१९८६.

११) कीर धनंजय- महात्मा फूले समग्र वाङःमय, संपादक -डॉ. स.ग. मालसे, य. दी. फडके, प्रकाशक - सचिव -म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

१२) कुंभार (गुरुजी) ब.ना.- शिवरायांची नवरत्ने, प्रकाशक - गुलाबराव मारुती कारले, नवमहाराष्ट्र प्रकाशन, पुणे-१९६८.

१३) केतकर श्रीधर व्यंकटेश- महाराष्ट्रीय ज्ञानकोश (शरीरखंड) विभाग -१९ वा, मुर- व-हाड, मुद्रक- ज्ञानकोशा छापखाना, पुणे.

१४) केळकर का.नं- शमी पूजन, प्रकाशक-ग.ज.अभ्यंकर कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे विदयापीठ प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती-१९७४

१५) केळकर .न.चि.- मराठे व इंग्रज - संपादक केसरी व मराठा, प्रकाशक - श्री. प्रिंटींग एजन्सी, पुणे - १९१८

१६) केळकर .न.चि.- भारत इतिहास संशोधन मंडळ - त्रैमासिक वर्ष -७, संपादक व प्रकाशक - दत्ती वामन पोतदार,गंगाधर नारायण मुजुमदार, शके १८४८ - १८४९

१७) कोठेकर शांता- 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृत्ती -२००५.

१८) खरात शंकरराव रा.- बारा बलुतेदार, प्रकाशक- ग.ल.ठोकळ,ठोकळ प्रकाशन, पुणे.

१९) खोबरेकर डॉ. वि.गो - महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८-१८८४)महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई, प्रथमावृत्ती १९९४

२०) खोबरेकर वि.गो. -इंग्रजी सत्तेविरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव, (सन १८१८-१८६०) पॉप्युलर बुक डेपो , मुंबई, प्रथम मुद्रण जुन १९५९

२१) गस्ती भिमराव- बेरड, प्रकाशक- दिलीप माजगांवकर, राजहंस प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, ऑगस्ट २००२

२२) गायकवाड प्राचार्य आर.डी. व इतर मराठेकालिन संस्था व विचार, प्रकाशक - मोरश्वर फडके, फडके प्रकाशन , कोल्हापुर, तिसरी आवृत्ती १९९०

२३) घोडके डॉ. ह.म.- महाराष्ट्र गाथा, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रकाशक-दिलीप माजगांवकर, पहिली आवृत्ती-२०००.

२४) चव्हाण वसंतराव- रामोशी समाज- एक क्रांती ज्योत, प्रकाशक - मा. आरडे प्रभाकर

२५) चव्हाण रामनाथ- जाती आणि जमाती, मेहता पब्लिसिंग हाउस, पुणे -१८८९, तिसरी आवृत्ती- २०००

२६) चव्हाण रामनाथ - भटक्या विमुक्तांची जात पंचायत

२७) चव्हाण वसंत - रामोशी समाज एक क्रांतीज्योत, प्रकाशक- मा. प्रभाकर आरडे, संपादक - आरडंट व्हयू १७७९ बी मंगळवार पेठ, कोल्हापुर.

२८) जोशी तर्कतीर्थ श्री लक्ष्मण शास्त्री- मराठी विश्वकोश (खंड-१४) संपादक- तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशक- सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ-१९८९

२९) जोशी अरुण व इतर- ब्रिटीश साम्राज्यवाद आणि भारत, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्र. आ.-२००१.

३०) ताटके अरविंद- आद्यक्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, प्रकाशक- संजय रामचंद् लिमये, मिनल प्रकाशन , कोल्हापुर १५ ऑगस्ट १९९३

३१) दाते रा.रा.- भारतीय स्वातंत्र्य युध्दाचे रण झुंजार काळ प्रकाशन, पुणे, १९८५

३२) देवगीरीकर त्र्यं.रं. -वासुकाका जोशी आणि त्यांचा काळ

३३) दिक्षित म.श्री -पिचलेली मनगटे, प्रकाशिका- बा.शा. इनामदार सौ. सुमिम ग. क्षीरसागर, अतुल प्रकाशन, पुणे. तृतीय आवृत्ती १० एप्रिल १९८६

३४) देशपांडे डॉ.कृ.प- कथा क्रांतिकारकांच्या भाग-२, प्रकाशक- संजय काकडे, अमोल प्रकाशन, पुणे, नवीन आवृत्ती-२०१२

